म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. २९९१



REFBK-0016298

काव्य-संदर्भ
८०७३४ - ८.५.७३
२११८



# बाळराज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ........
क्रमांक ........................ नों: दि:

संपादिका

डॉ. सरोजिनी बाबर
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती

REFBK-0016298

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५१६२०८

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प ६ वे

सर्व हक्क लोकसाहित्यसमितीच्या स्वाधीन.

प्रथमावृत्ति १ मे १९६२
द्वितीयावृत्ति १ मे १९६७

**मूल्य तीन रुपये**

सजावट
**चित्रकार श्री. गोडसे**

मुद्रक
**वि. पु. भागवत**
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
मुंबई ४

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्यसमितीच्या
वतीने महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण
संचालनालयातर्फे प्रकाशित.

## महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती

अध्यक्ष

**डॉ. सरोजिनी बाबर**

सभासद

**श्री. विनोद राव**

**सौ. कुमुदिनी पवार**

**श्री. बाजीराव पाटील**

**श्री. वि. वा. जोशी**

**श्री. सोपानदेव चौधरी**

**प्रा. गजमल माळी**

**प्रा. राजा महाजन**

**प्रा. वामनराव चोरघडे**

**डॉ. ग. मो. पाटील**

**श्री. के. जे. सात्रे**
अवर सचिव, उद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**श्री. य. ह. पिटके**
संचालक, प्रकाशन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**श्री. बापूराव नाईक**
उपसंचालक, लेखनसामग्री आणि मुद्रण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

चिटणीस

**श्री. बा. मो. बोधनकर**
शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

आवृत्ती पहिली

# संपादकीय

महाराष्ट्र सरकारच्या लोकसाहित्य समितीच्या वतीने चालू साली प्रकाशित होणारे सहावे पुष्प कोणत्या प्रकारे काढावे, यासंबंधी या समितीच्या सभासदांनी बरीचशी चर्चा केली. त्यावेळी अनेक विचार पुढे आले. परंतु मतभेदाला वाव मिळूनही लहान मुलांच्या संबंधीची लोकगीते प्रकाशित करावीत या विचारास एकमताने व आनंदाने पाठिंबा दिला गेला. हेतू एवढाच की, या समितीच्या पूर्वीच्या प्रकाशनांच्या मानाने हे प्रकाशन वैशिष्ट्यपूर्ण व्हावे.

शेवटी हा विषय निश्चित झाल्यानंतर हे प्रकाशन सचित्र केले जावे असाही एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आणि त्यासाठी सर्वानुमते चित्रकार श्री. दलाल यांच्याकडून रंगीत चित्रे काढून घ्यावीत असेही ठरविण्यात आले.

त्यानंतर ठरलेल्या या विषयाला धरून या ग्रंथाचे नाव 'बाळराज' असे निश्चित करण्यात आले व मजकुराची जुळवाजुळव सुरू झाली.

लोकसाहित्याच्या संशोधकांना व अभ्यासकांना वैयक्तिक अशी विनंतीपत्रे धाडल्यानंतर महाराष्ट्राच्या निरनिराळ्या दैनिकातून व आकाशवाणीवरून त्या विषयाचे निवेदन व मागणी जाहीर केली गेली.

त्यामुळे या कल्पनेस भरघोस पाठिंबा मिळाला. आवश्यक तेवढा मजकूर वेळेवर हाती येणे शक्य झाले. या कामी मराठीच्या काही नामवंत लेखकांनी जसे आपुलकीने साहाय्य केले, तसेच अनेक अप्रकाशित व्यक्तींनीही जिव्हाळ्याने हातभार लावला, हे नमूद करण्यास विशेष आनंद होतो.

या ग्रंथामध्ये 'बाळराजाचे'चे दर्शन दोन प्रकारे होत आहे. एका विभागात निरनिराळ्या लेखकांनी लोकगीतांवर आधारित असे लेख दिले असून दुसऱ्या विभागांत केवळ लोकगीते मिळाली तशी त्या त्या संग्राहकाच्या नावावर प्रकाशित केली आहेत. ह्या मजकुराची जुळवाजुळव होत असताना व संपादनाचे काम चालू असताना शक्यतोवर पुनरावृत्तीचा दोष टाळण्याचा कटाक्षाने प्रयत्न केला आहे. त्यातूनही काही ओव्या पुन्हा पुन्हा आलेल्या आढळल्याच तर वाचकांनी क्षमेच्या भावनेने तिकडे पहावे, असे नम्रतेने सुचवावेसे वाटते.

ही लोकगीते महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व विभागातून मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी देखील काही भाग राहून गेलेला आहे याची आम्हास जाणीव आहे.

हाती आलेल्या मजकुराचे संपादन करीत असताना मराठीचे एक कवी श्री. ना. ध. पाटील (पुणे विभागाच्या शिक्षण उपसंचालकांचे चिटणीस) यांची मदत झालेली आहे. तसेच या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी आमच्या समितीच्या बरोबरीने अशी महाराष्ट्र सरकारच्या प्रकाशन विभागाने अंगीकारिली हे या ग्रंथाचे एक उल्लेखनीय वैशिष्टय होय.

हा ग्रंथ उठावदार व्हावा म्हणून चित्रकार श्री. दीनानाथ दलाल व चित्रकार श्री. पाथरकर यांनी मौलिक साहाय्य केले आहे. या सहकार्याबद्दल लोकसाहित्य समिती त्यांची आभारी आहे. तसेच या ग्रंथासाठी ज्या लेखकांनी व संग्राहकांनी आम्हांस आपुलकीने सहकार्य दिले त्यांचेही समिती आभार मानीत आहे.

पुण्याच्या आनंद मुद्रणालयाचे संचालक श्री. दादा जोशी यांनी हा ग्रंथ एवढ्या चांगल्याप्रकारे छापून दिल्याबद्दल ही समिती त्यांचीही ऋणी आहे.

**डॉ. सरोजिनी बाबर**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती

रंगपंचमी
दि. २६–३–१९६२

आवृत्ती दुसरी

## संपादकीय

'बाळराज'ची पहिली आवृत्ती १९६४ च्या प्रारंभीच्या कालातच संपली आणि त्यामुळे या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढण्यासंबंधीचा विचार लोकसाहित्य समितीपुढे आला. त्यावेळी ही दुसरी आवृत्ती पूर्वीच्यापेक्षाही अधिक आकर्षक काढण्यात यावी यासंबंधी एकमत झाल्यामुळे पूर्वीची सर्व चित्रे रद्द केली गेली व ग्रंथाचा आकारही बदलण्यात आला. तसेच ग्रंथाची जुळणी वेगळ्या धर्तीने करण्यात आली. पूर्वीचा मजकूर विषयवार निवडला गेला आणि काही नव्यानेही भर घालण्यात आली. शिवाय काही लेख पूर्वीच्या यादीतून कमी करण्यात आले, काही संक्षेपाने घेतले गेले तर काही नवीनही लिहून घेण्यात आले. डॉ. उपाध्याय यांचा हिंदीतील लेख या ग्रंथात आणखी एक वेगळे वैशिष्ट्य म्हणून समाविष्ट केला गेलेला आहे. म्हणजे या सर्व ग्रंथाची रचनाच एकदम वेगळी झालेली असून संपादकीय प्रस्तावही नव्याने लिहिण्यात आलेला आहे.

लहान मुलांच्यासंबंधीचा हा ग्रंथ असल्यामुळे चित्रकार श्री. द. ग. गोडसे यांनी त्या दृष्टीने सर्वत्र केलेली सजावट या ग्रंथाचे एक आगळे वैशिष्ट्य दर्शवीत आहे यात शंका नाही.

वास्तविक हा ग्रंथ याहीपेक्षा अगोदरच या नव्या थाटाने प्रकाशित व्हावयाचा होता. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे झालेल्या या दिरंगाईबद्दल आम्ही दिलगीर आहोत. लोकसाहित्याचे अत्यंत आदराने, प्रेमाने व आपुलकीने स्वागत करणाऱ्या आमच्या असंख्य वाचकांची व या ग्रंथास सहाय्यभूत झालेल्या लोकसाहित्यकारांची समिती फार ऋणी आहे.

१ मे १९६७ डॉ. सरोजिनी बाबर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १६२६८

## अपूर्वाई—

वयाचं भान उरत नाही, काळवेळ समजत नाही, तुझं माझं ठाऊक नाही, जबाबदारीची जाणीव उरत नाही, घरातलं दारातलं उमगत नाही, आपलं अस्तित्व उरत नाही, तुझ्याशिवाय भागत नाही, दुनियेची फिकिर माहीत नाही असल्या अपूर्वाईत माणूस असला की, त्याच्यासारखा नशीबवान तोच म्हणावा. आल्या घडीत तो अशावेळी असा काही दंग असतो की, काय सांगावं? पोराहून पोर झालेल्या ह्या माणसाला म्हणावं तरी काय! घरातलं किंवा जिव्हाळ्यातलं बाळ दिसलं रे दिसलं की, ह्याची कळी खुलून जाते. जसा काय जन्माचाच सारा शीणभाग उतरून अंगावरून फेकून द्यावा अशा थाटानं तो सुखावतो. इंद्रसभेतल्या ऐटीनं. नवलाख तारांगणांच्या उमेदीनं दाही दिशांच्या साक्षीनं. कुबेरापेक्षाही पलीकडच्या धनदौलतीनं. मनाच्या उभारीनं. तर ते बाळ म्हणजे त्याच्या जिवाचा विसावा. वाढत्या वयानं अंगावर पेललेल्या जबाबदारीचा विरंगुळा. त्यामुळं बाळ जन्माला आलं म्हणजेच त्याचा मनमोर आनंदानं डोलू लागतो. हर्षाची गुढी दारी उभारतो. सवाष्णींच्या हातांनी अंगणांत पाण्याच्या घागरी ओततो. सनईचौघडा वाजू देतो. आत्मविश्वासानं मनातील आशाआकांक्षांचे इमले उभारतो.

अशावेळी इंद्रधनुष्याची रंगीत गाडी करून त्याला चंद्रसूर्यांचे दिवे लावीत विश्वाला गवसणी घालायला निघायचा मोह त्याला होतो. अद्‌भुत चमत्कारांच्या दुनियेत शिरून कल्पनेचं प्रचंड उड्डाण घेऊन आकाशाचा वेध घेत बाळासाठी बाळलेणी घडवायची तयारी करतो. त्याची हौस अशी तालेवारीनं नटून पुढं पुढं झेपावते. त्यामुळं इंद्रसभेच्या सोनाराच्या घरी ठिणगुल्या उडताना बाळाचे कडीतोडे घडलेले पाहायचे भाग्य त्याला लाभते. आणि मग उगवतीच्या दिमाखानं डोईवर चमकणारं जावळ हवेत भुरभुरू उडत असताना हसऱ्या मुखानं आपल्याकडे झेप घेणाऱ्या बाळाच्या हास्यात त्याला जणु विश्वाचं दर्शन घडतं. भगवान श्रीकृष्णाच्या बाळलीला अशावेळी त्याच्या नजरेत खेळू लागतात आणि कृष्णरूप धारण करूनच हा बाळ आलेला आहे या भावनेनं तो खुळाभैरा होऊन जातो. त्याला विलक्षण आनंद होतो. कवतिकाच्या राशीवर चढून त्या बाळाला सजवायचा मोह अनावर झाल्यामुळं खुद्द सागर उफडा करून त्यातील ठळक रत्नं वेचायला देखील त्याची कल्पना धजावते तर! खरं ना! म्हणून त्याचा हिरमोड होणार नाही याची खबरदारी घेतच अशावेळी त्याच्या घराण्याची वाडवडिलार्जित संस्कृती त्याच्या पाठीशी उभी राहाते. त्याच्या पोटात न मावणारा आनंद मग उसळ्या घेत ओठांवर येतो आणि त्याच्या मुखी बालवेद शिणगारतात—

*पेरा झाला रानातून मोड करी वर मान*
*तसं हसे माझं तान्हं पाळण्यात*
*थुई थुई उडे कां ग कारंजे उसळे*
*तुझ्यामुळे उचबंळे तान्ह्या बाळा*
*काजवे फुलले फुलले लाखलाख*
*पहाया श्रीमुख राजसाचे*

त्यामुळं अशा वेळी बाळाला अंगाई गायचा त्याला मोह होतो. त्यासाठी वहात्या वाऱ्याला, दरवळत्या फुलाला, गात्या पक्ष्याला, उमलत्या कळीला, चालत्या माणसाला, डुलत्या झाडाला, लोंबत्या पारंबीला, नाचत्या कमळाला, खळखळत्या नदीला, पळत्या हरणाला, गरजत्या मेघाला, डरकाळत्या जनावराला आणि झोके देत्या माणसाला जरा बेतानं ध्या म्हणून तो हात जोडतो. बाळाला निजेनं घेरलंय तर त्याला निजूंद्या खुशालीनं असं आवर्जून म्हणतो. त्यातूनही बाळ या कुशीवरून त्या कुशीवर व्हायला लागलंच तर मग हलक्या हातानं त्याला कुरवाळीत आणि थोपटीत त्याचे ओठ हालू लागतात—

*बाळा जो जो रे निज बाळा*
*स्मितहासा वेल्हाळा*
*धरी मी करतल ताला*
*अंगाई, तुजला ही लडिवाळा*
*जो जो जो जो रे*

अशावेळी कोठून ना कोठून ऐकलेली अनेक अंगाईगीतं त्याच्या आठवणीचा उपसा करीत पुढं झेपावतात. म्हणून शेलक्या कल्पना, वेचक शब्द, सुंदर आदर्श, ठळक भावना, आकर्षक स्वर या सर्वांचा चोखामेळा बसतो. त्या कारणानं बाळ तर झोपून जातोच पण गुणगुणणाराचाही आवाज मंदावून जातो. आपल्यामुळं बाळ निजला या अपूर्वाईनं तो एवढा सुखावतो की, त्याचा सारा शीणभाग नाहीसा व्हावा. झोपलेल्या बाळाच्या दर्शनानं तो जसा वेडावून जातो आणि—

*तान्हियाचे दात जसे डाळिंबाचे दाणे*
*खेळविते कौतुकाने बाळराजा*
*तान्हियाचे दात जशी मोतियांची जाळी*
*हासता पडे खळी गोड गाली*
*मोठे मोठे गाल भिवया लांबरुंद*
*गाल गोरे लालबुंद राजसाचे*
*चंद्राची वाढे कला तसे बाळाचे बाळसे*
*लावण्या उणे नसे अणुमात्र*
*श्रीमंताचा डौल तुझा बाई पुरा कर*
*सोनेरी चंद्रकोर बाळ माझी*

अशा सुंदर कल्पनांची खैरात करीत आपलीच दृष्ट होईल एखादवेळ बाळाला म्हणून जीभ चावतो, एवढंच नाहीतर आपल्या मनातील शंकेने दूरदूर पळून जावं म्हणून की काय—

*टाळिया नंदा बाळा गोविंदा*
*बाळाच्या हाती रंगीत काठी*
*बाळ गेलं दीदी हरपली मुदी*
*मुदी कशाची मुदी माशाची*
*बाळ कशाचं बाळ नवसाचं*

असल्या बडबड गीताच्या आहारी जाऊन बसतो. त्यामुळं पोराहून पोर होत त्याचं वय मागं सरतं आणि आपल्या बालपणीच्या गमती जमती आठवीत त्याला अस्मान टेंगणं करावंसं वाटतं ! शप्पथ !!

आजोबांच्या खांद्यावर बसून त्यांच्या डोईवरच्या पागोट्याच्या नागमोडी पिळात आपले हात गच्च खुपसून मनमुराद हसत न् आजोबांना पायांच्या तडाख्यानं पुढं चला म्हणून रेटीत नेणाऱ्या चिमुकल्याचा अशावेळी त्याला हेवा वाटतो. एवढंच नाहीतर त्या बाळाच्या हसण्यामुळं दिसणाऱ्या नाजुक दोन दातांच्या वयाचं आपणही व्हावं आणि डोईवरच्या टोपड्याचे गोंडे उडवीत असंच वडीलधाऱ्यांच्या खांद्यावर बसून मिरवावं असा त्याला विलक्षण मोह होतो. म्हणताना पोलार वाळ्यांच्या न् पैंजण तोड्यांच्या पायानं डौलानं चालत एकेका पायाची खूण उठवीत या येथून त्या तिथंपर्यंत चालून गेलेल्या एके काळच्या आपल्या पायांना तो उगाचच गोंजारीन म्हणतो. तेवढ्यात घरातलं तान्हुलं त्या दिमाखानं आपला तोल सावरीत पुढं येऊन त्याच्या पायाला बिलगतं आणि खाऊचा हट्ट घेऊन भोकाडही पसरतं. तर अशावेळी त्याला एवढा आनंद होतो की, कवतिकानं त्या बाळराजाला कडेखांदी उचलून घेऊन त्याच्या गालावर ओघळलेले आसू आपल्या ओठांनी टिपीत त्याला हवं ते द्यायला तो उत्सुक होतो. वेळेला मी आपला जीव गहाण टाकीन पण तुझा हट्ट भागवीन या ईर्षेनं तो बाळाला काय पाहिजे म्हणून विचारतो. त्यावेळी बाळाप्रमाणं त्याचीही वाणी बोबडी होऊ पाहाते आणि सापाचा चाबुक, कडाडत्या विजेचा दोर, चांदोबाचा दिवा आणि चांदण्यांचे सागरगोटे मागणाऱ्या कृष्णदेवासारख्या बाळराजाची हौस भागवायची असेल तर ती मीच भागवावी या तालेवारीनं त्याचं मन मोहरून उठतं. पण बाळाला हवा असतो साधा गूळ न् तो आई देत नाही म्हणून त्यानं धिंगाणा घातलेला असतो हे कळल्यावर 'एवढंच होय ? चल देतो' असली भाषा करून तो आपल्या हातानं गूळ देतो. आपले कपडे त्यामुळं मग चिकट होतील ही भीतीदेखील त्याला शिवत नाही. उलट बाळानं चिकट्या हातांनी आपल्याला बिलगताना होणारा आनंदच त्याला अपूर्वाईचा वाटतो. म्हणून असा माणूस मेवेकऱ्याच्या घरी जाईल. तिथं लाकडी साच्यात पाक ओतून तयार होणारी साखरेची खमंग चित्रं बाळासाठी घेऊन येईल. त्यातले चिऊकाऊ दाखवून बाळाला खेळवील. बाळानं मोडलेल्या चित्रांचे फुटके तुकडे स्वतः चावून खाईल आणि अशा खाण्यानं खरकट्या झालेल्या बाळाचे पोटभर मुके घेऊन त्याच्यापुढं खाऊचं झाड आणून ठेवायचं वचन देऊन मोकळा होईल ! खरंच !! त्याशिवाय त्याला बरंच वाटायचं नाही तर !

आपलं मोठेपण घटकाभर विसरून लहान बाळाशी गुलुगुलु गोष्टी करीत बसताना हा माणूस देहभान विसरून जातो. लहान लहान वाक्यं घ्यावीत, यमकबद्ध बोलावं, अद्‌भुतरम्य सांगावं, पशुपक्ष्यांना बोलायला लावावं, चॉकोलेटचं झाड रोवावं आणि दाही दिशांना खेळायला बोलवून धरित्रीचं अंगण सजवून टाकावं म्हणजे औट घटकेतल्या राजाचं राज्य भोगल्याचा आनंद सांगणाराला न् ऐकणाराला पण होतो. अशा वेळी इंद्रसभा चंद्रसभा बसावी त्या डामडौलानं बाळराजे बसलेले असतात आणि सर्कशी-तल्या विदुषकानं अवचितच काही भव्य दिव्य दाखवीत चमत्कार करीत हसवून सोडावं त्या थाटानं सांगणारा ऐटीत आलेला असतो. त्यामुळे हा चोखामेळा बघून ते सारं घर आनंदानं हुंकारतं आणि—

*पालख पाळणा बाई मोत्यांचा खेळणा*
*जोजविते आत बाई लाडका चिमणा*
*शिंपांचा मळा बाई स्वातीनं शिंपला*
*मोती मोती टिपुन तुझ्या छताला गुंफला*
*सागर सांडूनी बाई माणीक धुंडुनी*
*चंद्रसूर्य जडविले इवल्याशा गगनी*

या कवतिकानं लाडाकोडात बाळाला वाढविल्याचं सार्थक झालं असं बाळाच्या आईला, मावशीला, आजीला, आक्काला आणि आत्याला वाटतं. अशा वेळी त्या बाळाची आई तर हारखून टुम्म होते जशी. मीच यशोदा मीच देवकी या रुबाबानं तिची काया रोमांचित होते. वात्सल्य तिच्या उरीपोटी दाटून येतं आणि ती आपल्या बाळाला एकदम पोटाशी धरीत म्हणते कशी, "फार नको शहाणा होऊस. दृष्ट होईल राजाला." अशा वेळी आपल्या बाळानं कृष्णदेवासारखं अवखळ व्हावं, आपण त्याला रवीदोरानं जखडून ठेवावं, त्यातूनही निसटून जात त्यानं पेंद्यासारख्या साथीदारांना घेऊन गोकुळच्या बाहेर पाऊल टाकावं, चिंतेनं आपला जीव व्याकूळ व्हावा, गावोगाव सांगावे जावेत, जासूद धाडावेत आणि बाळाच्या सईनं फुटलेल्या पान्ह्यानं लांबवरची झेप घेत थेट गोव्यातला दूधसागर उभा करीत आपल्या गोविंदाबरोबर सगळ्या लहानग्यांची तहान-भूक हरपून टाकावी या मोहानं ती भांबावून जाते. बाळाच्या टाळूवरील केसातून हात फिरवीत तिचे डोळे मिटले जातात आणि ती एक प्रकारच्या अननुभूत अशा समाधानात दंग होऊन जाते. स्वर्गीय सुखाचा आनंद तिला त्यावेळी गवसतो. त्यापुढं चंद्रतारकांचंही सौंदर्य फिकं पडतं. ते बघून हा माणूस एवढा सुखावतो की, "एक होता राजा

न् एक होती राणी" अशा थाटानं गोष्ट सांगताना आटपाट नगरीला त्यानं ह्या बालगोपाळांपुढं केव्हाच आणून उभी केलेली असते. त्यासाठी पोपटाच्या रथाला उंट जोडलेले असतात, मुंगीच्या गाडीला हत्ती जुंपलेले असतात, वाघोबांच्या जोडीला हरीण घेतलेले असते आणिक कासवाबरोबर झाडावरची मैना गोष्टी करीत चिवचिवलेली ऐकू येते. म्हणताना लहान मुलांच्याप्रमाणेच मोठ्यांच्याही मनाला या दुनियेची भुरळ पडून या जादूच्या नगरीत राहायचा मोह टाळणं अशक्य झालेलं असतं. त्या कारणानं चंद्रमौळी झोपडीत राहाणाऱ्या सासुरवाशिणीनं आपल्या लाडक्याच्या कवतिकाच्या गोष्टी करताना चारचौघींच्यापुढं मोठ्या डामडौलानं ठेवलेला—

*नदीच्या कडयिला ग बाई मी वाळू शेवाळिली*
*ग बाई मी वाळू शेवाळीली*
*त्या बाई वाळूयिचा ग बाई मी चिखल बनविला*
*ग बाई मी चिखल बनवीला*
*त्या बाई चिखलाच्या ग बाई मी विटा बनविल्या*
*ग बाई मी विटा बनवील्या*
*त्या बाई विटायाची ग बाई मी चूल बनविली*
*ग बाई मी चूल बनवीली*
*त्या बाई चुलीवरी ग बाई मी पाणी तापविलं*
*ग बाई मी पाणी तापवीलं*
*चांदीच्या घंगाळात ग बाई मी पाणी विसणिलं*
*ग बाई मी पाणी विसणीलं*
*काचेच्या न्हाणीमधी ग बाई मी बाळक न्हाणीयलं*
*ग बाई मी बाळक न्हाणीयलं*
*जरीच्या रुमालानं ग बाई मी बाळक पुशीयिलं*
*ग बाई मी बाळक पुशीयिलं*
*रंगीत पाळण्यात ग बाई मी बाळक निजविलं*
*ग बाई मी बाळक निजवीलं*
*अकाट्या शेकाट्यांनी ग बाई मी पाळणा लांबविला*
*ग बाई मी पाळणा लांबवीला*

हा मनोभाव त्याला अपूर्वाईचा वाटतो. शिवाय त्या लवांकुशाच्या गोष्टीतील सीतामाईनं नदीकडेच्या झाडावर बसलेल्या माकडणीनं आपल्या मुलाला प्यायला घेतलेलं बघून वाम्याखुम न् अस्वस्थ होऊन आपल्या लेकाला धावतपळत जाऊन आणून पदराखाली घेतलेलं तिला जेव्हा दाखविलं तेव्हाच समाधानाचा सुस्कारा सोडला म्हणजे काय झालं त्यातली पण गंमत त्याच्या ध्यानात येते. आईचं काळीज बाळाला बघून सुपाएवढं होतं म्हणजे काय होतं याचा त्याला अंदाज घ्यायला या गोष्टी कारणीभूत होतात. एवढंच नाहीतर—

*सालम सलकी, तुझीमाझी पालखी*
*पालखीत बसू, खोबरं खिसू*

असं मोठ्या ठसक्यानं म्हणत लेकीला खेळायला शिकविणाऱ्या आईच्या उत्साहाची पण कल्पना तो करू शकतो आणि—

*चल ग राधे बनात ग*
*चाफ्याचं फूल माझ्या कानात ग*

या गीताच्या ढंगदार स्वरात आपला स्वर मिसळीत या मायलेकींच्याबरोबर नाचायला पण पुढं येतो! अशा वेळी आंब्याच्या झाडावर फांदीला येणाऱ्या खनोखनी गुंजेसारखी त्याची भावना मोहरून उठते आणि—

*फुगडी खेळू थंकुटा*
*भाऊ माझा धाकुटा*
*सोन्याचा ग करगुटा*
*मोती किती लावूं?*
*मामाची लेक आली :*
*नांव काय ठेवूं :*
*खंडीभर दाण्याचं :*
*वाण काय देऊं?*
*टीचभर खणाची :*
*चोळी काय शिवूं!*

या गीताशी समरस व्हावं म्हणते. त्यामुळं दवानं माखलेल्या पाणंदीच्या पाऊलवाटेनं चालताना भर्जरी शालूचा पदर भिजावा तसा तो सुखावतो. सोन्याच्या चवरंगावर बसून

मोत्यांचा चेंडू झुगारीत आकाशातील मण्यांची माळ गुंफणाऱ्या कृष्णदेवाप्रमाणं आपण ऐटी मिरवावी असंही त्याला वाटतं. ते सुख भोगता यावं म्हणून मग इंद्राच्या दरबारात जाऊन लोळणफुगडी खेळायला त्याची तयारी होते. त्यासाठी कवतिकाच्या, लाडा-कोड्याच्या, साता नवसाच्या बाळराजाप्रमाणे करवंदीच्या जाळीतून आणि मखमलीच्या ताटव्यातून जाणाऱ्या वाटेनं बिनघोरी पुढं होत चिरेबंदी वाड्यातील गुंजावणी डोळ्यांच्या पाखराशी खेळायला मामांच्या गावी जायला तो निघतो देखील! त्या कारणानं झुनुक झुनुक जाणाऱ्या, खिडकीवाटे पहाणाऱ्या आणि रंगांची कारंजी जागोजाग उडवणाऱ्या भोपळ्यातील म्हाताऱ्या आजीची सोबत त्याला घ्यावीशी वाटते. नाजुक ससांच्या जोडीनं सजवलेल्या रंगीत गाडीत बसायचा मोह त्याला अनावर होतो. वाटेत नीट रस्ता दाखवायला म्हणून चंद्रसूर्यांचे घोडे जुंपलेल्या उगवतीला लाल शेंदराच्या खापीतून वर येत खेळायला ये म्हणायला त्याला अभिमानाचं भरतं येतं. कौस्तुभाच्या तेजानं झळाळणाऱ्या मामामामींच्या, आजोबा आजींच्या, काकामावशींच्या श्रमानं काठोकाट भरलेला अमृतकलश उफडा करून त्यातला एक घोट तिनंही घ्यावा असं त्याला मनापासून वाटतं. त्यासाठी रत्नजडित सिंहासनावर बसून उगवतीला निरोप द्यायला पाहिजे ही भावना त्याला स्पर्श करून जाते. म्हणून दुनियेतील सगळं ऐश्वर्य वेचून घेऊन आलेली रानपाखरं आपल्या चोचीतील धनदौलत त्याच्यापुढं ठेवतात. त्यासरशी धुरांच्या रेघा हवेत काढणाऱ्या झुकझुकत्या गाडीत बसून चांदीसोन्यांच्या पेठांचं गाव असलेल्या मामांच्या घरी निघालेली बालमंडळी तिथं येऊन डोकावतात. म्हणताना इंद्रनिळांचे हंस व कोकीळ, मोत्या पोवळ्यांचे राघुमैना, हिऱ्यामाणकांचे चिऊकाऊ, पांचुचे शुकमोर, रत्नजडित हत्तीघोडे, भर्जरी शेलेदुपेटे, किनखापांचे अंथरूणपांघरूण, गझनीच्या गाद्याउशा, चांदीचे गडवेपेले, सोन्याचं घंगाळ, गंगाभागीरथीचं पाणी, राजगिरी अतर असलं एकेक त्यातून उठून बाळराजांना सामोरे येतं आणि त्या जादूच्या नगरीत हा माणूस खुळाभैरा होऊन आनंदानं डुंबत रहातो. अशा वेळी त्याची कल्पना प्रचंड उड्डाण घेत नवलाख तारांगणातून झेपावते. लाडक्या बाळासाठी घरी आणलेला कांचनी पालख, खुतनीची कुंची, खरीबिंदल्या, अंगडं टोपडं, काजळतीट, रत्नजडित पिंपळपान, घुगऱ्या, येसबंदाचा झुपका हे सारं त्यांना दाखविताना त्याला अस्मान ठेंगणं होतं. म्हणून तो विचारतो की, चांदण्याचं तेज आगळं का माझ्या बाळाचं? त्यासरशी लुकलुकत्या चांदण्या ह्या माणसाच्या राजबिंड्याला अंगाई गात आपला भपका फिक्का असल्याचं कबूल करतात! म्हणताना हा ढगांची शिडी करीत न् खराट्याच्या एका

झपाऱ्यासरशी खालची दुनिया वर घेऊन आलेल्या हरभरे भरडल्या म्हातारीला हे बाळगोपाळ भेटायला घेऊन जाईन म्हणतो. तिथं जाऊन गरजत्या ढगाला दटावीत हत्तीच्या सोंडेनं कोसळतेल्या मेघधारांचा चांदवा धरून ह्या चिमण्यांना मंगलस्नान घडवून गारांच्या ढिगांवर बसवीन म्हणतो! त्या कारणानं घरोघरी ऐसपैस पसरलेले गारवेल धा धावून वाढीस लागतील व आभाळाच्या काळजाला जाऊन भिडतील आणि त्यातल्या पानावर बसून मुलं चांदण्यांच्या जगात सहज जाऊन येतील या आनंदात तो दंग होऊन जातो. म्हणताना रंग, रूप, रस, गंध इत्यादी सर्वांच्या स्पर्शानं त्याचं समाधान न्हाऊन उठतं, पुनीत होतं. त्यामुळं हर्षभरानं आपल्या बाळराजाला कुरवाळीत जीवनातील परमोच्च सुखाचा धनी होऊ पहातो. अशा वेळी त्याची ब्रह्मानंदी टाळी इतकी लागते की, त्याबद्दल कुणी काय बोलावं आणि कोणत्या भावनेला घेऊन कुठल्या शब्दांनी पुढं व्हावं? छे! त्याबद्दलचं वर्णन करणं आमच्यासारख्यांच्या वाणीच्या ताकदी बाहेरचं होतं आणि मग त्याचं त्यालाच सगळं लखलाभ होऊन बसतं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

अनुक्रमणिका

*भाग १ ला*


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| अंगाई | २ |
| कवतीक | १७ |
| दृष्ट | १०५ |
| संस्कार | ११७ |
| बाळगाणी | २२७ |


*भाग २ रा*

विविध लेख


| | | |
|---|---|---|
| बाळगोपाळ | श्री. ना. रा. शेंडे | २५१ |
| विदर्भातील बालविषयक लोकगीते | डॉ. य. खु. देशपांडे | २६४ |
| बाळ राजस ग माझा | श्री. न. शे. पोहनेरकर | २७३ |

विषय पृष्ठ


| | | |
|---|---|---|
| जुनी संस्कृती | श्रीमती गिरजाबाई केळकर | २८७ |
| बाळलेणी | डॉ. सरोजिनी बाबर | २९६ |
| अंगडीचं होतं–थोंगडीचं झालं | सौ. तारा परांजपे | ३०८ |
| लोकसाहित्यातील लेकरू | डॉ. ग. वा. तगारे | ३१८ |
| खानदेशी लोकगीते | प्रा. गजमल माळी | ३२१ |
| माणिकमोत्यांची रास | प्रा. आनंद यादव | ३३५ |
| कोकणी लोकगीते | सौ. कमला वाघ | ३४३ |
| तान्हं बाळ | सौ. मालतीबाई दांडेकर | ३५७ |
| वेडी माया | सौ. कुमुदिनी पवार | ३६३ |
| लोकगीतातील आई | श्री. पां. र. शिंदे | ३६८ |
| शिशुगीते (जुनी) | श्रीमती आनंदीबाई शिर्के | ३८० |
| बाळराजविषयक मराठी व अन्य प्रांतीय लोकगीते | डॉ. सौ. सविता जाजोदिया | ३८६ |
| हिन्दी के बालगीत | डॉ. कृष्णदेव उपाध्याय | ४१७ |

## या ग्रंथातील संग्राहक

१ कु. विद्या देसाई
२ सौ. शांताबाई लिमये
३ सौ. निर्मला धारप
४ श्री. जनार्दन वाघमारे
५ सौ. वीणा दीवाणजी
६ सौ. इंदिराबाई भाटवडेकर
७ श्री. वि. वा. जोशी
८ सौ. पार्वतीबाई गुंजाळ
९ सौ. कुमुदिनी पवार
१० सौ. गंगूबाई बाबर
११ डॉ. सरोजनी बाबर
१२ सौ. सिंधू वारनूळकर
१३ श्री. ना. रा. शेंडे
१४ सौ. हव्वाबी खान
१५ सौ. नलिनीबाई शिंदे
१६ श्रीमती जानकीबाई पाटील
१७ श्री. ग. ह. पाटील
१८ श्री. बाबासाहेब बापूसाहेब देसाई
१९ सौ. लीलावती पवार
२० सौ. शरदिनी मोहिते
२१ सौ. शांतादेवी बाबर
२२ श्रीमती आनंदीबाई शिर्के
२३ सौ. सुशीलाबाई शितोळे
२४ श्री. दा. गो. बोरसे
२४ श्री. रा. श्री. कदम
२६ श्रीमती लक्ष्मीबाई महाजन
२७ सौ. उषाताई माटे
२८ श्री. अशोक देशपांडे
२९ श्री. हरिहर मातेकर
३० श्री. उ. भा. कोठारी

३१ सौ. शुभाताई घोरपडे
३२ श्री. न. शे. पोहनेरकर
३३ सौ. पार्वतीबाई मोरे
३४ सौ. सावित्रीबाई रेखी
३५ श्री. गो. ल. जमदाडे
३६ सौ. इंदुबाला ढेरे
३७ डॉ. विमल चोरघडे
३८ प्रा. सौ. विमल थत्ते
३९ डॉ. हरिकिसन राठौर
४० श्री. गणेश दामोदर कुडे
४१ सौ. पार्वतीबाई किर्लोस्कर
४२ सौ. गंगाबाई धारप
४३ श्री. सदाशिव माळी
४४ श्री. बाजीराव पाटील
४५ श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार
४६ श्रीमती नलिनी रसाळ
४७ सौ. सुलोचना फडके
४८ सौ. शकुंतला पवार
४९ श्री. माधव नावडीकर
५० श्री. रावसाहेब जगताप
५१ कु. विमल तपस्वी
४२ श्री. वा. रा. पवार
५३ श्रीमती गिरजाबाई केळकर
५४ सौ. तारा परांजपे
५५ डॉ. ग. वा. तगारे
५६ प्रा. गजमल माळी
५७ प्रा. आनंद यादव
५८ सौ. कमला वाघ
५९ सौ. मालतीबाई दांडेकर
६० श्री. पां. र. शिंदे
६१ डॉ. यशवंत खुशाल देशपांडे
६२ सौ. मंगला नावडीकर

# भाग पहिला

## अ नु क्र म


- अंगाई
- कवतिक
- दृष्ट
- संस्कार
- बाळगाणी



# अंगाई

# अनुक्रम

निजसर आले डोळे—

*संग्राहक* ⁘ कु. विद्या देसाई

⁘ सौ. शांताबाई लिमये


⁘ सौ. निर्मला धारप

⁘ श्री. जनार्दन वाघमारे

⁘ सौ. वीणा दिवाणजी

⁘ सौ. इंदिराबाई भाटवडेकर

⁘ श्री. वि. वा. जोशी



# निजसर आले डोळे—

पोवळ्यांच्यासारख्या ओठांचं, टाळांच्या टोपणासारख्या डोळ्यांचं, कर्दळी-सारख्या रेखीव काजळटिकलीचं, मऊ मऊ अंगाचं, भुरुभुरु उडणाऱ्या जावळाचं, गुलाबासारख्या सतेज चेहऱ्याचं, हसऱ्यावृत्तीचं, देखण्या रूपाचं, रुणझुणत्या वाळ्यांचं, वाघनख न् सरी बिंदलीचं, गळ्यातल्या ताईताचं, कमरी गोफाचं, खेळत्या वयाचं आणिक आपल्या जिवाच्या विसाव्याचं असं सुखनिधान झालेलं गोजिरवाणं बाळ झोपेला आलं म्हणजे भारी रडतं. डोळे चोळतं, आईला घे म्हणतं. तिच्याच मांडीवर लोळावं म्हणतं. तर अशा वेळी त्याच्या डोळ्यात नीज येते. आईच्या काळजात वात्सल्याचे उमाळे दाटतात. उरी पोटी पान्हा फुटतो. आणि पदराखाली घेतलेल्या बाळानं निजावं म्हणून तिचे ओठ आनंदानं हलू लागतात. बाळाला लवकर झोप यावी या हेतूनं तिचा स्वर सजतो. काळीज फुलतं. वेचक शब्दांनी तिची कल्पना मोहरून उठते. शब्द आणि भावना यांचा सुंदर संगम घडतो आणि कंठातून निघणारा सूर त्यात मिसळून

जातो. अंगाईला बाळसं येतं न् बाळाला त्या तालासुरात झोप जवळ घेऊ पाहाते!....

बाळाची नेत्रं मग भुलतात. हत्तीणी दातांच्या पालख पाळण्याची सोनेरी पालखी होते. जाईमोगऱ्यांच्या अंथरुणावर बाळराजस सुखावतो. मोत्यांचा खेळणा वर डोलू लागतो. पालख झेपावतो. त्यासरशी सागर उफाडा होतो. रत्नामाणकांची खाण वर उसळ्या घेते. हिरेजडित राघूमैना खेळण्यावर नाचू लागतात. चंद्रसूर्यही त्या इवल्याशा गगनाला मिठी मारतात! त्यासरशी आईच्या गीताला उधाण येते. त्या स्वरानी बाळ सुखावते न् त्या नादात झोपी जाते. बाळराजाच्या मुखावर यावेळी पसरणारे समाधान आईला एवढा अपूर्वाईचा अनंद देते की, त्या क्षणाला तिला स्वर्गही तुच्छ वाटू लागतो!

## १

संग्राहिका : कु. विद्या देसाई

१

पाळणा पाचूचा वर खेळणा मोत्यांचा
आत बाळ नवसाचा निद्रा करी
निजसर आले बाळा तुझे डोळे
अंथरूण केले जाईजुईचे
अंथरूण केले जाई मोगऱ्याचे
बाळ गोजिरे ग माझ्या ताईचे
नीज नीज बाळा म्हणू किती तुला
गुलाबाच्या फुला अता राजसा
नीज नीज बाळा सोन्याच्या पालखी
तुला रक्षण जानकी आणि रघुनाथ
तिन्हीसांज झाली दिवे लावणीची वेळ
थांबविशी खेळ अता राजसा
नीज नीज बाळा लाडक्या विठ्ठला
अंगाई ही तुला बाळराजा

२

पालक पाळणा बाई मोत्यांचा खेळणा
जोजविते बाई माझा लाडका चिमणा
शिंपांचा मळा बाई स्वातीनं शिंपीला
मोती मोती टिपूनी तुझ्या छताला गुंफीला

सागर सांडूनी बाई माणिक धुंडूनी
चंद्र सूर्य जडविले इवल्याशा गगनी

३

पालक पाळयीना वर खेळना परकाराचा
माज्या ग बाळायाचा मामा मैतर जिनकराचा
पालक पाळयीना वर खेळना सोलापुरी
माजा ग बाळराज आत नेनंता मजा करी
पालक पाळयीना मोती लावीते दोरीला
माज्या ग तान्यायाला नीज म्हणीते हरीला

४

दंडाचा पारना लावीन धरना
नीज बाळा सरावना
दंडाच्या पारन्याले सोन्याचे आकोळे
बाळा तुही निद्रा भोळे
दंडाचा पारना वाजते कारकीर
राधा झोपली बिनघोर
दंडाचा पारना दंडुल्या मारते
तानं बाळ जोजुवते
दंडाचा पारना करसूत्र सोनीयानं
घर शोभले नानयानं
दंडाच्या पारन्याले पीतांबर साजं
उघडा झोपे गणराज
दंडाच्या पारन्याले फुलांची केली शेज
माहा झोपते काळीज

२

## संग्राहिका : सौ. शांताबाई लिमये

जो जो आंगाई आंगाई मंगाई
तान्ह्या बाळाची कांगाई
नीज का ग नाही बाळाच्या डोळीये
अंथरूण केले पांघरूण शेला
निजविते तुला तान्ह्या बाळा
अंथरूण केले जाई मोगऱ्याचे
बाळ गोजीऱ्याचे अंग मऊ
नीज रे बाळा लागो तुझा डोळा
कुणाची घननीळा दृष्ट झाली
जो जो ग जोखलं डाळिंब पिकलं
बाळ सवकलं गाणीयाला
पाळण्याची दोरी हालविते कोण
बाळाची बहीण कुमूताई
हातऱ्या कुतऱ्या शुक गे माऊ
कुणाची दृष्ट होऊ तान्हूल्याला
ये ग तू ग गाई चरूनी भरूनी
तान्ह्या बाळा म्हणूनी दूध देई
तान्हं बाळ खेळे वाजताती वाळे
निवतील डोळे सखीयांचे
तान्हं बाळ खेळे अंगणी ओसरी
तुला संगत दुसरी गोविंदाची
माझीया अंगणात सांडली दूधपुरी
जेवला श्रीहरी तान्हा माझा

माझीया अंगणात सांडली दूधफेणी
जेवली हिरकणी चिंगूताई
आमचं तान्हं बाळ आम्हाला आवडे
सुखी ठेव देवा दारीचे केवडे
तान्ह्या या बाळाला मारू नका कोणी
राग येतो मनी बाळायाच्या
आमचं तान्हं बाळ आम्हाला आवडे
घालीतो साकडे देवाजीला
आमचं तान्हं बाळ आम्हाला हावं हावं
देवाजीनं द्यावं जन्मभरी

२

संग्राहक : सौ. निर्मला धारप

ये ग तू ग गाई चरूनी भरूनी
बाळाला म्हणूनी दूध देई
ये ग तू ग गाई खा ग तुझा कोंडा
बाळाला दूध मांडा देईन मी
ये ग तू ग गाई दे ग तुझं दूध
बाळाला निरसं दूध देई
ये ग तू ग गाई दे ग तुझं दूध
तेही पाजू तुज बाळराज
गाई ग गोठ्यात म्हशी ग राना
बाळ पाळण्यात दूध मागे

अंगाई मंगाई तांबूली कंगाई
तान्हीयाला माझ्या दूध देई
ये ग तू ग गाई[1] बाळाच्या डोळीया
घालू पाळणीया अंथरूण
ये ग तू ग निजे अंथरूण वाजे
पांघरूण साजे बाळायाला
रंगीत पाळणा वर मोतीयांची दोरी
हालविती गोरी बाळ माझी

:: ४ ::

संग्राहक : श्री. जनार्दन वाघमारे

येग येग निजूबाई हालत मालत
लाडक्या बाळायाची नेतरं भुलवीत
खेळ माझ्या बाळा तुला देते लाह्या
दुपार झाली आता शेतावं आयाबाया
पाटायींचं पाणी जातं नारंगीबाईला
नेनंता बाळराज झटे शेवंती जाईला
बोबडे बोबडे बोल मला लागतात गोड
शान्या बाळा मला तू शेतावर सोड
रंगीत पाळणा आहे हत्तीच्या दातांचा
माझ्या ग आईच्या लाडक्या नातूचा

१ झोप

येग येग गाई तुझीया गोठ्यामंदी
माझ्या बाळ राजसाला दूध दे वाटीमंदी

## ५

संग्राहिका : सौ. वीणा दिवाणजी

अंगाई गाई केली बाळ कसं ग निजलं
कमळ फुललं पाळण्यात
पालक पाळणा वरी खेळणं मोराचं
आत बाळ ग थोराचं निलू राणी
रांगत रांगत बाळ आलं ग ओसरी
त्याला संगत दुसरी अंजूईची
कशाने ग बाई दणाणे माझा वाडा
खेळतो बैलगाडा बाळ माझा
हौस मला मोठी सोन्याच्या जानव्याची
मुंज या तान्ह्याची दिनूबाळाची
सोनाराच्या घरी कशाची ठोकाठोकी
घडते ताटवाटी बाळासाठी
सोनाराच्या घरी ठिणग्यांचा भडीमार
घडतो चपलाहार निलूराणी
कोवळं कोवळं जसं केवड्याचं पान
तशी गोरी पान निलूराणी

लांब लांब केस आईने वाढविले
बाबांनी गोंडे केले निलूराणीला

जिवती ग माये रानात तुझी वाडी
तेथून दया धाडी बाळासाठी

६

संग्राहिका : सौ. इंदिराबाई भाटवडेकर

जो जो गे म्हणूनी बाळाला निजवू
वाटीत निववू दूधभात

जो जो ग जोकलं डाळिंब पिकलं
बाळ ग सोकलं पाळण्याला

न्हाऊनी माखूनी बाळ पाळणी घातलं
आयुष्य चिंतीलं बाळराजा

न्हाऊनी माखूनी बाळ घातलं पालखी
तुला राखण जानकी रघुनाथा

पाळण्याला बाई मोतीयांचे घोस
मामाला भारी हौस भाचीयाची

बाळ खेळू जाये दूरी दूरीचीये
आम्हा कुळीचीये अंबाबाई

बाळ खेळू जाये वडा साऊळीये
घरी माऊलीये वाट पाहे

आमचा बाळराजा आम्हाला आवडे
दारीचे घेवडे जून झाले

अंदा मंदा माऊ बाळाला तीट लावू
जाईल काऊ चिऊ भुर्रदिशी

ताई माई बाळ अंगणात खेळे
दही दूध सांडे बाळराज

आमुचा बाळराजा खेळाया गेला कोठे
बोचतील काटे पायामध्ये

बाळराजा खेळे अंगण झालं थोडं
लाविली फुलझाडं गुलाबाची

माझा बाळराजा हळदीने न्हाई
पाणी पाटा जाई शेवंतीला

सोभिवंत दिसे बाळाचा पालख
लाखामध्ये एक बाळराजा

तिन्ही सांज झाली ओवाळा मोहरी मीठ
काळी लावा तीट बाळराजा

डोळ्यात काजळ घालील ग आजी
लागेल द्रिष्ट माझी बाळराजा

बाळाच्या खोड्यांचे कौतुक वाटते
डोळे भरुनी पहाते रात्रंदिन

नंदाचिये घरी सावळा गोपाळ
हुबेहूब बाळ तैसा दिसे

॥७॥

## संग्राहक : श्री. वि. वा. जोशी

१

ये ग ये ग गाई तू खाशी खरवड
तुझ्या दुधाची आवड बाळराजा

सांजेची वेळ झाली तांबू घरी आली
भुकेची वेळ आली राजसाची

सांजेची वेळ आली गाई आल्या घरा
दूध काढी भरा भरा बाळासाठी

अंगणी उभी गाय गाईपुढे गोऱ्हा
बापापुढे शोभे हिरा बाळराजा

तान्हया तान्हया गाई बांधल्या कूपक्षाठी
राजसाच्या दुधासाठी

तान्हया तान्हया गाई बांधल्या अंगणी
बाळा तुझीया कारणी

ये ग ये ग गाई तू खाशी कोंढा
बाळाला दूध मांडा

२

अंगाई गाई केली बाळ झोपी गेलं
कमळ उगवलं पाळण्यात

पाळणीयावरी सोन्याचे साखळदंड
निजला राजबिंड बाळराजा

| | |
|---|---|
| अंगाई गाई करू | किती मी घाई करू |
| | नाही निजत लेकरू |
| अंगाई गाई करू | बाळा न डोळा झोप |
| | पाळण्या लावा लेप |
| पाळणीयावरी | खेळणं मोराईचं |
| | आत लेकरूं थोराईचं |






# कवतिक

# अनुक्रम

**सांगते भैना तुला –**

संग्राहक ⁝ सौ. गंगूबाई बाबर ⁝ सौ. कुमुदिनी पवार
⁝ सौ. नलिनीबाई शिंदे ⁝ श्रीमती जानकीबाई पाटील
⁝ श्री. ग. ह. पाटील ⁝ सौ. निर्मला धारप
⁝ श्री. बाबासाहेब बापूसाहेब देसाई ⁝ डॉ. सरोजिनी बाबर
⁝ सौ. सिंधू वारनूळकर ⁝ कु. विद्या देसाई
⁝ सौ. पार्वतीबाई गुंजाळ ⁝ सौ. लीलावती पवार
⁝ सौ. शरदिनी मोहिते ⁝ सौ. शांतादेवी बाबर
⁝ श्रीमती आनंदीबाई शिर्के ⁝ सौ. सुशीलाबाई शितोळे
⁝ श्री. दा. गो. बोरसे ⁝ श्री. ना. रा. शेंडे
⁝ श्री. रा. श्री. कदम ⁝ श्रीमती लक्ष्मीबाई महाजन
⁝ सौ. उषाबाई माटे ⁝ श्री. अशोक देशपांडे
⁝ श्री. हरिहर मातेकर ⁝ श्री. उ. भा. कोठारी
⁝ सौ. शुभाताई घोरपडे ⁝ श्री. न. शे. पोहनेरकर
⁝ सौ. पार्वतीबाई मोरे ⁝ सौ. सावित्रीबाई रेखी
⁝ श्री. गो. ळ. जमदाडे ⁝ सौ. इंदूबाला ढेरे
⁝ डॉ. विमल चोरघडे ⁝ श्री. वि. वा. जोशी
⁝ प्रा. सौ. विमल थत्ते ⁝ डॉ. हरिकिशन राठौर
⁝ श्री. गणेश दामोदर कुडे



# सांगते मैना तुला–

पायाला भिंगरी लागावी, मनाला पंख फुटावेत, संगतीला भूकलाडू तानलाडू असावेत, शिजत्या तांदळाला आधण यावे, पाच फड्यांचा नाग डोलावा, वरातीला सजून हत्ती यावा, लामण दिव्यांची माळ पाजळावी, बिंदल्यात हिरेमाणीक चमकावेत, उगवतीला बघून रानातली मखमल हसावी आणि दारी फुललेल्या सोनचाफ्याची दरवळ सुटावी तशाच काहीशा डामडौलात जिवाला भूल पडावी अशी किमया घरच्या बाळाच्या कवतिकाची बोलणी करताना घडून येते. काय बोलू न् काय नको असे होऊन जाते. त्या कारणाने माझे मलाच न शोभणाऱ्या बाळाने मावशीला आई म्हणावे म्हणून शिकवण द्यावी तशी मी आपल्याच जिवाला घटकाभर आडवून ठेवते. आपलेतुपले हे नाते देवाजीने घडविलेच कसे असा विचार मग मनी घोळू लागतो आणि मग हजारात उठून दिसणारा आपला बाळ कसा गोजिरवाणा दिसतो याची बेरीज मी आपसूकच करीत रहाते.

डौलदार आंब्याप्रमाणे वाढीला लागणारे आपले बाळ मोती गुंफलेल्या छत्राखाली सावलीत उभा राहिलेला पाहिला की, जीव हारखून जातो. बाळ कोमेजणार नाही याची खात्री पटते. आणि मग केळी-नारळीवर दिमाखाने चढणाऱ्या बाळाला आवरीत त्याला काही लागू नये म्हणून देवाला हात जोडणाऱ्या त्याच्या मावशीची तारांबळ नजरेत येते. अशा वेळी माझ्या साडीचा घोळ सावरीत मी त्याला दाखवलेली भरल्या हाताच्या खाऊची लालूच आठवते. त्यामुळे मग दिवट्यांच्या भडीमारानं अंगणात उजेड पडावा तसे माझे मन मोहरून उठते. बाळासारखा हुंकार घालू लागते. टोपड्याला लावलेल्या झेंडूसारख्या फुललेल्या गोंड्याप्रमाणे ते डोलू लागते. आणिक मामाच तांबडा मंदिल लेवून शोभिवंत झालेल्या बाळाला दृष्ट होईल या भीतीने मी आपलीच नजर खाली घेते. जावळाचे बाळराज मामाच्या खांद्यावर बसून गावभर मिरवूं दे हाच आनंद मग मनी दाटून येतो.

राखडी केवड्याची, सरीबिंदलीची, बेलपानी वज्रटिक्केची, पोलारवाळ्या पैंजणाची, मुगवट भोकरांची आणि वेणीच्या घुंगूरल्या गोंड्यांची बाळराणी घरात खेळताना तिला बघून कोण्या तालीवाराची ही लेक असा विचारलेला प्रश्न कानाला सुखावतो. वाटते की, पाटीभर डाग ही लेवूं दे. चमेलीच्या झाडाखाली फुलांच्या होणाऱ्या भडीमारात ती खेळूं दे, तिला मग लई नटायला नकोच. सुरूच्या बागेतील आरशाप्रमाणे तिची अंगलट देखणी. म्हणून माझे म्हणणे की, मी आपल्या आयुष्याची शाल विणून ती माझ्या बाळाला पांघरायला देईन. माझी बाळे शंभरावर पाच वर्षांची दीर्घायुषी होऊ देत.

मावळतीच्या घोळात बाळराज खेळायला गेला की जीव तिथेच गुंतून जातो. वाटते की तिन्ही सांज झालीय. गुरेवासरे माघारी यायची वेळ. उगीच कुणी दुखापत तर करणार नाही ? म्हणून मी नागिणीपद्मिनींना हात जोडून सांगते की, वाटेत पडू नका, माझ्या सख्याची चाल चांगली नाही. अजून अडखळते, ठेचकाळते माझे बाळ. त्यासाठी रात्रबाईला देखील हात जोडून माझे सांगणे की, बाई जरा सावकाश ये. आणि आलीसच घाईगर्दीने तर हाती चंद्रज्योती घेऊन ये. मला चार धीराच्या गोष्टी ऐकव.

अग शेजीबाई, तुला तरी किती वेळा हात जोडू मी? म्हणतेय ना माझे बाळ अवखळ आहे म्हणून! हां हां! अग, जरा सावकाशीने घे. फुले झाडावर राहू देत नाही ना? थांब, मी त्याला बांधून घालते. अग, पण तुझ्या घरी कृष्णदेव म्हणूनच हे सवंगडी गोळा होतात नव्हे? मग? अशी रुसू नको गडे. कवतिक पदरी घे. आनंद उरी बाळग. वात्सल्य दाटू दे नजरेत. बाळकाचा वेल दारी फुलावा तसाच की ग हा मेळा शेजीराणी? खरे ना?

लहान बाळाची मला भारी हौस. म्हणून मी देवाला हात जोडते की, भैनाला लेक होऊ दे, दादाला मुलगा होऊ दे. मी त्यांच्या कौतुकाने न्हाऊन निघेन. नेत्रदीपक बाळंतविडा घेऊन जाईन न् काळजाचे अंथरुण घालीत त्या बाळराजाला अंगाई गाईन! माझे हे बाळ बघत्या नारीने भुलून जावे असे देखणे ग! टाळांच्या टोपणासारखे मोठे डोळे, रुंद छाती, नाजूक जिवणी, लालचुटूक ओठ, नाकेली अंगलट! तर ग? म्हणून काळ्या चंद्रकळेची कुंची शिवून ह्या देखणेपणाला मोडा घालीन म्हणते मी? काजळतीट तर लावीनच पण पोवळ्यांचे न् काळ्या मण्यांचे गाठले पण घालीन बाळाला! देवाशपथ!

आजीआजोबांनी तर किती कवतिक करावे बाळाचे? काल नाही आले तर वलणी सगळी अंगड्या टोपड्यांनी शिणगारून गेलीय! आणि बाळाच्या नाजूक बोटात तर हिरकण्या चमकताहेत जशा अंगठीच्या कोंदणातल्या! कमरेचा करदोडा किती नक्षीचा आणलाय पाहिलात का? अनिवार सुरतीचा न् दाणेदार मांडीचा बाळराज तो बघा आला डुलत डुलत! सरका तुम्ही बाजूला. हाती वतनाचे कागद घेऊन आलाय जणू गुलाम? अजोबांना वाचून का दाखविणार आहे स्वारी? विद्यादेवीची पूजा का बांधलीय या राजबिंड्याने? असू दे. थांबा गडे, साखरेचे पोते सोडते हं! घ्या बाई हा वसा कोडकवतीकाचा न् मग जा पुढे. ती पहा अमृताचा प्याला हाती घेऊन आई लक्ष्मी आली. मोत्यापोवळ्यांनी तिची ओटी भरू दे. देवी जगदंबे, माझ्या बाळाचा धरला पालव सोडू नको हं! आणि, उगवती उषे, तू पण ये. अशी सोप्यात ये जोते चढून आणि बैस माझ्या बाळाच्या पंगतीला. तो बघ दुधातुपाच्या न्याहारीला बसलाय! पाहिलास?....बोबड्या बोलाची मोठी गंमत वाटते नाही ग?

ही मैना न् तो राघू. एका पेटीतील माणीक मोती. कशाचा दुष्काळ म्हणून नाहीच पडायचा. कारण बया मालनच अशी जबरदस्त की, तिच्या हौदाला पाणी बक्कळ आहे! म्हणून म्हणते ओसरी न् माजघरात पालख पाळणा हल्रु दे डोल्रु दे. हलकड्या सलकड्या नाचू देत. माझे अंगण फेराचे होऊ दे न् तिथे माझे राजहंस डौलाने मिरवू देत.

माझे बाळराज म्हणजे जणू मोत्यांचे जहाज. जिवतीच्या हातची अमृताची वाटी पिणारे ऋतुराज आणि मी ह्या श्रीरंगाची आई. माझ्यासारखी मग मीच दैवाची नार नाही का? नांगराच्या तासाला ओली जाई लागावी तसे माझे भाग्य!

दाट चिंचबनातून आणि खेळत्या चंद्रज्योतीच्या उजेडातून मी चालणारी. म्हणून म्हणते माझे मला लखलाभ असू दे! उगीच कुणाजवळ हे कवतीक नाही हं कुणी बोलायचे? गळ्याची शपथ आहे बघ! माझे बाळ या कवतीकाच्या ओझ्याने कोमजले म्हणजे? इथे मी आपले एकच सांगेन तुम्हाला—

*माझं ग आऊक्ष असं तीळतीळ झडो*
*बाळराजसाला माझ्या रत्नाला तेज चढो*

॥१॥

## संग्राहिका : सौ. गंगूबाई बाबर

हावस मला मोठी वैनीला मुलगी व्हावी
खण चोळी कुंची बारशाला न्यावी

हावस मला मोठी बिंदल्याला सोनं घ्यावं
वैनीला माज्या हौसेचं बाळ व्हावं

उन्हाळ्याचं ऊन लागतं शेल्यातून
लाडक्या बाळराजा शिंगी[1] काढ पागेतून[2]

एकुलता एक नका म्हणू पांडवाला
कारल्याचा येल सारा गेला मांडवाला

गुज बोलायला मला कशाला हवी लोकं
माजी बाळाबाई गुजाजोगी हाय लेक

साळीच्या भातावर साखर किती वाढू
लिंबाजी बाळा नको भाताचं आळं फोडू

मावशी म्हणून कोण धरतो माझा घोळ
सयांनू किती सांगू हाई भैनाचं ग बाळ

माझ्या पोटीचा न्हाई शोभत मला
सांगते बाळा आई म्हणा मावशीला

पालक पाळना लेकीच्या लेकराचा
झोका टाकिते एकाराचा[3]

---

१ कोवळ्या वयाची घोडी. २ घोडे बांधण्याची जागा. ३ कवतिकाचा.

आपलं तुपलं कसं लावलं देवानं
भैनीचं बाळ कडी घेतलं भावानं

समोरच्या सोप्या हैती चांदीचे पेले
माज्या बाळाचे मैतर पानी पेले

पालक पाळणा वर खेळणा परकाराचा
माझ्या बाळाचा मैतर जिनकराचा

पालक पाळणा येता जाता हालवू
आत बाळ निजवू नवसाचा

माळ्याच्या मळ्यात केळी नारळी भैनी भैनी
लाडका बाळराज मधी केवडा अवगुनी[1]

गावाला गेला बाळ एक महिना तीन वार
माझा बाळराजा कसा जोडीचा बिलवार

जिवाला भारी जड कोण माझ्या कळकळींचं
बयाची माझ्या बाळं वाघ सुटले साकळीचं

पाची परकाराचं ताट वाढीते मी ऊन ऊन
माझ्या बाळराजा न्हाई पाठीची तुला भैन

सदरी सोप्यामधी नारूशंकर तांब्या लोळे
सवळा बाळराज नातू जावळाचा खेळे

बारीक बांगईडी हातात चमक्या मारी
माझा बाळराज कोवळे केस मागे सारी

हावस मला मोठी हिरवं लुगडं भरजरी
राजस बाळ माझा नातू घेतला कडीवरी

बया माज्या मालनीचं दिस नाचारीत[2] गेलं
बाळ जोडीला आलं

---

१ अवखळ. २ गरिबीत.

साखरेचे लाडू दुधातुपाच्या संगतीचे
माझे बाळराज हैती राजाच्या पंगतीचे

साखरेचे लाडू देते बांधून थोडं थोडं
बाळा किती सांगू भूक लागेल तिथं सोड

वाटेवरी झिरा[1] कोण्या कामिनीने केला
बाळ माझा ताना चतुर पाणी पेला

गेलं कोण्या गावा माझं पैशाचं पाकीट
सपनात येतं बाळा अंगचं जाकीट

मैनाबाईचं बाळ शिकलं रांगायले
पापी भावजने कसु बांधली अंगनाले

बयना बाईचं बाळ म्हनतं मामा मामा
कडे घेऊन नाच गा रघुमामा

शेजी देती शिवी जिची तिले सुभा
चरित पाहते देव ईसवरी उभा

लेकराची माय पाखराचे पाय
भुकेला माहा बाळ बेगी बेगी बाय

लेकूरवारीची बाय तिची करावी संगत
तिच्या माज्या लेकराची घळीभर गंमत

लेकरं खेलती औफेर चौफेर
माज्या चिलियाची लकाके नजर

बाळामंदी बाळ माहा बाळ ग्यानी ध्यानी
होळी[2] लाविली लेकरानं जिंकली पद्मिनी

धाकलं माझं घर माझं अंगण केराचं
बाळ खेळतं थोराचं

---

१ झरा. पाणी साठलेला खोलगट भाग. २ होड, चढाओढ.

नंगराच्या लेकरानं सजवला साज
ऐटदार माहा बाळ शोभते हंसराज

माळ्याच्या मळीयात फुलांची मोठी रांग
माह्या बाळाला पाहून राधिका झाली दंग

माह्या बाळाच्या गुणाचा तिनी लोकी वास
देवा देवाले लागली माह्या राजसाची चुरस

२

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

पैली माजी ववी हिरा सागर जगजेठी
कृष्णात जलामला माता देवकीच्या पोटी

कमानी दरवाजा वाडयाला शोभा देतो
माझा बाळ लिंबा सोप्याला गंध लेतो

नवस करीईती हिरीबाईच्या काठाला
बाळ राजसाची माझ्या खिल्लारी बैल मोटंला

तांबडी चंद्रकळा निरी पडावी हजार
माजा बाळराज करील मिरजेचा बाजार

लागनीचा आंबा त्येला पलानीची भर
माज्या बाळाजीचा आंबा वाढतो डौलदार

उन्हाळ्याचं ऊन बाई लागतं राजसाला
माज्या ग बाळायाच्या मोती छत्रीला झालरीला

रांगत रांगत वाळ जातं उंबऱ्यात
लाडका वाळराज हिरा झळके बंगल्यात

तांबूळीन बाई पानं कशी या शेकडा
वाळायाच्या माझ्या हाती रुपाया रोकडा

तांबूळीन बाई पानं देता झोपी गेली
बाळानं ग माझ्या शेला टाकूनी जागी केली

तांबूळीन बाई पानं द्यावी तेरा चवदा
बाळ माझा तान्हा खानारा पोरसवदा

पानाचा खानार चुना लावितो देठाला
बाळाच्या ग माझ्या लाली चढली ओठाला

पानं खाता खाता बाई बत्तीशी रंगली
बाळाची ग माझ्या लई सुरत चांगली

साती समिंदराचे काठी आलं खेळून शिलांगान
माजं ते बाळराज भरल्या हातानं देई सोनं

माजं ते बाळराजू मी का घेईन आलावला
बाळा कारंडी जाबू दिला

अवकाळ बाळराजू भर्ल्या रांजनी धुतो पायू
भनारानीचा हाई रावू

धडीच्या धोतरानी बाळ बांधीतो कानपट्टी
जातो वकीलाच्या भेटी

कचेरी जातो बाळ बसे खांबाला टेकूईनी
देतो जबाब[1] फेकूईनी

अवकाळ माजं बाळ केली नारळीवरी चढ
त्येची मावशी पाया पडं

---

१ उत्तर.

अवकाळ बाळराजू भरल्या रांजनी धुतो पाई
मामा बोलंना त्येचा काई मामी हासत उभी ऱ्हाई

बाळया सावळ्याचा येतो आवाज माझे कानी
लाडका बाळ माझा मामाला देतो पानी

लेकुरवाळीचं घर असे गदाळ[1] मदाळ
वसरीवरी झाली राघू मैनांची वरदाळ[2]

एकुलता एक लेक हाई हजाराला भारी
ताना या राघू माझा ढिगात ल्हैऱ्या मारी

सकाळी उठूनी हात माजा लोण्यामंदी
बाळाला ग माज्या देते सोनीयाची चंदी

पाळण्याचा दोर मला दिसतो एकार
लेकीईचा बाळ राघू टाकितो हुंकार

तेलणीचं त्याल गेलं सारे घडीभर
बाळायाचा माझ्या दिवट्याचा भडीमार

तान्हं तान्हं करू तान्हं हाय माजे घरी
तान्याच्या पाळण्याला लावा रेशमाची दोरी

गेला कोण्या गावा माझा घरचा आवल्या
बघते त्याची वाट दूर गेल्यात्या सावल्या

गेला कोण्या गावा याची अशी कशी सुद
इरजून गेलं याचं रतीबाचं दूध

लाडकं माजं बाळ त्येच्या लाडाला देते गूळ
सोड निरीचा माज्या घोळ

लाडकं माजं बाळ काठी मागीतो केवड्याची
बोली कळंना राजसाची

---

१ केरवारा. २ वर्दळ, ऊठ बैस. गर्दी.

गेला कोण्या गावा याचे असे कसे जाणे
सुकून गेल्याती याची रतीत्राची पाने

गेला कोण्या गावा याला गावाची सव[1] न्हाई
बाळायाला माझ्या पाणी द्यावं शेजी बाई

गेला कोण्या गावा त्याला महिना झाला सव्वा
अजून कसा यीना फोक नारळीचा नवा

काळी चंद्रकळा मी का नेसते निऱ्यावरी
लाडका बाळ माझा गोरा गणेश कडीवरी

दंडावरची चोळी बाई आनिक वरी सार
माजी तू बाळाबाई बाजूबंदाला जागा कर

अंगात आंगराकं त्येला चांदीची बटनं
लाडक्या बाळांचं तालीवाराचं नटनं

लाडकी येवढी लेक बाळ रुसली बापावरी
हिरकण मांडीवरी चोळी फुटाणी दांडीवरी

लाडक्या लेकीला फडका शिवते नभीचा
तानी माझी मैना दंड उघडा वाकीचा

अंगड्या टोपड्यात बाळ बसलं नटून
आलं आजोळी भेटून

हाका मी मारिते तुला लेकाच्या जिनसा
माज्या मोत्याच्या कणसा

टोपाच्या टकुच्याला गोंडं लाविलं झेंडू झेंडू
भाचा मामाच्या मागं हिंडू

लेकूरवाळीयीचा बाळ आवडीचा
फाडी पदर साडीचा

---

१ सवय.

हावस मला मोठी माझ्या बंधूच्या बाळाची
फाडिते पदर कुंची शिवीते चोळीची

सोन्याची टाचणी टोचितो कोटाला
बाळ माझा तान्हा बंद बांधीतो बुटाला

आंगडं टोपडं नार घालिती बाळाला
व्हैल[1] त्येला द्रिष्ट काळं लाविती गालाला

आंगड्या टोपड्याचं बाळ चालतं तोऱ्यानं
माज्या बाळाजीचं हालं जावाळ वाऱ्यानं

आंगडं टोपडं शिव शिंपीणी नकशाचं
माज्या या बंदूजीचं बाळ गरुड पक्शाचं

शेजी तू आई बाई संबाळ राळ रास
लई आवकाळ बाई माजा ह्यो हारीदास

जरीच्या टकुच्याला गोंडं लाविती मायनीचं
बाळ कडेला वहिणीचं

जरीच्या टकुच्याला गोंडं लाविती मऊजेचं
बाळ कडेला भावजेचं

तांबडा मंदील नको गुंडूस माज्या लाला
द्रिष्ट होईल तुज्या गाला

तांबडा मंदील बाळ गुंडीतो मोडीतो
पाटी संबला[2] सोडीतो

आंगड्या टोपड्याचं बाळ दिसतं गोजिरवाणं
सरी बिंदल्या पिंपळपान

भरल्या बाजारात भरणी आलीया नकशाची
माज्या बाळाच्या टकुच्याची

---

१ होईल. २ शेमला.

वाईट वंगायाळ नको बोलू शेजीवाई
आ काळ माजं बाळ भरल्या रांजनी धुतं पायी

शेजी तू संबाळ तुझं राखण अंगणी
लई आवकाळ बाई माझी ही चांदणी

शेजी शिया देती आणिक दे ग बाई
तान्या या बाळाला हिऱ्याला भंग नाही

शेजी तू आई बाई तुजा संबाळ सोनचाफा
आवकाळ बाळराज मोडील त्येचा ढापा

माझ्या अंगणात शेजीचे पाच मोती
त्यात माझी चंद्रज्योती उषाताई

शेजीच्या बाळायाला नको म्हणू पोरा पोरा
लाडक्या बाळराजा तुज्या कारणं येतं घरा

शेजी लेणं लेती कोण बघीतं लेण्याला
माझी मैनाबाई बघे कडीच्या तान्याला

अंगणात खेळे शेजीचे पाच पूत
गोरी मैना माझी जेष्ठ दिसे त्यात

माझ्या अंगणात शेजीचे पाच लाल
त्यात माझी मखमल मंजूताई

हातात कडी तोडे बाळ कुणा राज्याचं
बाळ माझा चंद्रकांत नाव सांगीतो आजोबाचं

हातात कडी तोडे बाळ चालतं तोऱ्यानं
बाळ माझा चंद्रकांत झुलपं उडती वाऱ्यानं

घडीव घडीव सोनारा पाच पेट्यांचा कडदोरा
बाळ माझा चंद्रकांत कांतीचा बाळ गोरा

धन ती संपदा माजं सांदीचं कोंदण
तान्हा माझा बाळराज रासबिंदीला मुंडान

पुतळ्याची माळ लोळती पाठी पोटी
तान्या या बाळायानं चंद्रहारानं केली दाटी

पोथी पुस्तक वाचताना भीकबाळी कानी हाले
नेनंता बाळ माझा सये बुकासंगं बोले

हातात कडी तोडी करदोडा नागमोडी
ताना माझा बाळ म्हणू वाणी की मारवाडी

सोन्याची आंगठी गोऱ्यापनात दिसंना
चइताचं ऊन वाळा माज्याला सोसंना

हातात कडीतोडे कमरेला हिरवा शेला
संजूबाळ माझा बाई शाळेईला गेला

हातात कडीतोडे कमरेला हिरवा गोफ
तान्हा बाळ माझा शोभे सरदाराचा लेक

सोनं बी झालं सस्त चांदी कशानं महागली
कडी कडदोऱ्याची मला आगत लागली

सोनं बी झालं सस्त चांदीचा काय भाव
माजा तो बाळराज कडीतोड्याचा बाजीराव

हावस मला मोठी कडी मोडून कडदुऱ्याची
बाळाजीची माझ्या गोरी कंबर सरदाराची

वाळ्या साखळ्याचा बाळा नको येऊ मागं
तुला शेजीची द्रिष्ट लागं

बाळ आजोळी गेला त्यांनी पेरावा काय केला
हात कड्याचा दावी मला

वाळ्या साकळ्याचा  नाद येतूया दुयीरी
माझा ग बाळराज  चढे मामाची पायीरी

कानी काय वाळ्या  शालू नेसे भरजरी
सोन्याच्या वाक्या चोळी  लेकीच्या दंडावरी

सांगून धाडीते  सांगलीच्या सोनाराला
नक्षीची आंगठी  तान्या माझ्या भालदाराला

भिकाऱ्याला भीक  देता मन हारकतं
माझ्या बाळायाच्या  कमाईला बरकत

शिवंच्या शेताला  औतं गेली गाड्यावरी
आता माझा बाळ  शिलेदार घोड्यावरी

पिकलं पिकलं  ऱ्यात बाळाचं सांगती
आता माझ्या बाळा  जेवान लाडूचं मागती

पिकलं पिकलं  जन बोलती येशीत
बाळायाचे माझ्या  बैल बुडाले राशीत

पिकलं पिकलं  जनाचे झाले तोंडी
बाळायाला माझ्या  बिघ्याला झाली खंडी

पाटच्या पान्यामंदी  सुकदेव[1] ल्हैऱ्या[2] मारी
त्याच्या उजेडानं  बाळ माझं बैल चारी

झाली सवसांज  दिवा लाव सुवासिनी
बाळाच्या वाड्यात  गाया आल्या मोकाशिनी

झाली सवसांज[3]  झाली दिव्याची ताकीत
बाळ माझा ताना  आला लक्षुमी हाकीत

झाली सवसांज  गायी आल्या दावनीला
आता माझा बाळ  हिरा उभा गव्हानीला

---

१ शुक्राची चांदणी. २ चमकणे. ३ तिन्हीसांज.

झाली सवसांज बाळ उभा जोत्यावरी
गाईला हाका मारी ये ग मालनी माझे प्यारी

माळ्याच्या मळ्यात माळी बसला खोपीत
बाळ माझा ताना फुलं तोडितो टोपीत

शेवऱ्या बईलाचा नंदीवानी आवतार
त्येच्या मागं चाले बाळ माजा सावकार

सुताराच्या आळी नेटानं काय चालं
माज्या बाळायानं चाडं सोन्याचं घडविलं

शेतामंदी कुरी आडवी उभी केली
बाळायानं माज्या चेड्याला हाक दिली

शेतामंदी कुरी बेणं पेरीती उडदाचं
माजं बाळ तानं पेरा पेरीतो मिरगाचं

थोराचा न्हवईरा वाट पडली वावरा
वाळ सावळा माजा लई गोताचा न्हवरा

जुंदळ्याचा गाडा येऊंद्या घराकडं
माज्या बाळायाची वड घरच्या पेवाकडं

चाड्यावरी मूठ घ्यावं देवाजीचं नाव
माझ्या बाळाच्या शेती अचाट पीक यावं

पावसानं बाई फळी धरली दूरून
कुनबी बाळ माझा शेती निघाला पेरून

पावसानं बाई फळी धरली सूर्यातळी
आता माझा बाळ पेरीईतो उतावळी[1]

वळवाचं पानी बाई अंगनी साठईलं
बाळ कुनब्याचं नटईलं

---

१ घाईघाईने, उतावळ्या मनाने

देवळ्या वैलायाची घाटी वाजते माळाला
बाळाची पाभईर बघा चालली साळाला
पिकलं पिकलं माझ्या बाळाचं पठार
जोंधळा आकडी गाव किरोली वठार

३

## संग्राहिका : सौ. नलिनीबाई शिंदे

किती तू नटशील बारा वर्साच्या उम्मेतीला
आयने लावीयेले माझ्या लालाच्या पैरनीला
आंघूळीला पानी हांडं ठेविलं हिंदुस्थानी
माझ्या बाळायाची गोऱ्यापणाची पिवळी जानी
माळ्याच्या मळीयात माळी बसला खुशीत
माझा बाळराज फुलं तोडीतो पुशीत
माझ्या ग दारामंदी बाळ कुणाचा लोळतो
ताना ग माझा बाळ नवा तालीम खेळतो
दळण दळीईते उरले पाच पसे
देवाने दिले बाळ माझे डोरल्याचे ठसे
राघू मैनाची जोडी निघाली वावरी
मैना पडली फशी राघू मारितो भरारी
पाची पक्वान्नाचं ताट पेला कुठे ठेवू
शिरीमंताच्या बाळा जेवू

राघू मैना दोनी हिंडती टेकडी
राघू तोडी कळ्या मैना गुंफिती राखडी

:::४:::

संग्राहिका : श्रीमती जानकीबाई पाटील

मोठे नि मोठे डोळे राघुवा रतनाचं
माजं ते बाळराज वाची कागद वतनाचं

खारीक खोबईरं माज्या पैलवानाचा मेवा
तान्या बाळाची माज्या कुस्ती नेमिली कुन्या गावा

खारीक खोबईरं माज्या पैलवानाची न्हयारी
तान्या बाळाची माज्या कुस्ती नेमिली खेड्यावरी

वाजत गाजत बाळा माज्याला कुठं नेला
माज्या राघूईला पैल्या कुस्तीला हुबा केला

पालक पाळना वर चिमन्यांचा कलकला[1]
बाळराज माजा आत चिल्लाळ[2] झोपी गेला

राजवाड्यापुढे सभा बसली थोराची
बाळ राजसाची तिथं बैठक मोराची

चांदणं टिपूर हाये पुनवेची रात
बाळ राजसाला कृष्ण देवाची सोबत

१ झुंबडा, समुदाय, दाटीवाटी, गर्दी. २ लाडका, कवतिकाचा.

५

संग्राहक : श्री. ग. ह. पाटील

गवळ्याच्या म्हशी खात्यात उभा बांध
नेनंता बाळ माझा गवळी गोरा चांद

हासता देखिली तुझ्या दाताची कवळी
बाळराज माझा ताना आला पाटंचा गवळी

सकाळच्या पारी तांब्या कशानं वला झाला
माझा बाळराजा पैलवान दूध प्याला

सून मी करिते लेकापरास देखणी
घरात वागविते माझी दऊत लेखणी

सडा या सारवान घरासंगं ते अंगनाला
माझ्या त्या बाळराजा एकादस चंदनाला

सडा या सारवान घरासंगं ती वसरी
माझ्या बाळाशी खेळाया बाळं आल्याती दुसरी

पोटीचा माझा बाळ माझ्या परास चढ झाला
माझ्या भुजबीवर गेला

माझ्या बाळायाला नाही नटावं लागत
आयना सुरूच्या बागंत

थोरलं माझं घर घराशेजारी पाणई
सून गवळ्याची ठानई

:::६:::

संग्राहिका : सौ. निर्मला धारप

लाडक्या लेकाईचं गोडसं जेवण
दुधाला विरजण साखरेचं

लाडका ग लेक भूक म्हणून निजला
आता दुधामध्ये त्याचा बत्तासा भिजला

मुले खेळती अंगणी घर भरले गोकूळ
वाटे मथुरेचा आला घरी माझ्या घननीळ

माझं बाळ खेळे अंगण झालं थोडं
लाविली फूलझाडं मैनाईनं

तान्हे माझे बाळ बाई हळदीने न्हाते
त्याचे पाणी जाते शेवंतीला

माझ्या ग दारावरनं मित्रांचा मेळा गेला
कंठीवरनं ओळखला संजूबाळ

माझ्या ग दारावरनं कोण गेली परकराची
हाती अंगठी हिरकणीची ताईच्या ग

मोठे मोठे डोळे भिवया लांब रुंद
केशरी लावी गंध संजूबाळ

तान्ह्याला बघूनी पान्हा हृदयी दाटला
अमृत पिऊनी बाळ तृप्त जाहला

माझीया मांडीवरी बाळ माझा विसावला
श्रीमुख पाहता बाळ गालात हासला

बाळ माझा बाई
सुखी मी संसारी
ठेवा अमोल जीवनी
बोल बोबडे ऐकूनी

माझं रे आयुष्य
सावळ्या बाळाच्या
कमी करीशी दातारा
घालीशी ते पदरा

माझ्या आयुष्याची
आता बाळराजा
विणीती मी शाल
त्याचा तू कोट घाल

माझ्या आयुष्याचा
तुम्ही बाळराजा
विणीते मी लेप
पांघरा बापलेक

माझ्या आयुष्याचा
आता बाळराजा
विणीते मी शेला
त्याचे पांघरूण तुला

आयुष्य चिंतीते
माझ्या बाळराजा
शंभरावरी पाच
राज्य करी सावकाश

॥७॥

संग्राहक : श्री. बाबासाहेब बापूसाहेब देसाई

दिवस मावळला
बंधूचा माज्या बाळ
गाई येत्यात्या गजबानं
हिरा झाकिते पदरानं

दिवस मावळला
वेल फुलला बाळकांचा
दारी घोळका बाळकांचा

दिवस मावळला
गुराढोरांची झाली येळ
बाळा निराळ्या वाटे खेळ

हात मी जोडीते हीर वारवी तुजईला
लाडका बाळराज सोनं खेळतं पलानीला

हात मी जोडीते रात्रबाई तुजईला
लाडका बाळराजा वस्ती राहिला एकईला

येडा ग माझा जीव वाऱ्याच्या लागं पाठी
लाडका बाळराज मला धीराच्या सांगी गोष्टी

ताईंता ताऱ्यायांचा मेळा जमला पाकरांचा
बया त्या मालनींनं पुडा सोडीला साकऱ्याचा

माज्या बी आऊक्षाची देवा आकूड कर दोरी
लाडक्या बाळायाला वर्स शंभर घाल पुरी

माळ्याच्या मळ्यामंदी माळी ग येऊ दीना
लाडका बाळ माझा फूल जाईला न्हाऊ दीना

वाटनी वयली हीर बाई बारव नकशीची
ताईंता तानीयाची जोडी गरुड पक्षीयाची

बसाया बसकार पाट टाकिला जांभळा
लाडक्या बाळराजा बस केळीच्या कंबळा

हरिणी मंजूबाई तुजं राहाणं काळ्या रानी
लाडक्या बाळायाची गोरी कंबर कवळी जानी

लेकीच्या आईला नका म्हणू हालकी
लेकाच्या आईला कुणी केलीया पालकी

बसाई बसकर वरखडाला देती आदी
लाडक्या बाळायाला पाट फिरकीचा टाकी मंदी

बाळा तुझ्यासाठी जीव होतो थोडा थोडा
लाडका तू ताना माझा काळजाचा घडा

साकळ्या वाळ्यायाचा   नाद येतो रुनूझुनू
लाडका बाळराज   अवकाळ झाला जनू

दुरून वळकीते   छत्रीखालून कोन येतो
लाडका बाळराजा   पतंग ढाळ देतो

सावळी सुरईत   उनानं झाली काळी
लाडका बाळराज   दरपानी रूप न्हाळी

सावळी सुरईत   अशी पाहिली न्हाई कुठे
लाडक्या बाळायाचं   व्हट बारीक डोळे मोठे

पानं खातंया बाळ   चुना लावितो देठाला
लाडक्या बाळायाच्या   सदा लालाई होटाला

खेळूनी खेळूनी   बाळा उपाशी नगं निजू
आकडी दुधामंदी   खडीसाखर घातली भिजू

आगाशी वावडी ती   का गंगनी सांगं गोष्टी
माज्या रे बाळराजा   तिला वाऱ्याची प्रीत मोठी

हातात इटी दांडू   लगूइरी ढासळली
तान्या त्या बाळायाला   सारी मंडळी हासयीली

गावाला गेला बाळ   माज्या काळजाची पेटी
   वाडा भयान लागे पाठी

खेळ्या खेळं बाळ   खेळं जंगी त्या भवऱ्यानं
   खेळ दिलाया मावळ्यानं

छंद बी खोर बाळ   छंद घेत एका ठायी
   मोर मागतो नाचवायी

छंद बी खोर बाळ   तुझ्या छंदाला देते गूळ
   बाळा निऱ्याचा सोड घोळ

तान्या त्या बाळायानं डाव मांडीला रस्त्याला
धन या संपदा कोण पुशीना राजसाला

अंगणी खेळे बाळ गगनी ये सूर्यदीप
तान्या या बाळाजीच्या हिरे माणिक बिंदल्यात

चांदीची बंदूक त्येला रुप्याची रेजक
जपून मार बाळा तुझी कंबर नाजूक

बाळ खेळू जाये तिथं घुटमळे जीव
कधी मावळेल देव घरा येई बाजीराव

बाळ माझा खेळे अंगण झालं थोडं
सदरी सोप्यापुढं वाढवीला

नवतीचा लाल चालला खेळायाला
चांदीची घुंगुरं बाळाच्या लेजीमाला

लाडक्या लेकीईंचा खेळ आला माझ्या मना
ताना माझा बाळ गडी तिला खेळू दीना

राघू पिंजऱ्यात मैना खेळे उंबऱ्यात
सयांनू किती सांगू दिस गेला आनंदात

तालीम तक्यावरी कशाची टाळी झाली
तान्या माज्या बाळानं गुंड छातीवरी नेली

आक्याचा पैलवान त्येला भेतंया सारं गाव
त्येच्या गळ्यामंदी पेटी वर मारुतीचं नाव

झोंबीच्या फडामधी पैलवान आला गोरा
द्रिष्ट होईल बांधा दोरा

जिकडे खेळे बाळ तिकडे माझा डोळा
बाळ नवतीचा पानमळा

आक्याचा पैलवान याड लावून गेला
माझ्या त्या बाळाजीचा कुस्तीचा बाजा झाला

८

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

शेजीच्या अंगणात हाई सीताफळीचं झाळू[1]
शेजी संबाळ सीताफळू हाई अवकाळ माजं बाळू

शेजी आली बसाया बस म्हणाया चुकली
तान्या या बाळाच्या बाई छंदाला गुतली

उनाड माजा रागू नको करू शिव्यागाळी
शेजारीणबाई संभाळ डाळीसाळी

शेजी आली घरा पाट देते बसायाला
बाळाच्या ती खोड्या माज्या येती पुसायाला

शेजीच्या घरी गेले बस म्हणीना जोत्यावरी
तान्हं माझं बाळ अवकाळ कडेवरी

शेजीचं बाई बाळ मला दुरून सांगी गोष्टी
समींदर माझा बाळ गळ्याला मारी मिठी

शेजीचं बाळराजू माज्या बाळासंगं खेळू
देते खाया डाळ गुळू

शेजीचं बाळराजू मला म्हणीतू मावशी
पुढं पाऊल टाकू कशी

---

१ झाड

९

संग्राहिका : सौ. सिंधू वारनूळकर

लाडक्या बाळायाची जगभर व्हावी कीर्ती
ब्रह्मा विष्णू महेश उभ्या पाठीशी त्रीमूर्ती

लाडक्या बाळायाचं नाव ठेवावं रघुनाथ
बापाशेजारी मांडा पाट जेवू घालते दूधभात

माळ्याच्या मळीयात बाळा तुला किती शोधू
येरे येरे लाडक्या तुला देते मी दुधू

काय करू बाळा रागं बोलले शब्द उना
नजीकच्या काळाईत तुझ्या सुखाला नाही सीमा

पाटच्या पाऱ्यामंदी माजा रांजण दणाणीला
माजा ग बाळराजा लव अंकूस पाण्या गेला

मध्यान रातीच्या उठा सयांनू दिवा लावा
बाळ वाड्याव आला नवा

माळ्याच्या मळीयात झाड पेरूचं लवईतं
माळी बाळाला बोलावीत

नको नको बाळा रडू आता झाल्या तिनी सांजा
जीव उडून जातो माजा

लाडक्या बाळायाचा लाड त्येचाबी पुरवावा
घोडा बसाया द्यावा नवा

लेकाया परास लेकी बाळीची मया येती
पर घराला बाळ जाती

लेकीचा जलईम वाई उसाच्या वाड्यावाणी
माय रडून घेती बाप वाघितो येड्यावाणी

प्रकाश पडीयेला चांदामागल्या चांदणीचा
पालक पाळईना भावाआधी बहिणीचा

सांगावा सांगूईनी भैन धाडी निकडीचा
माझा त्यो बाळराज वाघ सुटला साकळीचा

नवस म्या बी केलं नाही मला आठवण
पोटीच्या बाळासाठी घेतीलं म्या लोटांगण

आंगूळीईचं पाणी हांडा तापला परसदारी
माज्या ग बाळायाची छाती ग रुंद भारी

अंगूळीईचं पाणी हांडा ठेवीते गुजराती
माज्या ग बाळायाची शोभीवंत झुलपं दिसती

कोकण बंदराला नको जाऊ रे देकईण्या
माज्या तू बाळराजा नारी भुलतील कोकइण्या

सुपली कुंरकुंली आडभिंतीला उभी केली
लेक खेळत कुठं गेली

नटत नटत बाळ जातंया पेटंत
जाई मोगरा लुटत

लाडकी तू ग लेकी नको जाऊस बाजाराला
चिठ्ठी धाडीते वैराळाला

परटीन धुनं धुती लिंबं देती मी देठायाची
झबली बाळाची खुतनीची

तांबड्या मंदिलाचा सोगा सोडीला दुहेरी
बाळ निघाला बाहेरी

काळी ग चंद्रकळा नसिते मी घडीभरी
तानं ग माजं बाळ गोरा गंपती कडीवरी

अंगडं टोपईडं सरी बिंदल्या गाठईलं
बहिणा त्या गुजरीचं बाळ बघूसं वाटईलं

अंगडं टोपईडं बटवेदारा तुझं गोंडं
बया माझ्या मावळणींनं एका वर्षाचा केला खंड

सावळी सुरईत जशी कवळी काकडी
नेनंत्या बाळायानं टोपी ठेवीली वाकडी

अंगंड टोपडं शिव शिंपीनी नकशाचं
बाळ माझं चंद्रकांत लियाचं मोकाशाचं

मामाच्या पंगतीला बाळ जेवितो शिरपती
तांब्यानं तूप वाढी मामी त्याची धुरपती

शेल्याच्या पदरात कुणी बांधिला कालाकिता
माजा ग बाळराज आजूळी गेला होता

अंगडं टोपईडं घेती घोंचीला काळा खण
गोऱ्यापनाला मोडवान

अंगडं टोपड्यानं बाळ दिसतं मला नीट
घाली काजळ लावी तीट

अंगडं टोपईडं शिवीयेलं काळबेरं
दंडीवाक्याचं बाळ गोरं

चाटयाच्या दुकानात ल्योक बसला भोळाराजा
उंच घडीला हात माझा

नवस म्याबी केलं केलं ते जागोजागी
मामा मावशा फेडू लागी

खेळत रांगत बाळ अंगणी दुडदुडं
माझ्या बाळायाच्या मामा मागं पुढं घोडं

भाचा धरीयीतू मामाच्या पगडीला
दोघांच्या सुरतीचा उजेड पडला चावडीला

वळनाचं पाणी कसं वळणानं जातं
लाडकं बाळराज मामा म्हणून मागं येतं

माजं ते बाळराज देतं मामाला सलायाम
बंधूजी बोलत्याती बाळ मैनाचं गुलायाम

पदरी बांधीईते मी ग राजशाही मेवा
लाडका बाळ बोले जातो मामायाच्या गावा

बंधूला झाला लेक आमा भैनीला इच्छाव[1]
असं नाव ठेवा भाचा दिल्लीचा पाच्छाव[2]

देव देवाजीचं पुण्य माज्या सासऱ्याचं
गुणी बाळ माजं हाती दावं वासराचं

दैवाच्या बाळायाला आजोळी आजा आजी
बाळायाचे मामा त्येला पेल्यानं दूध पाजी

बाळाचे ग माज्या आजा आजी आले काल
अंगड्या टोपड्यानं वलन झाली लाल

आंगड्या टोपड्याचा शिंपी वाड्यात वलावला
भाचा कडीचा दाव मला

पिंपळपानाची साऊली पडली बगा जोत्यावरी
भाचा मामाच्या कडीवरी

मावळ्याच्या घरी भाचा पावणा शिरीरंग
देती बसाया चवरंग

---

१ इच्छा, अपेक्षा. २ बादशहा.

सोनाराच्या इथं वसलाय तुजा आजा
आता बाळा माज्या तोड्याचं मेज दे जा

मामा मांडी पाट मामी घाली रांगोळी
बाळा तुजं कौतिक होईल आजोळी

सोन्याची आंगूठी घेते मी हजाराची
नाजूक करंगळी तान्या या गोजीऱ्याची

आंगठीची घडईन किती ग बाई बेतायाची
द्रिष्ट मी काढीयीते बाळाच्या हातायाची

साखळ्या तोरडयाची एवढी नोवरी कोणाची
माझा बाळराजा शेती करीतो ग त्याची

मामाला मुजरा भाचा करितो वाकुनी
सब्बर शिंगी वरूनी

मामाला मुजरा भाचा करितो दोई हात
लावा जावयाचं नातं

टोपाच्या टकुच्याला जोड लाविती मी झेंडं
बाळ मामाच्या मागं हिंडं

मावळ्याच्या पुढं भाची जेवती चपाती
कशी पडली सजागती

माज्या बहिनीचं बाळ मला म्हणती मावशी
पुढं पाऊल टाकू कशी

माज्या बंदूजीचं बाळ मला म्हणीतं आत्याअक्का
कडी घेऊन घेते मुका

थोरल्या घरची लेक कशी वाड्यातून बोलं
तिच्या नथीचा मोर डुलं

हौस मला मोठी
कडीतोडीयाचा
सईला पुत्र व्हावा
बाळंतविडा न्यावा

हातात कडीतोडे
बाळ माझा तान्हा
कमरी करगोटा पेट्याचा
कसा शोभतो मोठ्याचा

हावस मला मोठी
तोड्या वाळ्यायाचा
बंधूल पुत्र व्हावा
भाचा कडेवरी घ्यावा

दिवस उगवीला
किरनं टाकितो झाडावरी
रत्न बाळीच्या चुड्यावरी

गोंडाळ तुझा हात
कसा मामाच्या नजरेत
कंगन्या कोरीव कागदात

१०

संग्राहिका : कु. विद्या देसाई

हावस मला मोठी
राजस बाळ माझा
हिरवं लुगडं भरजरी
राजा घेतला कडीवरी

अंबारीचा हत्ती
तान्या बाळायानं
बाई वाड्याला भिडला
काय किराना धाडला

दुरून वळकिते
माज्या तू बाळराजा
तुझ्या चालीचा झपाटा
छत्रीखालच्या पोपटा

लाडक्या लेकीईला
लई चुलत्याचा लळा
दिला अंदान पानमाळा

लेकाच्या परास मला लेकीची माया येती
वत्सला बाळ माझी गोपांला ढाळ देती

दुधातुपाचा खाणार नगं वाढू गुळवनी
बाळा माझ्या गणेशाची सुरत केळावानी

नटत नटत कुठं निघाला पेठंत
माझा बाळराजा जाई मोगरा लुटत

हरिश्चंद्र वारा बाई सुटेनासा झाला
ताना माजा बाळ बाई सपनी गुंतला

हरिश्चंद्र वारा बाई सुटला चवकोनी
बाळायाला सांगा लावा वावड्या दोनी दोनी

दिवस उगवला माजं दिवसापाशी काई
माजं बाळ तानं येन्याची वाट हाई

दिवस उगवला बाई करवंदीच्या जाळीत
माजा बाळराज का ग फिरतो मळीत

दिवस उगवीला किरणं टाकितो झपाझपा
माझी बाळाबाई सये चांदनी लोटी सोपा

दिवस मावळीला बागनी गावच्या घोलामंदी
मैनाईचा बाळ येतो मुराळी तोलामंदी

दिवस मावळीला बागनी गावच्या आसूपाशी
मैनाईच्या बाळासंगं बाई रामूशी इसवासी

सावळ्या सुरतीला न्हाई नटाया लागत
माझा तो बाळराजा केवडा केळीच्या बागेत

साखऱ्यापरीस किती गुळाला गोडाई
लाडकी बाळ माझी मोहर कंठीला जोडाई

१६२००

लाडकी एवढी लेक   मला मागती मलई
पितळेच्या वाटीला   लावा चांदीची कलई

हाका मारू किती   तुला लेकाच्या नावानी
अशी राधिका लेक   दिली मलाच देवानी

लाडक्या लेकीचं   तोंड भाजलं तिकटानी
तूप साखरेची सव   लावीली आज्जीनी

माझ्या ग दारावरनं   ओढा वाहे झुळूझुळू
बाळ माझी अवखळू   कृष्णाताई

हसत खेळत   आलं बाळ अंगणात
हिरा झळके कंगणात   बाळराजा

झाली तिनी सांज   दिवा लावा गच्चीवरी
बाळ आला हत्तीवरी   राजस ग माझा

गावाला गेला माझा   सोन्याचा तुकडा
लाडक्या बाळाईचा   भांग डोईचा वाकडा

तुज्या सरूपाची   जाई अंगनी बाळा लावू
माज्या लाडक्या सदाशीवू

घडीच्या धोतराची   मांडी दिसती दाणेदारू
बाळाची सुरत अनिवारू

कडू नि कारईलं   चिंचबाईनं बनविलं
घर बाळानं चालविलं

चावडी चढताना   सारे दिवान झाले खुशी
म्हवनी लाडक्या बाळापशी

समींदराच्या काठी   मोत्या पवळ्याची लुटालुटी
बाळ उचली खेळासाठी

लावणीचा आंबा पाणी घालिते पेला पेला
लाडक्या बाळायाच्या सावलीची आशा मला

वसाई वसकर शेला देते मी वलनीचा
लाडका बाळराज बंधू शेवंती मालनीचा

टोपाच्या टकूच्याला गोंडे लाविले पेंड्यावानी
लाडक्या बाळराजा सभा बघती येड्यावानी

पोथी पुस्तकानं भरलं देवघर
बाळा शंकईरा वाचून दाव[१] सारं

पोथ्या पुस्तकानं भरलं देवघर
बाळा माझ्या तान्या वाच रुक्मिणी सैयंवर

शाळेच्या गुरुजीला देऊ केली ताटवाटी
तान्या माज्या बाळा नका मारू ल्हेन्यासाठी[२]

तानेल्याला देते पाणी भुकेल्याला देते लाडू
बाळा राजसा माज्या नको मातेची सई[३] काढू

शाळेचा पंतोजी ग फार बाई तापला[४]
माजा ताना बाळ काय अक्षार चुकला

शाळेच्या पंतोजीला नेते झारीभर पानी
आता माजी बाळ लिहू लागलीच तानी

शाळेचा शिकनार शाळेला झालं ऊन
बाळासंगं माझ्या छत्री धराया कारकून

शाळेला जातो बाळ धडा वाचितो जाता जाता
चुलता नियाला उभा होता

उनाच्या रकामंदी रथ कुणाचा धावा घेतो
बाळ इंग्रजी शाळे जातो

---

१ दाखव. २ लिहिणे. ३ आठवण. ४ संतापला, रागावला.

माळीन सादविती ध्या ग बायांनू सीताफळ
माझा बाळराज खानार गेला शाळं

जिरसाळीच्या तांदळाला जाळ घालिते येता जाता
लाडका बाळराज शाळेचा यील आता

नटत थटत टाळू टोपीच्या भायेरी
तान्हं माझं बाळ चडे शाळेची पायरी

लिंबलोन करू सायेत[1] जाऊन
मन झाये तुष्ट बायनं[2] अक्षर पाहून

सायले जाताना व्हजं[3] झायं दप्तरनं
तान्हीयारे बाय सकवार[4] दिलं[5] तुन्हं

सायने जाताना रडू कसानं रे येतं
तान्हीया बायरे दप्तर जड व्हतं

मन्हा आंगनमां दाटी झाई कसानी
तान्हीया बायनी आते साया सुटनी

सायेना पंतोजीले देऊ दाय साय
सामां याला मी लहान मन्हा बाय

बैलामधी बैल बैल सजन गुणाचा
बाळा माझ्या नगं मारूस उन्हायाचा

शेताला गेली कुरी उभी बांधाच्या आसऱ्याला
तान्या बाळायाच्या मोती राघूच्या कासऱ्याला

शेताला नेली कुरी बी का नेलं गव्हायाचं
तान्या माझ्या बाळानं नाव घेतलं देवायाचं

आऊक मी चिंतते झाडावरच्या पाखराला
माझ्या शाळेच्या लेकराला

---

१ शाळेला. २ बारीक. ३ ओझे. ४ ज्ञान ग्रहण करणार. ५ अंतःकरण.

पाटच्या पाऱ्यामंदी हाक मारी पटकरी
माज्या बाळायाची बैल विसरली घरी

वळवाच्या पावसाचं झालंया आगर
बाळाच्या शेतामंदी सोडी पाऱ्याचं सागर

जुंदळ्याचा गाडा बाई सडकंनी घुमईतू
बाळायांची माझ्या भावाभावांची उम्मेईतू

पिकलं म्हणूनी जन बोलता राहीना
राजसाचा माझ्या गल्ला अंबारी माईना

दिवस मावळीला मला शिवेच्या शेतामंदी
बैल अवकाळ माझ्या बाळाच्या हातामंदी

बारा बैलांची दावन मागं म्हशीला डांवा रवा
लाडक्या बाळायाची माज्या राजाची बगा हवा

वाटेवरलं शेत चिमण्याबाईचं म्हायार
लाडक्या बाळकानं केल्या गोफणी तयार

गाडीवान दादा तुझ्या गाडीला नवी खोंडं
लाडका बाळराजा चारीतो सरकी पेंड

॥ ११ ॥

## संग्राहिका : सौ. पार्वतीबाई गुंजाळ

आकाशी वावडी वारा सुटं भराभरा
ताना तो बाळराजा उभा वावडीवरी हिरा

घरात कामधंदा चित्त माझं रानामंदी
तान्हा माझा बाळ नवा घातला कामामंदी

माळ्याच्या मळ्यामंधी काय करतं भिरीभिरी
माझा बाळा तान्हा मोहन मोटेवरी

बैला ग मधी बैल बैल उफळ्या गुणाचा
बाळाला किती सांगू सोड नांगूर उन्हाचा

हावशा माझा बाळ धनी हासत पुढं गेला
बईलाच्या पाठीवरी हात फिरवू लागला

माळ्याच्या मळ्यामंदी माळी बसला सावली
बाळ राजसाला माझ्या चावरी घावली

## १२

### संग्राहिका : सौ. लीलावती पवार

लाडकी ग लेक येवढी लाडकी होऊ नको
मामाची बागशाई हिरवं डाळिंब तोडू नको

आकाशी वावईडी चंग लावुनी सोडीईली
भाच्या त्या बाळायानं नगरी मामाची वेढीईली

हातात कडीतोडे करदोडा कवा केला
बाळ मामाच्या गांवा गेला

आजोबीळाला गेली करी कवतिक आजा आजी
मामा तांब्यानं दूध पाजी

लाडका येवढा लेक धरी मामाच्या धोतराला
बंधू माझ्या हावशाला भाचा शोभे चातुराला

वळवाच्या पावसानी फळी मांडिली कोसावरी
बाळ माझ्या राजसाच्या आली धावूनी उसावरी

शेताला नेली कुरी उभी शेतात गेली नीट
तान्या माझ्या बाळायाची पहिली साधीयेली मूठ

बाळ शिकारीला जातो ससा मारितो खिंडीत
वाघ मारितो जाळीत भाचा मामाला धुंडीत

लाडक्या लेका नको लाडका होऊंस
मामाच्या बागेतली कवळी अंजिरं तोडूंस

कुरळ्या केसायाचा भांग पडला कंगणी
बाळ माझा राघू खेळे मामाच्या अंगणी

मक्याचं दळायान माझ्या जिवाला आनंद
तान्हं माजं बाळ मांडी निजला गोविंद

दोन हजारचा घोडा त्याला तिसींचा तोबरा
बाळा माझ्या देखीताना झाला वकील घाबरा

घोड्याला घासदाना देते मी मनुक्याचा
पोटीचा बाळराज व्हईल वकील तालुक्याचा

अंगड्या टोपड्यानं बाळ करीतं सजावजा
घेतो कडीला मामा तुझा

माळ्याच्या मळ्यामंदी येसबंदाचा येल गेला
बाळाकारणं गोळा केला

कुरळ्या केसायाची भांगा पडते का वाकी
माझी दैवाची हाई सखी

मोठं नि मोठं डोळे जशा लिंबायाच्या फोडी
बाळाला देखिताना नार वाटची झाली येडी

वारा ग वाजल्याती भर दुपार शेरामंदी
लाडका बाळ माझा उभा जनलोकामंदी

अपूर्वाई[1] मेवा तान्या त्या लेकराचा
माझा तो बाळराजा बत्तासा साखरेचा

ईश्वर पिंडीवरी बेल वाहिला असा कुणी
माझ्या ग बाळायानी पूजा बांधिली नेनंत्यानी

उगवला नारायण उगवताना दिसं शोभा
त्येच्या दर्शनाला हात जोडूनी बाळ उभा

श्रावणी सोमवारी दुरडी बेलाची कुणी नेली
माज्या ग बाळायानी पूजा म्हादेवाची केली

माळी[2] सोप्याया परास माझं अंगण चुनगती
माझा तो बाळराज देवाधर्माची वाची पोथी

लेकी ग वरती लेक झाला मालनी चढायाचा
जिन देवाच्या मंदिरात आंबा वाहिला पाडायाचा

लक्ष्मीबाई आली येता दाराला देती थाप
माझ्या बाळायाची झाली पहिली ग झोप

पालक पाळईना तुला बांधिला तुळीबाई
राघू न्हवं ती मैना हाई

पालक पाळईना वर खेळणा मलकापुरी
बाळ गिन्यानी टाळकरी

देवाशी मागते मी राज संपत्ती थोडी थोडी
पोटी पुत्रांची द्यावी जोडी

---

१ अपूर्वाई. २ माजघर.

लक्ष्मीबाई आली चढे ओसरीचं जोतं
लाडक्या बाळासाठी सोडी साखरेचं पोतं

उगवला नारायण पिवळ्या झाल्या भिंती
तान्या त्या बाळायाला आऊक्ष मागीत होती

देवाच्या देऊळात उभी होते मी गाभाऱ्यात
मोती दिला अंगाऱ्यात बाळराजा सजनाला

लक्ष्मीबाई आली आली मागच्या दारानं
तिला खुणावलं धाकल्या बाळायानं

लक्ष्मीबाई आली शेताचा बांध चढे
हाती गोफण घेऊन बाळराज पाया पडे

उन्हाळ्याचं ऊन लागतं भारी माळावरी
देवा तू विठ्ठला रे धर छाया तू बाळावरी

नवस मी बोलईते झांजटाळांच्या टोपणा[१]
नेनंता माझा बाळ साऱ्या दिंडीत देखणा

गाईचा गुरराख्या म्हशीचा रानामंदी
सावळं कृष्ण बाळ पावा वाजवी पाणंदी

माझ्या ग अंगणात पाच फण्यांचा नाग डोले
त्याच्या साऊली बाळ खेळे

एकुलता एक लेक देवा नारायणा तारी
बाळराजाची माझ्या दोरी

पुत्राचं ग फळ देवानं दिलं सहज
कडे घ्यायला नऽो लाज

पंढरी जायायाला सारं सायास केलं काल
बाळा गिन्यानी संगं च'

---

१ टाळकरी. परमेश्वराची पूजा बांधणारा. जनलोकांचे वाद्य.

दिवस मावळला झाली गुराढोरांची येळ
लाडक्या बाळराजा रस्ता सोडूनी चेंडू खेळ

दिवस उगवला जसा शेंदाडाच्या फाकी
आऊक मागिते लेकालेकी

## १३

### संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

गोंडबीव्याची वेणी ती का पाठीवरी लोळे
भावामध्ये बहीण खेळे विद्याताई

लाडकी ग लेक लाड सांगिते बापाला
मोती मागिते कापाला मोहनाताई

लाडकी ग लेक भूक म्हणूनी निजली
तूप साखर भिजली मोहनाईची

बाप म्हणे लेकी साखरेचा खडा
मायबाई म्हणे जीव होतो थोडा थोडा

सरकारवाड्यापुढं दवंडी कशाची पिटली
कंठी लालाची तुटली बाळायाची

हास मला मोठी वहिनीईला मुलगी व्हावी
बाळंत विड्यावरती जरीची कुंची न्यावी

खेळणा पाळणा मोती कचले[१] दोरीला
जो जो करीती हरीला

---
१ गुंफले.

काम का करीताना वाई शिणला माझा जीव
ताना तो बाळराज पुढं उभा सदाशिव

सांगू तुला किती मी. नगं गल्लीनं पान खाऊ
माज्या रे बाळराजा कुण्या नारीचं नाव घेऊ

दुबळं माझं पण काही दिसंना घरामंदी
लाडकं बाळ माझं खांब सोन्याचा दारामंदी

सुखा नि दुःखायाचं माझ्या हुरद्याला कुलूप
तानं ग बाळ माझं आलं गुजाचं मालक

पालक पाळईणा घेती बघा भिंगायाचा
तान्हा माजा बाळराज राघू हिरव्या रंगायाचा

माझ्या या अंगणात आयाबायांचं पाची कुंडं[1]
बाळ माझा चंद्रकांत त्यात मागं वलदंड[2]

बोबड्या बोलायाचं बाळा मला येतं हासं
बाळा माझ्या चंद्रकांता मला बोलूनी दाव तसं

कुण्या माऊलीच्या पोटी हिरा जलामला इगतीचा
फेर पडला संपत्तीचा

कुण्या माऊलीच्या पोटी लेक जलामली शाणी
दुई कुळीचं राखी पाणी

पाणी ग भरीईते तुझ्या पाण्यात लाल काई
बाळ टाकितो पिवळी जाई

लाडक्या लेकीईचा लाड करावा मदूर[3]
धरी शेल्याचा पदर

जिरसाळीचे तांदूळा शिज सजना गुनावंता
बाळ शाळेचा यील आता

---

१ मुले. २ दंगेखोर. ३ मधुर. कवतिकाचा. तिच्या वयाला शोभेल असा

चालत चालू द्यावं रांगतं कडी घ्यावं
माझी ग मायबाई सुभेदारिणी पुढं व्हावं

जाईच्या फुलायांनी अंबाबाई ती घाम्याजली
नेणंत्यानं माझ्या सकाळी पूजा केली

गोरीचं गोरंपन तिला दिव्याचं लागं ऊन
तानं ग बाळ माजं त्याचं पिवळं गोरंपन

लेकूरवाळीईचा बाई रांजण अमंगळ
देव सत्यीनारायन पानी पित्याती निर्मळ

लक्ष्मी आली म्हणू कशी शेताचा बांध चढू
तान्हं बाळ कडीवरी हाती गोफण पाया पडू

नाचुनी नाचुनी मोर लागला झुरणी
बाळावरी माझ्या काळूबाईची करणी

भरल्या तिन्ही सांजा गाई आल्यात्या गोठ्यामंदी
दूध बाळाच्या वाटीमंदी

तान्हीया बाळासाठी केले नवस जागोजागी
मामे मावशा फेडू लागी

आंगडं टोपईडं तान्हे बाळ ते नटविले
चीट मामानी पाठविले

पिंपळपानायाची पड साऊली जोड्यावरी
बाळ मामाच्या कडेवरी

आंगडं टोपईडं शिव शिंपीनी काळं बेरं
दंडी वाक्याचं बाळ गोरं

हिंडुनी फिरुईनी बाळ आलं ते इसाव्याला
मांडी देते मी बसायाला

उगवला दिन ।पिवळ्या माझ्या भिंती
बाळाईला औक मागाया उभी होती

उगवला दिन आला दरवाजा नीट
माझ्या बाळराजा आता दर्शनाला ऊठ

उगवला दिन उगवताना आला वर
माझ्या बाळराजा ऊठ तीर्थाचा तांब्या भर

खेळ माझ्या बाळा तुला मी देते नंदी
लागले तुझ्या छंदी कामा काजाला पडे बंदी

देवाजीचं देनं पुन्य सासूसासऱ्याचं
कडीला बाळ तानं हाती दावं वासराचं

पालक पाळईना तू का हलशी तुळशीबाई
पोटीची माजी बाळं राघू न्हवं ती मैना हाई

उगवला नारायण उगवताना लालालाल
मावली मातोश्री राधा बाळाला पानी घाल

आई अंबाबाई तुजं सोन्याचं कंवाळ
परया परदेशा माज्या बाळाला संबाळ

पंढरपुरामंदी टाळ मुरदुंग वाजतो
माजा बाळ ताना कसा भजनी नाचतो

हात मी जोडीते देवा मारुतीला
सुखी ठेव माज्या बाळ राजसाला

महादेव देवळात नंदी देवळाबाहेरी
बाळाला ग माज्या पूजा पडली दोहेरी

जेजुरी गडाला पोत पाजळे शेलारीचा
तान्हं माजं बाळ गड चढे मल्हारीचा

मारवती राया — अंजनीचं तानं बाळ
रुईच्या पानाची — त्येच्या गळ्यांमधी माळ

नवस म्याबी केलं — गावाभाईर मारुतीला
बाळाचा लाभ झाला — देव नवसा पावईला

लक्ष्मीआई आली — आली सोन्याच्या पावलानं
नेनंत्या बाळायाचा — कट्टा चढती नवलानं

पाऊस पडीयीतो — वाडी गावाच्या माळावरी
मोत्याची अब्दागीरी — अनसुयेच्या बाळावरी

नवस म्याबी केलं — नवसा फळ आलं
बाळ अंगणी पानी न्हालं

माझं रे आयुष्य — उणं कर रघुपती
बाळा वाढवी श्रीपती

## १४

संग्राहिका : सौ. शांतादेवी बाबर

पालक पाळईना — वर मोत्यांचा खेळईना
सयांनू किती सांगू — बाळा गुंगी कशी यीना

माज्या या अंगणात — तोंडं धुती पोरी सोरी
माजी ती बाळ तानी — चांदणी त्यात गोरी

सुपली कुरुकली — आडभिंती उभी केली
तानी बाळ माजी — खेळाया कुठं गेली

माज्या ग अंगणात पाच फड्यांचा नाग डोले
त्येच्या सावलीला माजा ताना बाळ खेळे

बोबड्या बोलन्याचं मला येतंया लई हासं
सुदामा माज्या बाळा परतुनी बोलं तसं

बोबड्या बोलन्याची मला वाटती लई मजा
माजं ते बाळ तानं वाजवी बेंडबाजा

मोठं मोठं डोळे जशा लिंबायाच्या फोडी
बाळाला देकीताना[1] रंभा ती डोळे मोडी

पान्याला जाती नार पानी भरुनी का उमी
खडा टाकूईनी माज्या बाळाचा अंत बघी

लेकीच्या आईला हाई कशाचा दुकाळ[2]
माजी वयाबाई पानी हौदाचं बकळ

मोटारी परास जाती साईकल जोरानं
माज्या बाळायाची टाळू उडती वाऱ्यानं

पाची परकाराचं ताट वर साखरेच्या शेंगा
जेवण जेवीईतो बाळ ताना शिरीरंगा

लाडक्या लेकीईला लाडकं काम सांगा
देवपूजेला पाणी मागा

बाळ सासऱ्याला जाती नदीच्या निवाऱ्यानं
शेला भिजला दैवारानं

रांगत खेळत बाळ हुंबऱ्यावरी बसं
जसा सोन्याचा ढीग दिसं

बाळ आंगूळीला जातो घडी उडती धोतराची
संगं जोडी ती मैतराची

१ पहाते वेळी. २ दुष्काळ, उणेपणा.

माळ्याच्या मळ्यामंदी माळी बसला खोपीमंदी
बाळ ताना माजा फुलं तोडी टोपीमंदी

दिवस उगवीला जशी शेंदराची पुडी
बाळायाला माज्या औक मागिते वाढी[1] दिडी

वाजत गाजत आले सुतार तासायी
ताना या माजा बाळ बांधी ढेलज बसायी

समोरल्या सोप्या कांत बैसले खुर्चीवरी
हावशा बाळ माजा बाळ खेळतो मांडीवरी

आगीनगाडी आली झाली चढाया घाई घाई
हावशा बाळायानं बुटासहित दिला पायी

आगीनगाडी आली बोरीबंदरा किंकाळली
हावशा बाळायाची तवा नदार निवळली

आंब्याच्या सावलीला कोण निजला गोरापान
हावशा बाळ माजा आकरी दुधाचा पैलवान

हावस मला मोठी कडी मोडून कडदुऱ्याची
हावशा बाळायाची गोरी कंबर सरदाराची

हावशा बाळ माजं काय निघालं आंगूळीला
कोण्या नटव्या नारीनं डोळा तो ढाळीयीला

नदीच्या पल्यायाड शाळू आलाया राकनीला
हावशा बाळायाच्या मोती दुहेरी गोफनीला

बाळ सासऱ्याला जाती हितून बारा कोस
बाळा नटऱ्या गेला दिस

बाई कवळी कोथमीर तिची तुळणा कोणी केली
बाळा हावशानं गाडी नेली

---

१ दीडपटीने वाढणारे. दामदुपटीप्रमाणे. वाढत्या वयाचे.

माळीन सादविती द्या ग बायांनू सीताफळ
हावशा माजं बाळ खाणारं शाळा गेलं

सरकार वाड्यापुढं पेटी फुटली खजिन्याची
राजस बाळायानं राणी जितली बडोद्याची

झाल्या तिनी सांजा गुरावासराची येळ
बाळ माजा ताना उभा वाटेवरी खेळं

पालक पाळन्याची दोरी हुंबऱ्या भायेरी
माज्या बाळायाला झोका टाकिती दुहेरी

पालक पाळईना माज्या लेकाच्या लेकराचा
आश्विन मासात पडे पाऊस उत्तराचा

सकाळी उठून शेनापान्यात माजा हात
राजसा रे बाळा तुजं दिरव्य[1] गोठ्यात

सुपली कुरुकली आला बुरूड मिरजेचा
माझ्या बाळाईचा खेळ शान्या गिरजाचा

पालक पाळईना चिमंन्याबाईचा गजबार
माजा ग बाळ ताना आत निजला दरबार

राजमंदीरी पाळईना झोका देते मी जाऊईनी
तान्या माज्या बाळाईला आतमंदी पाहूईनी

पालक पाळईना राजमंदीरी नाद झाला
सयांला किती सांगू राजहंसांनी झोका दिला

पालक पाळईना सोप्या हलकडीवरी हाले
पाळना हालविता तानी बाळाई माजी डोले

साकळ्या वाळयाचा नाद येतो माज्या कानी
जोतं चढती माजी तानी

१. द्रव्य.

शेरभर दूध पैलवानाला देते मेवा
बाळाजीची माझ्या कुस्ती नेमिली कोण्या गावा

दात डाळिंबीचे दाणे ओठ पोवळ्याचे लाल
मुख गुलाबाचे फूल जसाचे

साजरी सुंदर कशाला वेणीफणी
रूप बघा गेंदावाणी माझ्या सईचं

साजरी सुंदर कशाला नटपट
शोभे कुंकवाचं बोट सईला माझ्या

जेवणाची पाटी बाई ठेविली वेल्या बांदा
गोजिरं बाळ माजं हाका मारितं सूर्व्याचांदा

गाई वासरानं सारा डोंगूर झाकला
ताना माझा बाळ कृष्ण गवळी धाकला

सासू नि सासरा आंबा लावून गेले त्यानी
बाळाला दिली लेक कलम उत्तम पाहूनी

सावली पसरली माझ्या दारीच्या घेवड्याची
नेनंत्या बाळायाची सुरत कोमेली केवड्याची

धाकलं माजं घर माजं अंगण फेराचं
बाळ खेळतं दिराचं

कुस्तीच्या फडावरी लिंबू नारळ आधी फोडा
पैलवानाला गाडी धाडा

अवकाळ माझा बाळ नका करूसा शिवीगाळी
माझा अवकाळ वनमाळी

उनाच्या रकामंदी कुठं निघालं माजं सोनं
कवळ्या छातीला लागं ऊन

अंकलखोपच्या पानंदीला कुणी लावली आंबा चिंच
तान्ह्या या गोजिराचं ल्हान परान बाळाईचं

अंकलखोपच्या शिवारात हिरव्या कातीचा नाग डोले
ताना तो बाळराज वतनदारीचा मान बोले

माझ्या या अंगणात आयाबायांच्या आल्या लेकी
माझा बाळ तान्हा नारद चेंडू फेकी

छंदबीखोर बाळ तुझ्या छंदाचा लई घोळ
माझा ग बाळ तान्हा दह्यामंदी मागी गूळ

छंदबीखोर बाळ तुझा छंदबी असा कसा
माझा बाळ ताना चंद्र मागितो आगाशीचा

माझं न्हवं बाळ माझ्या भैनाचा पंडित
बागणी बागणी करीत आला शिवार धुंडीत

आंगूळीला पाणी हांडा तापतो वजनाचा
बाळाजीचा माज्या शीण काढिते सजनाचा

दिवस उगवीला उगवताना देखीला
माझ्या बाळकानं म्होरं गुलाल फेकीला

माझ्या ग बाळायानं हुंबरं वलांडलं
लाडकं माझं बाळ मामा म्हणाया लागलं

अवकाळ माझं बाळ नारळी पोफळीवरी चढे
त्याची मावशी पाया पडे

आंगूळीला पाणी हांडा भरीला न्हाणीपशी
बाळ शेंडीला लिंबू घाशी

अवकाळ माझं बाळ हाती देते डाळगूळ
सोड निन्याचा रे घोळ

कुस्तीच्या फडावरी कोण हिरव्या छतरीचा
पैलवान माझा खातरीचा

शेरभर दूध पैलवानाला देते न्हारी
गुंड उचल माझ्या हरी

::१५::

## संग्राहिका : श्रीमती आनंदीबाई शिर्के

लावणीचा आंबा याला पाणी चूळ चूळ
लाडकी माझी मैना आंब्याचढी आली केळ

सविसांज झाली दिवा लावा ग जिन्यात
समींदर बाळ माझा आला ग मेण्यात

सविसांज झाली लामणदिवा लावा दारी
लाडक्या बाळायाची राघूची आली स्वारी

कोण्या गावी गेला लाल माझ्या लालणीचा
नेतरं झाली लाल शिण आला चालणीचा

लोकांची लेकईरं बाई खेळती लगुऱ्या[1]
राजसाच्या माझ्या सये चेंडूला घागऱ्या

लोकांची लेकईरं खेळती आट्यापाट्या
बाळाच्या माझ्या बाई रंगीयीत गोट्या

तुझ्या जिवासाठी जीव माझा थोडा थोडा
बाळा तू बळीराजा पायामंदी घाल जोडा

---

१ लगोरी. लहान मुलांचा खेळ.

मैना माझ्या साळाईचं लई हातपाय मऊ
पित्याला काळजी कोण्या राजीयाला देऊ

## १६

संग्राहिका : सौ. सुशीलाबाई शितोळे

यशोदे ग बाई तुझा हरी कोनावानी
सावळं याचं रूप जवसाच्या फुलावानी
यशोदे ग बाई ऐक हरीची आवई
शिंक्या पुरंना हात खाली मांडितो तिवई
नऊ मास होतं माऊलीच्या मिऱ्याआड
माऊली बाईला ओव्या गाईल देवाचड
उगवला नारायण दिसतो तान्हं बाळ
आला जानीमंदी मग झाला पायपोळ
लेकूरवाळीला हिला लेकराचं मिस[1]
बाळ तो राजाबिंडा सोन्याचा ढीग दिसं
नेनंता मुराळी बाई याला ग संभाळ
सुकूनी जाईल बाई केळीचं कंबाळ
कुंचीवर कुंची काळ्या कुंची चून पडं
मैना माझी बाळाबाई वाडा मामायाचा चढं
खेळ खेळ बाळा तुला कुणी केली मना
सांगते बाळा तुला आज्याचा रे परगाना

---

१ निमित्त. मोह.

वाकुडी तिकुडी लेका रघुवा तुझी माती
लेकीचं चांगुलपण पगाया घरा जाती

बडूद्या बैलायाची आली डिरकी पेटंमंदी
बाळराजा माझा सावध वाड्यामंदी

वाटच्या वाटसरा काय बघतो खेड्याला
सोन्याचं कुलूप माझ्या बाळाच्या वाड्याला

वाटंच्या वाटसरा काय बघतो डोंगराला
खिलारी नंदी माझ्या बाळाच्या नांगराला

जोंधळ्याचा गाडा रचिला चवकोनी
माझ्या बाळायाला शिकीवलं बाळपनी

जोंधळ्याचा गाडा आला ग माझ्या दारी
ओवाळीते बाळराजा चार बैल धुरकरी

## १७

संग्राहक : **श्री. दा. गो. बोरसे**

आयांनो बायांनो ठिवा खाली वान
मया रानी हासे शंभरी नम्री सोनं

मयना राघू चिडिया पायन्या व-हे हाले
घुंगरू झुमझुम वाजे चांदनी मन्ही डोले

चांदीनी दुदूझारी बाईनी जिजी लाये
आमरुत गुटूगुटू लाडकी मयना पेये

सोनुली मन्ही गोरी नकटी तुन्ही पोर
उतरना देरवीसन वहिनी तुझा नूर

चप्पय मन्ही हरनी वन्सना ल्योक काना
सोवही जोडा कसा नाद व सोडी द्याना

नाजुक समया खेये जुईनी जशी कयी
आंडोर तुम्हना बंड संभाया जाऊ बाई

गुपित तेस्ने सांगस सोधसू नवरा गोरा
घरानं शीलवान बाईना देखा तोरा

धनी ज हुंडासाठे करही आनमान
लेना द्या इकीसन लगीन करसू छान

मयना लाडाकोडानी कोणत्या राजानी रानी
तिना राजमा जासू खेय तिना देखसू

तिनं राजसे मज्जानं म्हनसू नामी गानं
मयनाले झोप लागनी मयनानी माय हरखनी

झोका उच्चासा देसू मयना मांडीवर लेसू
मयना रानीना झनकारा चंदर तारा डोलतसूं

नित्तय[1] झिरपस चांदनं डोलस सम्द त्रिभुवन
मयनाले झोप लागती मयनानी माय हरखती

येव येव कपिला गाई देखत मन्ही हाई बाई
दूद तुन्हं वह गोड बाई साठे पान्हा सोड

चरी भरी तापाय दूदवर वनी साय
आवडी साय कोन्हले आवडी साय मयनाले
त्या मा आमरुत कन पिई ले बाई झटकन

---

१ नितळ, स्वच्छ.

मयना बाई मन्ही	सख्याले आवडे
वासना[1] केवडे	घर भरे

शेरभर सोनं	खेतीवाडाना पसारा
तठे देऊ करा	लाडक्या मयनाले

वतनदारनं घर	साजेसा नवरा
तठे देऊ करा	लाडक्या मयनाले

सारोयन्या[2] भिंती	वन्हे काढना पोपट
तुन्ह्या लगीननी खटपट	मयनाबाई

सारोयन्या भिंती	वन्हे काढनी परात
तुन्ह्या लगीननी वरात	मयनाबाई

आईक मयना	नही धरावा आवुला
तुले देखीसन	जीव व्हई कालाभुला[3]

आंगनमा फुली वन	चंदरवन चांदनं
क्रिस्न बाय नाचे	कुदे सोभस आंगन

बाय लडे मोठा म्या	तो चंदर बिलंदर
चांदनीस्ना चंदरहार	देयेना लवकर

गवयीनी करतस	क्रिस्नानं कवतुक
क्रिस्न बाय चाफाकई	देखा नोक झोक

उमटनात गादीव हे	पाय इवलाले
भरू नका रागं	धनी क्रिस्न नादावले

गयसरी तोडी मन्ही	घरात दारात
काय बोलू क्रिस्ना	ती त लेकरानी जात

काय क्रिस्न हिनवस	भाऊ गोरा राम
नको बोलू बयरामा	गुनी मन्हा शाम

१ केवड्याचा वास, वासाचा केवडा. २ सारविल्या. ३ घाबरा, व्याकूळ, भांबावलेला.

दूध धई तूप लोणी शिरिखंड वासुंदी
रामक्रिस्न येकच पण बहु नादी फंदी

चावडीमा शाम मन्हा बठना आयटीनं
याले काय समजही गोपासस्न गन्हानं

जेवायले ऊठ राजा तठंच झोपना
नाठायले नही सूद कितला ग दमना

लाडकी मयना मांगस सांजोरी
लोनी हातवरी आजी लाड करी

लाडकी मयना मांगस डायीम
हातवरी जाभ मामी लाड करी

आंब्याचा आंबरस वर केळीचं शिक्रण
मामाच्या पंगतीला भाचा जेवितो नखऱ्यानं

लाडकी मयना मांगस चिरडी
खन धारवाडी मामा लाड करी

लाडकी मयना मांगस नथनी
हिरवा पाचू मनी आजी लाड करी

लाडकी मयना मांगस करमफूल
मोतीस्नी गुंफलं जिजी लाड करी

१८

संग्राहक : श्री. ना. रा. शेंडे

नोको झोंबू तान्या थानी नाई बुंद
कूस जी बेड़मान उगारे गोईंद

दह्या जलम सांजीले तान्या व्हती कारी रात
घुगऱ्याचे दाने दोन तुह्या जलमीची साथ

उगवला सूर्व्या आली तपन[1] तुरशीवर[2]
गवाई[3] हाये तान्या थिची सावली तुह्यावर

आको[4] नोको पाहू चांद लाजंल गोइंदा
बोटीच्या लंगूटीले त्येची आस नाई दादा

भारी चिकाचं जंगल चिक चाटरे गोइंदा
कारजाचा[5] टुकला नोको तोळू गोविंदा

धोतराचा काठ दोरी कमच्याले बांधली
बाळाचा पारना माहा तुटून जाईल

केळी नारळी तोडून इटी दांडूला केली जागा
अवकाळ जलामला बाई बाळ ताना माझा

सुपली टोपली नाड्यानं गुंफीली
लाडाची सईबाई खेळाया गुंतली

हातात इटीदांडू काखेमधी उभा गाडा
बाळायाला माझ्या खेळायाला वाट सोडा

बयनाबाईचा झूला तानुले झोपी जाते
बाळ तलवार फिरवते सैन्य राजाचे पळते

लेकाचा येवढा खेळ लेकी बाळीनं माज्या केला
चेंडू गगनी लाविला

खेळून माळून आली सई गे घरात
हिरे चमके बिंदुल्यात

घागऱ्या घुळू घुळू दणाणीला माझा सोपा
बाळ खेळतो प्राणसखा

१ उष्णता, प्रकाश. २ तुळशीवर. ३ ग्वाही, साक्ष. ४ तिकडे. ५ काळजाचा

आपट्याचं बाई फूल आली नवमीची रात
गोजिरवाणं माझं बाळ खेळे अंगणात

## १९

संग्राहक : श्री. रा. श्री. कदम

लाडकी माझी लेक खाया मागती मलई
सोन्याच्या वाटीला दिली चांदीची कल्हई

बहीण भावंडाचा झगडा झाला रानी
बहिणा डोळ्या पाणी भाऊ परस्तावला मनी

लाडकी म्हणू लेक धरी बापाच्या घोतरा
लाडक्या बंधूजीला कन्या शोभते चातुरा

सावळी सुरत जशी उनानं बिघडली
तान्या बाळायानं माझ्या आरशी उघडली

लेकीचा गोरेपणा हळदीला मागं सारी
माझ्या भैनाईच्या गोरेपणाला तेज भारी

बाळाबाई माझी जशी कवळी काकडी
कुरळ्या केसावरी टोपी ठेविते वाकडी

लाडक्या लेकीईचा जवा तवा हट्ट
दोनी बंधूच्या मधी पाट

लाडक्या लेकीईचं तिचं जेवण अट्टीचं
तूप आळलं ताटीचं

गावाला म्हणे गेला मला गमेना घरामंदी
माझ्या त्या बाळकाची सभा बसली दारामंदी

॥२०॥

संग्राहिका : श्रीमती लक्ष्मीबाई महाजन

माझ्या ग बाळाला कोणी रडविलं
कडू भरविलं मायफळ

बाळ ग माझं माझं मला व्हावं
देवाजीनं द्यावं जन्मभरी

बाळ माझं खेळू आलं लांब
हातामध्ये जांभ दूध मागे

बाळ खेळे माझं बाहेरल्या बिदी
राखण ग तुझी अंबाबाई

बाळ माजं खेळे वाजतील वाळे
निवतील डोळे सखयाचे

बाळ माझं खेळे मला नाही याद
घुंगराचा नाद कानी पडे

बाळायाच्या आळी पिकली ग बोरे
सोकावली पोरे वाड्यातली

येग येग गाई खा ग बाई कोंडा
बाळाचीया तोंडा दूध मांडा

गाई राखे हरी गवळ्याच्या घरी
बाळ गेला दुरी साद घाला
गाईचा गुराखी म्हशीचा खिल्लारी
बाळाचा कैवारी नारायण

॥२१॥

संग्राहिका : सौ. उषाबाई माटे

मोरया बाप्पा रे मोदक घेई सोंडेवरी
बाळ माझं खेळू दे मांडीवरी

कुणी ग द्रिष्ट केली पापिणी ग वांझे
बाळ तिन्ही सांजे कोमाईले

कृष्ण बाळ खेळे अंगण झाले थाड
सदरी सोप्यापुढे वाढवीलं

कृष्ण बाळ माझं हळदीचा उंडा
शोभतं गोऱ्या तोंडा पिंपळपान

तिन्ही सांजा झाल्या दिवा लावू कोणीकडे
देव हिंडे चोहीकडे कृष्णाबाई

दुधातुपानं भरली वाटी वरी साखरेची मुठी
गळ्याची सोड मिठी कृष्णा बाळा

मामा मांडी पाट मामी मांडी ताट
आजोळी तुझा थाट कृष्णाबाळा

:२२:

संग्राहक : श्री. अशोक देशपांडे

तांबड्या लुगड्याला डाग पडला काजळाचा
मातुसरीच्या कडंला नातू जावळाचा

सकाळच्या पारी मी का लोटते वसरी
माझ्या बाळासाठी बाळं येताती दुसरी

आसवांच्या माळा गळा घालीते बाळाच्या
दुजे काय व्हावे गरीब माऊलीच्या

सांगून धाडीते बाई पुण्याच्या लव्हारा
साखळदंड आणा माझ्या पाळण्या गव्हारा

माझ्या अंगणात तान्हं बाळ उभे
जसे उगवले चंद्र सूर्य दोघे

शेजारीण बाई विश्वासाच्या नारी
वाक्या पैंजणाचा हिरा खेळतो तुझ्या दारी

तान्या बाळायाला सया पाती[1] खिडकीवाटं
बाळ वाकडं नाही कुठं

पाळण्याची दोरी लांबता लांबली
पाळ बाळाची चांगली

माझीया अंगणात पाच फडांचा नाग डोले
सावलीने बाळ खेळे

सकाळच्या पारी मी का लोटते अंगण
बाळ खेळते रिंगण

१ पहाती.

खेळूनी खेळूनी बाळ आला विसाव्याला
बाळाचा माझ्या जीव बघा कासावीस झाला

झाई संध्याकाय गाई वासरेस्नी येथे
तान्ही यारे बाय जरा एकीकडे खेय

आंगनमां खेये अंगनना राजा
तान्हीया बायना पायी घुंगूरना वाजा

दूरथून देखू गाव पातोंडाना निंब
नान्हीया बाळ खेळे आता झाया टोलेजंग

तान्हा बाळ माझा अंगणी खेळतो
ओसरी लपतो चंद्रासरिसा

खेळूनी खेळूनी बाळ अंगणात बसं
ढीग सोनीयाचा दिसं

गाईच गोठाण झाडूनी मैदान
चेंडू खेळे रायभान

आंब्याची आंबराई लावीली दाट दूट
बाळ खेळे सारीपाट

तान्हं या लेकरू खेळाया गेलं दूर
माझ्या मनाला हुरहूर

खेळणं खेळशी सखेबाई तुळशी
माझा केवडा तुझ्यापाशी

लेकुराचा खेळ चक्कर भोवरा
लेकी घंगाळ पोहरा

लेकुराचा खेळ लेकुराला दंडे
तुझ्या सुपलीला गोंडे

सुपली कुरकली बुरडाघरी वेळू
खेळते माझी साळू

बुरडाला विसार दिला सुपा टोपलीचा
आहे खेळ कौतुकाचा

खेळून माळून आली माझी मालन
जाई मोगऱ्याखालून

खेळून माळून आली माझी रंभा
केला कामाचा खोळंबा

दे रे देवा मला नको काई सोनं नाणं
मांडीवरी देई मला विसाव्याला तान्हं

उगवला नारायण उगवताना तान्हं बाळ
शिरी सोन्याचं जावाळ

उगवत्या नारायणा आधी उगव माझ्या दारी
बाळासंगं कर दुधातुपाची न्याहारी
मग पिरथीमी धुंड सारी

देवकीचं बाळ असं यशोदेला छळी
चिंचच्या पानावऱ्हे मागतं दूधपोळी

बारा वरसं झाली सीताबाईच्या तपाला
लव झुंजतो बापाशी न्हाई वळकीले लेकाला

देवाजीच्या घरी पुत्रांची वाटणी
ओटा पसर मालनी

मन्हा नाही लेक कुयस्वामीनी तुन्हा दास
तान्हीया बायले[1] वाटे लाव सावकास

१ बाळाला.

मऱ्हा नाही लेक कुयस्वामीनी सोयरीना
ताऱ्हीया रे बाय हिरा तुऱ्हा पायरीना

जेऱ्हा घर ताऱ्हं तेऱ्हा घर आनंद
पायना शेजारी देव उतरे गोविंद

## २३

संग्राहक : श्री. हरिहर मातेकर

एकुलता एक बाळ जसा पाण्यातला लहू
नेणंत्या बाळायाला किती खाली वऱ्हे पाहू

नेणंत्या बाळायाचं कसं पिवळं गोरेपण
घरामंदी झाली कस्तुरीची मेळवण

लीला माझी गोरी कमळा ग सावळी
नेणंती ताई माझी त्यात शेवंती पिवळी

गोऱ्यायापणाला रूप सावळं मागं सारी
नेणंते ग बाई तुझे रूप गुलझारी

गोरीचे गोरेपण येईना माझ्या मना
नेणंती बाई माझी जशी सावळी जमुना

मोठे मोठे डोळे कशा भिवया कातीव
बाळा नेणंत्याचं रूप चंद्राचं वतीव

मोठे मोठे डोळे माझ्या हरनाबाईचे
बाळ राजस माझे जसे कंबळ जाईचे

अंगोठ्यापासूईनी मस्तक निहाळिते
बाळ नेणंत्यावरून पंचप्राण ववाळिते

मामा टाकी पाट मामी काढते रांगोळी
बाळा नेणंत्या रे तुझं कौतुक आजोळी

घरा पाव्हणे आले जन म्हणिती राहिले
नेणंत्या भासीयाला वाड्यात बोलाविले

माझा नाही ग बाई मह्या बहिणीचा सांगते
भाचाया माझा हिरा चवरंगी म्हाणीते

मावशी म्हणीयीतो धरला माझा घोळ
माझा ग नाही बाई माझ्या बहिणीचा बाळ

मावशी मावशी हात लावितो निरीला
बाळ माझ्या बहिणीचा मोती मागतो तुऱ्याला

शेजीच्या लेकराला करीना दुजाभाव
सर्व्या अंगी डोळे नारायणा तुला ठावं

शेजी तुऱ्हं बाळ मह्या बाळा बरोबरी
सहज उतरीन निंबलोण दोन्हीवरी

एका मागे एक चालले दुडा दुडा
शेजीच्या बाळायाची धाकूल्याची द्रिष्ट काढा

शेजारीण बाई संभाळ तुझं वाळवण
बाळायाची माझ्या करी ग बोळवण

हिडीस फिडीस नको करू शेजीबाई
तुझ्या घरी जाई चाफा माझा धाव घेई

बिदीला खेळईती शिजीचं पाच बाळं
त्यात माझी मोहनमाळ

शेजी घरी बाळा जाऊ नये घडी घडी
कवाडाला कडी तिची कपाळाला आडी

सूपभर सोनं शेजी झाकून घेते गळा
कडेवर ताना माझा उघडा पानमळा

माळीयाच्या पुता वा सदा भाग्येवंता
घालीसी मोटनाडा सूर्यदेव उगवता

माळीयाचा बाळ मोठा हिकमती
'दांडा लाविली सेवंती उसामंदी पेरी मेथी

आंब्याची आंबराई कोरीली राघूईनं
कुणब्या बाळाला गेली निदरा लागूईन

बाळाच्या ग शेतीचा मसोबा जागल्या
जोंधळ्याच्या राशी वर टिह्याला लागल्या

पोळ्याच्या दिवशी येसीबाईला तोरण
सिरीरंग बाळायाचं नंदी चाललं भारानं

तिन्ही सांज झाली देव आले गोठीयात
बाळ नेणंत्याचे नंदी आले झुल्या देत

माझं तान्हं बाळ हळदीनं न्हातं
त्याचं पाणी जातं शेवंतीबाईला

माझ्या दारावरून पोरांचा मेळा गेला
बाळ नेणंता ग माझा चालीवरून वळखीला

चंदनाचे पाट आलेत विकायाला
बाळा रे राघवा तुला घेते बसायाला

वसरीच्या वऱ्हे तान्हं रांगतं कुनाचं
बाळ शेजीचं गुनाचं

उंच ओसरीला पाट टाकते पईस
नेणंत्या बाळा माझ्या बापाशेजारी बईस

वडील पुतण्या करीतो नानी नानी
बाळाच्या ग मह्य सोन्याचे गोल कानी

ताटी साळीचा भात वर तुपाचं मोहन
बाळ नेणंत्याचं राजविलासी जेवण

समुद्राच्या काठी उभी होते मी सहज
बाळराज माझं आलं मोत्यांचं जहाज

एका मागं एक येतील धावधुडी
बाळ राजसाची भीम अर्जुनाची जोडी

जीवतीच्या हाती बाई अमृताची वाटी
शिंपीली तुझ्या पाठी बाळराजा

२४

संग्राहक : **श्री. उ. भा. कोठारी**

वाटेवरी शेत आल्या गेल्यानं मोडीलं
बाळानं ग माझ्या भाग्यीवंतानं पेरीलं

वाटंवरी शेत आल्यागेल्याची ग भागी
बाळानं ग माझ्या पेरीलं दोन्ही लागी

चाडयावरी मूठ घ्यावं बहिणीचं नाव
बाळाच्या ग माझ्या पिकाला काय पहावं

हात्ती पडला राती    बाळा तुझ्या शेती
तुरीला तवर[1]    मुगाला शेंगा येती

बारा बलुत्यांनी    माझा राघू वेढीला
शेलक्या गुडावरी    यानं सुतार सोडीला

बारा बलुत्याची    दौंड गेली शेता
आता माझा राघू    घामेला गुड[2] देता

शिणल्येत बसवराज    घेईनात चारापाणी
बाळाच्या ग माझ्या    गेले शेताच्या धावनी

शिणलेत बसवराज    यांनी मोडीलीत मेटं
बाळाचं ग माझ्या    लांब गवंडयाचं शेत

तिफण चालली    वाई झटक्यात
आता माझं बाळ    आलं तुला आटपीत

नांगराच्या ताशी    लागली ओली जाई
आता माझा बाळ    कुणबी दईवाचा होई

नांगऱ्या नांगऱ्याची    शेती पैज पडली
बाळाच्या बईलानं    नवी चावरी तोडली

दुधातुपाचा काळ    घेते चरीभर पाणी
आता माझा राघू    नांगऱ्या कोणा रानी

बाळाची ग माझ्या    बैठक नांगऱ्याची
सावली गदीबाज[3]    कशी झाडं पांगऱ्याची

नांगऱ्या माझा बाळ    शेत नांगरी हिवाळा
रेशमाचे जोते    चंदन बैलाच्या शिवळा

बैल रतनाने    शेती शिवळ सांडीली
नेणतं माझं बाळ    याची राळ ग मांडीली

---

१ फूलकळी. २ कणसाच्या पेंढ्या. ३ दाट. भरपूर.

रबऱ्याची भाजी गोरी खुडती घोळाणा
आता माझा बाळ कुणबी भिडेचा बोलेना

## २५

संग्राहिका : सौ. शुभाताई घोरपडे

टिका ढुशीखाली सरीबाईचा आकडा
बाळ राजसा रे मधे ताईत वाकडा

लाडकी मईना मांगस करमफूल
जिजी लाड करी ते मोतीस्नो गुंफलं

सोनाराच्या घरी कशाची ठोकाठोकी
घडविते कंठीं गोफ बाळासाठी

सोनाराच्या घरी कशाची ठोकठोक
बिंदुले घडवीत सईला माझ्या

कुरळ्या केसायाची वेणी येतीया दाणेदारू
लाडक्या लेकीईचं रूप बाळीचं अनिवारू[1]

सावळी सुरत माज्या जिवाला करवत
लाडकी मैना माझी येती गल्लीनं मिरवत

कुरळ्या केसायाला कशाला येणी फणी
लाडक्या लेकीईचं रूप जाईच्या येलावानी

दात डाळंबीचं दाणं ओठ पोवळ्यांचं लाल
मुख गुलाबाचं फूल राजसाचं

१ वर्णनापलीकडचे, सुंदर, देखणे.

साजऱ्या सुंदर भिवया चंद्रकोर
म्हणू किती सुंदर राजसाला

मोठे मोठे डोळे भिवया बाकदार
राजस बाळ माझा दिसतो झोकदार

मोठे मोठे डोळे भिवया नामी नामी
बाळ तान्यायाची द्रिष्ट काढती मामी

आंगडं टोपडं शिंप्या शिव वजनाचे
लेयाचं बाळ माझ्या बंधू सजनाचे

अंगड्या टोपड्याचा आयेर कुनी केला
बाळाचा माझ्या मामा जावळाला आला

हावस मला मोठी माझ्या बंधूच्या बाळाची
शिविते मी कुंची मिऱ्यामधल्या घोळाची

अंगड्या टोपड्यानं पेठ करती झगाझगा
माजा बाळ ताना चिल्लाळ टोपीजोगा

बाळाची ग टोपी नऊ लाख तारांगणे
आयुष्याची मया विणिली नारायणे

बाळाची माझ्या टोपी जरतारी गुंफी
बोलावू ग बाई कवन्या नगरीचा शिंपी

काळी ती चंद्रकळा तिच्या पदरी मोतीजाळी
बाळ नेसली संध्याकाळी

आंगड्या टोपड्याचं बाळ कुणी ग नटविलं
चिट मामांनी पाठविलं

बाळ आंगूवीळीला जातो संगं मैतवीराचा थवा
पोशाख हुता नवा

आंगड्या टोपड्याचं  न्हाळ दिसतं कवईळं
आत्यीनी पाठीवलं  चिट पुन्याचं पिवईळं

हावस मला मोठी  तान्ह्या बाळाच्या टकुच्याची
पिंपळपानासाठी  नथ मोडली दीडशाची

माज्या या अंगणात  सूर्यफुलायाचा ढापा
शेजी धाडिती खेळाया  आपुला सोनचाफा

शेजारनी साळू  नको वचकू मनाला
लावीन ग हात  तुझ्या पडल्या सोन्याला

शेजीच्या घरी जाऊ  न्हाई ते जाणं झालं
जेवणाचं ताट  तिनं आडमोरी केलं

शेजीबाई तुझं  बोलणं रागाईचं
बाळ माझं तान्हं  फूल चमेली बागाचं

वाजत गाजत  शेजीचं बाळ आलं
सखे ऊठ घाल माळ  सईबाई

शेजी तू आईबाई  उसनी द्यावी सूजी
बाळ पावनी आली माजी

शेजी तू आई बाई  उसना द्यावा गुळू
माज्या भैनाचं आलं बाळू

शेजी देते शिव्या  त्या तिच्या तिला लागो
डाळंबी खाल्या राघो

२६

संग्राहक : श्री. न. शे. पोहनेरकर

राया सावळ्याचं माझ्या अंथरून झालं गोळा
बाळ नेनंता ग सये नाग खेळला गव्हाळा

हे ग बिदीला खेळती शजाचे पाच बाळ
नेनंती ग माझी तान्ही त्यात आहे मोहनमाळ

बाळ्या सावळ्यानं माझं दनानलं बाई जोतं
बाळ राजस ग माझं सईचं ग बाळ येतं

दिव्याच्या ग सावलीला नको बसू सईबाई
नेनंता ग बाळ माझा तुझ्या पाठीचा देसाई

अरे इवाई गिरस्था काय पाहशी वतनाला
बाळराजसाला माझ्या द्यावी लेक रतनाला

नेनंती माझी बाई उभी केली कन्यादानी
अशी सये जावळाची मामा उकलितो येनी

बाळराजाच्या ग माझ्या आल्या करोल्या वहेनी
भाची नेनंती ग माझी मान मागती मेव्हनी

सईबाईचा ग वर ही ग सेवंती घेईना
माझा बाळराज बाई शिंगी कबूल करीना

मांडवाच्या दारी बाई कशाच्या ग गलबला
बाळरायाच्या ग सये वरातीला हत्ती आला

२७

संग्राहिका : सौ. पार्वतीबाई शं. मोरे

मोटं नि मोटं डोळं तुज्या डोळ्याची धरती न्यारी
चंद्र ढगात गिरक्या मारी

मोटं नि मोटं डोळं डोळं भिवया सुरतीचा
बाळ कुणाया गरतीचा

कुरळ्या केसायाची भांगा पडती तिच्या वाकी
बाळ दैवाची माजी सकी

दिष्ट या म्हणू झाली माज्या तांदबिळाच्या ढिगा
बापाशेजारी ल्योक उभा

आंगूबिळीला पानी हंडा तापून झाला गार
बाळ माजा ग छातीखोर

गोंडाळ माजं अंग माज्या धाकट्या भावावानी
एका झऱ्याचं पेलो पानी

लाडक्या बाळीयीला काम सांगूनी बगायावं
पानी पियाला मागायावं

आंगूबिळीला पानी हंडा ठेविला कुलपाचा
माज्या तान्या ग बाळाईचा

चरवीभर दूध पैलवानाचा माज्या मेवा
बापलेकांनी संगं खावा

लळा ग बाई मला माज्या तान्या ग बाळाईचा
गुंता काढिते झुलपाचा

आंगडं टोपडंड शिव शिंपीणी वजनाचं
वाळ लियाचं सजनाचं

घराची घर रीत हाई भाईर माझा कान
माजा खेळतो चंद्रभान

मामी बोलती मामायाला वाळ भाच्याला काई न्यावं
दूध पेढ्याची त्येला सवं

आंगूबिळीला पानी हंडा ठेविते नवा कोरा
लाडका बाळराज काळी झुलपं किती गोरा

२८

संग्राहिका : **सौ. सावित्रीबाई रेखी**

आंब्यांची आंबराई आल्या गेल्याला सावली
तुज्या आजीने लावली बाळराजा

अंगी ग आंगरखा पायी तुमान मागतो
छंद राघूला शोभतो राजसाला

राजसाच्या हाती एडका कोणी दिला
भाच्यायाला त्याच्या मामाने समजविला

रंगीत पाळणा चिमण्यांचा गलवला
आनंदाची झोप तुला बाळराजा

छंदखोर बाळ छंद केला अर्ध्या राती
तिथं पृथ्वीचा चंद्र मागतो हाती

अनाड बाळाचा करू नका गलबला
बाळ राजस अनाड माझा मला

बाळाला हाका मारू उभी राहून दारात
बाळराजस चंद्र कोणाच्या दारात

चंदनाचे पाट कसे आलेत विकायाला
बाळ राजसाला घेते मी बसायला

## २९

संग्राहक : **श्री. गो. ल. जमदाडे**

संबूरल्या सोप्या गादी टाकली येलायाची
प्रल्हाद बाळायाची टाळू वासेल[1] तेलायाची

सावळी सुरईत बाई उनानं झाली लाल
माझ्या बाळा रे गोविंदा माझ्या सावलीनं चाल

छंदबीखोर बाळ छंद मागीतो ठायी ठायी
मोर मागते माजी बाई

मोठं नि मोठं डोळे वरी भुवया गुलझार
कोण्या मातेचा तालीवार

नटतं नटतं बाळ टाळूचा भांग पाडी
सुरमा लियाला देती काडी

बाळाला मागईनं सोनं ताटात माईना
काका कबूल होईना

१ सुवासिक, अत्तर.

बाळाला मागईनं माझी भरली सोपा माळी
माझ्या बाळराजा नवरी मिळाली चाफेकळी

डाळिंबीचं दात व्हट पवळ्यांचा वळी
बालकाला पुसत्याती कोन मावली प्रसवली

मांडव शेकारीला जाळीच्या फोकार्यांनी
नवऱ्या बाळाच्या बापानी

हावस मला मोठी हौसंसारखं माझं झालं
बाळ अंगणी पाणी न्हालं

## ३०

संग्राहिका : सौ. इंदूबाला ढेरे

झाल्या तिनी सांजा गाई आल्या गजरानी
तान्हं बाळ माझं वाई झाकावं पदरानी

झाल्या तिनी सांजा पारिजातक फुलला
अंगणात हिरा माझा बाळ गोड बोलला

झाल्या तिनी सांजा कशी सांजाई फुलली
बाळाच्या वाड्यात माझ्या लक्ष्मी बोलली

झाल्या तिनी सांजा गाई येती घरोघरी
आला रांगत बाळ थोडी अंगण ओसरी

झाल्या तिनी सांजा वारा वाहे थंडगार
रांगत आला हिरा बंड झाला फार

झाल्या तिनी सांजा लावा दिवा ग तुपाचा
उजेड पडीला लक्ष्मीआईच्या रूपाचा

रंगी बेरंगी भवऱ्यांनी बाजार झाला लाल
घेऊन देते बाळा माझ्या बिगी बिगी चल

झाल्या तिनी सांजा बाळा नको जाऊ दूर
जिवाला माझ्या बाळा नको लावू हुरहूर

## ३१

संग्राहिका : डॉ. विमल चोरघडे

अंगण साजिरे ढोरावासरानं
तान्ह्या लेकुरानं घर साजे

पोटीच्या लेकासाठी नार झाली बैरागीण
सगं भरतार घेऊन हिंडे चवदा भुवन

चवदा भुवनानं अंथरली शाल
पोटी जन्मला लाल मन झालं ग खुशाल

आई बापांचा लाडका आजीचा पंचप्राण
तो माझा आत्माराम बाळराजा

लेकाचं घे जो कडे लेकीचं घे जो हाती
दैवाची उभी होती मायबाई

कुंभार घडवीतो पाळण्याची माथनी[१]
तुझ्या लाडाच्या नातनी

१. कळशा

मायेची ग माया अवघ्या बाळांवरी
गवळणीचा खोपा अवघड झाडावरी

मायबाच्या पोटी जलमली गजरा
जन्म देऊन केला वाडा लेकाचा साजरा

पाळण्याला हिरकणीचे वाजती घुंगरू
राजसाचं रडं सूर पाही धरू

लाडाच्या लेकीचा केला कानकेस
चारला तोंडचा घास

दंडाचा पाळण कळसूत्र माणकाचे
घर शोभते बाळाचे

दंडाचा पाळणा झुलतो घाईघुई
कशी हासते माझी आई

दंडाचा पाळणा वरी फुलायांचा साज
माझा लाडका गणराज

दंडाचा पाळणा आजू बाजू चिमण्या मोर
नीज काढू नको सूर

माझीया अंगणात चिऊ काऊ पाणी पिती
नेणंती विडा देती

माझीया अंगणात सांडली दूधफेणी
जेवली हिरकणी

तान्हीया गाईचे दूध गोड लागे
वाटीत जेवू मागे

लाडाची ग लेक उपाशी निजईली
साखर दुधात भिजवीली

लाडाच्या लेकीची ग केली मी वेणी फणी
तान्हेलीला पाजी पाणी

हाडीस फिडीस लेकरा कुणी केलं
पाणी डोळीयाला आलं

बहीण भावंडाचे बाई घडीभर जमेना
मधी बैसली कामिना

३२

संग्राहक : **श्री. वि. वा. जोशी**

बाळ माझा खेळे ओल्या का वाळूवरी
पिंपळपान टाळूवरी शोभतसे

बाळ माझा खेळे इकडे तिकडे
पायी रुतती खडे पैंजणाचे

बाळाचा ग खेळ चक्कर भोवरा
देते गंगाळ पोहरा बाळराया

बाळाचा ग खेळ भोवरा विटीदांडू
देते रेशमाचा चेंडू खेळायाला

झाल्या तिन्ही सांजा दिवे लागणीची घाई
खेळून आला नाही बाळराजा

बाळाचा ग खेळ आता कुणी मोडीला
वाटे नंदी गेला

झाल्या तिन्ही सांजा दिव्याची लगबग
बाळाराजा माझा खेळून आला बग

बिदीला खेळईतं कोणचं ग तान्हीक
बाळ नेणंत्याच्या करदोड्याला माणीक

बिदीला खेळईते कोणाची फूलबाजी
बाई नेणंती ग पायी पैंजण मैना माजी

## ३३

संग्राहिका : प्रा. सौ. विमल थत्ते

लेकीची ग जात तुपाची फुलवात
बाळराजस माझा नंदादीप ग तेवत

पाळण्याला पाठ नको लावू तू हटेले
बाळाचे ग माझ्या नाही नवस फिटले

पाळण्याच्या वरी सये चांदवा जवसाचा
मधे बाळ नवसाचा

लेक झाली म्हणूनी नको घालू खाली मान
घडेल कन्यादान

लेकूरवाळीचं काम सखे हळूयाचं
तिला निमित्त बाळायाचं

लेकूरवाळीईच्या झाली कामाची गाळन
रवी दोराला खेळनं

माझ्या ग अंगणात    कोणाची ग मुलं
त्यात गुलाबाचं फूल    माझं बाळराज

सांजेची वेळ झाली    दिव्या लावा ज्योती
धुंडू तुला किती    बाळराया

उनाड म्हणूईनी    रागानं देती शिवी
तान्यायाला गाते    माझ्या आऊक्षाची ओवी

लेकूरवाळीईचं    काम ग मोलं द्यावं
बाळ खेळायाला न्यावं

तान्या लेकराची    आई कुठं गेली बाई
वेळ भुकेची झाली काई

एका मागे एक    नका येऊ घडोघडी
भीम अर्जुनाची जोडी

बोबड्या बोलण्याचं    मला येतं हांसू
किती परतून पुसू[1]

लावणीच्या आंब्या    पाणी घालिते कुडता
उद्या होईल जुडता

लावणीच्या आंब्या    पाणी घालू दोघी तिघी
आंब्या वाढ बिगी बिगी

लावणीच्या आंब्या    पाणी घालू वाटी वाटी
सावलीची आशा मोठी

लावणीच्या आंब्या    पाणी घाला परातीने
राज्य करा शरतीने

माझ्या ग अंगणात    फूल सांडीले चाफ्याचे
गोरे पाऊल बाळाचे

---

१ विचारू.

माझं ग आऊक्ष असं तीळ तीळ झडो
बाळायाला माझ्या रत्नाला मोलं चढो

मावळ्याच्या घरी भाचा पाहुणा श्रीरंग
मामा करी ताट मामी टाकी चवरंग

वाघायाचं पिलू वाघासंगं शिवारात
ताना माझा बाळ मामासंगं शेतायात

म्हायाराची वाट इच्यारी गुराख्याला
इठ्ठल माझा बाळ माळीच्या झुरूक्याला

अंतरीचं गुज बांधी शेल्याच्या पदरात
माज्या तू बाळराया सोड बयाच्या हुरद्यात

नवस बोलते देवा माज्या नवसाला पाव
बंधवाच्या घरी कडदोऱ्याचं बाळ दाव

बहिणीचं बाळ • किती केलं तरी लोकाचं
आत्या म्हणून हाक मारी बाळ बंधुरायाचं

भावाला झाला ल्योक माझ्या बंधूच्या राणीला
चिरे फोडी न्हानीला गवंडी लागले कामाला

बंधूला झाला ल्योक आमा बहीणींला भूषण
मारुतीचं निशाण साखर वाटीते पशानं

बंधूला झाला ल्योक आमा बहिणींला काय कळं
उंची माडी दिवा जळं आजोबाचा नातू खेळं

बंधूला झाला ल्योक हासू हुरद्यात माईना
जोड फिरक्याचा पाळना सुतारा तुला येईना

आळीच्या बायांनो साखर घ्यावी आणिक
झाला बंधवाला माणिक

१६२८९



माझे आई म्हायार जशी गोकुळची धजा
सांगते [illegible] कृष्णाजी मामा तुजा

सरगीचा देव आहे जातीचा कुंभार
करितो घडामोड त्याचा चालला वेव्हार

लेकीचं ग नाव नाव ठेवीन सकू बकू
ल्योकाचं ठेविलं नावू नासिकचा तिरमखू[1]

लेकीचं ग नाव ठेवीन सईजा बईजा
ल्येकाचं ठेविलं नावू नेवाशाचा मोहनीराजा

लेकीचं ग नाव ठेवीन सीता गीता
ल्येकाचं ठेविलं नावू पैठनीचा एकनाथा

वांगीचे संतूबाई तुझी पायरी झाडील
केले नवस फेडील बाळ माझ्या नेनंत्याचे

वांगीचे संतूबाई तुझं लिंबाळ हालतं
याला गोणेपाळणे बांधीत बाळाच्या नवसाचे

रीवंच्या संतूबाई बाभूळबनी नांदं
बाळा माझ्या नेनंत्याला आयुक्षाचा वाडा बांध

ल्योकावरी ल्योक तुला झालेत जोडीचे
केली ईश्वराची पूजा आंबे वाहिले पाडाचे

माझ्या ग अंगणात कोणाचा गणपती
मुरली वेळां हाती शोभा किती याला येती

वांगीचे संतूबाई तुला वाहील कंबाळ
माझ्या बाळाला संबाळ

---

१ त्र्यंबकेश्वर.

## ३४

संग्राहक : डॉ. हरिकिशन राठौर

शेजारीण बाई येवडा अन्याव घाला पोटी
जाई मोडूनझ्यानी बाळानं केली काठी

पाहुणा आला घरा शेजी म्हणीती बघू बघू
माझ्या बाळाच्या छत्रीला लावील्या चिमण्या राघू

शेजारीण बाई नको लेकराशी भांडू
अनवळ[1] बाळानं झेंडू मोडून केला दांडू

शेजीचा ग सडा माझ्या मेड्यांला भिडूनी
अनवळ बाळ आला रांगूळी मोडूनी

माझीया अंगणात ताई माई उभ्या
दिसतात ऊगवल्या चांदण्या ग दोघ्या

घागऱ्याचा पाय चिऱ्यावरी पडे
नातवाला घेई कडे शेजीबाई

शेजी उन्ही घर तुम्ही बसा बसा बाई
तान्हीया बायले अन्याव कया काई

तान्हं तान्हं करू उन्ही शेजी मन्हा घरी
रंगीत पायना त्येले रेशमनी दोरी

घातलं घुसयनं[2] बाय घुसय् देईना
शेजीबाई तुन्हं लोनी हातले येईना

शेजारीण बाई दोघी एका दारानं वागू
तुझी मैना माझा राघू

---

१ अवखळ. २ घुसळण.

## ३५

संग्राहक : श्री. गणेश दामोदर खुडे

हातात कडीतोडे गळा कंठीचा पदर
नेणंता राघू माझा वाणी म्हणू का गुजर

सखी या लेणं लेती सोन्याचे हारे दोरे
आपण दावू लोका आपुलं बाळ गोरे

हातात कडीतोडे कडदोरा कवा केला
मामा तालेवार कुबेर भाचा लेला

हातात कडीतोडे कानी सोन्याचं कुंडल
बाळ कुणाचं चांगलं शेजारीण बाई

तान्हं या लेकरू खेळे वाळूवरी
पिंपळपान टाळूवरी

हातात कडीतोडे गळ्यात कंठी गोफ
कोण्या श्रीमंताचा लेक

हातात कडीतोडे कानाव कुंडले
नाव गणपती दंडले

अंगणी खेळते कशी ग लोकाची
सये सावळी गोफाची

माझ्या दारावरनं कोण गेली परकराची
हाती आंगठी हिरकणीची

तान्हीया बायनं[1] लेनं तरी काई
सांगू सोनारले घड घागऱ्या घाल पायी

---

१ बाळाचे

अंगात आंगराकं वर जाकीट ल्हैऱ्या मारी
बाळायाच्या माझ्या अंगाला सर्दी भारी

इवलीशी बट डाव्या बगलेला आकडी
नेनंता बाळ माझा टोपी ठेवीतो वाकडी

आंगड्या टोपड्याचा वाई शिंप्या घरी साज
माझा उघडा गणराज

अंगडं टोपईडं कुंच्याला वाण नाही
मावशीवाचून गाव नाही

अंगड्या टोपड्याचं बाळ कुणामागं गेलं
हौशा मामानं संगं नेलं

दुरून वळकीते बाई टोपीचा नंबर
बाळ रूपानं सुंदर



# ६८

# अनुक्रम

**लिंबलोण**

*संग्राहक* :: सौ. कुमुदिनी पवार

:: सौ. शरदिनी मोहिते


:: सौ. शुभाताई घोरपडे

:: श्रीमती जानकीबाई पाटील

:: श्री. हरिहर मातेकर

:: डॉ हरिकिशन राठौर

# लिंबलोण



खेडेगावातील सर्व सामान्य आईला आपल्या बाळराजाचं अमाप कौतुक असतं. तिला आपल्या बाळाइतकं मोलाचं दुसरं काहीच वाटत नाही. तिची खरी धनदौलत हीच असते. त्यामुळं उगवत्या सूर्यदेवाप्रमाणं तिला आपलं रांगतं बाळ दिसतं. ते बाळ उंबरठ्यावर बसलं की, तिला सोन्याचा ढीग पाहिल्याचा आनंद होतो. तिला आपला बाळ म्हणजे दारीचा चंदनचाफा, गळ्यातला ताईत, बांगडीवरचे हिरेमाणिक, काळजाचा तुकडा आणि घराण्याचा दीपक वाटत असतो. म्हणून दिवसाकाठचे चोवीस तास ती आपल्या राजसाला डोळ्यात तेल घालून जपत असते. ह्या राजबिंडयाला कुणाची दृष्ट लागू नये म्हणून तिचा जीव तुटत असतो. साता पडद्याच्या आत ह्या बाळाचं कौतुक ती त्यासाठी गुंडाळून ठेवते. आपल्या बाळाला सुखी ठेवावं म्हणून ती देवाला नवस बोलते. स्वतःच्या केसानं देवाची पायरी झाडीन म्हणते आणि काळजाचा चौरंग करून ती बाळाला त्यावर बसवीत डोळे भरून त्याचं दर्शन घेऊ पहाते! अशा वेळी

आपलीच दृष्ट बाळाला होईल की काय या भीतीनं तिचा जीव कावराबावरा होतो; आणि मग तिची नजर बाळाच्या धष्टपुष्ट अवयवांवरून बाजूला होते. एवढेच नाही तर ती आपल्यालाच बजावते की, खाली बघ. दृष्ट होईल. मग तिचा जीव खाली पडतो. ती सुखावते.

पण रोज रात्री बाळाला निजवताना मनीची शंका दूर करावी म्हणून ही आई आपल्या बाळाची आठवणीनं दृष्ट काढतेच काढते. अशा वेळी ती आपल्या हातांच्या मुठीत शेणकुटाचा तुकडा, मीठ, मोहरी, बिब्बा, गुंतवळ, येसवंद असले काय काय गोळा करून घेते. ही मूठ मग ती आपल्या बाळावरून अनेकदा वरखाली अशी मिरवते. त्यावेळी, "आल्यागेल्यांच्या, पै पाहुण्यांच्या, ऊनवाऱ्याच्या, दाहीदिशांच्या, देवादिकांच्या, भुताखेतांच्या, खैराकुटाच्या डोळ्यात राख पडूं दे असली काहीशी बडबड करीत ही मूठ ती पेटल्या चुलीत फेकते. चुलीने हे भक्ष्य स्वीकारीत बाळाला आशीर्वाद द्यावा म्हणून कडकड केली की, ही सुखावते. हातांची बोटे चुलीवर मोडते आणि चुलीचे काजळ बाळाला लावते. ज्याची ज्याची म्हणून नजर आपल्या बाळावर गेली असेल त्याच्या त्याच्या त्या नजरेचा पाणउतारा केल्यामुळे तिला हायसे वाटते, आणि मग ती व बाळ सुखाने झोपतात. अशा वेळी मृदंगाला साथ करणाऱ्या झांजा टाळांच्या टोपणाला देखील नवस बोलला जातो आणि खुद्द पंढरीच्या केशीराजाची राखण या बाळाला लाभते. त्यामुळं आईनं या बाळासाठी मांडलेलं काळजाचं अंथरुण न् मांडीच्या घडीचा चवरंग, नेत्रांचा दिवा आणि हातांचा पाळणा असा सजतो की, त्याबद्दल कुणी न् कसं बोलावं ?

१

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

हासता हासता खळी पडली गालाला
उतरीते मीठ बाळ माझा कोमेजला

द्रिष्ट झाली म्हणू गोऱ्यापरीस काळीयाला
माझ्या बाळायाला कुणी चंद्राला निहाळीला

वारव्या हिरीवरी घडी टाकिली धोतराची
बाळाला झाली द्रिष्ट झाडावरच्या पाकराची

बाळाला सांगईते नको जाऊस बाजाराला
द्रिष्ट बी तुला हुती धरू कुणाच्या पदराला

द्रिष्ट कुणी केली मिठाच्या झाल्या लाह्या
बाळराजा तुझ्या वाटोळ्या दंडबाह्या

द्रिष्टावेल तान्हा डोळा घालिते काजळ
तीट लाविते कपाळा बाळ माझा अवखळ

द्रिष्ट होईल राजसा खेळू नको अंगणात
बाळ माझा तू गुणाचा विगी विगी ये घरात

झाल्या तिन्हीसांजा गुरावासराची वेळ
बाळ माझा द्रिष्टावेल शेजीबाई

हात रे कुतऱ्या शुक रे मांजरा
बाळाच्या नजरा द्रिष्ट केली

माळ्याच्या मळ्यात येसूबंध कोवळा
द्रिष्ट होईल जावळा बाळायाच्या

कोणी द्रिष्ट केली वाळा माझ्या सोनटक्या
आता सैल झाल्या तुझ्या हातीच्या मनगट्या

जळो पापिणीची द्रिष्ट भली चुलीमध्ये पडो
माझा कडूलिंब वाढो संजूबाळ

दिष्ट नि म्हणू झाली झाली पेटंच्या वानीणीची
सोड सोगन बटनाची अंगी पैरन दाटनीची

द्रिष्ट मी काढीईते तिळा तांदळाच्या ढिगा
ताना बाळ माजा मामा शेजारी उभा

माळ्याच्या मळ्यामंदी इसबंद ग कवळा
माज्या बाळायाच्या द्रिष्ट झालीया जावळा

द्रिष्ट नि झाली म्हणू मीठ म्हवया मिळूनी
बाळ राजस ग माजं आले जतरा खेळूनी

झाल्या तिनी सांजा बाळा नको जाऊ दूर
होईल द्रिष्ट तुला लावू नको हुरहूर

द्रिष्ट नि झाली म्हणू मीठ मोहऱ्या पाकिटात
द्रिष्ट झाली नाटकात

द्रिष्ट नि झाली म्हणू मीठ म्हवऱ्या काळा बिब्बा
नित गल्लीला चंद्र हुबा

द्रिष्ट नि म्हणू झाली मीठ म्हवऱ्या आगिनीला
द्रिष्ट झालीया नागिनीला

माळ्याच्या मळ्यामंदी इसबंदाचं याल गेलं
द्रिष्टीकारनं गोळा केलं

माळ्याच्या मळ्यामंदी इसबंदाचा एक वाफा
द्रिष्ट झालीया बापलेका

झाल्या तिनी सांजा वारा वाहे झारझूर
होईल द्रिष्ट बाळा जावळ उडे भूरभूर

२

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

द्रिष्ट बी झाली म्हणू कुन्या नारीची जवा तवा
येसबंदाचीया टोप पानंदीवरी लावा

द्रिष्ट या झाली म्हणू येसबंदाचा करते रेंधा
बाळ माझा चंद्रकांत सुरत सावळी ल्हान बांधा

माळ्याच्या मळीयात इसबंदाचा कवळा
कशी झाली द्रिष्ट तान्या बाळाच्या जावळा

दुपारीची घडी तापली ती धोतराची
बाळाला द्रिष्ट झाली झाडावरल्या पाखरांची

आंगडं टोपईडं सये शिंप्यानं उसावलं
बाळ कडेला द्दष्टावलं

पोटीची माझ्या बाळं माज्यापरास चढ दिसं
द्रिष्ट होईल खाली बस

द्रिष्ट बी काढीताना कुण्या नारीचं नाव घेऊ
येसबंदाला कवा जाऊ

घागऱ्या घुळूघुळू नको येऊस माज्या मागं
तुला सर्यांची द्रिष्ट लागं

द्रिष्ट झाली म्हणू कुणा नारीची जवा तवा
बाळाच्या मांदिलात येसवंदाचा तुरा खवा

द्रिष्ट झाली म्हणू धोंडा फुटला वारवचा
माझा वाळराज घड कोम्याला नारळाचा

म्हणीत मी होते उभा गंध लावू नको
द्रिष्ट होईल जाऊ नको बाळा माझ्या

द्रिष्ट या म्हणू झाली धरी पाळण्याची दोरी
लाडका बाळराज आत निजला श्रीहरी

द्रिष्ट या म्हणू झाली जशा लिंबवाच्या फोडी
लाडक्या बाळायाला सुरम्याची देते काडी

मोठे नि मोठे डोळे जसे आभाळाचे ढग
लाडक्या बाळराजा द्रिष्ट होईल खाली बग

सोन्याईची आंगईठी गोऱ्या हाताला दिसईना
लाडक्या बाळायाला द्रिष्ट झाल्याली सोसईना

लेकीचा म्हणू खेळ चूल भानोशी कोनामंदी
द्रिष्ट होईल बाळा जाऊ नको बनामंदी

पायात पायतान बाळ दिसतो लखापती
लाडक्याची द्रिष्ट- इळाची काढू किती

द्रिष्ट मी काढीते मीठ म्हवरी काळा बिब्बा
लाडका बाळराजा चंद्र गल्लीला माझा उभा

द्रिष्ट मी काढीते मीठ म्हवऱ्या नि मेध्या
लाडक्या बाळराजा तुला निहाळीत कोन हुता

अशी नव्हती द्रिष्ट बाळा तुला कधी झाली
डोळ्यां उतरली लाली

कुन्या पापिनीची द्रिष्ट   पाळन्यावरी गेली
लाडक्या बाळासाठी   येसबंदाची जल्दी केली

:::३:::

## संग्राहिका : सौ. शुभाताई घोरपडे

कोणी ग केली द्रिष्ट   गेली पाळण्यावरून
गोरं ग माझं बाळ   उभा कळस धरून

शेजारे नहीं इन्या   रूपले जोड कोन्ही
नजरा मारी खाष्ट   मखमल कोम्हायनी

अवकाळ माजं बाळ   भरल्या रांजणी धुतं पाय
राजसाला माज्या   द्रिष्ट लागली की काय

भरल्या तिनी सांजा   गाई येती गजरानं
बाळ झाकावं पदरानं

एका मागे एक   नका येऊ घडोघडी
द्रिष्ट लागेल तातडी

एका मागे एक   चालले शिवू भिवू
नको शेजी दृष्ट लावू

तान्याला पाजी दूध   पारध्याला घाली जेवू
नको शेजी दृष्ट लावू

॥४॥

संग्राहिका : श्रीमती जानकीबाई पाटील

दृष्ट ही म्हणू झाली — अंगणी पाय धुता
बाळ राजस ग माझा — जातो लढाई रजपुता

दृष्ट ही म्हणू झाली — लाडक्या माझ्या चांदा
लहान ठेंगईणा — माझ्या राजसाचा बांदा

दृष्ट ही म्हणू झाली — मिरच्या उतरीते बारा
ताना ग बाळ माझा — दृष्टीजोगा बाई हिरा

जो जो म्हणताना — बाळाला झोप न्हाई
द्रिष्ट झाली काई — तान्या बाळा

॥५॥

संग्राहक : श्री हरिहर मातेकर

तुझ्या साजरपणाचा — माझ्या जिवायाला घोर
बाळ नेणंत्याला — लावा अंगाऱ्याची कोर

तान्हिया रे तान्हीका — बाळा रे माणिका
तुझ्या रे श्रीमुखा — निंबलोण

दृष्ट मी काढू किती — मीठ मोहऱ्या काळी माती
गोरेपण जपू किती — तान्हीया बाळाचे

नका बाळाकडे — असे पाहू टकामका
चित्ता लागे धक्का — माऊलीच्या

इसवंदाची ग कांडी — बांधीते पाळण्याला
बाळायाला माझ्या — द्रिष्ट झाली खेळण्याला

पापीणींची द्रिष्ट — मिठाची झाली ल्हाई
बाळ कोमेजला बाई

६

संग्राहक : डॉ. हरिकिशन राठौर

पाळण्याजवळी उभा — कळसा धरूनी
कुणा पापिणीची द्रिष्ट — बाळा झाली वो दुरूनी

पापिणीची द्रिष्ट — तशी पाळण्याच्या पाट्या
तान्या बाळायाच्या — सैल झाल्या मनगट्या

बाळा नजर झाली — कुणा पाप्याच्या नेत्राची
सोडी कंबर धोतराची

बाळाला द्रिष्ट झाली — मीठ मोहऱ्या घोळून
बाळ आले रिंगण खेळून

लिंबलोण बाई — उतरीते कोण
बाळाची मावशी मावळण


सख्याला झाली द्रिष्ट — मिठाच्या झाल्या ल्हाया
कोमावला रामराया

दिठली मिठली  कोणा पापीणीची झाली
मैना माझी कोमावली

दिव्याच्या पडछाई  नको बसू बाळराजा
तुझ्या पाठची कंबळजा

दिव्याच्या पडछाई  नको बसो सखूबाई
तुझ्या पाठीशी देसाई

पापीणी दुष्मीनींनी  नको द्रिष्ट लावू मनी
हिरा खेळतो अंगणी





# संस्कार

# अ नु क्र म

उदे बोल वाचे—


नामकरण (पाळणा)


कृष्णदेव

मौंजीबंधन

भोंडला–हादगा

भुलाबाई

# उदे बोल वाचे –



माणूस जन्माला आला की, त्याचे स्वत:चे नाव, त्याच्या वडिलांचे नाव आणि त्याचे आडनाव त्याला चिकटते. त्यावरून त्याची जगाला ओळख पटते. परंतु घराबाहेरच्या दुनियेतून गावोगाव तो फिरत गेला म्हणजे त्याची पारख केली जाते ती त्याच्या वागण्याबोलण्यावरून, तो पदरी बाळगीत असलेल्या त्याच्या चालीरीतीवरून. त्याने आपल्या अंगवळणी पाडले असेल त्या घराण्याच्या विशिष्ट वळणावरून.

त्यामुळे बाळपणापासूनच लहान मुलांना त्याच्या घराण्याचे म्हणून विशिष्ट असे वळण वडीलधाऱ्यांचेकडून लावले जाते. त्यासंबंधी त्याची विशेष काळजी घेतली जाते. त्याचे मन सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. म्हणून मग हे मूल समाजात येते ते आपल्या घराण्याचे वळण घेऊन आणि तिथे जगू पहाते ते आपल्या मूळच्या मनोवृत्तीला धरूनही! त्या कारणाने त्याच्या या जीवनविशेषालाच त्या घराण्याची संस्कृति म्हणून ओळखिले जाते.

ह्याच त्याच्या जीवनावर घडला गेलेला महत्त्वाचा असा संस्कार मानला जातो.


या संस्कारावरच त्या बाळाचे मानसिक संगोपन झालेले असते. मन पोसलेले असते. म्हणून त्याच्या जन्मापासूनच घरामध्ये सणासुदींच्या अगर धार्मिक विधींच्या कारणाने हे संस्कार त्यांच्या मनावर बिंबविले जातात. त्यासाठी पारंपारिक लोकगीतांचाही आश्रय घेतला जातो.

त्यामुळे मानवी मनाचा उत्तम प्रकारे विकास घडत जातो. देशाची संस्कृति बांधली जाते. मानसिक व शारीरिक आरोग्यही सुदृढ असे घडत रहाते.

सर्वसामान्य लोकांनी आपल्या बाळराजाच्या मनावर उत्तम प्रकारचे संस्कार घडविण्यासाठी लोकगीतकारांचे पाठबळ सदैव मानलेले आहे. त्यासाठी त्यांनी लोकगीतांची ही अपूर्वाईची दुनिया बारसे, मुंज, भोंडला भुलाबाई, कृष्ण-देवाचा आदर्श या विविध प्रसंगांनी आपल्या मुलांच्या जीवनात उभी केलेली आहे. त्यामुळे सुंदर अशा स्वररचनेबरोबरच आपल्या वाचेला त्यांनी उदे बोल म्हटले आहे. आपले बाळ चारचौघात वाखाणले जावे, नावारूपाला यावे आणि त्याचा सर्वत्र बोलबाला व्हावा म्हणून त्यांनी मोठ्या शानदार व डौलदार रीतींनी आपल्या वाडवडिलार्जित संस्कृतीची जोपासना केलेली आहे.

# नामकरण-बारसे


## (पाळणे)



# अनुक्रम

**बाळा जो जो रे—**

*संग्राहिका* : सौ. पार्वतीबाई गुंजाळ
: सौ. कुमुदिनी पवार
: सौ. गंगूबाई बाबर
: डॉ. सरोजिनी बाबर
: सौ. सिंधू वारनूळकर
: सौ. हव्वाबी खान
: सौ. मंगला नावडीकर



# बाळा जो जो रे –

घराण्याचा कुलदीपक अगर वंशवेलीचा आधार म्हणून घरात बाळ जन्माला आलं म्हणजे सारं घर कसं हारखून जातं. बाळाच्या दर्शनानं दाही दिशा सुखावतात आणि घरकुल समाधानाचा हुंकार टाकतं. त्या गोऱ्या गोऱ्या इवल्याशा डोळ्यांच्या आणि टोकदार जिवणीच्या मऊ लुसलुशीत बाळाच्या स्पर्शानं त्याची आई धन्य होते. त्याचं नाजुक हसणं बघून आणि रडणं ऐकून घराचे कानेकोपरे आनंदानं रोमांचित होतात. घराशेजारच्या वृक्षवेली नटून जातात. फुलझाडं आनंदतात. मीठ-मोहऱ्यांना उतरंडीतून बाहेर निघतानाच कसं अभिमानानं फुलावंसं वाटतं. येसंबद मोहरून जातो आणि घरातील रंगीत पालखाला केव्हा एकदा त्या बाळाला जोजवीन असं होतं. त्यामुळं दारी आंब्याच्या पानांचं तोरण आलेलं दिसलं आणि न्हाणीजवळ लिंबाचा झुपका टांगलेला पाहिला की, बाळाचं नाव काय ठेवायचं या संबंधीची बोलणी निघतात. अगदी ठेवणीतल्या मौल्यवान जिनसेप्रमाणं. तर त्या धांदलीत बारशाची तयारी करायचे बेत

आखले जातात आणि 'पाळणा' म्हणणारणींना आमंत्रण पाठवलं जातं ओसरीच्या पायऱ्या घागरी घागरी पाण्याच्या आंघोळीनं खुलतात. दिवळीत जागोजाग लावलेल्या पणत्या चंद्रज्योतीच्या दिमाखानं नटतात. रेशमानं पालख गुंफला जातो. फुलापानांनी बेतानं दरवळावं या तगाद्यानं तो नटतो. मोत्यांच्या सजावटीचं लेणं लेतो. सोन्याच्या दोरीनं हलतो, डोलतो. नक्षत्राच्या खेळण्यानं चांदवा सजतो. मग घरात पुरण शिजतं. लाडू वळले जातात. मानापानाच्या सवाष्णींची पंगत बसते. कुवारणींचा मानापान होतो. बाळाचे कान टोचले जातात. नवं अंगडं टोपडं बाळासाठी शिवलं जातं. ठळक दागिने बाळलेण्याच्या रूपानं घरी येतात. भर्जरी कुंचीत बाळ गुंडाळून घेतला जातो. बाळंतणीची ओटी भरली जाते. घुगऱ्या वाटावयाची तयारी होते. कणकीचे पाच दिवे न् पाच मुटके अमृतफळासह पाळण्याचे कोपरे सजवतात आणि मग बाळाला 'हारपाळ घ्या, गोपाळ घ्या' असलं काही पाचदा म्हणत दोन सवाष्णी पाळण्याच्या खालीवर मिरवून पाळण्यात घालतात. बाळाची आत्या तोंडात पेढा अन् पाठीवर शाबासकीचे धपाटे घेत बाळचं नाव ठेवताना बाळाच्या कानात "कुर्रर्र" करते. अशावेळी घरच्या आवडीनिवडीचा उपसा होतो आणि बाळाचं नाव मोठा आदर्श घेत ठेवण्यात येतं. म्हणताना त्या धांदलीत ओबडधोबडपणानं हाताळल्या गेलेल्या बाळाला चांगली नीज यावी म्हणून पाळणे गाईले जातात. दारी झडलेल्या सनई चौघड्याला देखील फिक्के पाडतील या तालेवारीनं सजलेले अनेक 'गळे' यावेळी मनापासून गात रहातात. या गीतातून देवादिकांची थोरवी, थोरामोठ्यांचा कित्ता आणि भल्याभल्यांचा आदर्श बाळाच्या आणि जमलेल्यांच्या कानांवर घातला जातो. त्या नादानं बाळ तर सुखावतंच पण ऐकणारांचेही कान समाधान पावतात. त्यामुळं अशा कारणानं धा धावून आणि हौसे मौजेनं चालून आलेली घराण्याची पिढीजात चालरीत घरंदाजपणानं असा काही डामडौल मिरवते की, तिचं तिलाच सारं लखलाभ व्हावं. देवाशपथ!

:: १ ::

संग्राहिका : **सौ. पार्वतीबाई गुंजाळ**

पहिल्या मासी पैला मासुळा     गर्भनारीचा रंग पिवळा
पिंड घडवितो हरी सावळा     जू बाळा जू

दुसऱ्या मासी पदर बंद     हिरव्या चोळीवरी काढिला चांद
मायबापाला झाला आनंद     जू बाळा जू

तिसऱ्या मासी कंथाला ठावं     हळदी कुंकवा ललाटी ल्यावं
ओटी भरूनी खोबरं घ्यावं     जू बाळा जू

चवथ्या मासी कुसवा चढं     अन्नपाणी तिला लागेना गोड
पिकल्या पानाचं बांधावं विडं     जू बाळा जू

पाचव्या मासी पाच फेरानं     बाळ देवीला जातं शरण
सांडले मोती घ्यावं भरून     जू बाळा जू

साहाव्या मासी सायास करती     चोळी पातळ इच्छा पुरविती
पोटी पुत्र ती मागून घेती     जू बाळा जू

सातव्या मासी नवस केला     खेळणा पाळणा वाहीन तुला
सोन्याची घुंगरं बांधीन तुला     जू बाळा जू

आठव्या मासी आठवी भीती     पंचारती घेऊन देवीला जाती
बाळाचा नवस फेडूनी येती     जू बाळा जू

नवव्या मासी हुरदं दुखते     दाईला बोलावून आणा म्हणते
पोलादी ईळा दाईला देते     जू बाळा जू

दहाव्या मासी जायफळ सोळा     बाळाच्या मुखात अफूचा गोळा
बाळा लागलाय कळीचा वारा     जू बाळा जू

आकराव्या मासी म्हायेरी जाती अंगडं टोपडं घेऊन येती
पोटीच्या पुत्राची इच्छा पुरविती जू बाळा जू

बाराव्या मासी बारसं करती थोरामोठ्यांना आवातनं देती
पोथीपुस्तकं वाचून पहाती बाळाचं नाव गोविंद ठेविती
जू बाळा जू

२

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

मथुरेमध्ये अवतार झाला
देव कृष्णजी जन्मास आला
तोडूनी बेड्या बंदीशाळेला
चरणाच्या प्रतापी मार्गी लागलां
जो बाळा जो जो रे

गोकुळी माध्यान्ही देवजी आले
नंदाचे घरी आनंद त्याले
गुढ्या तोरणे शीघ्र लाविले
गगनी देव–पुष्प नाचले
जो बाळा जो जो रे

तिसऱ्या दिवशी वाजंत्री वाजे
नैवेद्य गर्जे कर्णाचे नादे
उठ ऊठ छंदा नाचे गोविंदा
घेई बा त्याचे पदारविंदा
जो बाळा जो जो रे

चवथ्या दिवशी चार चौकी ती
लिंब डाळिंब नारळ आणिती
सगळे मिळुनी जिवत्या काढिती
उदबत्ती कापूर देवा दाविती
जो बाळा जो जो रे

पाचव्या दिवशी पाटा पूजन
बांधिली फुलवरा वाट्या तोरण
सरी साखळी माळा मोहन
अंगडं टोपडं बाळा भूषण
जो बाळा जो जो रे

सहाव्या दिवशी सटवीचा फेरा
गोपा बाळाशी आवरूनी धरा
रात्रीच्या वेळी लावा अंगारा
जो बाळा जो जो रे

सातव्या दिवशी श्रावणी पूजन
हळदी कुंकवाचे वाण करीन
पानं सुपाऱ्या सर्व्या वाटीन
जो बाळा जो जो रे

आठव्या दिवशी आठवी चिंतीते
गोपा बाळाला नववी गिणीते
सुईण येऊन जाग्रण करते
जो बाळा जो जो रे

दहाव्या दिवशी बळी पूजीती
नगरच्या नारी धावूनी येती
गोपाच्या जोडीला बळीला घेती
जो बाळा जो जो रे

बाराव्या दिवशी बारसं करती
थाट पक्वान्नाचा सारा उडविती
लाडू बरफीनी ताटे भरीती
जो बाळा जो जो रे

पुत्र जन्मला देखोनी नयनी
हिरा शोभला जैसा कोंदणी
चंद्र चांदण्या जाती अस्मानी
त्याला देखूनी लज्जित मनी
जो बाळा जो जो रे

पिंपळपान शोभते भाळी
नयनी कोरा काजळ घाली
दंडी बाजूबंद मुद्रिका करी
पायीचे तोडे पैंजण वरी
वाळ्याचा नाद उमटतो दारी
जो बाळा जो जो रे

सोन्याच्या दाब कमरेवरी
मोत्याची कंठी त्यावरी सरी
यशोदा बैसली मंचकावरी
नांव ठेवीले परब्रह्म हरी
जो बाळा जो जो रे जो

::३::

संग्राहिका : सौ. गंगूबाई बाबर

१

मनमोहना मनरंजना बाळा जो जो रे
रंगीत पाळणा वरी मोत्यांचा खेळणा
नीज नीज घननीळा नंद येशोदा बाळा
कृष्ण गोपाळा झोप घे वेल्हाळा
बाळा जो जो रे

पहिल्या अवतारी जन्म माशाच्या उदरी
जाऊनिया सागरी शंकासुराशी मारी
घेऊनी वेद चारी देव आले बाहेरी
बाळा जो जो रे

दुसऱ्या अवतारी कासव झाले श्रीहरी
पृथ्वी पाठीवरी मेरू पर्वत तारी
जाऊनिया सागरी वासुकीची दोरी
समुद्रमंथन करी रत्न काढी बाहेरी
बाळा जो जो रे

तिसऱ्या अवतारी वराह झाले हरी
पृथ्वी दाढांवरी हिरण्याक्ष वध करी
गोब्राह्मण रक्षण करी पुनः श्रीहरी
बाळा जो जो रे

चवथ्या अवतारी नरसिंह झाले हरी
खांबातुनी बाहेरी प्रकटले नरहरी

घेऊनी मांडीवरी हिरण्यकश्यपु मारी
पुनः श्रीहरी भक्त प्रल्हाद तारी
बाळा जो जो रे

पाचव्या अवतारी वामन झाले हरी
जाउनी बळीच्या घरी दान मागे सत्वरी
ठेवला पाय शिरी दैत्य घातला पाताळी
बाळा जो जो रे

सहाव्या अवतारी परशुराम रेणुका सुंदरी
नांदतसे मंदिरी आज्ञा पिता करी
घेउनी खड्ग करी रेणुका वध करी
पुनः श्रीहरी पृथ्वी निक्षत्रिय करी
बाळा जो जो रे

सातव्या अवतारी राम झाले हरी
जाऊन जनका घरी चाप उचली भारी
सीता स्वयंवरी रावण लज्जित करी
मारुती ब्रह्मचारी लंका दहन करी
अहिल्या उद्धारी पुनः श्रीहरी
बाळा जो जो रे

आठव्या अवतारी जन्म देवकी उदरी
यशोदेच्या मंदिरी भक्तांचा कैवारी
जाऊनी गवळ्याघरी करी लोण्याची चोरी
जाऊनी मथुरापुरी कंसमामा ठार करी
बाळा जो जो रे

नवव्या अवतारी बौद्ध झाले हरी
जाऊनी पंढरपुरी उभे विटेवरी

भक्तांचा कैवारी संकटे हरितो सारी
बाळा जो जो रे

दहाव्या अतवारी कलंकी होईल हरी
दुनिया धुंडाळी सारी पुनः जगा उभरी
असे देव दशअवतारी पुनः श्रीहरी
बाळा जो जो रे

२

बाळा श्रीकृष्णा देवकीच्या नंदना
बाळा जू जू रे
होताशी कैलाशी अलुक निरंजना
बाळा जू जू रे

आलाशी अवतारी कौसल्येच्या उदरी
करीशी पालना सुखी करावे जना
बाळा जू जू रे

येऊनी रामानी सोडीले बंधना
येउंदी हटेना ऋषी करी वंदना
बाळा जू जू रे

राम जन्मले न्हाई कुनी वळकीले
कुनाला कळेना वशिष्ट जाणे खुणा
बाळा जू जू रे

कौसल्येच्या गर्भात आठ बरसाची मूर्ती
घालसी धिंगाना कुठं आहे रावणा
बाळा जू जू रे

---

१ युद्ध

अवतार निरगुन उडवी रावनाची मान
मारीला कुंभकर्ण राज दिले बिभिषेन
बाळा जू जू रे

आनंद अवघ्याला तेतीस कोटी देवतांला
इंद्र करी गायना नारद वाजवी वीणा
बाळा जू जू रे

राम बोध झाला कीरत भावना
खूल दिली पुरेना काय करावे कळेना
बाळा जू जू रे

दिवस सोमवारी लावून ज्ञानाची दोरी
केले पालना सुखी ठेविले जना
बाळा जू जू रे

३

श्रीकृष्णा बाळा पालखी करी निद्रा घननीळा
बाळा जो जो रे

श्रावणमासी अष्टमीशी देवकी कुशी ये जन्माशी
बाळा जो जो रे

कंसभये वसुदेव तो बाळा नेऊनी ठेवी गोकुळा
बाळा जो जो रे

मध मुखी घालुनी मधुसूदनाशी नंद बघे निजसुत वदनाशी
बाळा जो जो रे

गर्गमुनींनी जातक केले दुसऱ्या दिशी हेलकरी आले
बाळा जो जो रे

तिसरे दिवशी माय उसंगा घेउनी पान्हा पाजी श्रीरंगा
बाळा जो जो रे

चवथे दिवशी साखर पेढे वाटिले नगरी भरून गाडे
बाळा जो जो रे

पाचवे दिवशी पंचमी पूजा बाळबाळंतीण रक्षावळी जा
बाळा जो जो रे

सहावे दिवशी सटवीचा फेरा लिहीतसे भाळी गोरस चोरा
बाळा जो जो रे

सातवे दिवशी सप्तये ऋषी रक्षाबंधने बांधिती खाशी
बाळा जो जो रे

आठवे दिवशी आठही वाणे दिधली नंदाने गो-भू-दाने
बाळा जो जो रे

नववे दिवशी नौबत वाजे देशोदेशींचे आले वो राजे
बाळा जो जो रे

दहावे दिवशी तिमण करा सुईणींची मोत्यानं ओटी वो भरा
बाळा जो जो रे

ऋतूवती नारी बळीराणा घेती त्यायोगे त्यांना होत संतती
बाळा जो जो रे

बारावे दिवशी बारसे झाले बाळ श्रीकृष्ण पालखी निजले
बाळा जो जो रे

:::४:::

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

१

पहिल्या दिवशी बोलली गंगा
नका बायांनो करूया दंगा
दशरथ राजाला जाऊनी सांगा
घोडी उभी करा पाचीया रंगा
जू बाळा जू

दुसऱ्या दिवशी बोलली भागा
निरगुण निराकार होईल जागा
बायांनो तुम्ही चरणाशी लागा
चुडीयाचे दान रामाला मागा
जू बाळा जू

तिसऱ्या दिवशी बोलली भीमा
बाळाच्या रूपाची लागंना सीमा
जाऊनी बोलवा बाळाच्या मामा
अशा बोलती उमा नि रमा
जू बाळा जू

चवथ्या दिवशी बोलली तारा
सोनार आणावा आपुल्या घरा
सरी बिंदल्या घडीव सोनारा
धनुष्यबाणाची तयारी करा
जू बाळा जू

पाचव्या दिवशी सटवी बोलली
सीता रामाची लंकेला नेली
कशी देवा तुला निद्रा लागली
गेला मारुती लंका जाळली
जू बाळा जू

साहाव्या दिवशी बोलली जना
शक्ती लागली बंधू लक्षुमणा
अंजनीसुता द्रोणाई आणा
भोवती जमली वानरसेना
जू बाळा जू

सातव्या दिवशी कलिंग कोळ
राम जलमला रूप मंजूळ
गर्जे आसमानी सूर्यमंडळ
राम निघाला रावणाचा काळ
जू बाळा जू

आठव्या दिवशी दाखवी लीला
पुत्र जाहला दशरथ राजाला
कौसल्या माताने झोकाया दिला
कैकई सुमित्रा सांगाती तिला
जू बाळा जू

नवव्या दिवशी नवी नवलाई
कळी खुलली संटी सामाई
प्रसूत जाहली कौसल्या माई
गाऊ लागली गीत अंगाई
जू बाळा जू

दहाव्या दिवशी बोलली गजा
संगं घेऊनी वानरी फौजा
आधी जाऊनी रावण वधा
इंद्रजिताच्या उडवा भुजा
जू बाळा जू

आकराव्या दिवशी आकरावा रंग
दास रामाचा उभा बजरंग
वासूदेवानं लाविला छंद
पंचहत्यारी रामाच्या संगं
जू बाळा जू

बाराव्या दिवशी बाराया घरी
उजेड पडीला विजलीचा भारी
शोभा चढली राजमंदीरी
कोटी देव आले आयुधी नगरी
जू बाळा जू

२

पहिल्या दिवशी जन्मले बाळ
कळस सोन्याचा देतो ग ढाळ
पडीला उजेड तिनी त्रिकाळ
दिपली नेत्रं दोनी प्रेमळ
करी भक्तीचा प्रतीयापाळ
कृष्ण जन्मला बंदी या शाळं
जो बाळा जो

दुसऱ्या दिवशी दुसरा रंग
रूप सावळं गोरं हे अंग
जसं झळकतं आरशाचं भिंग

येती गवळणी बाळाच्या संगं
नारी पद्मिनी झाल्याती दंग
येश्वदा फेकिती कृष्णाव रंग
जो बाळा जो

तिसऱ्या दिवशी आनंद मोठा
सती सावित्री बायांनू उठा
खारीक खोबरं साखर वाटा
धर्म केलाया धा वीस पेठा
आयेव नारीचा आयोर लुटा
जो बाळा जो

चवथ्या दिवशी बोलली बाळी
अनुसयाची वाजली टाळी
कृष्ण जन्मला यमुना जळी
पाळण्या बांधिली सोन्याची दोरी
ती ही हालविती माता सुंदरी
जो बाळा जो

पाचव्या दिवशी पाचवा राडा
रानसटवीनं वेढिला बाळाचा वाडा
यशोदामातेचा जीव झाला थोडा
लिंबू नारळ देवाला फोडा
तान्ही वासरं गाईला सोडा
तान्ह्या बाळाची दृष्ट हो काढा
जो बाळा जो

सहाव्या दिवशी कळीचा वारा
बाळ जन्मला फुलांचा गजरा
जशा मोत्यांनी गुंफाव्या तारा

राधा कृष्णाला घालिती वारा
चल येश्वदा आपुल्या घरा
जो बाळा जो

सातव्या दिवशी सातवा महाल
मधें चांदणं पडलं गोल
चहू बाजूंला तोरणं हालं
सोनेरी मंडप घालती लाल
कृष्ण मांडीवर येश्वदा डुलं
जो बाळा जो

आठव्या दिवशी आठवीचा थाट
भुलल्या गवळणी तीनशेसाठ
चुकूनी गेल्या पाण्याची वाट
ताकाचे डेरे फोडीले चट
श्रीकृष्ण देवाची पहाती वाट
जो बाळा जो

नवव्या दिवशी नवतीचा फंद
तान्ह्या बाळानं घेतला छंद
कारागृहाचे तोडीले बंद
वासुदेवाला मिळाला नंद
झाला गोकुळी आनंदी आनंद
जो बाळा जो

दहाव्या दिवशी धाव्वीची रात
तेत्तीस कोटी देवता येत
मुखी धरूनी चंदनज्योत
उतरून टाकिती माणिक पोत
जो बाळा जो

आकराव्या दिवशी नारद बोलं
देवा तुम्ही किती झोप हो घ्याल
बाहेरी येऊनी दर्शन द्याल
कृष्णजन्माची पताका लाल
जो बाळा जो

बाराव्या दिवशी जमल्या नारी
पाळणा बांधिला येश्वदा घरी
त्याला बांधिली रेशमी दोरी
जो जो म्हणीत हालविती नारी
पाळणा गायीला नानायापरी
बाळाचे नाव ठेविले हरी
जो बाळा जो

३

जो जो रे श्रीरामचंद्रा दशरथपुत्रा लागो निद्रा
बाळा जो जो रे

केवळ काचनी पाळणा आणिला
तुजसाठी बा रेशमी विणिला
बाळा जो जो रे

खूर रुप्याचं चहू बाजूंना
हांतरीलासे आत बिछाना
बाळा जो जो रे

भर्जरी चांदवा रेशमी शेला
चिमण्या मोत्यांची झालर त्याला
बाळा जो जो रे

हंस कोकीळ ते इंद्रनीळाचे
बसविले शुक मोर पोवळ्याचे.
बाळा जो जो रे

हालवी कौसल्या दशरथ बाळा
वंदिले कृष्णा या विश्वपाळा
बाळा जो जो रे

जो जो जो रे वेल्हाळा निद्रा करि गुणी बाळा
बाळा जो जो रे

४

कन्यारत्न ही जन्मली बहू सुकृत चांगली
ऋषींने शोधुनिया पाहिली शुद्धमती गायिली
जो जो जो गे

पालक चंदनसा कातियला रंगवुनी तयार केला
खिडक्या कंगोरे हिरेमोती त्याला गोफ चहू बाजूंला
आणुनी मंदिरी बांधीयला वर चांदवा दिधला
वाजंत्री वाजती सदरेला भीमक संतोषीला
जो जो जो गे

कुंच कुंचली चढवुनी घडवुनी बाळ लेणी
सखया येताती घेऊनी शुद्ध ओटी भरुनी
नाव ठेविले रुक्मिणी गूळपान वाटूनी
जो जो जो गे

५

काय ही जमीन त्यात वाढले तन
जावे शरण सद्‌गुरुशी। बाळा जू जू रे

एक नांगर कोरीला डोंगर
आधार मंत्राचा दोरा पंगतीचा। बाळा जू जू रे

दोर धरून खेळू अवघे जन
दोहींचे खंडानं नांगरली जमीन। बाळा जू जू रे

वज[1] करु जमिनीची किरपा सद्गुरुची
झाली पेरणी आली उगवुनी। बाळा जू जू रे

करूनी राखण सत्त्वाची गोफण
मनोभावे धरून पिकाची राखण। बाळा जू जू रे

तिवडा खीला चार वेद जुंपीले
झाली मळणी वारा सुटे मंजूळ
भक्तरस परिमळे आवडे करू चढाओढ। बाळा जू जू रे

गाड्या भरूनी उरली अक्षरे दोन
माझ्या सद्गुरुंनी जडीले जडान
लिहिले पोथी पुरान पहा वाचून। बाळ जू जू रे

५

संग्राहिका : **सौ. सिंधू वारनूरळकर**

१

पहिल्या दिवशी आनंद झाला
मोत्या पवळ्याचा धर्म वो केला
हत्तीवरी अंबारी घाला
जू बाळा जू

१ मशागत, निगा

दुसऱ्या दिवशी खांदली न्हाणी
पाणी घालिती बारा वो जणी
पुत्र राज्याला झाला हो धनी
जू बाळा जू

तिसऱ्या दिवशी तिसर्डे करती
हाती सोन्याची आरती घेती
हरीनामाचे पूजन करती
जू बाळा जू

चवथ्या दिवशी नाना या परी
वाक्या बिंदल्या बाळाला सरी
बोलवा सोनार आपल्या घरी
जू बाळा जू

पाचव्या दिवशी वाजली घंटा
बळी बैसले चांदीच्या पाटा
झाला आनंद पंचांग वाचा
जू बाळा जू

सहाव्या दिवशी करिती सहावं
येण्याजाण्याला बहीण भावं
मायबापाचे राखावे नाव
जू बाळा जू

सातव्या दिवशी सटवीचा फेरा
ओकी अक्षरे पडंना चुकारा
माया जंजाळी फसवू नरा
जू बाळा जू

आठव्या दिवशी आठवी चौकी
तान्ह्या बाळाची नवती खुलती
सख्या मिळूनी जागृत करती
जू बाळा जू

नवव्या दिवशी तुझं तुला ठावं
बाळ वंशाचं राखील नाव
मायबापाला पंढरी दावं
जू बाळा जू

दहाव्या दिवशी दहावी माळ
संगं जमती बाळगोपाळ
मातापित्याला झाला सुकाळ
जू बाळा जू

अकराव्या दिवशी अकरावा थाट
उदबत्ती लाविली तीनशे साठ
बाळ खेळतो आनंद वाटं
जू जू बाळा

बाराव्या दिवशी बारसं करती
बाळगोपाळा आवातनं देती
नाव हौसेनं श्रीकृष्ण ठेवती
जू बाळा जू

तेराव्या दिवशी पाळणा बांधिला
मोत्यापवळ्याची झालर त्याला
मायबापांनी झोका वो दिला
जू बाळा जू

२

पहिल्या दिवशी राजदरबारी
जमले सारे सरदार मानकरी
बाळ शिवाजी आले अवतारी
जू बाळा जू

दुसऱ्या दिवशी राजमंदीरी
केली आरास नाना या परी
नाव घालिती दासी सुंदरी
जू बाळा जू

तिसऱ्या दिवशी वाजली घंटा
साऱ्या नगरीशी आनंद मोठा
खारीक खोबरं साखर वाटा
जू बाळा जू

चवथ्या दिवशी केला शिणगार
आले तानाजी मामा शेलार
असे शिवबाला शोभे सरदार
जू बाळा जू

पाचव्या दिवशी पाचवी केली
देवी शिवाई धावुनी आली
असे राजाला प्रसन्न झाली
जू बाळा जू

सहाव्या दिवशी लावून लळा
कानी कुंडल मोत्यांच्या माळा
गंध कस्तुरी कपाळी टिळा
जू बाळा जू

सातव्या दिवशी सातवी करा
जिजाई पोटी जन्मला हिरा
त्याच्या टोपीला मोत्यांचा तुरा
जू बाळा जू

आठव्या दिवशी आनंद मोठा
आले सेनापती तानाजी उठा
हाती तलवार मिरविती ताठा
जू बाळा जू

नवव्या दिवशी नवरत्न हार
अशी मोत्यांनी गुंफीली तार
झळके धरणी तसे अंबर
जू बाळा जू

दहाव्या दिवशी गेलाया शीण
निळ्या घोडीला रेशमी झीण
फोटो काढावा वरती बसून
जू बाळा जू

आकराव्या दिवशी आकरा या रंग
बाळाला पाहून सेनाही दंग
पंचहत्यारी राजाच्या संगं
जू बाळा जू

बाराव्या दिवशी बोलवा माळी
केली आरास लावूनी केळी
नाव शिवाजी ऐका मंडळी
जू बाळा जू

तेराव्या दिवशी तेराही कोरी
पाळण्या बांधिली रेशमी दोरी
गाणे गाऊनी हलवी सुंदरी
जू बाळा जू

चौदाव्या दिवशी नौबद वाजे
बाळ अंबारीत बसून साजे
संगं घेऊनी लष्कर फौजे
जू बाळा जू

पंधराव्या दिवशी मारून धजा
शहाजी राजानं जमविल्या फौजा
बाळ शिवाजी दख्खनचा राजा
जू बाळा जू

३

सन आठराशे सत्याण्णव सालात
आनंद झाला करवीर शेरात
पहिल्या शुक्रवारी श्रावण मासात
पुत्र जाहला शाहू राजास
चंद्र उगवीला लक्ष्मी महालात
जू बाळा जू

शाहू राजाची पुण्याई थोर
गुढ्या उभारुनी तोफेचा मार
झाला आनंद होतो गजर
पान सुपारी वाटी साकार
जू बाळा जू

बिजली बत्तीचा प्रकाश भारी
ल्हाया टाकिल्या राजमंदीरी
पाहून तिरपती नगर नारी
ओतीती आणूनी स्वर्णघागरी
खणा नारळांनी ओट्या सावरी
जू बाळा जू

लक्षुमी पोटी जन्मला हिरा
मोठ्या मोठ्या शेरी पाठवल्या तारा
बंदी कैद्यांच्या फोडील्या मोहरा
पहिल्या दिवसाचा मजकूर सारा
जू बाळा जू

दुसऱ्या दिवशी दुसरा प्रकार
हत्तीवरूनी वाटी साकार
घोडे कोतवाल निघाले स्वार
घण घण वाजा वाजे सुंदर
जू बाळा जू

तिसऱ्या दिवशी तिसरी आरती
दत्ताची छाया बालकावरती
सोळा सुवासिनी फेर या धरती
करून शिणगार बाळा ववाळती
जू बाळा जू

चवथ्या दिवशी चंद्रपूजेचा
देव गजानन साहक बाळाचा
खेळ खेळीतो कृष्ण गोकुळचा
प्रकाश पडला म्हाळी सूर्याचा
जू बाळा जू

पाचव्या दिवशी सटवीचा मान
लिहिती आक्षारं दोही हातांनं
चवरंगी पूजा बांधी सन्मान
हाळदीकुंकू वाटिती वाण
जू बाळा जू

सहाव्या दिवशी सहावा उल्हास
सडा सारवण केलं वाड्यास
तेल सुवासिक लावी अंगास
पाणी घालिती तान्या बाळास
जू बाळा जू

सातव्या दिवशी साती आसरा
गुप्त रीतीनं घालिती फेरा
लिंबू नारळ टाकी उतारा
द्रिष्ट काढूनी लावी अंगारा
जू बाळा जू

आठव्या दिवशी आठवा चांद
पोटी जन्मला कृष्ण गोविंद
हार पुष्पाचा सुटे सुगंध
करवीर नगरी झालीया दंग
जू बाळा जू

नवव्या दिवशी नवस केला
खेळणा पाळणा अंबाबाईला
तोरण पताका बांधीन तुला
कृष्ण बालक लाभू दे मला
जू बाळा जू

दहाव्या दिवशी धाही दिशांस
केली बोळवण जोतिर्लिंगास
देवी अंबाई पूजिली खास
बाळाला लागू दे तुझा ग ध्यास
जू बाळा जू

अकराव्या दिवशी आकरावा लिंग
दास रामाचा उभा ही संगं
पाची हत्यारे प्रभूच्या मागं
देव मारुती सेवेत दंग ।
जू बाळा जू

बाराव्या दिवशी बारशायाला
सोन्याचा पाळणा मोत्यानं गुंफीला
आंगडं टोपडं किनखापी त्याला
हिरे जोडीले पिंपळपानाला
शाहूच्या गादीवरी बाळ बैसला
राजाराम नाव जाहीर सर्वांला
जू बाळा जू

६

संग्राहिका : सौ. हवाब्बी खान

पहले जुबांपर जलके रसीपत नबीका बोलो सरासर ।
कुलं अंबीया के सरदार अनवर ।

जिन्नो तुहूलद लावो जुत्रांपर ॥
पड़लो दरुद आये मेरे दिलपर
जुजुरे जू ताने जू

अरसी और कुरसी म्हैताव व ता रे ।
अंगार दोजखकी वुजवाने वाले ॥
अर्शोंसे कंदील लगवाये सारे ।
इत्र गुलाबके उडते फंवारे ॥
जुजुरे जू ताने जू

वारे तालाने हुकूम फरमाये ।
हुर परीयोंने मंडवा समाये ॥
मशरीकसे मगरीब तक शोर मचाये ।
सब सरज नशान गल्लुफ चढाये ॥
जुजुरे जू ताने जू

मयोजी मयो सब और सबको ।
तारीख बारा अव्वल जुम्माको ॥
उलफत परदेमे किरील उनको ॥
हमल रह प्यारी आमीना बी को ।
जुजुरे जु ताने जू

पहले महिनेका बयान करते ।
झाड और पहाड सलाम करते ॥
दौडके शयतान पहाडोमें छुपते ।
आयसे नबीयें दुनियामें आते ॥
जुजुरे जू ताने जू

दूसरे महिनेको आखाही बहाना ।
तऱ्हा तऱ्हा के चिजें ले आना ॥

प्यारी आमीनाको लाके खिलाना।
फुल चमेलीके हार गुंदाना॥
जुजुरे जू ताने जू

तीसरे माहिनेको अंग मोडे आते।
निंदका वहाना कर बिस्तर मे सोते।
जंन्नत का हरसाना हरदम दिखाते॥
नूरका जलसा ख्वावमे पाते॥
जुजुरे जू ताने जू॥

चौथे माहिनेको फिर हाके ताला।
नूरे नबीको साचेमें डाला॥
अखाना सरकुम करके जुमला।
आमीनाके शुरमे नूरका शोला॥
जुजुरे जू ताने जू

पांचवे माहिनेको पांच अनासर।
आवो सकूम करके बराबर॥
रहेमत के नारे गुलशन मे लाये।
इसराहिल बातों को जोहरमे लाये॥
जुजुरे जू ताने जू

छट्टे माहिने के छे महापुरे।
लालीये कुडते जडवाई हिरे॥
चौदा रतन सिनगार नारे।
आरमान कोने जडवाई हिरे॥
जुजुरे जू ताने जू

सातवे महिने के सात सितारे।
आफताब माहिताब झुक गये सारे॥

जंन्नतसे पोशाख दिलवाने वाले ।
जसने मुन्नराक लाके सवारे ॥
जुजुरे जू ताने जू

आठवे महिनेको आठ जंन्नता ।
रिदवाये तोफा लेले के आये ॥
हुकम हुवा के सरको झुकाये ।
जुजुरे जू ताने जू

नववे महिने को नऊ किरीना ।
जमीन आसमान चमके नगीना ॥
बशरों के महेलों में देखे अमीना ।
सब सर्ज हुवा मक्कामदीना ॥
जुजुरे जू ताने जू

दसवे महिने को दसवा महा ।
आमीनाके घरमे जन्नतीदाया ॥
प्यारी आमीनाको जनोन आया ।
तुहलूद का सामान जंन्नतसे लाये ।
हुर परियां उनके खिदमत मै आये ॥
जुजुरे जू ताने जू

जिब्रवरील आपना भेश बदलाये ।
मुर्ग बनकर तशरीफ लाये ॥
आमीनाके दिल धैशत खाये ।
उस वक्त आमीना आराम पाये ॥
जुजुरे जू ताने जू

आशउल आर्शी हूर जो आये ।
कौसरका पानी जंन्नतसे लाये ॥

जच्चा और बच्चे को पानी नहलाये ।
आर्शी के कपडेमें बच्चा सुलाये ॥
जुजुरे जू ताने जू

आर्शी उल आर्शी गवार लाये ।
रेशम के दोरीसे झुला बंद वाये ॥
झुलेके चौफेर कलमा लिखवाये ।
मखमल की गादी जाहेर बिछाये ॥
जुजुरे जू ताने जू

मोरे नबुवत का कुडता सिलाये ।
सामे दरूद की टोपी पहनाये ।
बुल बुल हुलकी चादर उठाये ।
स्वल्हे आलाको झुलेमे भाये ।
जुजुरे जू ताने जू

७

संग्राहिका : **सौ. मंगला नावडीकर**

नंदामंदिरी अवधारी अवतरले श्रीहरी
बाळरूप घेऊनिया मुरारी बाळा जो जो रे

अंगडं टोपडं कुंचडं वर टोपी गुजरी रुण झुण
वाकीचा गजर चालतसे सुंदर
बाळा जो जो रे

पालक चंदनाचा कातवला रत्नजडित कोंदण
सखया पुसिती नावाला हर्षयुक्त हा मनाला
करि निद्रा रुणझुण बाळा बाळा जो जो रे

येश्वदा म्हणतसे नंदाला घ्या गोविंदाला
विरजण लावु द्या दुधाला उशीर झाला मजला
हलवी येश्वदा निज बा नारायणा
बाळा जो जो रे
राजसा सुकुमार डोळेसा बाळा जो जो रे

सरी साखळी बिंदली पिंपळपानाला जोडली
अति बहु शोभली बाळा जो जो रे
राजसा सुकुमार डोळेसा बाळा जो जो रे

८

संग्राहिका : सौ. इंदुमती पाटील

मथुरेत तुझा अवतार झाला
वसुदेव-देवकीच्या गर्भासी आला
बंद सोडूनी बेड्या साकळ्या
चरण पातका मार्ग दाविला
जो बाळा जो जो रे जो

दुसऱ्या दिवशी दुसरं लेणं
अंगी टोपडं पिंपळपान
यशोदाबाई बाळ ग तानं
वय कोवळं दिसाया ल्हान
जो बाळा जो जो रे जो

तिसऱ्या दिवशीं भाचूण करिती
लिंबाच्या काड्या प्यायला देती
खोबरे खारका खायला देती
पंक्तीत साजुक तूप वाढिती
जो बाळा जो जो रे जो

चवथ्या दिवशी चवयी बोले
तान्या बाळाची नवती खुले
सखी सुंदरा दृष्ट काढिती बळे
जो बाळा जो जो रे जो

पाचव्या दिवशी सटवीचा फेरा
बाळा गोपाळा आवरुनी धरा
मुला लेकरा गाई वासरा
लिंबू नारळ टाकी ऊतारा
दृष्ट काढुनी लावी अंगारा
जो बाळा जो जो रे जो

सहाव्या दिवशी सहावी पूजन
आणिल्या वरवा ठेवी भरून
लावी समया दिवे भरून
हंड्या झुंबरे लावी थटून
जो बाळा जो जो रे जो

सातव्या दिवशी साती सामान
पायी पद्म मुखी रतन
दंडी शोभती वाक्या तोरण
बाळा गोपाळा द्यावे भोजन
जो बाळा जो जो रे जो

आठव्या दिवशी आठ आळती
कुरवड्या भातवड्या ताटं घुमती
खिरी दुधाच्या वाट्या भरती
बाळा गोपाळा जेवू घालिती
जो बाळा जो जो रे जो

नवव्या दिवशी नवस करिती
हरीचा पालव लागू द्या म्हणती
खेळणा पाळणा वाहीन तुजशी
औक्ष द्यावे तान्या बाळाशी
जो बाळा जो जो रे जो

दहाव्या दिवशी धावत येती
पिवळा पितांबर जरी नेसती
पान सुपाऱ्या विडे वाटिती
अत्तर गुलाब केशर देती
जो बाळा जो जो रे जो

अकराव्या दिवशी कुजबूज वाचे
संभाळ भैरोबा आनंद नाचे
तुझ्या नादाने गोविंद नाचे
जो बाळा जो जो रे जो

बाराव्या दिवशी बारसं करिती
गोकुळच्या नारी बोलवा म्हणती
एक म्हणती सादेव घ्यावा
एक म्हणती म्हादेव घ्यावा
सादेव म्हादेव परतुनी घ्यावा
श्रीहरी कृष्ण नाव ग ठेवा
जो बाळा जो जो रे जो



कृष्णदेव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# अनुक्रम

**घ्या ग गोविंद, घ्या ग गोपाळ—**

*संग्राहक* श्री. ग. ह. पाटील

सौ. शरदिनी मोहिते

सौ. पार्वतीबाई किर्लोस्कर


सौ. गंगाबाई धारप

श्री. सदाशिव माळी

सौ. शांतादेवी बावर

श्री. बाजीराव पाटील

## घ्या ग गोविंद
## घ्या ग गोपाळ—



आपल्या घरातील नुकतेच जन्माला आलेले बाळ भगवान् श्रीकृष्णासारखे दिसावे असा मनोदय त्याची आई सदैव आपल्या जवळ बाळगून रहाते. त्यामुळे कृष्णदेवाच्या खोडया ती त्याच्या कानावर घालते आणि ह्या बाळाने विश्वरूपदर्शन घडवावे अशी ईर्षा मनी जोपासते. ह्या बाळाचे नाव ठेवतानाच ती बारशाचेवेळी त्याला 'गोविंद घ्या, गोपाळ घ्या; कृष्ण घ्या, केशीराजा घ्या,' अशा कौतुकाने न्हाऊमाखू घालते. कृष्णदेवाचा पाळणाही त्यावेळी हौसेने म्हटला जातो.

त्यामुळे कृष्णाच्या बाळलीलांच्याबरोबरच त्याने उभ्या केलेल्या अद्‌भुतरम्य दुनियेचा झाडाही त्यावेळी आपोआप होत रहातो. या संदर्भात बाळाला मांडीवर घेऊन डोलावीत असताना अगर त्याला पाळण्यात घालून जोजविताना कृष्णदेवाच्या ओव्या आळविण्याची प्रथा आहे.

गोकुळच्या कृष्णदेवाचे लोकगीतांनी घडविलेले या संदर्भातील दर्शन विशेष अपूर्वाईचे आहे. म्हणूनच इथे थोडा वानवळा देत आहोत.

:: १ ::

संग्राहक : श्री. ग. ह. पाटील

यशवदे बाई हरी तुझा पक्का चोर
ताक कशायानं करू नेला माझा रवीदोर

यशवदे ग बाई हरी तुझा बहूरंग
पुरेना हात शिंकी खाली मांडीतो चौरंग

यशवदे ग बाई खेळ तुझ्या कारट्याचा
यिनीयला चेंडू शिंदीच्या सोरट्याचा

यशवदे ग बाई सांग तुझ्या ग हरीला
खडे ग हानीईतो गवळ्यांच्या नारीला

दुडीवरी दुडी गवळणी निघाल्या झाडून
कळंबाच्या झाडावरी कृष्ण बैसला दडून

यशोदे ग बाई कृष्ण तुझा बाळराजा
घेतात या आळ सुना गवळ्याच्या ढालगजा[1]

पिवळ्या पातळाला डाग पडला काजळाचा
सांगते भैना तुला कृष्ण कडेला जावळाचा

बाळाची यशोदा नेसली कशीदा
दूध पाजत बैसली सावळ्या गोविंदा

पहिली माझी ओवी बाई तुळशीच्या मुळी
लाडका कृष्णदेवू बाळ गोकुळात खेळी

---

१ भांडखोर, तोंडाळ.

२

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

उपजला कृष्ण आडवा घेतला बापानी
कवाड उघडी आपल्या लाथांनी
आगाशी पाखरू बोलीचा फेर जाना
उपजला कृष्ण उघडीला बंदीखाना
आगाशी पाखरू बोलीची गत मत
उपजला कृष्ण झाला आनंद गोकुळात
आगाशी पाखरू बोली बोलात दुहीरी
उपजला कृष्ण झाला मामाला वयीरी
उपजला कृष्ण कुलपं गळाली ठाईची
पुरविली इच्छा माता देवकीबाईची
उपजला कृष्ण आनंद झाला फार
हत्तींवर जासुद मामा वाटीतो साखर
उपजला कृष्ण उपजताची रांगतो
कंवस त्याचा मामा माराया सांगतो
साठ पुतरांनी गंधारी नाई धाली
एकल्या कृष्णातानी देवकी संतुषली
कृष्णा तुझी बोली गुळाची गुळपोळी
भुलविली तू राधा गवळ्याची लेकुरवाळी
मथुरा बाजारी गेल्या गवळनी झाडुनी
कळंबाच्या झाडावरी कृष्ण बैसला दडुनी
नदी जमुनाला कृष्ण खेळतो सारंगपाट
आला गवळनीचा थाट कृष्णा द्यावीस वाट

॥३॥

संग्राहिका : सौ. पार्वतीबाई किर्लोस्कर

कृष्ण टाकी उड्या झाडा कळंबा वरूनी
गोपिकांची वस्त्रं नेतो लपूनी चोरूनी

कृष्ण टाकी उड्या झाली यमुना काळी
शेषाच्या फणीवरी नाच करी वनमाळी

कृष्ण टाकी उड्या वय पाच वरसांचं
पाताळात जाऊईनी केलं मर्दन कालियाचं

कृष्ण टाकी उड्या चेंडूच्या कारणानं
वाजवीत पावा घाली शेषाला वेसण

॥४॥

संग्राहिका : सौ. गंगाबाई धारप

जो जो गे म्हणूनी भागली यशोदा
तुला कुणाची गोविंदा दृष्ट झाली

दुधातुपानी भरल्या वाट्या वर साखर माईना
छंद घेतल्या राहीना यशोदा बाळ

लिंबलोण करू दोघांना बरोबरी
विजया शेजारी आनंद बाळ

बाळाचा पाळणा महाली टांगती
येता जाता हालवीती कृष्णबाळ

यशोदा म्हणे बाळ माझा माती खातो
ब्रंह्मांड दावितो तोंडातूनी

खोड्याळ म्हणूनी बाळ बांधीला दावणी
दुष्ट या गौळणी गोकूळीच्या

५

संग्राहक : **श्री. सदाशिव माळी**

दही रे दुधाची गवळण चालली एकली
कळंबाच्या झाडाखाली कृष्णानं आरोळी ठोकली

मथुरेच्या बाजारात जातसे श्रीकृष्ण कोल्हाटी
खेळ मांडिला तिथे राही चंद्रावळीसाठी

मथुरेच्या बाजारात झाला श्रीकृष्ण चांभार
बेगडी वहाणा राही चंद्रावळ घेणार

मथुरेच्या बाजारात झाला श्रीकृष्ण कुंभार
नाजुक नवल्या राही चंद्रावळ घेणार

मथुरेच्या बाजारात झाला श्रीकृष्ण कासार
राजहंसी वांगड्या राही चंद्रावळ भरणार

मथुरेच्या बाजारात झाला गवळणींचा गजर
सोडा सोडा कृष्णदेव राहीबाईचा पदर

दही रे दुधाची राही परतली एकली
कळंबाच्या झाडाखाली कृष्णानं काचोळी गुंफली

:::६:::

संग्राहिका : सौ. शांतादेवी बाबर

१

जलामला किस्नदेव सुटल्या बंदीशाळा
देवकी माता बोले दैवाच्या माज्या बाळा
किस्न गोकुळी जलामला दिवा गोकुळी तुमी लावा
बाळ मावशीला दावा
किस्न गोकुळी जलामला नंदराजाचा भरला वाडा
वाटी दुरडीनं सुंठवडा
किस्न गोकुळी जलामला टिटवी गगनी करी चाळं
कंस मामाला झाला काळ

२

कदंब ढाळी कडाडली
कदंब ढाळी कडाडली
देवकी माता रडू लागली
देवकी माता रडू लागली
आम्हाला कृष्ण झाला न्हाई
वाळं तोडं लेला न्हाई
राशीयेला गेला न्हाई
धुरळा माती खेळला न्हाई

## बाळ किसनाचीं शिदोरी

संग्राहक : **श्री. बाजीराव पाटील**

*एकला गहू, अनू परकार[1] बहू, मंग संग काय देऊ न का रुसला*
*किसना रे, तुझा न्याव काय केला ॥*

*दुपडी रोंटी, साधी रोटी, कंचनावाटी, दही ठिवले ।*
*किसना रे, वर लोनीरे माखले ।*
*आगर मांड्याची करुनिया वळी, पुरनाची पोळी,*
*आनिक पीठशोळी, परकार केला ।*
*किसना रे, तुझ्यासाठी रोडगा ठुला ।*
*माता म्हने सुंदरी, देवा श्रीहरी, गाई सोळ ।*
*किसना रे, हट करता झाला लोळ[2] ॥*

*मालटी मुंगटी खातु केवळ, मालपुरान्याची आपुर,[3]*
*काठीची शेवळी, तुपांबुर, दुधांतली खीरसरोटी,*
*किसना रे, सरोळ्याची आवळ मोटी ।*
*माता म्हने सुंदरी, देव श्रीहरी, गाई सोळ, ॥*

*सरोळे, बटोळे, सुपशेवळी, नरवुले, गव्हले, बरती चारोळी ।*
*कुरळी सां डोळी, आनिक पापळी, किसना बलाव आपले गळी ।*
*अन् हाका मारं, धंद्याला होतो उशीर ॥*

---

१ प्रकार. २ रोड. ३ आंबट.

आनून दूध गोळंबी खाकस, आंब्याचा रस, शेवलाळ्
केले सुरुस,[1] तुपकेळं मलीदा गोळ।
किसना रे, हट[2] करता झाला लोळ॥

दाळीतली दाळं, उकडले फळं, रताळपेंड्या अन् रायकेळं।
खाऊ दुधासी, अन् का रे बापा धरली आळन[3] झाली दिष्ट।
किसना रे, ओवाळीन मोहऱ्या मीठ।
केले म्या उदळाचे वळे, वळे मिठाई साखर खळे, खाज्या—
पुऱ्या आनिक शिंगाळे, फराळ कर।
किसना रे, का लळतं सारंगधर॥

अनारसे फेन्या, गुजगुजवान्या सोजीकन्या, उतती खोबरं।
किसनारे, वर मेजवा साखर।
खिसळी तुपातली, बोरपुंजा हाय चुन्याची, सक्रसावधान
इल्लायची, परकार करून गुपचुप करे धळमोळं[4]
दयता रांधता आले फोळं।
किसना रे, हट करता झाला लोळ॥

तुरीचं वरन रांधलं नेटं, सांज्याच्या पोळ्या, सोजी दाट।
हरबऱ्याचं पुरन येगळं ताट, बैस पंगतीला।
किसना रे, शिकरनानं डवना[5] भरला।
गरम मसाले, पायता जिरे, परकार करून न्यारे न्यारे।
कढी सवठाची, कढी चिंचीचि, कढी म्या केली आमसोलाची·
शाकसुपारी[6] चिकनगोटी।
किसना रे, वाढील्या वरन बोटी॥

---

१ स्वादिष्ट. २ हट्ट. ३ अडवणूक. ४ घडामोड. ५ द्रोण. ६ भाजी.

बोरीचं बोरकुट, चिंचीचं मेदगोनी बहू आंबट,
लोन[1] लावून, मिरच्या लावून तिखट ।
किसना रे, खोल गेलं तुहं पोट ।
हरी रे, जाऊन भातकं[2] तोळ बागात ।
मठ, बरबळ्याच्या करून भाकरी, चिपीचं रायनी ।
माता म्हने गरीब आपला संसार, धरुन हनुवटी ।
किसना रे, तू धरुन चाव तांदूळवाटी ॥

मुगदल मर्द, बांध मिठाई, जिलबी शिऱ्यामध्ये टाकाई ।
साता धान्याची भुजली लाई,[3] गहू, जोंधळा अन् गवत्या साई ।
राजगुरा कनसं मोकळी, साता लाह्याचं केलं पीठ ।
किसना रे, तू फराळ करबा नीट ।
कासरुकी घागरी तुपाच्या, लापसी मोहन भोग मळ्याच्या ।
उंब्या नागदिवे हुक्क्याचे, हुक्का[4] फुटाने हरबऱ्याचे,
वटाने आहेत परगट ।
किसना रे, तूज का रे आला वीट ।
कळ्ळी, तेल त्या जवसाचं, तिखाडी तेल, त्या मव्हरीचं ।
खत्यखात कोनाचे लेव्हीले ।
किसना रे, जीऊ बलाव संगत्याले ॥

तुहे दैव, तुह्या दैवानं भक्त पांडव,
शहाण्णव कुळीचे राजे देव ।
तुह्या नामाची मजला गोळी ॥

---

१ मीठ. २ खाउ. ३ लाही. ४ हुरडा.

सुखवळे केले, म्या फुलवळे केले, किसना रे, तुह्यासाठी
गुळवळे केले, पानगे वाजग्याचे केले ।
किसना रे, किती सांगू बापा तुले ।
ठोंबरा, आंबील त्या जोंधयाची, खीर म्या केली ।
गव्हा तांदयाची, चटनी म्या कवठाची केली ।
किसना रे, वर निंबोटी पिळली ।
हरबऱ्याचा खार घालून कढीत, वांग्यावैंगनाचं भरीत,
शाक मिर्च्यांची तोंडी लावीत, शाक भाजी देंडोळ ।
मिर्च्यांची भाजी सांग हुळहुळ ।
माठीच्या मुळ्या, मुळ्याच्या शेंगा, कवळा गुलावासतुह्यासाठी
किसना रे, पानवळ्या वाढील्या ताटी ।
आधाडा भाजी कुपात,[1] किसना रे, हा भाजीपाला रानात,
आंबाळीची भाजी, बहु आपुर, वरतीहयकुंड घालुन जिरं,
कनी घालून केला परकार ।
वर मिरच्या खिसल्या चार ।
किसना रे, कठीले काळ दुखळात[2] तगर येरंडाचे तोळूनी,
काध्या सावरा, भावरा निसुनी, टेकाळू नरम जात निवळूनी,
शाक संबारात घोळूनी ।
किसना रे, दिली तुपाची फोळनी
हरी रे, केलं नाईचं रायनी ॥

पारसी दोळका, हजार दोळका, कासी कवळ्याच्या करुनी
फाका,[3] खारी कवळ्याचा गून ऐका, कथली म्या

१ कुंपणांत. २ दुःखांत. ३ फोडी.

पडोळाची केली ।
भाजी कांचनाची निसली ॥

बैलांदाची भाजी पोयी, भाजी वक्रयाची ऐकावी,
आनिक भाजी खांडकोई, भाजी म्या चित्रंगाची केली,
किसना रे, जेव कडुसले कारले ।
हरी रे, किती सांगू बापा तुले ॥


भादली, कुटकी, निसंग, लालसाई काळा रंग,
तांदळाचा भात जेवूनी संग, अंधन म्या मांडग्यासी ठेवले ।

किसना रे, दूध वाढले भाताले ॥
हंडे गंगाळ पानी सारून, रक्त जातीचं चंदन,
तेल किकसाये[1] मर्दून मायापिरतीचं ईसन,
उठ रे हरी ।
किसनारे, सोळा सहस्रा तुमच्या नारी ।
लहानपनच्या टोकरवाळ्या, दंडी दंडवाळ्या,
अन् शिरीचा मुगुट जरतारी ।
किसना रे, करदोळा पायी घागरी ।
हरी रे, तुझे वाघे नानापरी ।
भातोभातीचे वस्तरं, मुंगुट धोतर, शालेदुशाले
आंगावर, आनिक रुमाल बुट्टेदारी ।
उठ हरी, किसना रे, सोळा सहस्र तुमच्या नारी ।
हाती काठी मोर वासडी, नऊ लाख गाई गोंधनगव्हारी,[2]

१ उटणे. २ खिल्लार.

यमुनेतिरी गाई चारी ।
मंग कोनाची बिठली, चिठली, कोनाची धारी,
कोनाची पुरी, करुन कुस्कारी ।
किसना रे, अशी मजा पुसा बापा तुले





# मौंजीबंधन

# अनुक्रम

उपनयन

*संग्राहक :* सरदार आबासाहेब मुजुमदार

श्रीमती नलिनी रसाळ

सौ. निर्मला धारप

सौ. सुलोचना फडके



# उपनयन

जुन्या काळच्या युगामध्ये लहान मुलगा थोडा जाणता झाला म्हणजे त्याला गुरुगृही अभ्यास करण्यासाठी म्हणून पाठविण्यात येत असे. अभ्यास करण्यासारखे योग्य वय प्राप्त झाले म्हणजे जवळपासच्या आश्रमातून राहाणाऱ्या गुरुविषयी विचारपूस केली जात असे. विद्वान, सदाचारी व ज्ञानसंपन्न अशा गुरूजवळ स्वतःला त्यांच्या शिष्यवर्गात सामील करून घेण्याबद्दल स्वतः विद्यार्थीच विनंती करीत असे. त्यावेळी एक लहानसा धार्मिक विधि त्या विद्यार्थ्याच्या घरी उरकण्यात येई. यज्ञयागादि करून हा विधी उरकल्यानंतर ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी म्हणून उपवीत चढविले जात असे. या विधीसच मौंजीबंधन अगर मुंज म्हटले जाई.

त्यावेळीच वेदाध्ययनाचा प्रारंभ म्हणून गायत्री मंत्राचा उपदेश केला जाई. तसेच या विधीमुळे द्विजित्व प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यास सन्मानाने गुरुगृही पाठविण्यात येई.

इथं द्विजत्व म्हणजे दोनदा जन्म घेतलेला असा अर्थ घ्यावयाचा.

म्हणजेच मातापित्यांच्यापासून मिळालेला असा एक जन्म आणि गायत्री मंत्र व आचार्य यांच्यामुळे मिळालेला दुसरा जन्म होय.

आपल्या पुढील अध्ययनासाठी गुरूकडे जाणे यालाच 'उपनयन' संस्कार असे म्हणतात. जुन्या काळी हा विधी मुलांप्रमाणे मुलींच्या बाबतीतही पार पडला जाई.

::१::

## संग्राहक : सरदार आबासाहेब मुजुमदार

श्रीगणेशाय नमः हरि हरि ऐसे जन हो म्हणा
सत्या पाप जाईल जाणा कृष्ण द्वारकेचा राणा
त्यासी मौंजी बंधन ॥१॥

नंद यशोदा दोघेजण पाहती कृष्णाचे लक्षण
पिता देखुनी म्हणे जाण मौंजीबंधन करी ॥२॥

सात वरुषांचा मुरारी त्याशी करा ब्रह्मचारी
शीघ्र बोलवा आचारी जोशी मुहूर्त सांगती ॥३॥

तव ते पाचारिले जोशी नंद पुसतो तयासी
मुहूर्त सांगावा आम्हाशी चंद्रबळ गोमटे ॥४॥

पाटी घालुनि वर्तविले उत्तम लग्न जे पाहिले
लग्न उत्तम जे रिघाले चंद्रबळ गोमटे ॥५॥

नंद मनी संतोषले थोर सोहळा पै आले
दारी मंडप घातीयले कोड कौतुकासी ॥६॥

आमंत्रण नगरी वट्ट आले विद्यावंत भट्ट
विडे वाटिती चौफट गंधाक्षता करिती ॥७॥

आले शेट साहूकार घेऊनि उत्तम आहेर
गवळी मिळून थोर आहेर उत्तम करिती ॥८॥

नंदनवन सारीची प्रीती सरशा नारी गीत गाती
तव तो मुंजीया श्रीपती खेळविती गवळणी

नंदे बोलविला साला त्यासी वैसू घातला शेला
तव त्या चतुर बाळाला खेळविती गोपाळ ॥९॥

गोकुळी मांडीला सोहळा वाजती मृदंग पै कीळा
आणिक वाजंत्रींचा मेळा झडे मृदंग टाळ ॥१०॥

दहीभात कालविती कृष्णामुखी कवळ देती
त्यांच्या पुण्या नाही नीती जे कृष्णासंगे जेविती ॥११॥

ब्राह्मणे समिधा पाठविले वेळ कामे घेउनी आले
घरात स्थंडील घातले होम मांडीला निका ॥१२॥

चरुघृताच्या आहुती वरव्या समिधा अर्पिती
ही तव झाली पूर्णाहुती शांती करिती अभिषेक ॥१३॥

कृष्णे पसरिला हात आहुती खाया मागत
स्वच्छ वदन प्रकाशीत मुखी अग्नी दिसताहे ॥१४॥

काहूगाईचा गोवळा साप वोगळा घालितो
हा तो उंडीचा भुकेला उभ्या अन्न भक्षितो ॥१५॥

वेई करगोटा कासोटीशी ब्रह्मचारी तू वा होशी
तीर्थाटन करिशी संध्याकारणा लागी ॥१६॥

आंगीकारोनी श्रीहरी संध्यामंत्र तो उच्चारी
पाटी बैसले आचारी तयापुढे बोलतो ॥१७॥

बोलवा हो यशोदा काही सांगेल मुकुंदा
रुष का धरिशी गोविंदा अघटित पवाडे तुझे ॥१८॥

हाती घेऊनिया थाळा मातेपुढे उभा बाळा
ब्रम्हचारी यांचा खेळा भिक्षा मागतो कैसा ॥१९॥

म्हणा रे गोविंद गोविंद मना लागो हाचि छंद
जगी भरला आनंद तिन्ही योग्यानं सोडी ॥२०॥
कृष्णदेवाचे मौंजीबंधन आनंदले त्रिभुवन
जन करिती चिंतन पापाचे होई क्षालन ॥२१॥

२

संग्राहिका : **श्रीमती नलिनी रसाळ**

तुपाचे शेजारी साखरेची गोणी
राजसाने काढिले लग्न मुंज दोनी

लगनापरीस मुंजीचा यज्ञ भारी
राजस हा माजा प्रल्हाद मांडीवरी

मुंजीचं लगीन बापलेकाशी लागतं
राजसाला माज्या चंद्रबळ हे लाभतं

ब्राह्मण म्हणती मुंजा बाहेरे येऊ द्या
राजसाला माज्या मातृभोजनी जेऊद्या

मुंजीयेच्या वेळी मुंजा कापे थरथरा
राजसाचा मामा येऊद्या धीर धरा

लग्न नाही मुंज दारी तोरण कशाचं
राजसाचं माज्या फळशोभन सख्याचं

पहिली भिकाळ माता घाली बत्ताशाची
राजसा तू माज्या मुंजाबाळा भुकेलाशी

हौस मला मोठी सोन्याचं जानवं
राजसाच्या माझ्या मामानं आणावं

मांडव घातीयेला फुलासकट जाईचा
गोऱ्या मालनीचा छंद मुंजाच्या आईचा

मांडवाच्या दारी तुपवाला कोण झाला
बाळ राजस माझा मुद्या गोवी जानव्याला

सोनाराच्या इथं कशाची ठोकाठोकी
बाळ राजसाची मुंजाची तातवाटी

२

संग्राहिका : **सौ. निर्मला धारप**

पाच वरुषाचा मुंजा उभा केला
गायंत्रीमंत्र दिला बाळराजा तुला

पाच वरुषाचा मुंजा तो ल्हान
संध्या शिकवितो ब्राह्मण महान

मुंजीचे मुहूर्त दशमी एकादशी
आता बाळराजा चंद्रबळ तुझ्या राशी

मुंजीचे मुहूर्त दशमी एकादशी
माझ्या मुंजाबाळा आता तू भुकेलाशी

दारवंटा उभी पिवळे तिचे पाय
तीच तुझी माय मुंजाबाळा

पहिली भिक्षावळ आई घाली वत्ताशाची
आता भुकेलाशी मुंजावाळा

पहिली भिक्षावळ आई घाली सोनं
नवसाचं आहे माझं बाळ तान्हं

हौस मला मोठी सोन्याच्या जानव्याची
मुंज आहे तुझ्या तान्हीयाची

सोनाराच्या आळी कशाचा भडीमार
बाळायाचा माझ्या घडविते चंद्रहार

मुंजीयेच्या येळी मुंजा कापी दंडभुजा
बाळायाच्या माझ्या पाठीशी मामा उभा

मुंजीयेच्या येळी का रे बामना तुजी घाई
माझ्या बाळायाचा मामा अजून आला न्हाई

४

संग्राहिका : सौ. सुलोचना फडके

प्रभुकृपे सुदिन हा आला
व्रतबंधन हे आजि बाळा

चौघडा वाजतो दारी
तुज स्नान घालीती नारी
काजळ कुंकू तव या गाला । व्रतबंधन....

भोजना सिद्धता केली
घातिली पाट रांगोळी
जमविले आप्तइष्टांला । व्रतबंधन....

बैस तू भोजना आता
मुखी घास घालिते माता
आनंद होत या काला । व्रतबंधन....

केशरी भात जिलबिला
मोतिचूर झुलवित आला
करी सेवन पक्वान्नाला । व्रतबंधन....

ॐ भवती भिक्षां देही
गायत्री मंत्र हा गाई
गुरुमुखे करी श्रवणाला । व्रतबंधन....

तुजवरी कृपेची छाया
राहो ही सदा प्रभुराया
विनवी माता जगताला । व्रतबंधन....

# भोंडला



# अनुक्रम

हस्त हा दिनीयाचा राजा—

*संग्राहक*

सौ. कुमुदिनी पवार

सौ. शरदिनी मोहिते

डॉ. सरोजिनी बाबर


सौ. शकुंतला पवार

कु. विद्या देसाई

सौ. नलिनीबाई शिंदे

सौ. मंगला नावडीकर

# हस्त हा दिनीयाचा राजा—




आपल्या मुसळधारीने जगाचे लक्ष वेधीत येणारा हस्ताचा पाऊस मोठा मानापानाचा. आश्विन मासाच्या वैभवाचा. तर ह्या वेळच्या वाजत गाजत दर्शन देणाऱ्या या पावसाची न् त्या वेळच्या हस्त नक्षत्राची पूजा घरोघरी मराठी मुलाखत बांधली जाते. त्या पूजेच्या मानकरी असतात त्या त्या घरच्या परकरी पोरीबाळी. ह्या पूजेसाठी समोरासमोर उभ्या असलेल्या हत्तींचे चित्र काढण्यांत येते. ह्या हत्तींचे सोंडेत फूलमाळ असते. भिंतीवर टांगलेला हा देखावा रंगीत खडूने अगर रंगाने काढण्यात येतो आणि अंगणातील हत्तींच्या चित्रासाठी पाटाची बैठक घेऊन त्यासाठी वापरली जाते रांगोळी. पूजेसाठी मग येतात झेंडू मखलींची, कोरांटी कारियाळांची असली त्यावेळची फुले. आणिक हत्तींच्या गळ्यात माळ घातली जाते ते वांगे, दोडका, घोसाळी, भेंडी, पडवळ, सीताफळ, कारलं, मिरची, काकडी इत्यादि फळांची.

रोज सायंकाळी ही पूजा मुलीबाळी अनेक प्रकारची गीते गाऊन व फेर

धरीत नाचून बांधतात. ह्या गीतांचे विषय असतात प्रामुख्याने बाळपणी जुन्या काळी उपभोगलेल्या सासरमाहेरच्या सुखदुःखांचे. पण ते गीत संपले की, विसरता यावेत म्हणून त्यावेळी मोठी कौशल्यपूर्ण योजना केलेली असते ती रोज नव्याने तयार होणाऱ्या खिरापतींची. खिरापत कुणाला ओळखता आली नसली पाहिजे या ईर्षेने त्या त्या घरची सुग्रीण ती तयार करीत असते. मोठ्या अक्कलहुषारीचे हे काम. पण ते विनचूक पार पाडले जाते. मोठ्या हौसेने ते हातीही घेतले जाते. त्यामुळे ओळीने सोळा दिवस खेळला जाणारा हा भोंडला मोठ्या उमदीने व बहारीने सर्वत्र पार पडला जातो. त्यासाठी वडील-धाऱ्यांचे कौतुकही अमाप खर्ची पडत असते.

हस्तनक्षत्राच्या पूजेसाठी जी गीते रोज नित्य नियमाने आळविली जातात आणि चढत्या दिवसाच्या संख्येने जी म्हटली जातात त्यांची स्वररचना अपूर्वाईची असते. वर्णन केलेला गीतातील प्रसंग साईनसंगीत नजरेसमोर यावा अशा सुंदर चाली घेऊन ही गीते येतात. त्या कारणाने या दिवसातील घरोघरीचे अंगण मोठ्या नवलाईने शिणगारिले जाते. हस्ताचा पाऊस म्हणजे वर्षभराचे पिण्याचे पाणी उभे करणारा पाऊस. यावेळच्या मुसळधारीमुळे मानवी जीवनात नवचैतन्य उभारले जाते. म्हणून या चैतन्यमयी जीवनाच्या स्वागताचीच जणू ही पूजा होय.



:::: १ ::::

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

१

सोन्याची सुपली मोत्यांनी गुफली
तिथं आमच्या वन्सं खेळत होत्या
वन्सं वन्सं मला आलं मूळ
गुणांचे गौरी मला काय पुसतीस
पुस जा आपल्या दिराला

सोन्याचा चेंडू बाई मोत्याचा दांडू
तिथं आमचे भाऊजी खेळत होते
भाऊजी भाऊजी मला आलं मूळ
गुणाचे गौरी मला काय पुसतीस
पुसजा आपल्या जावेला

सोन्याची रवी बाई रुप्याचा डेरा
तिथं आमच्या जाऊबाई ताक करित होत्या
जाऊबाई जाऊबाई मला आलं मूळ
गणाचे गौरी मला काय पुसतीस
पुसजा आपल्या सासऱ्याला

सोन्याची सहाण बाई रुप्याचं खोड
तिथं आमचे मामंजी पूजा करीत होते
मामंजी मामंजी मला आलं मूळ
गुणाचे गौरी बरीच दिसतीस
पुसजा आपल्या सासूला

सोन्याचा करंड वाई रुप्याचा आरसा
तिथं आमच्या सासूबाई कुंकू लावीत होत्या
सासूबाई सासूबाई मला आलं मूळ
गुणाचे गौरी बरीच दिसतीस
पुसजा आपल्या नवऱ्याला

रुप्याचा पलंग वाई रेशमाची गादी
तिथं आमचे पति बाई निजले होते
पतिराज पतिराज मला आलं मूळ
आणा फणी घाला वेणी
जाऊंद्या राणी माहेरा

२

सासरच्या वाटं कुचकुच काटं
कोण पाहुणा आला ग वाई....हूँ...हूँ
सासरा पाहुणा आला ग बाई...हूँ...हूँ
सासऱ्यानं काय आणलं ग बाई....हूँ....हूँ
सासऱ्यानं पाटल्या आणल्या ग बाई...हूँ...हूँ
पाटल्या मी लेत न्हाई संगं मी येत न्हाई
चारी दरवाज़े लावा ग बाई....हूँ....हूँ
झिप्रं कुत्रं सो सोडा ग बाई...हूँ...हूँ
सासरच्या वाटं कुचकुच काटं
कोण पाहणा आला ग वाई...हूँ...हूँ
पती पाहुणा आला ग बाई....हूँ....हूँ
पतीनं काय आणलं ग बाई....हूँ....हूँ
पतीनं चाबुक आणला ग बाई....हूँ....हूँ
चाबुक मी लेते संगं मी येते

चारी दरवाजे उघडा ग बाई...हूँ....हूँ
झिप्रं कुत्रं आवरा ग बाई....हूँ....हूँ

३

एक लिंबू झेलू बाई दोन लिंबू झेलू
तीन लिंबू झेलू बाई चार लिंबू झेलू
चार लिंबू झेलू बाई पाच लिंबू झेलू
पाचा लिंबाचा पानोळा
माळ घालिती हनुमंता
हनुमंताची निळी घोडी
येता जाता कमळं तोडी
कमळाच्या पाठीमागं लपली राणी
अग अग राणी इथं कुठं पाणी
पाणी नव्हे यमुना जमुना
यमुना जमुनाची बारीक वाळू
तिथे खेळे चिलार बाळू
चिलार बाळाला लागली भूक
सोन्याच्या शिंपीनं पाजलं दूध
पाटाच्या घडीवर निजीवलं
निज रे निज रे चिलार बाळा
मी तर जाते सोनारवाड्या
सोनारदादा सोनारदादा
गौरीचे मोती झाले का नाही
गौरीच्या घरी तांब्याच्या चुली
भोजन झालं आवळीखाली
उष्ट्या पत्रावळी चिंचेखाली
शेणगोळा आंब्याखाली
पानसुपारी उद्या दुपारी

४

अक्कण माती चिक्कण माती
अश्शी माती सुरेख बाई ओटा तो करावा
अस्सा ओटा सुरेख बाई जातं ते रोवावं
अस्सं जातं सुरेख बाई शोजी ती काढावी
अश्शी शोजी सुरेख बाई करंज्या कराव्या
अश्या करंज्या सुरेख बाई दुरड्या भराव्या
अश्शा दुरड्या सुरेख बाई शेल्यानं झाकाव्या
अस्सा शेला सुरेख बाई पालखी ठेवावी
अश्शी पालखी सुरेख बाई माहेरी धाडावी
अस्सं माहेर सुरेख बाई खेळाया धाडीतं
अस्सं सासर द्वाड बाई कोंडूनी मारीतं

५

एवढंसं घरकुल बाई सारवूनी काढावं
उखळ त्यावरी रोवावं बाई जातं जी मांडावं
अस्सं उखळ गोड बाई खपल्या कांडाव्या
अश्शा खपल्या गोड बाई गहू ते वलवावे
अस्सं गहू गोड बाई जाती ते टाकावं
अस्सं जातं गोड बाई शोजी ती काढावी
अश्शी शोजी गोड बाई गव्हले वळावे
अश्शे गव्हले गोड बाई दुरडी भरावे
अश्शी दुरडी गोड बाई माहेरी धाडावी
अस्सं माहेर गोड बाई खेळाया धाडीतं
अस्सा खेळ गोड बाई आजोळी नेई तो
अस्सं आजोळ गोड बाई खायाला देई ते
अस्सं सासर द्वाड बाई कोंडूनी मारीतं

६

हरीच्या नैवेद्याला केली
जिलेबी बिघडली

त्यातली एवढीशी उरली मळी
त्याची केली बुंदीकळी
तुपात तळली साखरेत घोळली
जिलेबी बिघडली

त्यातला एवढासा उरला पाक
त्याचा केला साखरभात
तुपात तळला साखरेत घोळला
जिलेबी बिघडली

त्यातलं एवढंसं उरलं पीठ
त्याचं केलं थालीपीठ
तुपात तळलं साखरेत घोळलं
जिलेबी बिघडली

७

कोथिंबीरी बाई ग आता कधी येशिल ग
आता येईन चैत्रमासी
चैत्रा चैत्रा लौकर ये
हस्त घालिन हस्तारा देव बसवीन देव्हारा
देव्हाऱ्याच्या चौकटी उठता बसता लाथाबुक्की
घे काठी लाग पाठी
घेत नाही काठी लागत नाही पाठी
घरादाराची लक्ष्मी मोठी

॥२॥

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

१

सासूरवाशी सुन रूसून बसली कैशी
यादवराया राणी रुसून बसली कैशी
सासू गेली समजावयाला
चला चला सूनबाई आपल्या घराला
अर्ध राज्य देते तुम्हाला
अर्ध राज्य नक्को मला
मी नाही यायची तुमच्या घराला
सासुरवाशी सुन रूसूनी बसली कैशी
यादवराया राणी रुसूनी बसली कैशी

सासरा गेला समजावयाला
चला चला सुनबाई आपल्या घराला
साखळ्याचा जोड देतो तुम्हाला
साखळ्याचा जोड नक्को मला
मी नाही यायची तुमच्या घराला
सासुरवाशी सुन रुसून बसली कैशी
यादवराया राणी रुसून बसली कैशी

दीर गेला समजावयाला
चला चला वहिनी आपल्या घराला
विटी दांडू देतो खेळायाला
विटी दांडू तुमचा नक्को मला

मी नाही यायची तुमच्या घराला
सासुरवाशी सुन रुसून बसली कैशी
यादवराया राणी रुसून बसली कैशी

नणंद भावजया दोघीजणी
खेळत बसल्या अंगणी
भावजईवरी डाव आला
रुसून बसली गाईच्या गोठ्यात
सासुरवाशी सुन रुसून बसली कैशी
यादवराया राणी रुसून बसली कैशी

नणंद गेली समजावयाशी
उठा उठा वैनी चला घराशी
सोन्याची सुपली देते तुम्हाशी
सोन्याची सुपली नको मला
मी नाही यायची तुमच्या घराला
सासुरवाशी सुन रुसून बसली कैशी
यादवराया राणी रुसून बसली कैशी

नवरा गेला समजावयाशी
उठ उठ राणी चल ग घराशी
लाल लाल चाबुक देतो तुजशी
उठली ग बाई गजबजून
पदर घेतला सावरून
सासुरवाशी सुन रुसून बसली कैशी
यादवराया राणी घराशी आली कैशी

२

आला चेंडू गेला चेंडू
राया चेंडू झुगारिला

आपण चाले हत्ती घोडे
राम चाले पायीं
राम ग वेचितो कळ्या
सीता ग गुंफिते माळा
आल्या ग लगीन वेळा
आकाशी घातिला मंडप
जरतारी घातीलं बोहलं
जरम्‌जरती बसले पती
पतीन पती तिरूवाई राळा
तिरुबाई राळा मुंजाबाळा
मुंजाबाळाची मुंजक दोरी
तीच दोरी सावध मारी
सावधा सावधा सर्वतकाळ
सर्वतकाळचा दोर
आणा दोर बांधा चोर
बांधा चोर वाई झाडाशी
झाड झटकं फूल टपकं
ते बाई फूल मी तोडीलं
वाहिणी माथा खोवीलं
वाहिणा तुझी वेणी ग
सोनीयाची फणी ग
वाहिणा तुझा खोपा ग
उंदीर घेतो झोपा ग

३

आमच्या परसात भेंडीचं झाड
लवलव डहाळ्या हालतिल ग

अंबरमामा बाई येतील ग
फुल फुल साड्या बाई आणतिल ग
फुल फुल साड्या बाई नेसू ग
लांब लांब पदर काढू ग
लांब लांब पदर जरतारी
आमचे मामा व्यापारी
तोंडात चिकणी सुपारी
सुपारी गेली फुटून
मामा आले उठून

४

माझी वेणी मोकळी
सोनीयाची साखळी
साखळी देऊ देवाला
देवा दे मला अंगारा
अंगारा देऊ आईला
आई दे मला साडी
साडीच्या पदरी रुपाया
भाऊ माझा शिपाया

३

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

१

ऐलमा पैलमा गणेश देवा
माझा खेळ मांडून दे करीन तुझी सेवा

माझा खेळ मांडीला वेशीच्या दारी
पारवं घुमतं बुरुजावरी
पारवणी बाळाचे गुंजावाणी डोळे
गुंजावाणी डोळ्याच्या गुंफिल्या टिक्का
आमच्या गावच्या भुलोजी नायका
येशील काय देशील काय
कांडा तीळ बाई तांदूळ कांडा
आमच्या आया तुमच्या आया
खातील काय दुधोंडे
दुधोंड्याची लागली टाळी
आऊक्ष दे रे बा माळी
माळी गेला शेता भाता
पाऊस पडला येता जाता
पड पड पावसा थेंब्रोथेंब्री
थेंब्रोथेंब्री आळव्या लोंब्री
आळव्या लोंबती अंकणा
अंकणा तुझी सात कणसं
भोंडल्या तुझी सोळा वरसं

२

वाजे चौघडा रुणझुण आला ग हादगा पाहुणा
दारी तुळस दऊणा
जाई जुई शेवंती दुपारी फुले ग नानापरी
हार गुंफीते कुसरी वहाते मी हादग्या परी
हादगा देव मी पूजीते
लवंगा सुपाऱ्या वेलदोडे करून ठेविले विडे

आणखीन् दुधातले दूधपेढे  वहाते मी हादग्यापुढे
हादगा देव मी पूजीते

३

अरडी बाई परडी ग
परडी एवढं काय ग
परडी एवढं फूल ग
दारी मूळ कोण ग
दारी मूळ नणंद ग
नणंदेनं काय आणलंन् ग
नणंदेनं पाटल्या आणल्या ग
पाटल्या मी लेत नाही
संगं मी येत नाही
चारी दरवाजे लावा ग बाई
झिप्रं कुत्रं सोडा ग बाई

४

येवढं येवढंसं पाखरू माझं
लाल लाल ग त्याची चोच
गुंजावाणी ग त्याचे डोळे
सप्तपाताळी बाळ खेळे की पाखरू माझं

कोण्या बाजाराशी ग गेलं
कोण्या नारीनं खुणावलं की पाखरू माझं

दह्या दुधानी भरल्या वाट्या
वर साखर रायपुरी
माझा जेवणार नानापरी की पाखरू माझं

दुधा तुपानी भरल्या वाट्या
वर साखर रायपिठी
माझा जेवणार जगजेठी की पाखरू माझं

लोण्या ताकानी भरल्या वाट्या
वर साखर चवीयीला
आला गोविंद जेवायला की पाखरू माझं

हस्तीदंती ग आणा फणी
जावळ विंचरुनी घाला वेणी
लिंब कढवूनी घाला पाणी की पाखरू माझं

सोनीयाचा ग पाळयीणा
मोतीयाची ग लावली दोरी
पुढं हालवीते राधा नारी की पाखरू माझं

५

पानपुडा की शंकरचुडा की शंकरचूडा
मामा माझा की लेकुरवाळा की लेकुरवाळा
त्याच्या घरी की दुभतं काही की दुभतं काही
मामा पाहुणा आला बाई की आला बाई
त्याला जेवाया काय काय करू की काय काय करू

त्याला जेवाया साखरउंडे की साखरउंडे
मामा सांगे की मामी भांडे की मामी भांडे
त्यानं आणली की तेलंग साडी की तेलंग साडी
नेसून गेले मी बुरजावरी की बुरजावरी

तिथं हरपली इरुद्या जोडवी की इरुद्या जोडवी
सासूबाईंना कळू गेलं की कळू गेलं

चार चार चाबूक चमकाविलं की चमकावीलं
ते बाई चाबूक दूरच्या दुरी की दूरच्या दूरी

माझं माहेर पंढरपुरी की पंढरपूरी
माझं आजोळ रत्नांगिरी की रत्नांगिरी
रत्नांगिरीच्या बांगड्या साध्या की बांगड्या साध्या
येता जाताना खुळखुळ वाजे की खुळखुळ वाजे

६

हातुका मतुका चरणी चतुका
चरणीच्या सोंडेवरी
बाळ खुळखुळ गोंडेवरी
एकेक गोंडा विसाविसाचा
नागरसाड्या नेसायचा
नेसा ग नेसा मावल्यांनो
सात घरच्या पाव्हण्यांनो
पाव्हण्या गेल्या खोली
सीतानं टाकली डोली
चिटक्या मिटक्या करंडफूल
ते बाई फूल मी तोडीलं
हातग्या देवा वाहीलं
हातग्या तुझा तुरारा
मोतीयाचा भुरारा
भैनी तुमचा चांद वो
मोतीयाचा भांग वो
चांदासरशी निळ्ळी घोडी
येता जाता कमळं तोडी

७

खाईल्या पट्टीत वईल्या पट्टीत
पेरला राळा बाई पेरला राळा
कोण्या देशीचा काऊ आला बाई काऊ आला

एक लोंबट खोडून नेलं बाई खोडून नेलं
सईच्या अंगणी झोकून दिलं बाई झोकून दिलं

चोळून मोळून राळं केलं बाई राळं केलं
सईनं उचलून घरात नेलं बाई घरात नेलं

कांडून कुटून तांदुळ केलं बाई तांदुळ केलं
म्होरच्या बाजारी विकाय नेलं बाई विकाय नेलं

त्या बाई तांदळाचा खुरदा आला बाई खुरदा आला
त्या बाई खुरद्याची बांगडी केली बाई बांगडी केली

सासूबाईनं ठोसला दिला बाई ठोसला दिला
तो बाई ठोसला दूरच्या दूर बाई दूरच्या दूर

माझे माहेर पंढरपूर बाई पंढरपूर
माझं आजूळ रत्नांगिरी बाई रत्नांगिरी

माझ्या हातात कोईमतुरी चुडा बाई चुडा
मला बसाय निळ्ळा घोडा बाई निळ्ळा घोडा

कोण्या देशीचे गहू आणले बाई गहू आणले
त्याच्या चपात्या केल्या नऊ बाई केल्या नऊ

त्या बाई चपातिच्या तारा तुटं बाई तारा तूटं
माझ्या झिम्म्याचा धिंगाणा उठं बाई धिंगाणा ऊठं

८

बाईच्या परसात भेंडीचं झाड बाई भेंडीचं झाड
भेंडीचं झाड बाई खारवलं मामाचं घर बाई थोरवलं

मामाच्या घरी येऊन जा तूपरोटी खाऊन जा
घाल ग मामे तुपाची धार तुपाची धार गेली वाऱ्यावनं
भैनी आल्या पालखीतनं बाप आले घोड्यावनं
आई आली चुड्यावनं भाऊजी आले कुत्र्यावनं
कावो भाऊजी रुसला काळा विंचू डसला
काळा विंचू पापी रांजणाच्या काठी
रांजण गेला गडगडी पाऊस आला धडधडी

९

काळी चंद्रकळा नेसू मी कशी
गळ्यात हार बाई वाकू कशी
पायात पैंजण चालू कशी
बाहेर मामाजी बोलू कशी
दमडीचं तेल मी आणू कशी
दमडीचं तेल बाई आणलं
सासूबाईचं न्हाणं झालं
वन्संबाईची वेणी झाली
मामंजीची दाढी झाली
उरलेलं तेल झाकून ठेवलं
लांडोरीचा पाय लागला
येशीपातूर ओघळ गेला
त्यातनं हत्ती वाहून गेला

॥४॥

संग्राहिका : सौ. शकुंतला पवार

श्रीकृष्ण कमलकांता    अस्सं कस्सं झालं
अस्सं कस्सं झालं    माझ्या नशीबी आलं

वेड्याची बायको    करीत होती करंज्या
तिकडून आला वेडा    त्याने डोकावून पाहिले
होडी होडी म्हणून    त्याने पाण्यात सोडली
श्रीकृष्ण कमलकांता    अस्सं कस्सं झालं
अस्सं कस्सं झालं    माझ्या नशीबी आलं

वेड्याची बायको    करीत होती श्रीखंड
तिकडुन आला वेडा    त्याने डोकावून पाहिले
भस्म भस्म म्हणून    त्याने अंगाला फासले
श्रीकृष्ण कमलकांता    अस्सं कस्सं झालं
अस्सं कस्सं झालं    माझ्या नशीबी आलं

वेड्याची बायको    करीत होती जिलब्या
तिकडून आला वेडा    त्याने डोकावून पाहिले
बांगडी बांगडी म्हणून    त्याने हातात घातली
श्रीकृष्ण कमलकांता    अस्सं कस्सं झालं
अस्सं कस्सं झालं    माझ्या नशीबी आलं

वेड्याची बायको    शिवीत होती चोळी
बंडी[1] बंडी म्हणून    त्याने अंगात घातली
श्रीकृष्ण कमलकांता    अस्सं कस्सं झालं
अस्सं कस्सं झालं    माझ्या नशीबी आलं

---

१ सदरा.

| | |
|---|---|
| वेड्याची बायको | दुपारी होती झोपली |
| मेली मेली म्हणून | त्याने जाळून टाकिली |
| श्रीकृष्ण कमलकांता | अस्सं कस्सं झालं |
| अस्सं कस्सं झालं | माझ्या नशीबी आलं |

२

| | |
|---|---|
| काळी चंद्रकळा | मी नेसु कशी |
| गळ्यात हार | घालू कशी |
| दमडीचं तेल | आणू कशी |
| दमडीचं तेल | आणलं |
| सासूबाईंचं | न्हाणं झालं |
| मामंजींची | शेंडी झाली |
| उरलेलं तेल | झाकून ठेवलं |
| तिकडून आली | लांडोरी |
| लांडोरीचा | पाय लागला |
| सारं तेल | सांडून गेलं |
| वेशी बाहेर | ओघळ गेला |
| सासूबाई सासूबाई | अन्याव झाला |
| दूधभात | जेवायला वाढा |
| माझं उष्टं | तुम्हीच काढा |

३

माळ्याची माळ बाई रंगेना
झाडाचं फूल बाई उमलेना
माळ्यानं सांडली भिकबाळी
हुडकून दे रे बा माळी

सर्प म्हणे मी एकुला
दारी आंबा पिकुला
दारी आंब्याची कोय ग
खिरापतीला काय ग

॥५॥

संग्राहिका : कु. विद्या देसाई

१

अहिल्या पहिल्या गणेश देवा
माजा खेळ मांडिला वेशीच्या दारी
पारवा घुमतो बुरुजावरी
पारवाळ पक्ष्याचे गुंज गुंज डोळे
आमचा मारुती शिकार खेळे
खेळत खेळत गेला मळ्याला
फुलाची माळ आनली हत्तीला

२

गंगू रंगू तंगू ग मिळुनी हादगा गाऊ ग
केळी नारळी बकूळ पोकळी वरती लिंबू लावू ग
अननस पपनस कणीस आंबा वरती डाळिंब लावू ग
खिरापती या किती तऱ्हेच्या करंज्या लाडू मोदक ग

३

आड बाई आडवनी आडाचं पाणी खारवनी
आडात होता गणोबा गणोबा देव चांगला

गणोबा आमचा सत्याचा    पाऊस पडला मोत्याचा
आड बाई आडवनी    आडाचं पाणी खारवनी
आडात पडला शिंपला    आमचा भोंडला संपला

४

डेरा ग डेरा मांडीला अवधानी
त्या बाई डेऱ्यात कायसंसं घुमतं
घुसळण घुसळी राधिका गवळण
तिकडून आले कृष्णाजी दातार
कृष्णाजी कृष्णाजी दान द्या
निळ्या घोडीवर बसून जा
निळी घोडी वाळली    सखुबाई सुंदर हासली
सखुबाई तुमच्या अंगणी    सुंदर चाफा लावूनी
ऐसा चाफा फुलला,    चला बाई कळ्या तोडायला
आम्ही कळ्या तोडील्या    आम्ही बाई हार गुंफिले
हारा हारा चाफेळी    रात्र झाली गोकुळी

५

नणंदा भावजया दोघीजणी
घरात नव्हतं तिसरं कोणी
शिंक्यावरचं लोणी खाल्लं कोणी
मी नाही खाल्लं वहिनीनं खाल्लं
आता माझा दादा येईल ग
दादाच्या मांडीव बशीन ग
वैनीच्या चाड्या सांगीन ग
दादा तुझी बायको चोरटी
असू दे माझी चोरटी
घे काठी लाग पाठी
घरादाराची लक्ष्मी मोठी

६

एवढासा तांदूळ बाई नखांनी खुडीला
भारा जी बांधीला बाई येशीभाईर टाकीला
गाय आली हुंगून गेली
म्हैस आली खाऊन गेली
म्हशीला झाला बाई रेडा
गाईला झाला बाई पाडा
तोच रेडा पाडा बाई बापाजीचा वाडा
बाबाजींनी घेतली जांभळी घोडी
जांभळ्या घोडीची नेटकी चाल
जिथं पाऊल पडंल तिथं कोल्हापुरी शाल
कोल्हापुरी शाल बाई उंदरून दिशी
ठसा पडंल बाई चोळी चोळी देशी
ठस्सा मस्सा अंबर घस्सा
अंबरात पडली काडी
तीच काडी उप्पर माडी
उप्पर माडीवर कमळाचं तळं
त्या बाई तळ्यात परटीन धुती
विठूच्या टोपीला निळा रंग देती
विठूची टोपी बाई रंगाची
रखमाईची चोळी बाई भिंगाची

७

हस्त हा दुनियेचा राजा
तयासी नमस्कार माझा

नमस्कारासरशी वारा
आधी पडल्या मेघधारा
मागून पडल्या मुसळधारा

(चाल वेगळी)

धारा या दुधाच्या दिसती
त्याने ग पिके ही पोसती

(चाल वेगळी)

हस्ताची मग पाळी आली    म्हणून त्याने गंमत केली
त्याच्या योगे चिखल झाला    त्या चिखलामधी केळ लावली
एकेक केळ मोठे आले    हादग्या देवा मी वाहीले
खिरापतीला ते वाढीले
हादगा गांधारी पूजिते    सखयांना बोलावीते
हादगा देव मी पूजिते

८

एक लिंबू झेलू बाई    दोन लिंबू झेलू
बारा लिंबाची सेवा करू    हनुमंताला माळ घालू
हनुमंताची निळी घोडी    येता जाता कमळ तोडी
अगं अगं राणी    इथं कुठं पाणी
वरच्या डोंगरीचं आणा पाणी
आमच्या गावचा नवलक्र माळी    त्यानं लावली करवंदजाळी
करवंदजाळीचं पाटूळं
पाटूळं सोगा जी लोळू द्या    आडवा गोपा जी खेळू द्या
आमचा भोंडला घुमूद्या

६

संग्राहिका : सौ. नलिनीबाई शिंदे

१

सासरच्या वाटं    कुचकुच काटं
कोण पावणा    आला ग सई....हूं....हूं
सासरा पावणा    आला ग सई....हूं....हूं
काय घेऊन    आला ग सई....हूं....हूं
गाडी घेऊन    आला ग सई....हूं....हूं
गाडीची बैलं खरताडी
वर बसला कैकाडी
त्याच्या गाडीत    मी बसायची न्हाई
त्याच्यासंगं    मी जायाची न्हाई....हूं....हूं

२

दिराच्या वाटं    कुचकुच वाटं
कोण पावणा    आला ग सई....हूं....हूं
दीर पावणा    आला ग सई....हूं....हूं
काय घेऊन    आला ग सई....हूं....हूं
तोडे घेऊन    आला ग सई....हूं....हूं
त्याचे तोडे मोडके
त्याचे गळ्यात मडके
त्याचे तोडे    मी लियाची न्हाई
त्याच्यामागं    मी जायाची न्हाई....हूं....हूं

३

सासूच्या वाटं    कुच कुच काटं
कोण पावणी    आली ग सई....हूं....हूं

सासू पावणी आली ग सई....हूं....हूं
काय घेऊन आली ग सई....हूं....हूं
पाटल्या घेऊन आली ग सई....हूं....हूं
तिच्या पाटल्या सडक्या
जशा भिंगाच्या खिडक्या
तिच्या पाटल्या मी लियाची न्हाई
तिच्या मागं मी जायाची न्हाई....हूं....हूं

४

नवऱ्याच्या वाटं कुच कुच काटं
कोण पावणा आला ग सई....हूं....हूं
नवरा पावणा आला ग सई....हूं....हूं
काय घेऊन आला ग सई....हूं....हूं
घोडं घेऊन आला ग सई....हूं....हूं
त्याच्या घोड्याव मी बसणार
माझ्या पुढनं ते चालणार
त्यांच्या मागं मी जाईन सई....हूं....हूं
गुज गुज गोष्टी मी बोलीन सई....हूं....हूं

:::७:::

संग्राहिका : सौ. मंगला नावडीकर

१

सोन्याचा करंडा बाई मोत्याचं झाकण
तिथं आमच्या सासूबाई कुंकू लावत होत्या

सासूबाई सासूबाई मला आलं मूळ
मला काय पुसतीस वरीच दिसतीस
पुस जा आपल्या सासऱ्याला

सोन्याची दौत बाई मोत्याची लेखनी
तिथं आमचे मामंजी पत्र लिहित होते
मामंजी मामंजी मला आलं मूळ
मला काय पुसतीस वरीच दिसतीस
पुस जा आपल्या दिराला

सोन्याचा दांडू बाई मोत्याची विटी
तिथं आमचे भाऊजी खेळत होते
भाऊजी भाऊजी मला आलं मूळ
मला काय पुसतीस वरीच दिसतीस
पुस जा आपल्या जावेला

सोन्याचा डेरा बाई मोत्याची रवी
तिथं आमच्या जाऊबाई ताक करीत होत्या
जाऊबाई जाऊबाई मला आलं मूळ
मला काय पुसतीस वरीच दिसतीस
पुस जा आपल्या ननंदेला

सोन्याची सुपली बाई मोत्यांनी गुंफली
तिथं आमच्या वन्स पाखडीत होत्या
वन्सं वन्सं मला आलं मूळ
मला काय पुसतीस वरीच दिसतीस
पुस जा आपल्या पतीला

सोन्याचा पलंग बाई मोत्याचे खूर
तिथं आमचे पतिराज झोपले होते

पतिराज पतिराज मला आलं मूळ
आणा फणी घाला वेणी जाऊ द्या राणी
माहेरा माहेरा
आणली फणी घातली वेणी
गेली राणी माहेरा माहेरा

२

अरडी बाई परडी ग परडीएवढं कोण ग
परडीएवढं मूळ ग दारी मूळ कोण ग
दारी मूळ सासरा सासऱ्याने काय आणले ग
सासऱ्याने आणले गोठ ग गोठ मी घेत नाही
सांगा मी येत नाही चारी दरवाजे लावा ग बाई
लावा ग बाई
झिपऱ्या कुत्र्याला सोडा ग बाई
सोडा ग बाई

अरडी बाई परडी ग परडीएवढं कोण ग
परडीएवढं मूळ ग दारी मूळ कोण ग
दारी मूळ सासू सासूने काय आणले ग
सासूने आणली नथ ग नथ मी घेत नाही
सांगा मी येत नाही चारी दरवाजे लावा ग बाई
लावा ग बाई
झिपऱ्या कुत्र्याला सोडा ग बाई
सोडा ग बाई

अरडी बाई परडी ग परडीएवढं कोण ग
परडीएवढं मूळ ग दारी मूळ कोण ग
दारी मूळ नणंद ग नणंदने काय आणले ग
नणंदने आणल्या बांगड्या बांगड्या मी घेत नाही

सांगा मी येत नाही झिपऱ्या कुत्र्याला सोडा ग बाई
सोडा ग बाई
अरडी बाई परडी ग परडीएवढं कोण ग
परडीएवढं मूळ ग दारी मूळ कोण ग
दारी मूळ दीर ग दिराने काय आणले ग
दिराने आणल्या पाटल्या पाटल्या मी घेत नाही ग
सांगा मी येत नाही चारी दरवाजे लावा ग बाई
लावा ग बाई
झिपऱ्या कुत्र्याला सोडा ग बाई
सोडा ग बाई

अरडी बाई परडी ग परडीएवढं कोण ग
परडीएवढं मूळ ग दारी मूळ कोण ग
दारी मूळ जाऊ ग जावेनी काय आणले ग
जावेनी आणल्या कुड्या ग कुड्या मी घेत नाही
सांगा मी येत नाही चारी दरवाजे लावा ग बाई
लावा ग बाई
झिपऱ्या कुत्र्याला सोडा ग बाई
सोडा ग बाई

अरडी बाई परडी ग परडीएवढं कोण ग
परडीएवढं मूळ ग दारी मूळ कोण ग
दारी मूळ पति ग पतीने काय आणले ग
पतीने आणले मंगळसूत्र मंगळसूत्र मी घेते ग
सांगा मी येते ग चारी दरवाजे उघडा ग बाई
उघडा ग बाई
झिप्रं कुत्रं बांधा ग बाई बांधा ग बाई

# भुलावाई

## अ नु क्र म

शंकर पार्वती—


*संग्राहक* : डॉ. विमल थोरघडे

: सौ. गंगूबाई बाबर

: श्री. माधव नावडीकर

: डॉ. सरोजिनी बाबर

# शंकर पार्वती –



पश्चिम महाराष्ट्रात जसा भोंडला तसा वऱ्हाड-खानदेशात भुलाबाईचा मान-पान. भाद्र्यातील पौर्णिमेपासून भुलाबाईची पूजा आश्विनी पौर्णिमेपर्यंत चालते हा तिचा विशेष.

शंकराला भोलानाथ–भुलोबा–असे म्हणतात. म्हणून मग भुलाबाई म्हणजे पार्वती हे ओघानेच येते. शंकर पार्वती म्हणजे कैलासाचे देव. दुनियेवरील लोकांचे भलेबुरे पाहाणे हा त्यांच्या मनाचा स्थायिभाव. उण्यापुऱ्यांचे ते मालक. अडल्यानडल्यांचे ते आश्रयदाते. गोरगरिबांचे ते वाली. म्हणून त्यांचे स्मरण करावयाचे. त्यांच्या छत्राखाली वावरावयाची संधी घ्यावयाची ही या खेळामागची भूमिका असावी.

घरातील दिवळीला–कोनाड्याला–चांगली आरास करावयाची, मखर बसवायचे आणि आत भुलोबा व भुलाबाई यांची मातीची चित्रे करून बसवावयाची. त्यांच्या आशीर्वादाने चांगले दिवस यावेत म्हणून प्रार्थना करावयाची. त्यासाठी भोंडल्याप्रमाणेच अनेक प्रकारची गीते म्हणावयाची. रोज खिरापत

वाटावयाची. मात्र शेवटच्या दिवशी—म्हणजे कोजागिरीला—फराळाचे करावयाचे न् हळदीकुंकवाला खूप जणींना बोलवावयाचे हा फरक आहे. शिवाय भुलाबाईचे विसर्जन केले जाते ते आणखी निराळेच.

यावेळी म्हटल्या जाणाऱ्या गीतांचे विषय भोंडल्याच्या गीतांप्रमाणेच पुष्कळसे आहेत. परंतु काही गीतांच्यामधून भुलोबाचे व भुलाबाईचे वर्णनही आलेले आढळते.

भुलाबाईला काही कारणाने बोलावले असता भुलोजी घरात नसल्याची कारणे जेव्हा पुढे येतात आणि 'हळूच भुलाबाई पाय टाका, तोडे तुमचे भारी' असा तिला इषारा दिला जातो तेव्हा मोठी बहार येते. मुलीबाळी अशा गीतांचे वेळी विशेष रंगून जातात.

या गीतांच्यामधून दिसणाऱ्या माहेरच्या वैद्याचे वर्णनही मोठे रुबाबदार आढळते.

*आला ग माहेरचा वैद्य*
*डोक्यात टोपी ग जरतारी*
*अंगात सदरा बुट्टेदारी*
*नेसला धोतर रेशीमधारी*
*हातात काठी ग चंदनाची*
*कसा ग दिसतो राजावाणी*

आणि मग सासरमाहेरची अशी काय तुलना होत राहाते की, त्याबद्दल कुणी न् किती बोलावे याचा उमगच पडू नये.

:::१:::

संग्राहिका : डॉ. विमल चोरघडे

१

आपे दूध तापे त्यावर पिवळी साय
लेकी भुलाबाई तोडे लेवून जाय
कशी लेक दादा घरी नणंदा जावा
करतील माझा हेवा
हेवा परोपरी नणंदा घरोघरी
दुःख देती भारी
नणंदेचा बैलं डुलत येईल
सोन्याचं कारलं झेलत येईल
एका टिपरीव उभे राहू अस्मानीचा गड पाहू
गडावर गड माहूरगड तिथचा सोनार कारागीर
त्यानं आणला साखळजोड
घेता घेता लाजली तळ्यात घागर बुडाली
तळ्या तळ्या ठाकुरा भुलाबाई जाते सासूरा
जाते तशी जाऊ द्या तांब्याभर पाण्यानं न्हाऊ द्या
बोटभर मेण लावू द्या कंपाळाभर कुंकू लेऊ द्या
जांभळे लुगडे नेसू द्या जांभळी चोळी घालू द्या
मुठभर भात खाऊ द्या जांभळ्या घोड्याव बसू द्या
जांभळ्या घोड्याचे उडते पाव आऊल पाऊल नागपूर गाव
नागपूर गावचे ठासेठुसे दुरून भुलाबाईचे सासर दिसे

## २

येवढीशी गंगा झुळू झुळू वाहे
तांब्या पितळी झळकत जाय
तांब्या पितळी नाय ग
हिरवी टोपी घाल ग
हिरवी टोपी हरवली
सर्पाआड लपवली
सरपदादा हेकोडा
जाई आंबा तेकोडा
जाई आंबा पिकला
भुलाबाईला वाहीला
जाई नव्हे जुई नव्हे
चिंचेखालची राणूबाई
चिंचा तोडित जाय ग
नारळ तोडित जाय ग
घोड्यावरचा भुलोजी राणा
पालखीतली राणूबाई
चिंचा तोडित जाय ग
शंभर पानं खाय ग
खाता खाता रंगली
तळ्यात घागर बुडाली

२

संग्राहिका : सौ. गंगूबाई बाबर

१

कारलीचं बी पेर ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा
कारल्याचं बी पेरलं हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

कारल्याला पाणी घाल ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा
कारल्याला पाणी घातलं हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

कारल्याला मोड येऊ दे ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा
कारल्याला मोड आला हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

कारल्याला मांडव घाल ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा
कारल्याला मांडव घातला हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

कारल्याला फूल येऊ दे ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा
कारल्याला फूल आलं हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

कारल्याला कारलं लागू दे ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा

कारल्याला कारलं लागलं हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

कारल्याची भाजी कर ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा

कारल्याची भाजी केली हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

कारल्याची भाजी खा ग सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा

कारल्याची भाजी खाल्ली हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा

भाजीचा गंज घास हो सुनबाई
मग जा आपल्या माहेरा माहेरा

भाजीचा गंज घासला हो सासूबाई
आता तरी धाडाना माहेरा
मला काय पुसतेस पुस जा आपल्या सासऱ्याला

मामाजी मामाजी आता तरी माहेरी धाडाना
मला काय पुसतेस पुसजा आपल्या दिराला

भाऊजी भाऊजी आता तरी माहेरी धाडाना
मला काय पुसतेस पुसजा आपल्या जाऊला

जाऊबाई जाऊबाई आता तरी माहेरी धाडाना
मला काय पुसतेस पुसजा आपल्या नंदेला

वन्सं वन्सं आता मला माहेरी धाडाना
मला काय पुसतेस पुसजा आपल्या नवऱ्याला

पतिराज पतिराज आता मला माहेरी धाडाना
घेतली काठी लावली पाठी
जाऊन वसली नदीच्या काठी

२

पहिली ग भुलाबाई देवा देवा साजे
घातीला मंडोबा[1] खेळे खेळे खंडोबा

खंडोबाच्या नारी बाई वर्षा वर्षा आसनी[2]
आसनीचं पाणी जसं गंगेचं पाणी

गंगेच्या पाण्यानं वेळीला भात
जेविला कंथ राणा भुलाबाईचा

भुलाबाईच्या कंथानं ठोकीला राळा
ठोकिल्या राळ्याचे लांब लांब सोगे

हातपाय गोरे भुलाबाईचे
ठोकिला राळा हनुमंत बाळा

हनुमंत बाळाचे लांब लांब झोके
टिकाऊ दोरे हातपाय गोरे

भाऊ भाऊ खेळती मातापुढे झळकती
झळकतीचं एकच पान धुरून[3] भुलाबाई नमस्कार

१ मांडव. २ आश्विनी. ३ आद्य.

:::३:::

संग्राहक : श्री. माधव नावडीकर

१

आडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत पाय घसरला
भुलाबाईला मुलगा झाला
साखरशेला विसरला

विट्टी बाई विट्टी सोन्याची विट्टी
भुलाबाईला मुलगा झाला
गावात धाडा चिठ्ठी

भाकर बाई भाकर जोंधळ्याची भाकर
भुलाबाईला मुलगा झाला
गावात वाटा साखर

ताम्हण बाई ताम्हण चांदीचं ताम्हण
भुलाबाईला मुलगा झाला
नाव ठेवा वामन

आडावरच्या तडावर धोबी धुणं धुतो
बाई धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला हिरवा रंग देतो

इथून दाणा पेरीत जाऊ
माळीयाच्या दारी
हळूच भुलाबाई पाय टाका
साखळ्या तुमच्या भारी

२

गडावर गड बाई म्हावरगड
तिथला सोनार कारागीर
त्याने आणला साखळजोड
घ्या घ्या भुलाबाई साखळजोड
साखळ्याचा जोड घेत न्हाई
तुमच्याबरोबर येत न्हाई

गडावर गड कैलासगड
तिथला सोनार कारागीर
त्याने आणले दागिने
भुलाबाई बोले रागाने
साखळ्या वाळे तोरड्या
या तर पायी बेड्या
गोट पाटल्या तोडे
हाती बसती वेढे
वाकी बाजूबंद दंडी दोरखंड
सरी ठुशी हार झाला गळ्या भार
बाळ्या बुगड्या नथेला
भोके नाका कानाला
असले दागिने घेत न्हाई
तुमच्याबरोबर येत न्हाई

साध्या भोळ्या पार्वतीला
आणू फुले पूजेला
मनोमनी प्रेम ठेवू तिचे काही गुण घेऊ
तेच दागिने मोलाचे भुलाबाईच्या तोलाचे

३

सईच्या अंगणात राळा पेरला बाई राळा पेरला
एके दिवशी काऊ आला बाई काऊ आला

एकच कणीस तोडून नेलं बाई तोडून नेलं
सईच्या अंगणात टाकून दिलं बाई टाकून दिलं

सईनं उचलून घरात नेलं बाई घरात नेलं
कांडून कुटून राळा केला बाई राळा केला

घागर घेऊन पाण्याला गेली बाई पाण्याला गेली
मधल्या बोटाला विंचू चावला बाई विंचू चावला

४

आला माझ्या सासरचा वैद्य
दिसतो कसा म्हसरावाणी
डोक्याला टोपी फाटकी तुटकी
अंगातला सदरा चिंध्याविंध्या
हातात काठी जळकं लाकूड
पायान जोडा फाटकातुटका

आला माझ्या माहेरचा वैद्य
दिसतो कसा राजावाणी
नेसाय धोतर जरीकाठी
अंगात सदरा रेशमी काडी
हातात काठी पंचरंगी
पायात जोडा पुणेरी
डोक्याला रुमाल जरतारी
कसा ग दिसतो राजावाणी

४

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

१

*या भुलाबाई आमुच्या आळी*
*तुमच्या अंगात निळी चोळी*
*निळया चोळीवर मोर काढला*
*निळ्या मोरावर सांडला गुलाल*
*भुलोजी दलाल घरी नाही, घरी नाही*

*या भुलाबाई आमुच्या आळी*
*तुमच्या अंगात लाललाल चोळी*
*लाल लाल चोळीवर बसला मोर*
*बसल्या मोरावर सांडलं अत्तर*
*भुलोजी दातार घरी नाही, घरी नाही*

*या भुलाबाई आमुच्या आळी*
*तुमच्या अंगात पारवी चोळी*
*पारव्या चोळीवर चितारला मोर*
*चितारल्या मोरावर सांडलं पाणी*
*भुलोजी वाणी घरी नाही, घरी नाही*

२

*येथुन दाणा पेरीत जाऊ माळीयाच्या दारी*
*हळूच भुलाबाई पाय टाका साखळ्या तुमच्या भारी*

येथुन दाणा पेरीत जाऊ माळीयाच्या दारी
हळूच भुलाबाई पाय टाका तोरड्या तुमच्या भारी

येथुन दाणा पेरीत जाऊ माळीयाच्या दारी
हळूच भुलाबाई पाय टाका तोडे तुमचे भारी

२

अलीकडे दवण्याची काडी
पलीकडे दवण्याची काडी
मधी गवळ्याची माडी
ऱ्हाई बाई ग

गवळ्याला दोन मुलं
त्यांची नावं काय बाई
राघू आणि मैना सई
ऱ्हाई बाई ग

राघू बोलला आईला
पंचमीच्या सणायाला
आणू काय ग मैनाईल
ऱ्हाई बाई ग

आला मैनाचा भाऊ
कावो पावणं येणं केलं
मैनाईला मूळ आलं
ऱ्हाई बाई ग

पाठवावी मैनाईला
भुलाबाई लाडाईला
पाठवावी बाळाईला
ऱ्हाई बाई ग

अग अग पोरीसोरी
मला काय पुसतीस
पुस जा आपल्या सासूला
ऱ्हाई बाई ग

सासू आत्याबाई ऐकावं जी
पाठवावी मला माहेराला
एवढी विनंती तुम्हाला
ऱ्हाई बाई ग

अग अग सूनबाई
मला काय ग पुसतीस
पुस जा आपल्या सासऱ्याला
ऱ्हाई बाई ग


मामंजी मामंजी ऐकावं जी
पाठवावी मला माहेराला
एवढी विनंती तुम्हाला
ऱ्हाई बाई ग

मला काय ग पुसतीस
सून सासुरवाशी तू ग
पुस जा आपल्या पतीला
ऱ्हाई बाई ग

ऐकावं जी घरधनी
मूळ आलं माहेराचं
पाठवावी मला माहेराला
न्हाई बाई ग

अवो अवो पावणं
पाठवावी माहेराला
भुलाबाई भैनाईला
न्हाई बाई ग

अवो अवो पावणं
न्यावी तुमच्या मैनाईला
भुलाबाई हारकली
भावासंगं माहेरा गेली
दीड दिवसाची बोली झाली
न्हाई बाई ग



# बाल गाणी

# अनुक्रम

गंमत जंमत

संग्राहक सौ. कुमुदिनी पवार
श्री. न. शे. पोहनेरकर
श्री. रावसाहेब जगताप
कु. विमल तपस्वी
श्री. वा. रा. पवार

# गंमत जंमत



बोबड्या बोलांचे न् चाचपडत्या पायांचे बाळ घरचा उंबरा ओलांडून ओसरीवर आले की, पोरासोरांच्या घोळक्यात बसायला शिकते. तिथेच त्याचा जीव रमू लागतो. त्या मुलांच्या घोळक्यातून निघणारा ताल न् सूर ते उचलू पहाते. तोंडातून मग काही आवाज निघू लागतो आणि हातांचे टाळ वाजू लागतात. अशावेळी त्या बाळाशेजारी सावलीप्रमाणे धावणारे वडीलधारी माणूस असते. त्याच्याही कंठातून ही गंमत जंमत बाहेर पडू लागते आणि आठवतील तेवढ्या अनेक बडबडगीतांचा उपसा मग त्या जगात आनंदाने होत रहातो.

निवडक शब्द घ्यावयाचे न् त्याना ठेका देत स्वराशी नाते जुळवीत रहायचे हा या गीतांचा विशेष असतो. त्यामुळे ती ठेकेदार वाटतात. मुलांच्या प्रमाणे नाचरी मनोवृत्ती धारण करतात. या गीतांच्या ओळींना अगर त्यामधून गुंफल्या गेलेल्या शब्दांना नेमका असा अर्थ असतोच असेही नाही. बाळाचे भान हरपून टाकायचे न् त्या नादात बाळाला पोटभर खेळवायचे एवढेच त्यांना माहीत असते.

त्यामुळे मग वडीलधाऱ्या मंडळींनी बाळाला खेळवीत—

*टाळिया नंदा बाळा गोविंदा*
*बाळाच्या हाती रंगीत काठी*
*बाळ गेलं दिदी हरपली मुदी*
*मुदी कशाची मुदी माशाची*
*बाळ कशाचं बाळ नवसाचं*

अशी झोकनोक उडवीत केलेली बडबड जणू त्या बाळालाही समजते न् सगळीकडे समाधानाबरोबरच हास्याचीही कारंजी उडू लागतात! आणि मग 'चांदोबा चांदणं भोगलंस का?' या गीताप्रमाणं 'बाळा तुझं गाणं भोगलंस का?' असा प्रश्न करीत हसऱ्या बाळाला पोटाशी धरून त्याचे टोपलीभर मुके घेतले जातात! त्यावेळचा आनंद उभयतांच्या काळजाबाहेर इतका ओसंडून जातो की ती शीग त्याला थोपवूच शकत नाही!

घर सोडून अंगणात आलेल्या मुलांच्या जीवनातही अशी गंमती-जमतींची गीते खूप असतात.

*झिम् पोरी झिम्*
*कपाळीचं भिंग*
*भिंग गेलं फुटून*
*पोरी गेल्या उठून*

असल्या आटोपशीर गीतांनी पोरींचे खेळ धा धावून पुढे येतात आणि—

*आबुलाल गबूलाल*
*संभाजी कोतवाल*

अशा ढंगात मुलग्यांची गीते सजून उठतात. या गीतातील 'लिंबाच्या झाडा-वर डाग डाग वाजतं' या गोष्टीचं कुतूहल मग एवढे माजते की, असली गीते पोत्यांनी पुढे यावीत! एवढेच नाही तर—

*चांदोबा चांदोबा भागलास का*
*लिंबोणीच्या झाडावर लपलास का*

असे खुद्द चांदोबालाच विचारीत चांदण्या रात्री घराचे उभे अंगण असे घुमून उठते की, त्या खेळात सामील व्हायचा मोह खुद्द चंद्रसूर्यांनाही व्हावा!

: १ :

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

१

वेळू बाई वेळू कुपाकाठी वेळू
गौर आली सासरी आता कुठं खेळू

सोंडी बाई सोंडी माजघराची सोंडी
गौर गेली सासरी जागा झाली भोंडी

२

चाफा बाई चाफा तेलंगी चाफा
जाईचं लुगडं वालाची चोळी

काकण पोळी पुरणाची
हाती वाटी तुपाची तुपाची

३

गडू बाई गडू तांब्याचा गडू
गडूत होता पैसा पैशाची घेतली जुडी

जुडी बाई जुडी सांबाराची जुडी
माहेरचा डोंगा पाहून घेतली उडी

४

काकडी म्हणं काकडी सव्वा हात काकडी
दादाची बायको तीन जागी वाकडी

५

साळी म्हणं साळी चिपटंभर साळी
बायको नको काळी म्हणून दादा हिंडतोय आळी

६

खण खण कुदळी मण मण माती
देऊन खचले चांदण्या राती

चांदण्या रातचे माणिक मोती
घाल घाल गौराइ आपल्या नाकी

घालता घालता मोडली दांडी
त्याची केली ऊप्पर माडी

उप्पर माडीवर उभी राह्य
गौराई आपलं माहेर पाह्य

माहेर काही दिसेना शंकराला पुसेना
शंकराला पुसले गौराईस माहेर दिसले

२

संग्राहक : श्री. न. शे. पोहनेरकर

१

टिकली मिकली केली येकली शेता गेली
तिकडून आला भाऊ तुझी टिकली पाहू

काय पहातोस मेल्या शेत खाले कोल्ह्या
खालं तर खाऊ दे तुझी टिकली पाहू दे

२

बाळ बंगड
हिरवं अंगडं
बाळ आंबेबनात जातं
आंबे तोडुन खातं
घरला पळू पळू येतं

३

हार बाळा हारकुलं बाळाच्या हाती कुरकूलं
बाळ गेलं बोराला हाका मारी पोराला

बाळाचं बोर सांडलं चहूकडं मांडलं
पोरं लागली वेचायला बाळ लागलं नाचायला

४

लव लव साळाई मामा येतो
खोबऱ्याची वाटी देऊन जातो
गुळाची पोळी खाऊन जातो
दळाचे गोळे घेऊन येतो

५

राघू माझा तान्हा ग भिंगाची टोपी आणा ग
मोतीयाचे घोस ग सयांनू तुम्ही लावा ग

बारीक शेला वाऱ्यानं गेला
दृष्ट व्हईल याला ग पदर कुणी तरी घाला ग

६

मुतकुली मुंद्याचे
मुंदे सुंद्याचे

सुंदे कुंद्याचे
तुत् मन मी मनन
तुला हौसच आहे
मला हौसच आहे
मारुतीच्या अंगाला तितकंच ऊन,
शंकऱ्याची माय परभनीला जाय

३

संग्राहक : श्री. रावसाहेब जगताप

अगं या गुलाबाचा हार
अगं या गुलाबाचा हार
आमच्या वेण्या झाल्या लाल
आमच्या वेण्या झाल्या लाल

गल्लोगल्लीला सोनार माणिक मोती डोलार
डोलाराच्या खिडक्या आम्ही बहिणी लाडक्या
लाड सांगावा बापाला मोती मागावे कापाला
गवर आली न्हायाला शंकर आले पाह्याला
शंकर आमचे म्हेवणे दीड दिसाचे पाऱ्हणे

२

किस बाई किस दोडका किस
दोडक्याचं पाणी कावळ्या राणी
खेळ ग सुने नेणतेपणी
हिरवं लिंबू कुंकावाणी

३

अगं आई गं        काग झालं गं
सासूच्या कारट्यानं        शिव्या दिल्या गं
कश्यापायी गं ?
आंब्याच्या रसापायी
उली उली खाऊ नव्हता
मेल्याला घरी देऊ नव्हता
मार मेल्या मार
आजून मार
चिंचंखाली बसलाय हवालदार

४

आड बाई आड ग        आड बाई आड ग
आडाला आल्या शेंगा        घाल ग पोरे पिंगा
एकीचा का दोघींचा        भार पडला चौघींचा
मामाची लेक गोरी        हळद लावा थोडी
हळदीचा उंडा        रेशमाचा गोंडा
रेशमकाडी हालती        चिंचंखाली डोलती
ती चिंच गोड गं        जिभेला आले फोड ग
तो फोड फुटंना        धाकला मामा उठंना
मामा गेले नांगरी        सोन्याच्या ग घागरी
तिथं आली बोतरी        आत कोण उतरी
डोकीवर काय ?
चुंबळ
चुंबळीवर काय ?
डालगं

डालग्यात काय ?
करंडा
करंड्यात काय ?
घुंगरू

५

| | |
|---|---|
| जोंधळ्याचं पात | जोंधळ्यावाणी |
| सासरा दिसतोय | गोंधळ्यावाणी |
| तुरीचं पान | तुरीवाणी |
| सासू दिसतेय | पोरीवाणी |
| बारवच्या काठी | शिजिवला भात |
| आत्याबाई गेल्यात्या | बेडकुळ्या खात |

६

आकण माती चिकण माती भिजू द्या
आडव्या भिंती बांधुन घ्या
अक्काचा नवरा मामलेदार
चोळ्या शिवतो हिरव्यागार
शिवता शिवता विसरला
भोपळ्याच्या पानावानी पसरला

७

| | |
|---|---|
| घुम रे घुम | तिकडंच घुम् |
| कवळी काकडी | धडाम् धुम् |

८

कुरकुलं म्हणं कुरकुलं
इवलूसं कुरकुलं

कुरकुल्यात होता	चिंचेचा पाला
बामनीन बाईचा	उपास मोडला

९

कोळवंभर मोती	जाईच्या दिशा
चांद मोत्याचा·	भांग मोत्याचा
नाही माझी मैना दियाची
लाल गोंडा लेयाची
कणगीत घालून ठेवायची
कणगीला आला भुरा
वेशीत नेऊन पुरा

१०

बायकात पुरुष लांबोडा
भाजून खातो कोंबडा
पोरीत पोर लांडगा चोर

११

आंब्याच्या भाजीला हटावं किती
मुंबईच्या पोरीनं नटावं किती

१२

इत्ता इत्ता	गीमित्ता
मामानं आणलाय	अडकित्ता

१३

इकडून आला	काळ्या टोपीचा
तिकडून आला	काळ्या टोपीचा
म्हातारीचा लेक मेला	उपऱ्या पोटीचा

१४

पिंगा बाई पिंगा चवळीच्या शेंगा
चवळीच्या वेलीला शेंगच नाही
मामाच्या लेकीला नाकच नाही

१५

आंबा पिकतो रस गळतो
कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो
× × ×
वेळू म्हण वेळू टपोरी वेळू
चला ग पोरींनो झिम्मा खेळू
× × ×
झिम् पोरी झिम् कपाळाला भिंग
भिंग गेले फुटून पोरी गेल्या उठून

१६

माझ्या दारात चंदन माझ्या दारात चंदन
वेलचिची पानं डुबुकदार डुबुकदार बाई डुबुकदार

मला नियाला आलं कोण
आले म्हणती बाप राजे
त्यांना बसाया टाकू काय
त्यांना जेवायी सोन्याचं ताट

आले म्हणती काका राजे
माझ्या काकाला रुपेरी ताट

आले म्हणती भाऊ राजे
माझ्या भावाला चांदीचं ताट

माझ्या बापाला वरली गादी
माझ्या भावाला वरली सतरंजी
माझ्या मेव्हण्याला वरलं तरट

माझ्या बापाला झोपायला पलंग
माझ्या काकाला झोपायला बाज

माझ्या भावाला झोपायला खाट
माझ्या मेहुण्याला झोपायला रांजण

रांजण आला घरंगळत
मेव्हणा उठला तळमळत

१७

माझं माहेर पंढरपूर
पंढरपुराहुन आणली शाल

आत्याबाईला नेसायला
वटी भरली सुकनाची

वटी भरली खुणुक खुणुक
माझी फुगडी झुणुक झुणुक

१८

राजाचं लगीन तळ्या पाळ्यानं
राजाचं बाशिंग नेलं घारीनं

राजाच्या लग्नाला तिळाचे वडे
बाशिंग नाही तर बांधले फडे

राजाच्या लग्नाला वऱ्हाडी कोण
झिपरे कुत्रे आणले दोन

काय बाई पुन्याची तारीफ
लवंगा निघाल्या बारीक

जानकी हिंडती मुलूख
जानकीच्या पायात भवरा
जानकी मागती नवरा

नवरा कुठं गेला ?
अंघोळीला गेला

जेऊ वाढ की त्याला
लाज वाटती मला

२१

जावई सासू भांडती
जावई सासू भांडती
जनलोक ऐकती झाले दंग
नाही धाडत मैना तुमच्या संगं

जावई आला रे रानात
मारली लात पाडिला दात
धावा धावा गावच्या लोका
यानं केला माझा घात

२२

वाकडी तिकडी बाभळ
तिला आल्या शेंगा
साहेबाचा बंगला
चुन्यानं रंगला

२३

चिमणे चिमणे काच ग तुला पिल्ले पाच ग
एक पिलू मेलं गाडीत घालून नेलं
गाडी लागली डोंगराला शिंग लागलं नरडीला

तिकडून आल्या आयाबाया त्यांनीं केल्या शेवाया
आपण खाती वाटीभर राघूला देती पळीभर

तो राघू रूसला खोपीत जाऊन बसला
ती खोप जळाली चिमणी लांब पळाली

ओढ्याला आला लोंढा भिजला माझा गोंडा
गोंड्याच्या हाती रुपाया भाऊ माझा शिपाया

शिपाई झाला मापाडी त्यानं दिला धापाडी
ती धापाडी खाईना पन्नास पानं घेईना

जेजुरीचा खंडोबा नाव ठेवा लांडोबा
लांडोबा गेला ताकाला माशी चावली नाकाला

तेलीन गेली तेलाला विंचू चावला गालाला
बामन गेला पेंडीला साप चावला शेंडीला

२४

संग्राहिका : **कु. विमल तपस्वी**

अडचण कांडी सव्वा टिपरी
ह्या बाई टिपरीचा भरीला भारा

हा बाई भारा कुणाच्या दारा
हा बाई भारा यशोदीच्या दारा

यशोदे यशोदे बाळ कुठं गेला
घेतली बासरी न् नदीवर गेला
घेतल्या गाई न् नदीवर गेला

सगळीच भरली तुपाची वाटी
न्हाईलं साईलं देते बाळासाठी

२

अडगुलं मडगुलं सोन्यानी गुंफीलं
डोंगरी किंकरी वाजवी श्रीहरी

लपत छपत बाळ घरी आला
दुरून देखीला खुणेनी ताडीला

३

एक पाय नाचू दे गोविंदा
घागरीच्या छंदा

एक पाय नाचू दे मुरारी
वाजू दे घागरी

४

आपडी थापडी गुळाची पापडी
धम्मक लाडू तेल पाडू

तेलंगीचे एकच पान
धररे गोप्या माझा कान

५

एरिंग मिरिंग लवंगा तिरिंग
लवंगा तिरचा डुगडुग वाजा
गाई गोपी उतरला राजा

६

च्याव म्याव पकालीचं पाणी प्यावं
काशीला जाऊन खीर खावं

७

हात गोरा माझ्या सईचा
काकण चुडा माझ्या बाईचा

हात कसा हाले
वारा कसा डुले
पाऊस कसा पडे
तसा जुंदळा हाले

५

संग्राहक : श्री. वा. रा. पवार

१

वडा बाई वडा वड्यात नाही सांबार
गावी आले कुंभार कुंभारा नाही माती

गावी आले खाती[1]    खात्या नाही कोळसे
गावी आले आरसे    आरशा नाही रूप
गावी आले तूप
असं गगन खोलवी    सीता टाके बोलवी

२

भिंतीवरचा नागोबा    पडला माझ्या पायावर
मोडला माजा साखळजोड
घडव घडव सोनारा    किती करू येरझारा
दारी कुत्रे भुंकती    नंदा जावा झगडती
देर माजा कोतवाल    भाऊ माजा सुभेदार
तिक्रवड्याचे[2] चार पाय    त्यावर बसली गौराबाय
धुऊन देते पाय



१ लोहार. २ चौरंग.

# भाग दूसरा




# विविध लेख

# अनुक्रम

## विचार सौंदर्य


| लेखक | विषय |
|---|---|
| श्री. ना. रा. शेंडे | बाळगोपाळ |
| डॉ. यशवंत खुशाल देशपांडे | विदर्भातील बालविषयक लोकगीते |
| श्री. न. शे. पोहनेरकर | बाळ राजस ग माझा |
| श्रीमती गिरजाबाई केळकर | जुनी संस्कृती |
| डॉ. सरोजिनी बाबर | बाळलेणी |
| सौ. तारा परांजपे | अंगडीचं होतं–घोंगडीचं झालं |
| डॉ. ग. बा. तगारे | लोकसाहित्यातील लेकरू |
| प्रा. गजमल माळी | खानदेशी लोकगीते |
| प्रा. आनंद यादव | माणिकमोत्यांची रास |
| सौ. कमला वाघ | कोकणी लोकगीते |
| सौ. मालती दांडेकर | तान्हं बाळ |
| सौ. कुमुदिनी पवार | वेडी माया |
| श्री. पां. र. शिंदे | लोकगीतातील आई |
| श्रीमती आनंदीबाई शिर्के | शिशुगीते (जुनी) |
| डॉ. सौ. सविता जाजोदिया | बाळराज विषयक मराठी व अन्यप्रांतीय लोकगीते. |
| डॉ. कृष्णदेव उपाध्याय | हिन्दी के बालगीत |

# विचार सौंदर्य



रांगते खेळते घरातील लहान मूल म्हणजे वडीलधाऱ्यांचा मोठा विसावा. कोडकौतुकाचा विषय. वयाचे भान विसरून खेळ खेळ खेळण्याची जागा. मनाची करमणूक. तर अशा ह्या लाडक्या विषयावर आपल्या मनात घोळणाऱ्या भावनांचा शिडकावा इथे काही मान्यवर मंडळींनी केलेला आहे. लोकगीतांचा आधार घेऊन त्यावर आपले भाष्य प्रकट केले आहे.

व्यक्ती तितक्या प्रकृती असतात असे म्हणतात. त्याप्रमाणे मुलूख तशा चालीरीती इथे या लेखांतून प्रकट झालेल्या आहेत. त्यामुळे हे लेख वाचनीय तर झाले आहेतच पण त्यांच्या श्रवणाने व वाचनाचे माणसाचे ठायी वात्सल्य दाटले जाईल अशी खात्रीची परिस्थिती इथे उभी राहिलेली आहे!

'बाळ राजा' संबंधीचे एकूण तेरा निबंध-लेख—इथे दिलेले असून ते सर्व आपल्यापरीने चांगले लिहिले गेले आहेत. प्रत्येकाने या विषयाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोणातून पाहिलेले असल्यामुळे या लेखांना विविधता प्राप्त

झालेली आहे. लिहिणारा जणु इथे आई झाला आहे न् त्याच्या कडीखांद्यावर त्याचे लाडके बाळ नाचते बागडते आहे असा भास व्हावा इतके हे निबंध वाचनीय झाले आहेत.

इथे वडीलधाऱ्यांच्या प्रमाणेच नवीन तरुणांनीही लेखन केले आहे. त्या कारणाने मराठी संस्कृतीचे हृदयंगम दर्शन घडते यात शंका नाही.



# बाळ गोपाळ

ना. रा. शेंडे, नागपूर.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

या विशाल विश्वाच्या कुशीत बाल-गोपाळांचं एक वेगळंच रम्य व उदात्त विश्व आहे. विविध भावभावांच्या रसाळ फळांनी आणि सुंदर व सुगंधित पुष्पांनी ते बहरलेले आहे. मनाला केवळ प्रसन्नच नव्हे तर कुंठित करणारे अमृतबोल साऱ्या विश्वभर दुमदुमत आहेत. काही अस्फुट, अबोध, तर काही बोबडे अन् छणाणणारे. कुठे हृदयाला गुदगुल्या करणारे स्पंदन तर कुठे ममतेला पाझर फोडणारे क्रन्दन आणि कुठे वात्सल्याचे झुळझुळ वाहणारे निर्मळ झरे तर कुठे कारुण्याचे थयथयणारे फवारे. कुठे उंची पोपाखात सुंदर हिरवळीवर आनंदाने उड्या मारणाऱ्या गोजिऱ्या बालबालिकांचे मधूनच उठणारे गोड हुंदके; तर कुठे नागड्या अवस्थेत दलदलीवर रेंगाळत विहार करणाऱ्या लालांचे आर्त गलके. या बाल-गोपाळांचे हे विश्व एका गूढार्थाने भरलेले आणि एका बाल्यरागाने निनादलेले. त्या चिमुकल्यांच्या बोबड्या, अस्फुट बोलातील गूढार्थ व आक्रंदनातील राग विख्यात तत्त्वज्ञांना, शास्त्रज्ञांना, रसज्ञांना काय किंवा संशोधकांना काय उमगणे कठिणच. काही उमगत असेल तर ते केवळ मातेच्या

हृदयाला; काही जाणवत असेल तर ते तिच्या पवित्र मनाला; काही बोध होत असेल तर तिच्या सजल नेत्रांना; आणि काही कळत असेल तर तिच्या सूक्ष्म कर्णेन्द्रियांना! या विश्वात खरोखरीच जर काही विशेष असेल तर ते माता आणि तिचे जाणकारी हृदय, बाळ आणि त्याचा अभिनय नि बोल आणि त्या दोघांच्या साथीला अन् साक्षीला असलेला प्रत्ययदर्शी पाळणा.

ग्रामीण स्त्रियांनी—नव्हे मातांनी बालगोपाळांच्या या विश्वात जे विविध भावरस निर्माण करून सहजस्फूर्तीने जी गीतरूपी बोलकी गंगा अवतरविली आहे, तिचे माहात्म्य काव्यसृष्टीत तर विशेष मोलाचे आहे.

*राजाई व् भुलाई माह्या गोईंदाची गीताई*
*इन्दुरची व् रंभाई, माय शंकरची व् गजाई*
*माह्या बाळाची अंगाई माय् रंगाई—गीताई*
*गा माय् गीताई—राजाई*

माता कौसल्येचा राम मला चंद्र खेळण्यासाठी आणून दे म्हणून जसा रुसला व हट्ट धरून बसला, अगदी तसाच बयनाबाईचा बाळ गाण्यासाठी रुसला. तो काही केल्या ऐकेना. मातेने त्याला हरप्रकारे समजाविण्याचा प्रयत्न केला. पण तो छोटा बंडू गप्प काही होईना! त्याने मातेला बेजार करून सोडले. तेव्हा राजा इंद्राची रंभा आणि भगवान शंकराची गिरिजा त्याला राजी करण्यासाठी, त्याला भुलवून आनंदित करण्यासाठी धाव घेऊन आल्या; आणि मातेच्या आग्रहाच्या विनंतीवरून त्या मधुर गीत गाऊन बाळाचे रंजन, सांत्वन करू लागल्या, असा उदात्त भाव या लोकगीतात दर्शविला आहे. अंगाई व रंगाई आणि गीताई व राजाई या शब्दांनी मातेच्या वात्सल्याचे जसे सोज्वळ भाव व्यक्त केले आहेत, तसेच त्यांनी गीतात हृद्य लालित्य-निर्झरही निर्माण केला आहे.

मुलगा गुणी पण खोडकर आहे. त्याचा व्रात्य स्वभावही मातेला मोठा कौतुकास्पद वाटतो. ती त्याच्या दोषांकडे दुर्लक्ष करून त्याच्या गुणांचीच वाहवा करण्यात स्वतःला धन्य समजते. या संदर्भात हे एक लोकगीत पाहा :

*पोर नाचे भुईवर*
*भुले तुरस राजावर*

*उभा देव सर्गावर*
*दूध सांडते अंगावर*
*पोर अठर वटर*
*धरे जाईचा पदर*
*उभी शेजारी गुल्नार*
*रंगी भुलते पोरावर*

मुलगा मोठा देखणा आहे, तो अंगणात थयथय नाचत आहे, तुळस भाळली जाऊन त्याला गोंजारू पाहात आहे, देव स्वर्गावर उभा राहून ते विलोभनीय दृश्य पाहात आहे आणि प्रसन्न होऊन तो बालकावर दुधाची धार सोडत आहे, हे एक हृदयंगम चित्र; तर दुसरे म्हणजे मुलगा मोठा वात्रट नि लबाड आहे, तो जाईचा पदर दांडगाई करून धरतो आहे, शेजारी एक सुंदर मुलगी त्याचेवर नजर रोखून उभी आहे, ती त्या मुलावर अनुरक्त झाली आहे, असे हे मनाला तोषविणारे शृंगारिक चित्र ग्रामीण स्त्रियांनी उपमा-उपमेयांनी कसे सुरेख रंगवले आहे ! या गीतातील जाईचा पदर म्हणजे जाईच्या फुलाची पाकळी. ती पाकळी तो मुलगा तोडू पाहतो. हे शेजारीच असलेल्या गुलनारला म्हणजे यौवनाने फुललेल्या गुलमोहरीच्या लतेला पाहवत नाही. तिच्या मनात ईर्षा निर्माण होते आणि त्या मुलाने आपल्याकडे धाव घ्यावी अशी ती अपेक्षा बाळगते. चरणातील शब्द अगदी साधे आहेत; पण भाव मात्र हृदयाला कसा फुलविणारा आहे !

खेड्यापाड्यातील स्त्रिया निरक्षर व भाविक; पण प्रसंगी तितक्याच चतुर व कल्पक. विशेषत: बालकांवरील त्यांच्या गीतात राधा-कृष्ण, सीता-राम, गोपीचंद, श्रावण, लवांकुश, ध्रुव इत्यादी नावांचा मोठ्या कुशलतेने वापर केला असल्याचे आढळून येते. तरल भावनांचा आविष्कार कसा घडवावा याची कलाही त्यांना साधली आहे.

*लेकरं खेलती चौफेर चौफेर ।*
*माझ्या चिलियाची लकाके नजर ॥*
*बाळामंधी बाळ माहा, लई ग्यानी ध्यानी ।*
*होळ लावली लेकरानं, जिंकली पद्मिनी ॥*

*नगरच्या लेकरानं सजवला साज।*
*येटबाज माहा बाळ, शोभतो हंसराज॥*

'एका विस्तीर्ण पटांगणात नगरीतील सर्व मुले मनमुराद खेळत आहेत; त्यात माझा चिलिया बाळही खेळत आहे. त्याची नजर कशी तेजस्वी आहे! सर्व बालकात तर माझा बाळ मोठा बुद्धिमान आणि चतुर आहे. सौंदर्यसम्राज्ञी पद्मिनी जिंकण्यासाठी मुलांनी पैज लाविली; पण ती माझ्याच बाळाने जिंकली. नगरीतील त्या सर्व मुलांनी सर्वात सुंदर कोण म्हणून स्पर्धा लावली; पण त्या सर्वांत माझा बाळच मोठा ऐटबाज आणि देखणा ठरला. सर्वांत तो हंसराजासारखा शोभू लागला.' असे खुमासदार वर्णन करून माता आपल्या बाळासंबंधी म्हणते :

*माळ्याच्या बगिच्यात, फुलाफुलांची भरली रांग।*
*माह्या बाळाचं पाहून रूप, राधिका झाली दंग॥*
*माह्या बाळाच्या गुणाचा तिनी लोकी वास।*
*देवादेवाले लागली, माह्या राजसाची चुरस॥*

'माळ्याच्या बागेत मन वेधून घेणाऱ्या सुंदर सुंदर फुलांच्या मोठमोठाल्या रांगा आहेत. पण ती सर्व सुंदर फुलं माझ्या बाळाच्या सुंदरतेपुढं फिकी पडली आहेत. अहो, माझ्या बाळाचं लावण्य, रूप पाहून तर राधागोरीसुद्धा दंग झाली. आणि माझ्या बाळाच्या गुणांसंबंधी तर काही विचारायलाच नको! तिन्ही लोकात त्याची कीर्ती दुमदुमत आहे. इतकी की, देवादेवांमध्ये त्यांची चुरस लागली आहे. स्पर्धा लागली आहे स्पर्धा!' आपल्या बाळासंबंधी मातेचा हा केवढा अभिमान!

घरात पुत्रजन्म झाला. अंधारात प्रकाशज्योत निर्माण झाली. कळ्या खुदकन हसल्या. उष्ण हवेत गारठा आला. माया, ममता आणि वात्सल्याचे प्रवाह वाहू लागले. अंगाई गीताचे मधुर, सुखद स्वर घरादारात आणि आसमंतात निनादू लागले. माता–पिता–बहीण–भाऊ–नात्यागोत्याची सर्व माणसे आनंदाने हरखून गेली. मातेचे हृदय असीम सुखाने उचंबळून आले. तिने बालकाला दुधाशी लावले. त्याची काजळ लावून दृष्ट काढली. त्याचे प्रेमभराने मुके घेतले.

आणि मग तिने आपल्या तान्हुल्याला पाळण्यात घातले. बाळापुढे सारे विश्व तिला सामान्य वाटले. ती अंगाईगीत गाऊ लागली:

*ॐ ॐ ॐ....जू जू रे जू जू*
*जू बाळा जू, वेल्हाळा जू जू रे जू जू*
*माता हालवे पाळणा, गुणवंता*
*लवकुशा देते झोका, माता सीता*
*जू जू रे जू जू.*
*सीता गाते रे गाणं, कुलवंता*
*जळते बिन्द्राबनी दिवा, जसवंता*
*जू जू रे जू जू*

'मी माता सीता आहे. तू लवकुश बाळ आहेस. गुणवंत, कुलवंत आणि यश प्राप्त करणारा जसवंत तू आहेस. तू म्हणजे घराची शोभा—घराण्याचं वैभव. पवित्र वृन्दावनात अखंड तेवत राहणारा तू भाग्याचा दीपक आहेस. झोप बाळ झोप!' बाळ लवकर झोपत नाही. मधूनच तो रडू लागतो. माता त्याला पुन्हा चुचकारते. ममतेनं आंजारते गोंजारते. पाळण्याला झोके देत ती पुन्हा अंगाई गीत गाते :

*बाळा जो जो रे, सिरिकिस्ना*
*देवकीनंदना, बाळा जो जो रे*
*माय रे गाणं गाई*
*रात्रा झोका देई, बाळा जो जो रे*
*झोप जगन्नाथा,*
*चांद तुझ्या रे माथा, बाळा जो जो रे*
*नोको लळू बाळा,*
*माहा दाटे गळा, बाळा जो जो रे*
*माह्या झेंडूच्या फुला,*
*लावलीस रे माया, बाळा जो जो रे*

*बाळा इकुसा देह,*
*समद्या पुर्थवी मोल, बाळा जो जो रे*
*का पाहसी टकटक*
*नाय रे तुले धाक, बाळा जो जो रे*
*तुहे सोनियाचे केस*
*राजबिंडा तुहा भेस, बाळा जो जो रे*
*मुकुंदा तू झोप,*
*चुम्बा घेते बाप, बाळा जो जो रे*

अनेक प्रकारे समजूत घातल्यावरही बाळ काही झोपत नाही. माता त्याला विनवते :

*नीज नीज बाळा, माह्या तान्ह्या गोपीचंदा रे नंदा*
*हालवता हात दुखला*
*गाणं गाता कंठ सुकला*
*नीज नीज बाळा, माह्या तान्ह्या गोपीचंदा....जू आँ*

आणि मग ती म्हणते, 'माझा बाळ खेळून आल्यावर जेवणाच्या वाटीनं त्याला ओवाळीन. तोंडात काऊचिऊच्या घासानं भरवीन. गाईचा गोठा शेणानं भरला आहे तो साफ करीन. पटांगण स्वच्छ करीन आणि माझ्या बाळ रायभानाला खेळायला सुंदर जागा तयार करून देईन.'

*खेलून मालून आला माहा सरावन*
*वाटी जेऊ ओवाळीन....जू आँ*
*गाईचं गोठान, भरलं शेणानं, झाडीन मैदान*
*बाळ खेळलं रायभान....जू आँ*

इतक्यावरच माता थांबत नाही. ती शेजारणीबाईला उद्देशून म्हणते :

*शेजारने बाई, माह्या घराकले पाह्य*
*पारण्यात बाळ हाय....जू आँ*

आणि नंतर ती शेजारणीला अंगण झाडायला सांगते. त्या अंगणात तुझी मैना आणि माझा राघू एका जागी खेळतील. पण लक्षात ठेव हं! आपल्या मैनेला नीट सांभाळ! कारण माझा राघू शहाणा होईल, मोटा होईल अन् तुझ्या मैनेचे हरण करील, अशी जाणीव तिला करून देते.

*शेजारने बाई, आंगण झाडू लाग*
*तुही मैना, माहा राघू*
*खेलती एका जाग....जू आँ*
*शेजारने बाई, राख आपली मैईना*
*राघू व्हईल शहाणा....जू आँ*
*शेजारने बाई, माहा राघू उडल*
*तुही मैना उडवल....जू आँ*

मग माता विविध कल्पनांचे जाळे निर्माण करते. ती म्हणते, 'अरे बाळा तुझी आई मेली तर पुरुषाचे काय नुकसान होणार? पण बाळा, सगळी नगरी धुंडाळून काढशील तर तुझी माता तुला आढळणार नाही–तिची माया तुला कधी लाभणार नाही.'

*बाळाची मेली माय, पुरुषाचं गेलं काय?*
*नंगरी धुंडाळून पाहय*
*नाही दिसे बाळ माय....जू आँ*

'मी मुलाबाळांची माता झाले आहे, आता तर पूर्णपणे प्रपंचात गुरफटून गेले आहे. सोन्यासारख्या माझ्या लेकरापायी मी माझे माहेरही पूर्ण विसरून गेले आहे.'

*लेकुरवाळी झाली, जंजारात गुंतली*
*सोन्या लेकराचे पायी*
*माय माहेर इसरली....जू आँ*

मग ती बाळ आणि पाळणा यांची मुक्तकंठाने महती गाऊ लागते :

दंडाचा व् पारना, वाजते कारकीर
बाळ मुरलीधर
शोभते घरदार....जू आँ
पारन्याले हीरकाचे वाई वाजती घुंगरू
राजसाचं माह्या लळ
वाई सूर पाहे धरू....जू आँ

आणि मग माता बाहेरच्या रम्य वातावरणाकडे धाव घेत गाते :

गाईकऱ्या दादा, तुह्या गाई कलवजो
खेळाया बाळासंगं
हरणाईले बोलवजो...जू आँ
आंब्याची आंबराई, लावली दाटदूट
सावलीत राजसाचा
मांडला चौरंगपाट....जू आँ
गाणं गाऊ किती, रातची येळा झाली
नीज बाळा गोपीचंदा
आनंदाच्या रामचंदा...जू आँ

मातेच्या अशा सद्भावपूर्ण सात्त्विक बोलांनी तिच्या अत्यंत मृदू व ऋजुतापूर्ण शब्दमंत्रांनी बाळासंबंधीचे केवढे भावविश्व निर्माण केले आहे, तिच्या अंतःकरणातील पावित्र्य आणि नेत्रातील दिव्यत्व बाळ आणि पाळणा यांभोवती मांगल्याची वलये निर्माण करतात. ती आपली सगळी मायेने ओथंबलेली शब्दसंपत्ती आपल्या बालकावर नि त्याच्या विसाव्याच्या पाळण्यावर उधळून टाकते. लालित्य, प्रमाद आणि अलंकारमंडित असे आणखी हे एक लोकगीत पाहा :

दंडाचा पारना लावीन धरना, नीज बाळा सरावना
दंडाच्या पारन्याले सोन्याचे आकोळे, बाळा तुही निद्रा मोळे
दंडाचा पारना वाजते कारकीर, राधा झोपली बिनघोर
दंडाचा पारना दंडुल्या मारते, तान्हं बाळ जोजुवते

*दंडाचा पारना करसूत्र सोनियाचं, घर शोभलं तानयाचं*
*दंडाच्या पारन्याले पितांबर साज, उधडा झोप गणराज*
*दंडाच्या पारन्याले फुलांची केली शेज, माहा झोपते काळीज*

एखाद्या समाजात काय किंवा कुटुंबात काय काही व्यक्ती विरोधासाठी विरोध करतात. कोणाला एखादी गोष्ट रुचली नाही तर नसतील ते आडमार्ग निर्माण केले जातात. अशा व्यक्ती स्वतःचे भले तर करीतच नाहीत पण इतरांनाही अडविण्याचा, त्यांचे अकल्याण करण्याचा दुष्ट प्रयत्न करतात. विशेषतः बालकांच्या बाबतीत असे काही घडले तर मन केवळ विषण्णच होत नाही तर दुःखाने ते पेट घेते. त्या भावनेपैकी हे एक लोकगीत आहे :

*बयनाबाईचं बाळ शिकलं रांगावाले ।*
*पापी भावजयीनं कसु बांधली अंगणाले ॥*
*बयनाबाईचं बाळ नाचाया लागले ।*
*पापी गौराईचं पोट दुखाया लागले ॥*
*बयनाबाईचं बाळ धावाया लागले ।*
*पापी झिप्राईनं दोन गोटे फेकयले ॥*
*बयनाबाईचं बाळ हासाया लागले ।*
*पापी ठमाईनं लिंबू भारयले ॥*

आणि नंतर माता व्यथित अंतःकरणानेच, जो करील तो भरील, दुष्टाचा दुष्टपणा त्याचा त्यालाच भोवल्याशिवाय राहणार नाही अशा भावनेने मन मोठे करून उद्गारते :

*शेजी देते शिवी—*
*दुष्ट मारते गोटा—*
*कोणी करे जादूटोना—*
*जिची तिले मुभा ।*
*तिचा तिले शाप ।*
*चरित पाहते देव इसवर उभा ॥*

मग माता निःश्वास टाकून आपली बोटे कडाकडा मोडते, दुष्ट व्यक्तींना शाप देते :

*इळा पिळा टळो । जादूटोनाईचं घर जळो ।*

तिचे लक्ष आपल्या बाळाकडे जाते. 'भाग्यवंत माहा बाळ। आयुवंशाचा बाई पुरा। नांदे देवाचा आसरा' असे उद्गार काढून ती आपल्या बाळाला आशीर्वाद देते. आणि त्याला हृदयाशी घट्ट धरून, झरत्या नेत्रांनी त्याचे चुंबन घेते.

प्रस्तुत ठिकाणी करुण रसाची हृदय विदीर्ण करणारी दोन लोकगीते नमूद करण्याचा मोह अनावर होतो.

एका खेडूत विधवा बाईला एकच एक लहान मूल आहे. हे मूलच त्या माउलीचा आधार. मूल दुधावरचे आहे; पण आईला दूध मात्र येत नाही. मूल दुधासाठी टाहो फोडते. दुसरीकडून दूध आणायला तिच्याजवळ एक पैसाही नाही. मुलाचा आर्त टाहो ऐकून ती व्याकूळ होते. ती गहिवरून म्हणते, 'तान्हुल्या, कशाला बरं स्तनाला झोंबतोस? बाळा, स्तनातून एकही थेंब दूध येत नाही रे....उगा राहा बाळा, गोविंदा; उगा, उगा राहा.' मातेचे नेत्र झरू लागतात. हृदय धडधडू लागते. शरीराला कंप सुटतो. कंठ भरून येतो आणि ती पुत्राला कुरवाळीत म्हणते, 'माझी कूसच खराब, बेइमान झाली आहे रे तान्हुल्या! तुला मी जन्म दिला त्या वेळी सायंकाळ झाली होती व ती रात्र काळरात्र होती. घरात असं काय होतं बाळा, की जे खाऊन मी पुष्ट होईन आणि मला भरपूर दूध येईल! त्या रात्री तर तुझ्या जन्माच्या साथीला केवळ पोपटीचे दोनच दाणे काय ते होते. ते मी तुझ्यासाठी राखून ठेवले होते. बाळा, आता मजजवळ काय उरलं आहे बरं?' दुःखावेगानं आलेले हुंदके तिला आवरणे कठीण झाले. अश्रुधारा सैरावैरा धावू लागल्या. कोरडा आवंढा गिळण्याचा प्रयत्न करून ती करुण शब्दात म्हणाली, 'होय, आता सूर्य उगवला आहे. त्याचा प्रकाश तुळशीवर पडला आहे. तीच काय ती राहीला आहे. तिचीच सावली आता तुझ्यावर आहे. बाळा, अशा भेदक नजरेनं इकडे तिकडे काय बघतोस रे! अरे, तुझी ही दयनीय अवस्था पाहून तो चंद्रदेखील लाजेनं खाली मान घालून पळून जाईल. लंगोटीसाठी कोणाकडून बोटभर चिंधी मिळेल अशी

काही आशा नाही. गोविंद बाळा, दूध नाही तर नाही; पण या भयंकर जंगलात चिकाची झाडे फार आहेत. तो चीक दूध म्हणून चाट. पण टाहो मात्र फोडू नकोस रे. उगा राहा. माझ्या काळजाचा तू तुकडा. तोच माझा या विश्वात आधार. त्याचीच मला माया आहे. त्यावरच मी कशीबशी जगत आहे. तो तोडू नकोस आणि उगा राहा बाळ, उगा राहा.' हृदयाला असा पीळ पाडणारे ते हे एक लोकगीत पाहा :

*नोको झोम्बूं तान्या, थानी नाई बूंद*
*कूस झाली बेईमान, उगा रे माह्या गोविंदा...उगा रे*
*देल्ला जलम सांजिले, तान्या व्हती कारी रात*
*घुगऱ्याचे दाने दोन, तुह्या जल्माची साथ....उगा रे*
*उगवला सुर्व्या, आली तमन तुरसीवर*
*गवाई हाये तान्या, तिची सावली तुह्यावर...उगा रे*
*आको नोको पाहू, चांद लाजले गोईंदा*
*बोटीच्या लंगुटीले त्येची आस नाई बाळा....उगा रे*
*भारी चिकाचं जंगल, चिक चाट रे गोईंदा*
*कारजाचा इकुसा टुकळा, नोको तोळू माया...उगा रे*

आपल्या तान्हुल्याला दुधाऐवजी चीक चाटून जिवंत राहा, पण माझी माया सोडू नकोस अशी आर्त विनवणी करणाऱ्या अभागी मातेच्या भकास जीवनाचे हे चित्र सुखलोलुप जीवन जगणाऱ्या व्यक्तींना पाझर फोडणारे नाही काय? स्तनाला एक थेंब दूध येत नाही, पण बाळ तर जगला पाहिजे. दुसऱ्यांना किंवा परिस्थितीला दूषण देण्यापेक्षा माता कूसच बेइमान झाली म्हणते. मुलाचा काळरात्रीला जन्म झाला तेव्हा घुगऱ्याचे दोनच दाणे काय ते साथीला होते. तुळशीवृंदावन आता साक्षीला आहे, तिचीच बाळावर सावली आहे. दयनीय अवस्था पाहून चंद्रही लाजेने मान खाली घालून निघून जाईल. तेव्हा कुणाची आशा बाळगायला नको हे उद्गार किती प्रखर, किती जळजळीत आहेत! त्या मातेची आणि बाळाची दारुण अवस्था समाजाला जागृत करायला समर्थ नाही काय?

आणि मग–

पुत्राचा अंत झाला; दुधाच्या थेंबाविना, अन्नाच्या कणाविना! बाळ तडफडून तडफडून मेला. पुत्राने अभागी मातेची माया टाकून दिली. परिस्थितीच्या तीव्रतर धगधगत्या ज्वालेत उडी घालून आपली कैफियत सादर करायला तो देवलोकी निघून गेला. त्यावेळी मातेने हृदय बडवून, दगडावर माथा आपटून जो आक्रोश मांडला त्यासंबंधीचे हे हृदयभेदी शोकगीत पाहा :

*बाळ साजरं गोजरं*
*मया लावूनिया गेलं*
*माहं कारज हरपलं....अगा ए देवा ॥*

*नाई देल्ल थेंब दूध*
*म्हूनशा सोडलास नाद*
*अता देऊ कोना हाक?...अगा ए देवा ॥*

*बाबा, रानाचं पंखरू*
*अगा जाऊ कोठी धरू?*
*कवन्या राहुळात जाऊ?....अगा ए देवा ॥*

*बाळा इवलाले डोरे*
*इवलाले हात पाय*
*गेला कायातला जीव....अगा ए देवा ॥*

*तान्या रुसून तू गेला*
*कोन खाजिना चोरला?*
*समदा देह पेटला...अगा ए देवा ॥*

*नाई हासला येक येळ*
*नाई बोलला घळीभर*
*खसलं उभार उरावर....अगा ए देवा ॥*

*बाळा, गेलास देवाघर*
*देजो गावची खबर*
*खाक झालं समदं घर....अगा ए देवा ॥*

*देवा, येकटी मी येक*
*आता नोको मले भीक*
*माह्या बाळाची झाली राख...अगा ए देवा ॥*

ग्रामीण विभागाच्या टापूटापूत बालगोपालांच्या विश्वासंबंधी जशी अत्यंत हृदयंगम अशी असंख्य लोकगीते आहेत तशीच असंख्य हृदयद्रावक गीतेही आपल्या गुणवैशिष्ट्यांनी खेड्यापाड्यातील आयाबायांच्या ओठावर सारखी तरंगत आहेत. ती संशोधून त्यांचे एकाग्रतेने रसग्रहण केले म्हणजे निरक्षर स्त्रियांच्या अलिखित, संपन्न प्रतिभेचे व रसपूर्ण कल्पनावैभवाचे अभिमानाने कौतुक केल्यावाचून राहावत नाही.



# विदर्भातील बालविषयक लोकगीते

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे, यवतमाळ

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

**प्रास्ताविक** : प्रस्तुत गीत मध्य-वऱ्हाडमधील ब्राह्मणी बोलभाषेतील आहे. यवतमाळला माझ्या पुतण्याच्या शेजारी दारव्हयाचे श्री. दाणी हे गृहस्थ राहतात. त्यांना ३–४ वर्षांचा दत्तू नावाचा मुलगा आहे. श्री. दाणी यांच्या भावाची पत्नी सौ. दाणी हिने कृष्णाच्या जागी दत्त असे म्हणून हे गीत गायिलेले माझ्या कानांवर पडले. पुतण्याचेच समजून तन्मयतेने त्या बाईने गीत म्हटल्यावरून माझे लक्ष आकृष्ट झाले. ते गीत मी उतरून घेतले आणि मूळ गीत कृष्णाचे संबंधी असून त्या भागात प्रचलित असल्याचे कळले. कृष्णाच्या बालपणीच्या सहजसुंदर लीला प्रेमळ आणि घरगुती शब्दात वर्णिल्या असल्या-मुळे ते गीत कोणातरी प्रादेशिक स्त्रीने रचले असावे. कृष्णाच्या खोड्यांबद्दल, त्याच्या लीलांबद्दल अथवा गोपीच्या गाऱ्हाण्यांबद्दल अनेक लोकगीते सर्वत्र प्रचलित आहेत. त्यांपैकीच हेही एक—

## कृष्णाच्या खोड्या

माझ्या कृष्णाच्या खोड्या अति गुंगोनि जाती
अशी धाकात ठेव त्याला जरा ।
ग यशोदे, असेल तुज तो हिरा ॥ धृ० ॥

माझ्या घरी कृष्णा । पळत पळत आला ।
दह्या दुधाचा काला केला ।
गोप मित्रांना वाटून दिला ।
एक लोण्याचा गोळा आणून ।
उशाशी ठेवून दिला ।
कृष्णाची आजी काय म्हणेल ।
ग सुनबाई चोरुनि खाणे काय बरे ॥ १ ॥

माझ्या वेणीला बांधून दोरी ।
दिली खुंटीला टांगून साडी ॥
सकाळी उठता क्षणी विसकटली माझी वेणी ॥
खुंटीची आली जरा आणी ।
माझ्या दाताचा झाला चुरा ॥ २ ॥

घट घेऊनि मी पाण्याला गेले ।
घट यमुनेच्या पाण्याने भरले ।
झप झप घराकडे आले ।
दारात येता क्षणी, पडून मी झाले लंगडी ।
मातीचे घट गेले फुटून ।
ग वरती, सासूने काडले कुटून ॥ ३ ॥

तांटली घेऊन मी देवाला गेले ।
डोळे मिटून जळ फिरविले ॥

*ताटली कृष्णाने नेली । चंगळ पेढ्यांची केली ।*
*आणि म्हणतोय, की नेला कसा ।*
*ग गोपिके, पेढा मी खाल्ला कसा ॥ ४ ॥*

*आई मी तुझा लहानसा बाळ ।*
*गोपी घेतात माझ्यावर आळ ॥*
*नको करू माझा असा छळ ।*
*मी जाईन यमुना तीरी । या गोपिकांच्या पायी ॥*
*आणा आणा, माझ्या कृष्णाला परत आणा ।*
*देवा तुला मी मागते क्षमा ।*
*पुन्हा दुखविणार नाही त्याला ॥ ५ ॥*

**प्रास्ताविक :** प्रस्तुत गीतात चेंडू हा शब्द सर्वत्र चंडू असा वापरला आहे. हे गीत श्रीकृष्ण, बळीराम आणि त्यांचे सवंगडी हे यमुनेच्या तीरावर जो चेंडूचा डाव खेळले व ज्याचा शेवट कालियामर्दनात झाला ती कथा या गीतात गोविली आहे. चांदा जिल्ह्याला लागून असलेल्या मराठवाडा (माणिकगड किल्ल्याचा परिसर) विभागात प्रचलित असलेल्या मराठी बोलीत हे गीत रचिले आहे. गीतात म्हटल्याप्रमाणे या गीताची रचना मिळविणारा कोणी शाम भारती असून सखाराम गुरव नावाच्या इसमाने ते गीत इथे गायिले आहे. माणिकगड किल्ल्याच्या परिसरात चंदनबाई या आमच्या शेतीच्या गावी मुक्काम असताना शेतावर काम करणाऱ्या वाघकुणबी नावाच्या मनुष्याने हे गीत म्हटले; ते त्याच्याच भाषेत तेव्हाच म्हणजे ता. २४-३-१९४३ ला उतरून घेतले. तत्रस्थ मराठी बोलीचा तुलनात्मक अभ्यास करण्यास या गीताचा उपयोग होईल. 'ण' च्या ऐवजी 'न', 'व' च्या ठिकाणी 'र', कृष्ण चे रूप क्रिस्न.

## चेंडूचे गाणे

*श्री क्रिस्न खेळितो चंडू सौंगडी मिळून ।*
*चंडु ऐका जडित रत्नाचा खेळे मनमोहन ॥ धृ० ॥*

सौंगडी जमले लहान थोर जान ।
वाटेनं चालिले मस्करी करून ।
चंडु घेतला बळिरामानं ।
बळिराम मारितो चंडु । उडाला गगन ।
या चंडुची पुरुषार्त (र्थ) तुम्ही ऐकाना ।
गेला एकवीस स्वर्गावरतं सत्य जाना ।
चौदा भुवनं हिंडुनी आला कोठे गवसेना ॥
चंडु करंव (कळंव) रुक्शा (वृक्षा) वरि आला ॥
पाना तेथ येउनि चंडु गुंतला ।
डाव श्रीहरी वरतं आला ।
सौंगडी म्हणे अरे क्रिस्ना । डाव दे आमुचा ॥ १ ॥

चंडु ऐका जडित रत्नाचा ।
खाली डोह कालियाचा ।
बारा बारा कोस वास तयाचा ।
तेथं मिर्तु होय पक्षाचा ।
त्या डोहावरनं फांदा आला ।
करंवाच्या त्या फांद्या वरतं चंडु गुंतला हरिचा ॥
सौंगडी म्हणे अरे क्रिस्ना डाव दे अमुचा ।
हा डाव तुम्हावर आला चंडु तुमचा ।
हरि करंब रुक्शा वर चढुन ।
फांद हालवितो मनमोहन ।
चंडु पडला डोहात जाउन ।
श्री क्रिस्न म्हणे आपुला डाव देईन ।
चंडु ऐका जडित रत्नाचा ॥ २ ॥

हरि म्हणे पेंद्याला ।
डाव आम्हा वरति आला ।

चंडु डोहामधि पडला ।
या चंडुकरिता उडी डोहात घालीन ।
म्हणे सौंगड्यासी डाव तरी आपन देईन
सौंगडी म्हणे अरे क्रिस्ना पुरे कराना ।
सोडला डाव आपन खाली उतराना ।
सौंगडी करे कारुणा (करुणा) ।
नको उडी घालु मनमोहना ।
याहो हाक मोकलील माता ।
कर जोडुन लागतो चरना ।
हरि काही केल्या ऐकेना ।
श्री क्रिस्न म्हणे आपुला डाव देईन ।
चंडु ऐका जडित रत्नाचा ॥ ३ ॥

चंडु करिता घातली उडी ।
ज्याने पाताळि घेतलि उडी ।
मग थरारले सौंगडी ।
बळिराम पिटे उर पोट म्हणे घात जाला ।
या चंडु करिता क्रिस्न डोहात बुडाला ।
गेली वात गोकुळी येश्वदेनं आकांत केला ।
येश्वदा नग्र (नगर) लोक धावुनी आले ।
तेतीस कोटी सुरवर हे सर्व करिति वीचार ।
तेथ भरुनि वाहे नीर ।
येणेपरि जाला कल्लोर (कल्लोळ) ।
अवघे म्हणती चंडु करिता । हरीचा गेला प्राण ।
चंडु आयका जडित् रत्नाचा ॥ ४ ॥

चंडु करता क्रिस्न डोहात बुडाला ।
जीने जीन्हे (जीणे) जी व्यर्थ । मुक्त होऊ डोहात ।

असे म्हणउनि अवघे । उड्या घालु पाहात ।
कोणी आटोपिना एकमेका ।
तो हरि पाताळी गेला ।
त्याने महाल सोन्याचा पाहिला ।
त्या महालात परवेसला ( प्रवेशला ) ।
त्या पलंगावर कालिया निजे आपन ।
चंडु आयका जडित रत्नाचा ॥ ५ ॥

तेथं जाउन पाहे आपना ।
जवळ बैसली त्या शेषाची पद्मीना ।
तिनं पाहिला श्री किस्न भगवान ।
ते पद्मिन काय बोलली श्री क्रिस्नाला ।
तुम्ही प्रान तरी वाचवा आता घटकेला ।
हा जागा होइल कालिया गिरल ( गिळल ) तुम्हाला ।
श्री क्रिस्न म्हणे जे चंडु दे आम्हाला ।
तेव्हा पद्मीन काय बोलली ।
तुम्ही काहो निशा चढवली ।
तुमची का अक्कल गेली ।
चंडु पडला उशा खाली ।
श्री क्रिस्न म्हणे आपुला चंडु घेईल ।
चंडु आयका जडित रत्नाचा ॥ ६ ॥

कौतुक करती श्रीरंग ।
मुरली वाजवे मंजुळ राग ।
कालिया श्री क्रिस्नावर छापा घाली ।
त्या दोघांची पाहा कुस्ती पैली वहिली ।

कालिया श्री क्रिस्नाला आटा घाली
आंग फुगडत हरीना त्यावरी सोय पटवोनी ।
त्याच्या नाकी टोचुन एसन ।
चंडु घेऊन आनंदानं ।
त्याच्या फनीवर नाचे मनमोहन ।
तेव्हा धावली पन्नीन ।
धाऊन धरे चरण ॥ ७ ॥ चंडु आयका ॥

तेव्हा पन्नीन बोले श्री क्रिस्ना उत्तर ।
आपन दिसता महापूर्न अवतार ।
म्हनून कालिया केला जर्जर ।
पंचाआरती घेउनी । वोवाळी श्री क्रिस्नाला ।
बाहीर निघाला घेउनि कालियाला ॥
नग्र लोक पळू लागत भेउन त्याला ।
नंदा यश्वदा क्रिस्न आले गोकुळाला ।
येश्वदा ओवारी (ओवाळी) श्री क्रिस्नाला ।
म्हने कालियासि जाऊ द्याना ।
सोडला कालिया केला मुक्ता ।
शाम भारती कवन मीळवी जाना ।
सखाराम गुरव म्हणे चंडु खेळाना ।
चंडु आयका जडित रत्नाचा ॥ ८ ॥

**प्रास्ताविक :** प्रस्तुत गीत छत्तीसगडच्या हिंदी बोलीच्या सान्निध्यात राहणाऱ्या मराठी भाषिकांच्या बोलीची हिंदीच्या सान्निध्याने किती विकृती झाली याचे उदाहरण आहे. गडवेरा हे गाव हल्ली मध्य प्रदेशात आहे; पण आजपर्यंत त्याचा नागपूरशीच घनिष्ट संबंध होता. प्रस्तुत गीत आमचे मित्र आणि झाशीच्या राणी लक्ष्मीबाईच्या बंधूंचे पुत्र श्री. (आता कै.) गोविंद

चिंतामण तांबे (नागपूर) यांनी सुमारे दहा वर्षांपूर्वी आम्हांस दिले. शब्दावर टीपा दिल्या आहेत, त्यावरून अर्थबोध होण्यास मदत होईल. गाडीतून प्रवास करून तेथून मुलांना खाऊ आणला त्याचे विनोदी भाषेत या गीतात वर्णन केले आहे.

## बबियाजूचे गाणे

(चाल–तेली के रे तेली के । पाच पसेरी के)

*दद्दामन्ती बबियाजू । बबियाजू*
*बबियाजूचे दावजू । दावजू*
*दावजूनी घेतले बेलवे[२] । बेलवे*
*गडपेऱ्याची तैयारी[३] । तैयारी*
*एक रेहेंकुवा[४] घेऊन आले । घेऊन आले*
*बस्ना खुर्ची ठेवून घेतली । ठेवून घेतली*
*बेलवे जोतुन[५] दै[६] चाबूक । दै चाबूक*
*बेलवे सूटौ[७] झिरण्यावर । झिरण्यावर*
*तोफा दागल्या किल्ल्यावर*
*अशे काहूं बेलवे बमकले[८] । बमकले*
*रेहेंकुवा पटकून[९] उचकले[१०] । उचकले*
*कऱ्या खलतुन लटकले । लटकले*
*चक्के धुऱ्यातुन निपकले[११] । निपकले*
*भदाक दद्दाहरे उतरले । उतरले*
*करुन लागले आय रे । आय रे*
*दावजू एकदम जो चंपत[१२] । जो चंपत*

१ दद्दा (दादा), बबियाजू (बाबा-बावाजी), दावजू (दावनी) ही व्यक्तींची नावे
२ बैल. ३ तयारी. ४ गाडीचा एक प्रकार. ५ जुंपून. ६ दे. ७ सुटले. ८ चमकले.
९ आटपून. १० पळाले, ११ निसटले. १२ पळाले.

बेलवे खदेरुन[१] घेऊन आले । घेऊन आले
पूंछ मरोडून[२] हाकवले । हाकवले
गडपेऱ्यावर घेऊन गेले । घेऊन गेले
शेरभर घुले[३] बशेते । बशेते
मगद पावभर जलेब्या । जलेब्या
चिरोंजी दाणे बतियां । बतियां
मेळ्या[४] वरतुन खरीदल्या । खरीदल्या
गुच्चुन बेलव्यात अरैया । अरैया
खेचुन त्यांची पगैया[५] । पगैया
धूमधडाका दवडावले । दवडावले
घरी येऊन बेलवे तरयावले[६] । तरयावले
तारीला शेरणी[७] खवावली[८] । खवावली
पठोनी प्रमीला सोडू पाठवली । पाठवली
सागर गजरात छपावली[९] । छपावली ।

१ हाकत. २ मुरडून. ३ मिठाईचे प्रकारांची नावे. ४ यात्रा ५ पाय. ६ थांबले. ७ यात्रेतून आणलेला खाऊ. ८ खावविली, खावयास दिली. ९ सागर ग्याझेटात छापविली.



# बाळ राजस ग माझा

श्री. न. शे. पोहनेरकर, औरंगाबाद

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

**स्त्री**-जीवनात अनेक भावनांचे अनुबंध आहेत. माहेरच्या मांडवाखाली स्त्रीच्या जीवनलेखाला प्रारंभ होतो. आईबाप, बहीणभाऊ, शेजारी-पाजारी अशा अनेक आप्तेष्टांच्या भावबंधांनी हा लेख लिहिला जातो. परंतु ही स्थाने तिच्या जीवनलेखातील स्वल्पविराम होत. विवाह झाला आणि तिने संसाराच्या उंबरठ्यावर पाय दिला की, तेथे अर्धविराम येतो. योगायोगाने सर्व काही मनासारखे झाले तर ठीकच आहे; नसता, उद्गारचिन्हांच्या सावलीखाली तिला वावरावे लागते. मात्र जेव्हा तिच्या कुशीला पुत्रजन्माचे भाग्य लाभते तेव्हा सार्थकतेच्या पूर्णविरामाने ती आपला जीवनलेख पूर्ण झाल्याचे समाधान मानते. मराठीच्या विखुरलेल्या लोकसाहित्याची आपण वरवर जरी पाहणी केली, तरी स्त्री-जीवनाचा आलेख हा अशा प्रकारचा पहावयाला मिळतो. तिच्या अंतःकरणात आपलेपणाच्या ज्या भावना ओसंडून वाहताना दिसतात त्यांचा खराखुरा उद्रेक जेव्हा ती आपल्या बाळराजसाला ओव्या गाते तेव्हा झालेला आढळतो. इतर नात्यागोत्याची माणसेही तिला जवळची वाटत नाहीत असे नव्हे. आईबापांना तर ती

काशी-प्रयागाची उपमा देते. त्यांच्याविषयीचा अभिमान तिच्या अंतःकरणात ओतप्रोत असतोच. तीच गती भाऊबहिणींच्याविषयी. आपल्या दाराशी हत्ती-घोडे झुलत असले तरी भाऊबीजेच्या दिवशी आपल्या गरीब भावाच्या चोळीची तिला मनोमन असोशी असतेच. हे सर्व अनुबंध अत्यंत हृद्य आणि मनोहर आहेत हे जरी खरे असले, तरी पण सासरच्या संसारात तिच्या प्रेमाचा आणि वात्सल्याचा मध्यबिंदू केवळ एकच असतो आणि तो म्हणजे तिचा बाळराजस! तिच्या अंतःकरणाची भावगंगा या ठिकाणी मात्र अतिशय पवित्र आणि वत्सल रूपाने प्रकट होते. आपल्या जीवनाचे हे सार्थक आहे अशी तिची मनोमन भावना आहे. पोटी पुत्र, हे तिच्या जीवनतपस्येचे चिरवांच्छित फळ आहे. आणि म्हणूनच आपण जेव्हा लोकसाहित्यातून या बालजीवनाविषयीचे उल्लेख पाहतो, तेव्हा तेथे आपणास अनेक प्रकारांनी या बाळराजाला सजविलेले आणि गायिलेले दिसते.

मानवी जीवनातच बालसृष्टीचे आगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान आहे. ती आहे रत्नसृष्टी. तिच्यासाठी जिवाभावाची न बहुमोलाची अशी स्त्रीची वत्सलता दुथडी भरून वाहते. वाटेल तो त्याग त्यासाठी करणे तिला अवघड वाटत नाही आणि म्हणूनच ती आपल्या गावच्या शिवेवर असलेल्या संतुबाईची सारखी प्रार्थना करीत असते की—

*शीवेचे ग संतुबाई । बाभुळ ग बनी नांद*
*बाळराजसाला माझ्या । आऊक्षाचा नाडा बांध ॥*

बालसृष्टीची पहिली देवता म्हणजे संतुबाई. आधी तिने आऊक्षाचा नाडा बांधावयाचा. परंतु कदाचित मुळातच तेथे आयुष्याची वाण असली तर त्याला उपाय काय? या त्यागी मातृदेवतेला ती अडचण वाटत नाही. तिचा जन्मच मुळी त्यागाच्या तपस्येसाठी असतो. आधी ती कन्या म्हणून असतानाच मातेची ममता आणि महत्ता यांची जाणीव करून घेते. आईपण आणि त्याचे कष्ट हे तिला ठाऊक असतात. हरघडी तिला याची जाणीव असते.

*काटा मोडला पायात । बसले ग भुईला*
*जन्मकाळाच्या येळला । कसं वाटलं आईला ॥*

संसारातील सुखदु:खाच्या प्रत्येक प्रसंगी तिला आपल्या आईची आठवण होत असल्याने, आपल्या बाळराजसाविषयीची तिची ममता आणि वत्सलता आकाशाला देखील ठेंगणे करतात. आयुष्य कमी-अधिक असण्याची शक्यता असली तरी ती आत्मविश्वासाने सांगते—

*माझ्या रे आऊक्षाचा । मी रे ईनवीते लेप*
*बाळ राजसा रे माझ्या । पांघरा रे बाप त्योक*

आपला पती आणि बाळराजस यांच्यासाठी ती आपल्या अख्ख्या आयुष्याचा लेप विणविते आणि त्या सावलीत त्यांची जोपासना करते. इतकेच नव्हे तर

*माझं रे आउक्ष । उनं कर रघुपती*
*माझ्या वानीच्या बाळाला । घाल शंभर भरती ॥*

कदाचित तिच्या बाळराजसाला 'शतं जीव' म्हणताना नियतीला संकोच वाटत असला तर ती वात्सल्यमूर्ती माता परमेश्वराची प्रार्थना करते की, माझं आयुष्य कमी कर आणि ते बाळाच्या नावाने जमा म्हणून ठेवून त्याला 'शतायुँव पुरुषः' या श्रुतिवचनाची सार्थकता करणारा होऊ दे. जगण्यावाचून जीवनाला अर्थच नाही. बाळराजसाच्या आयुष्यात कसलाही तुटवडा भासू नये ही तिची आंतरिक तळमळ आहे. आणि म्हणूनच शिवेच्या संतुबाईपासून श्रीरामचंद्रापर्यंत ती सर्व देवांना एकच मागणे मागते की, वाटल्यास माझे आयुष्य कमी करा; परंतु माझ्या बाळराजसाला मात्र शंभर पूर्ण वर्षांची भरती भोगू दे. म्हणजे जीवनातील कर्तृत्वाला तेज येण्यासारखे काही तरी करणे त्याला शक्य होईल. ही आहे त्या बाळराजसाच्या मातेची ममतेची ओढ आणि वात्सल्याची तहान.

वासरांनी गोठा भरावा आणि लेकरांनी घर भरावे ही अपेक्षा जुन्या मराठी कुटुंबात असे. ज्याच्या घरी ही समृद्धी आहे तिथे भाग्यलक्ष्मी नांदते अशा संकेताने त्यांचे व्यवहार चालत. कुटुम्बनियोजनाची दृष्टी त्यांना नव्हती आणि ती येण्याचे कारणही नव्हते. काळीच्या कसदार कृपेवर त्यांना कशाचीच उणीव भासत नव्हती. अशा परिस्थितीत एखाद्या घरी एकच एक बाळ असला, तर त्याची फार मोठी माया आणि मोल होत असते. मुलांच्या जोड्या असल्या तरी त्या दणकट कणखर असावयाच्या.

*एकामागं एक । येतील धाव धुडी*
*बाळ राजस ग माझे । भीम-अर्जुनाची जोडी ॥*

आपल्या वंशवेलीची भूषणे आपल्या धर्म आणि संस्कृतीच्या परंपरेला साजेशी अशीच असावीत ही अपेक्षा त्या भाबड्या मायमाउल्यांची असे. एकुलत एक असला तरी त्याचे जीवन उजळले जावे, तेजस्वी व्हावे, म्हणून ती त्य तान्ह्याला लहानपणापासूनच घुटीबरोबर महनीयांच्या जीवनगाथेचे वेढे पाजीत असे.

*काय पुन्य केलं । अंजनी ग माझे बाई*
*देवा माझ्या मारोतीनं । डेरे दिले गावोगावी ॥*

माझ्या बाळाने जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ट व्हावे, अवल्या देशभर त्याच्या कीर्तीचे चौघडे झडावे, म्हणून ती अंजनीमातेला साद घालते आणि आपला एकुलता एक बाळ तिच्या बाळासारखा महान कर्मयोगी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करते. आपल्या भावी आयुष्यात आपण आपल्या बाळाचा तसा उत्कर्ष पाहू ही तिला अपेक्षा—नव्हे आत्मश्रद्धा आहे; म्हणूनच कुणी तिला 'मुलगा एकच आहे काय?' असे म्हटले, तर तिच्या भावनात्मक जगात अस्मितेचे धुमारे मोहरतात आणि ती म्हणते—

*एकूलता एक । म्हनू नग सईबाई*
*बाळ राजस ग माझा । मला शंभराच्या ठाई ॥*

नाही तरी तिच्या श्रद्धामय जीवनात शंभर कौरवांपेक्षा पाच पांडवांचे मोल अधिक आहे. म्हणूनच ती आपल्या बाळराजसाला शंभराच्या ठिकाणी, किंबहुना त्यापेक्षा अधिक मानते. अर्थात तिचे प्रेम एका विशिष्ट दृष्टीचे आहे. आपणाला परमेश्वराने मानमरातब दिला, वैभव दिले, आपला सुखी संसार सजविला, तरी पण या सर्व फळाचे मूळ कारण आपण नव्हे; ही त्या महान महनीयांची देणगी, त्यांचा आशीर्वाद आणि पूर्वजांची पुण्याई आहे, याचा तिला विसर पडत नाही. परमेश्वर आणि पूर्वज यांच्या पायाला ती सतत स्मरत असते. एक असो वा दहा असोत, घरी श्रीमंती असो वा नसो, हा सर्व आपल्या पूर्वजांच्या पुण्याईचा प्रभाव आहे हे ती कधीच विसरत नाही.

*येकुलता येक । नको म्हणू सारा ईळ*
*बाळ नेनंता ग माझा । वडिलांची पायधूळ ॥*

आपल्या जीवनमार्गावर तो यथापूर्वमकल्पयत अशा धोरणानेच विजयी आणि यशस्वी होत जावा हीच तिच्या भाबड्या मनाची प्रामाणिक असोशी. आपले बाळ वंशाचे एकटे रोपटे, ही भावना दाखविताना ती आपल्या परिचित जीवनातून बाळाला उपमा देते—

*येकुलता येक । जसा कातनीचा तंतू*
*बाळराजसाला माझ्या । आउक्ष ग किती चिंतू ॥*

कातणीचा तंतू ही उपमा आपल्या एकुलत्या एक लेकराला देताना तिच्या जिवंत काव्यात्मक कल्पनेची तर धार दिसतेच; परंतु त्याबरोबरच त्या कोमल जीवाशी तिचे जडलेले नाजुक भावबंधही अत्यंत हळुवारपणे प्रत्ययाला येतात. अर्थात अशा आपल्या आतड्याच्या तंतूची जोपासना आपण करीत असतानाच त्याला परमेश्वराचे पाठबळही अवश्य हवे ही तिची मनोमन अपेक्षा आहे. म्हणून ती सांगते—

*असा येकुलता येक । त्याला नारायेन तारी*
*देली देवाजीच्या हाती । माझ्या जहाजाची दोरी*

माझी जीवननौका मी परमेश्वराच्या पायी ठेविली आहे. ती कातणीचा तंतू असली तरी आपल्या पुण्याईने आपल्या जीवनाच्या सार्थकतेची परमावधी आहे हे ती आत्मविश्वासाने म्हणते. पुत्रवंती असो की कन्यावंती असो; परंपरेने पुत्राचे महत्त्व असले तरी कन्यकेलाही आपल्या आईच्या प्रेमाची पाखर तितक्याच आत्मीयतेने लाभते.

*ह्याग ल्योका परीस । ल्येक कशानं ग उनी*
*अशी माझी प्रानसयी । हिरा न्हाई हीरकनी ॥*

हिऱ्याप्रमाणेच हिरकणीलाही व्यवहारात मोल आहे. म्हणून आपल्या संसारातील या बालसौख्यात मुलाच्या बरोबरीने मुलीलाही निश्चित महत्त्व आहे.

लोकसाहित्यातील उपमासृष्टी अशीच विलोभनीय आहे. व्यवहारातील अमोल वस्तू म्हणून रत्नांची उपमा संस्कृत-साहित्यात आपण पाहतो. गृहरत्नानि म्हणून या बाळ–गोपाळांचा उल्लेख या पंडिती साहित्यात आहे. बालकांच्या कोमलपणाकडे लक्ष ठेवून त्यांना फुलांची उपमा अनेकांनी दिलेली आहे. अनेक कवींना आकाशात, धरेवर अशी फुलांची पखरण पाहत असताना माझ्या घरीही फुले असे म्हणण्याचा मोह अनावर होतो. परंतु लोकसाहित्यातील या बालसृष्टीचे उपमावैभव काही अपूर्व असे आहे.

*तान्हया बाळा खेळ । असा तुळशीच्या मागं*
*बाळ माझ्या नेनंत्याला । केवड्या ऊन लागं*
*शेजी लेनं लेली । अंग झाकून वूगडी*
*वानीचं ग माझं बाळ । माझी संपत उघडी*
*देवाला मागते । लेकुरवाळा ग शेजार*
*या ग राघु मैनांचा । असा भरला बाजार*

एक का दोन! संसाराची मर्यादा, व्यवहाराचा व्याप जेवढा आणि जितका मोठा तितकीच या उपमांची रेलचेल! मात्र यात काव्यातील संकेत असतीलच असे नव्हे. काही काही उपमा अतिशय अभिनव आणि रोखठोक; परंतु आशयाची अभिव्यक्ती मात्र पुरेपूर. मातीच्या वाड्यात आणि कुडाच्या झोपडीत खेळणारी ही बालसृष्टी आहे. तिला नागरी जीवनाचे संस्कार नाहीत. निसर्गाचा कसदार सहवास आहे त्यांना; म्हणून ती बाळसेदार असतानाच अतिशय चपळ आणि धारदार आहेत.

*राया सावळ्याचं माझ्या । अंथरूण झालं गोळा*
*बाळ राजस ग माझा । नाग खेळला गव्हाळा ॥*

आपल्या मुलाच्या चपळपणाची आणि तल्लख लाघवाची तुलना गव्हाळ्या नागाबरोबर करताना यातील उपमेची अनन्यसाधारणता मनावर बिंबल्या-वाचून राहत नाही. फुले, रत्ने यांपेक्षा देखील या मायमाउलीच्या गव्हाळ्या नागात काही विशेष खुमारी आहे हे कुणालाही सहज कळून येईल. अर्थात अशी ही चपळ मुले शिष्टपणाच्या आणि सभ्य शिस्तीच्या अशा लीला थोड्याच

करणार? त्यांच्या लीला खऱ्या अर्थाने खोड्या असणार. मुलांना खोड्या करायलासुद्धा त्यांच्या अंगी सामर्थ्य असावे लागते. जन्मापासून इंजेक्शन आणि बाटल्यांच्या बोंडल्याने वाढ झालेल्यांना ते जमणे नाही.

*शेजारीणीबाई । सांभाळ आपलं वाळवन*
*बाळ राजसाचा माझ्या । चेंडू आला बागेतून*
*हातात इटीदांडू । काखमंदी घेतो गाडा*
*बाळ राजसाला माझ्या । उन्हाडाला वाट सोडा*
*अग शेजारीनीबाई । सांभाळ आपल्या दाळी साळी*
*बाळ राजसानं माझ्या । मांडली ग चेंडूफळी*
*वाळ्या साखळ्यानं । दनानलं माझं जोतं*
*वानीचं ग बाळ माझं । सये वसरीला खेळतं*
*वाटनं ग चालताना । उग जाईना वाटनं*
*बाळ राजस ग माझा । पोरं डिवचितो बोटानं*

आपल्या आजीबाईच्या झोळण्याबरोबर झोंबी खेळण्यापासून तो आरंभ करतो आणि मग त्याच्या खोड्या दिसामासी वाढत जातात.

लोकसाहित्याच्या या बालसृष्टीत दृष्ट लागणे आणि अपशकुन यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. जुन्या भावनिक जीवनात या दृष्ट लागण्याला फार जपले जात असे. एखादे मूल चांगले गुटगुटीत, खेळकर, शांत व सुंदर असे असले आणि त्याच्याकडे जर एखादी बाई सारखी टक लावून पाहू लागली, तर ते मातेच्या हळुवार मनाला कधीच मानवत नसे.

*येका मागं येक । येतेत माझे रावे*
*दृष्ट व्हईल ग सये । पापीनी ग खाले पाहे*
*पापीनीच्या डोळां । पिळावा ग लिंबरस*
*तिनं माझा राजहंस । न्याहाळीला सावकाश*
*पापिनीची दृष्ट । मिठाची ग झाली लाही*
*बाई नेनंती ग माझी । कोमेजली जाईजुई*

*पापिनीची दृष्ट । गेली पाळन्यावरूनी*
*बाळ राजस ग माझा । उभा कळसाला धरुनी*
*इसबंदाची ग कांडी । बांधीते पाळन्याला.*
*बाळराजसाच्या माझ्या । दृष्ट झाली खेळण्याला*

लेकरू किरकिर करू लागले, कणकणू लागले म्हणजे मातेच्या मनात पहिली शंका निर्माण होते ती दृष्टीची. आपल्या बाळाला दृष्ट लागली असली पाहिजे या भावनेने मग ती आधी आपल्या पदराच्या पिळ्याने त्याची दृष्ट काढते. नंतर फड्याने दृष्ट काढते. या गोष्टीने साधी दृष्ट असेल तर ती उतरते. परंतु अधिक जोराची अशी दृष्ट लागली तर इसबंदाची कांडी पाळण्याला आणि बाळराजाच्या दंडाला बांधावी लागते.

*मला गरज पडली । इसबंदाच्या रोपाची*
*बाळ उछावाला नेला । दृष्ट पडली पाप्याची ॥*

याखेरीज भाकरतुकडा ओवाळून टाकणे, दृष्टीचे मंत्र टाकणे हेही उपाय करण्यात येतात. अशा दृष्टी वारंवार लागू नयेत म्हणून ज्याप्रमाणे इसबंदाचा तोडगा करण्यात येतो त्याचप्रमाणे बाळाच्या गळ्यात दृष्टमणीही ओवून बांधण्याची चाल आहे.

संकेत आणि परंपरा यांवर आधारलेल्या काही निषिद्ध गोष्टी या बाल-सृष्टीच्या आचारसंहितेत आहेत. याला तर्कांचा आधार नाही. परंतु परंपरेने यांना मान्यता दिलेली आहे.

*पाळण्याला पाठ । शेजी लाऊनीया गेली*
*राघू माझा पाळण्यात । मग मला सय झाली*
*दिव्याच्या ग सावलीला । नग बसू सखेबाई*
*नेनंता ग बाळ माझा । तुझ्या पाठीचा देसाई*
*अग तिनी सांजा झाल्या । दिवा लाव राहीबाई*
*बाळ राजस ग माझा । गवळी बांधी तान्या गायी*

*तिन्ही संध्याकाळी । दिव्याची ग जलदी करा*
*मोत्या अन् पवळ्यानं । लक्ष्मीची वटी भरा*
*तिन्ही संध्याकाळी । दिवा लावा लवकरी*
*नेनंता ग बाळराजा । जावळाचं बाळ घरी*
*तिनीसांजा लक्ष्मी आली । राहृया मला ती ग ठाव*
*बाळ राजसा रे माझ्या । देवाचं रे घर दाव*
*माझ्याहूनी ग धाकटा । माझ्या परी चढ झाला*
*बाळ राजस ग माझा । भुजच्या म्या आड केला ॥*

असे कितीतरी आचार अलिखित अशा परंपरेने आजपर्यंत चालत आलेले आहेत. यांची नोंद हे आचार पाळीत आलेल्या मायाबहिणींनी आपल्या अभिजात रसिक दृष्टींनी अक्षरस्वरूपात करून ठेविली आहे. आजच्या पिढीलाही हे संकेत आणि प्रकार निश्चित माहीत आहेत. मात्र उद्याच्या उगवत्या पिढीत या सर्व आचारसंहितांची माहिती होण्यासाठी संदर्भ विवेचनांची सोय आवश्यक ठरणार आहे, असे आज म्हटल्यास ते अयोग्य ठरणार नाही.

आपल्या मनातील भावभावनांची नोंद आपण येथवर पाहिली. 'बाळ राजस ग माझा' ही स्त्रीजीवनातील फार मोठी सफलता मानली जात असल्याने त्याच्याविषयी लोकसाहित्यात उभारलेले कल्पनांचे कुंज पाहिले. परंतु याखेरीज अजून एक दालन या बालसृष्टीविषयीचे आपणांस आढळते. मूल रडत असताना त्याला जवळ घेऊन शांत करण्यासाठी, त्याला उगे करण्यासाठी स्त्रिया काही गद्य-पद्य अशी काव्ये उच्चारीत असतात. त्याला थापटीत थापटीत किंवा डोलवीत डोलवीत अशी काही वाक्ये उच्चारावयाची की, ज्याला अर्थ म्हटला तर असतो आणि म्हटला तर नसतो. ती वाक्ये तुटक असतात. संदर्भाची साखळी त्यात असेलच असे नाही. मात्र यमक–अनुप्रासांनी आणि ठराविक शब्दांच्या जोडणीने तेथे नादमधुरता आणि लय आपोआपच उत्पन्न होतात. पंडिताना त्यात अर्थ सापडणे अशक्य आहे. परंतु बालमनाला त्या ठराविक नादश्रवणाने आणि यमकांच्या आवृत्तीने आपल्या रडण्याचा विसर पडतो. ते गप्प बसते. खऱ्या अर्थाने बालसाहित्य ते आहे. बाळ त्या शब्दसंहितेने मोहित होतो. यात नाद-माधुरीचाच खेळ विशेषत: असतो.

टिकली मिकली केली
येकली शेता गेली ।
तिकडून आला भाऊ
तुझी टिकली पाहू ।
काय पाहतोस भेल्या
शेत खाल्लं कोल्ह्या ।
खाल्लं तर खाऊ दे
तुझी टिकली पाहू दे ।
बाळ बंगऽऽड । हिरवं अंगऽऽडं
बाळ अंबेबनात जातं
अंबे तोड तोडू खातं
घरला पळ पळू येतं

हारा बाळा हरकूलं
बाळाच्या हाती कुरकूलं
बाळ गेलं बोराला
हाका मारी पोरांला
बाळाचे बोरं सांडले
चहूकडे मांडले
पोरं लागली येचायला
बाळ लागलं नाचायला
लव लव साळाई मामा येतो
खोबऱ्याची वाटी देऊन जातो
गुळाची पोळी खाऊन जातो
दळाचे गोळे घेऊन येतो

*राघू माझा तान्हा*
*भिंगाची टोपी आना ग।*
*मोतियाचे घोस*
*सयांनो तुम्ही लावा ग।*
*बारीक शेला, वाऱ्यानं गेला*
*दृष्ट व्हईल याला ग,*
*पदर घाला।*

अशा प्रकारची गद्य-पद्य पण लयबद्ध अशी कितीतरी रचना या लोकसाहित्यातील बालविभागात आजही ऐकायला मिळते. यातील प्रत्येक वाक्य स्वतंत्र आहे. त्याचा सामूहिक संबंध म्हटल्यास आहे, म्हटल्यास नाही. मात्र आई जेव्हा आपल्या बाळराजाला मांडीवर घेऊन लयीवर गात असते तेव्हा त्याची मोहिनी त्या छोट्या जीवाच्या कानाला निश्चित पडते. त्या लयीत ते रमते, तद्रूप होते, क्षणभर आपणास विसरते आणि आपले रडणे बंद करते. हे प्राथमिक अवस्थेतील बालसाहित्य आहे. यातूनच काऊ–चिऊच्या कथा, राजाराणींच्या गोष्टी, आवडती–नावडतींच्या हकीकती या जन्माला आलेल्या असतात. मोठ्या माणसांना यात काही तथ्य न वाटणे साहजिक आहे. परंतु या निरर्थक अशा लयबद्ध वाक्यश्रवणाने बालसृष्टी मोहरते हे आपण पाहतो. वर दिलेली वाक्ये क्वचित सुसंगत तरी आहेत; परंतु आमच्या लहानपणी एक म्हातारे गृहस्थ आम्ही पाहिले. त्यांच्या तोंडची वाक्ये मोठी गंमतीची असत. लहान मुले त्यांना अतिशय भीत असत. याचे कारण ते मुलांना मारीत किंवा रागे भरत असे नव्हे; तर त्यांचे खेळवणेच त्या पद्धतीचे असे. मुलाला एकदा धरले की, अशीच असंबद्ध वाक्ये ते म्हणत आणि प्रत्येक वाक्याच्या समाप्तीस त्या मुलाच्या गालात एक एक छोटीशी चापट बसे. मग ही चापट क्वचित डोकीवर, क्वचित कपाळावर, अशा पद्धतीने ते खेळवीत. त्यांची ती वाक्ये आज आमच्या स्मरणात नाहीत. पण क्वचित काही आठवणीतून तपासताना आढळतात ती अशी :—

*मुतकुली मुंद्याचे*
*मुंदे सुंद्याचे*

*सुंदे कुंद्याचे*
*तुत् मन मी मनन*
*तुला हौसच आहे*
*मला हौसच न हे*
*मारुतीच्या अंगाला तितकंच ऊन*
*शंकऱ्याची माय परभनिला*

अशी एक का दोन अनंत वाक्ये असत. ती आणि त्यांचे पठण सारखे चालू असे. प्रत्येक वाक्यागणिक एकेक टप्पू खाऊन लहान मुले जेरीस येत आणि शेवटी रडू लागत. म्हणूनच हे मामा आले की, मुले अपसुक पळून जायची! त्यांच्या अंतःकरणात वात्सल्य भरपूर; परंतु त्याची अभिव्यक्ती ही अशा प्रकारची! एकेकाचा एकेक विशेष असतो; त्यातलाच हा एक प्रकार.

आता शिक्षणाची सोय खेड्यापाड्यातून झालेली आहे. नाही तेथे होत आहे. सर्व प्रकारच्या सोयी करण्यात येत आहेत. जुन्या जमान्यात लहान मुलांना अक्षरसंस्कार होणे यालाही एक समारंभ असे. शाळांची सोय नसल्याने शिक्षकांची उणीव ही असायचीच. त्यातूनही वतनदारांची मुले शिकायची. गरीबांची मुले यथातथाच. मात्र लिहिण्यासाठी मुलांना शिक्षा होणे हा प्रकार सामान्यच. त्यात कुणाला काही वाटत नसे. पंतोजीला जे काही द्यावयाचे ते नाण्यात नव्हे; तर त्याच्या संसाराचा विचार करून.

*शाळेच्या पंतोजीला । देऊ केले पाँघरून*
*बाळराजस ग माझा । सखा लिही येक दोन*
*शाळेच्या ग पंतोजीला । देऊ केली शालजोडी*
*बाळ नेनंता ग माझा । आता लिही बाराखडी*
*शाळेतल्या पंतोजीला । म्या ग देऊ केले गहू*
*बाळ राजस ग माझं । एका साळंत दोघं भाऊ*
*शाळेतल्या पंतोजीला । देऊ केली ताटवाटी*
*बाळ राजसाला माझ्या । नका मारू लेहन्यासाठी*

या पंतोजीला मानही असे. त्याच्या गरजा अशा प्रकारे भागविल्या जात. आणि शिक्षणाची व्यवस्था त्या परिस्थितीच्या मानाने अशी होताना दिसते.

लोकसाहित्यात आढळणारा बाळराजस आणि त्याच्याविषयीचे अनेक उल्लेख आपण येथपर्यंत पाहिले. यात मातृहृदयाची वत्सलता दुथडी वाहत आहे. आत्मीयता ओसंडलेली आहे. एकत्रकुटुंबपद्धतीच्या जुन्या समाजरचनेत लहान मूल हा फार मोठा विरंगुळा असे. सुनेला सासुरवास असला तरी देखील आपल्या भावी सुखी जीवनाची आशा म्हणून ती आपल्या बाळराजाकडे पाही. सासरची माणसे सुनेला सासुरवास करीत असताना देखील तिच्या बाळराजाचं कौतुक करण्यात ती कमतरता करीत नसे. कारण तो उद्यांचा देसाई आणि मालक आहे ही भावना तिला विसरता येत नसे. याचसाठी आपल्या सासुरवासात सुनेला हा फार मोठा विरंगुळा वाटे. आपल्या करमणुकीखातर ही सून आपल्या मुलाला पर्वसूरींच्या बाललीला ऐकवीत असे.

*माझ्या ग अंगनात । सांडला दूधभात*
*बाळ राजस ग माझा । जेवला रंगनाथ*
*माझ्या ग अंगनात । सांडली तूप पोळी*
*बाई सावळी ग माझी । जेवली चाफेकळी*
*देवईचं बाळ । असं यशोदेला सळी*
*चिंचंच्या ग पानावऱ्हं । मागतं दूध पोळी*
*बारा वरसं ग झाले । सीताबाईच्या तपाला*
*लव झुंजतो बापाशी । नाही वळखीले लेकाला*

रामायण, महाभारत आणि इतर अवतारी पुरुषांच्या कथांशी त्याचा परिचय याच बालवयापासून होत असे. याच संस्कारांच्या साखळीने त्याचा जीवनपट सांधलेला असे. संस्कृतीची वैशिष्ट्ये बाळघुटीबरोबरच त्याला पाजली जात. अर्थात पुढील आयुष्यात मिळणाऱ्या खतपाण्यावर याची योग्य ती वाढ पुढे अवलंबून असल्याने ही मात्रा आपल्या मर्यादेपर्यंत तशी अतिशय जागरुकपणे आपल्या बाळराजाच्या मनाची मशागत करीत असे. श्रद्धा आणि भावना यांच्याच एकमेव आधारावर तिचे जीवन असल्याने हीच बाळघुटी त्याही छोट्या जीवाला लाभत

असे. शाळेचा पंतोजी अक्षरे शिकवी. व्यवहाराचे लिहिणे तो शिकवी. परंतु आईची माया त्याला भावनात्मक भाग्याने विभूषित करी. म्हणून जुन्या काळी खऱ्या अर्थाने पंतोजीची जबाबदारी याच माय-माउल्यांची असे. आणि त्या आपल्या ऐपतीनुसार ती प्रामाणिकपणे पारही पाडीत असत.

श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या बालपणच्या लीला सर्वांनीच गायिल्या आहेत. लोकसाहित्यात त्यांना वाण नाही. परंतु याच संदर्भात रामचरित्राचे गायन करताना या माउलींना जेव्हा लव आणि कुश यांच्या जन्माच्या ओव्या गाण्याचा प्रसंग येतो तेव्हा त्यांचे भावनात्मक अंतःकरण भरून येते.

*सीता वनवासी । पाखरा ग संगं हासं*
*साजनी ह्या संसाराचं । रामानं ग केलं कसं*
*सीताबाई बाळंतीन । तिला बाळंत्याची वान*
*अंकुश ग बाळ वऱ्हे । झाकी पळसाचं पान*
*सीता वनवासी । दगडाची केली सेज*
*म्हनीती ग राजसाला । अंकुश रे बाळा नीज*
*सीता माय पतिवर्ता । या ग रुषीला कळली*
*तिच्या बाळाला न्हायासाठी । त्यांनी गंगा वळवीली*
*गंगाधराच्या पायऱ्या । सीता वेंघली दमानं*
*अंकुश ग बाळावऱ्हे । छत्री धरीली मोरानं*

अशा एक का दोन, अनंत प्रकारांनी या बालसृष्टीची सजावट या साहित्यात झालेली आहे. भावनेच्या प्रामाणिक आविष्कारातून बहरलेली उपमा आणि कल्पनासृष्टी येथे आहे. काळ जुना आहे. श्रद्धास्थाने जुनी आहेत. तर्कांची पत्रास तेथे विशेष नाही. पण अभिव्यक्तीच्या पाठीमागे ठसठशीत प्रामाणिकपणा प्रत्ययाला येत असल्याने या ओळी जिवंत वाटतात आणि मर्नामुखी भरतात. बालसृष्टी हा या विशाल साहित्याचा एक महत्त्वपूर्ण भाग. म्हणून त्याचा कितीही विस्तार केला तरी शेवटी तो अपूर्णच वाटणार आणि राहणार. कारण लेखनाला मर्यादाही आहेच. खेरीज शब्द पांगुळावे असा हा भावनामय प्रदेश. याची माधुरी मनोगनच जाणणे योग्य व उचित.



# जुनी संस्कृति

श्रीमती गिरजाबाई केळकर, जळगाव

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

पूर्वीच्या रहाणीत ज्या अनेक जुन्या चालीरीती होत्या त्यात लोकगीतांना महत्त्वाचे मानले जात असे. घरात बहुतेक सर्व कामे घरच्या घरीच करावयाची पद्धत होती. मोठे कुटुंब असेल तर मदतीला म्हणून मजूर माणसे ठेवत. पण घरातल्या बायका सर्व करीत. अर्थात दळण, कांडण वगैरे काम करताना करमणूक म्हणून, कामाचे श्रम वाटू नयेत म्हणून, ओव्या म्हणण्याची चाल होती. त्यामुळे काम निघेल त्याप्रमाणे ओव्यांचे विषय बदलते असत.

*भिंती सारविल्या । वर काढीले ताम्हन ।*
*तुझ्या मुंजीचे सामान । बाबूबाळ ॥*
*भिंती सारविल्या । वर काढीली कीरमोर ।*
*तुझ्या मुंजीला आली थोर थोर । बाबूबाळ ॥*
*साहित्याच्या पराती । आजीने भरील्या ।*
*तुझ्या मामाने धाडील्या । तारफेण्या ॥*

*मांडवाच्या दारी । चिखल कशाचा ।*
*वरमाईच्या न्हाण्याचा । वहिनीबाईच्या ॥*
*भाग्याची लक्ष्मी । हिरवी साडीचोळी ल्याली ।*
*मुंज घरी आली । तान्हीयाची*

अशा तऱ्हेच्या ओव्या म्हणून मुंजीचे साहित्य सुरू होते व कार्याला सुरुवात करण्यापूर्वी आईबाप व कार्य असेल तो मुलगा--मुली अशी तिघे बसून घाणा भरतात. तेव्हाही ओव्या म्हणण्याची चाल आहे. उदाहरणार्थः—

*घाणा भरीयेला । वीडा ठेवियेला ।*
*आधी नामियेला । गणराज ॥*
*आधी मूळ धाडा । घुंगराची गाडी ।*
*गणराज वऱ्हाडी । घरा आणा ॥*
*आधी मूळ धाडा । परशूराम देवा ।*
*आमच्या घरी यावा । कार्यासाठी ॥*
*घाणा भरीयेला । सव्वाखंडी भाताचा ।*
*आमुच्या गोताचा । गणराज ॥*
*न्हाऊनी माखुनी । पूजेला बसली ।*
*हिरवा चुडा ल्याली । वहिनीबाई ॥*

लहान मुली झोपाळ्यावर बसल्या म्हणजे त्यांच्या आनंदाला पारावार नसतो, तसाच त्यांच्या ओव्यांनाही नसतो. त्यात नुकते लग्न झालेले असले म्हणजे सासरचे कौतुक सांगायचे असते. ते अशा ओव्यांच्या रूपाने त्या सांगतात. जसे की—

*साखळ्या तोरड्याचा । पाय पडला चिखलात ।*
*मला दिली ग कोकणात । बाप्पाजींनी ॥*
*साखळ्या तोरड्याचा । पाय ठेवीते गाडीत ।*
*मला दिली ग वाडीत । बाप्पाजींनी ॥*
*साखळ्या तोरड्याचा । पाय हळू टाका वहीनीबाई ।*
*बाहेर बसले माझे भाई । सदरेला ॥*

*मला हौस मोठी । साखळ्या तोरड्याची ।*
*सून आहे जहागीरदाराची । दादाजींची ॥*

तसेच आपण भाग्यवान आहो म्हणूनच चांगली माणसे मिळाली हेही ती सांगते—

*काय मी पुण्य केले । आईसारख्या त्या सासूबाई ।*
*कमळी अंबाई । पुजीयेली ॥*
*काय मी पुण्य केले । भावासारखे दीर*
*कमळी रघूवीर । पुजीयेला ॥*
*सासरी सासुरवास । मला नाही केला ।*
*कीर्ती मिळाली तुम्हांला । सासूबाई ॥*

पण क्वचित उलटे झाले तरी काय करावे ते देखील ती सांगते—

*सासरी सासूरवास । सोसेल तसा सोसावा ।*
*आब तो राखावा । माहेरच्यांचा ॥*

सासरी किती सुख असले तरी माहेर विसरू शकत नाही, म्हणून तिला मग आपल्या लग्नापासूनच्या आठवणी यायला लागतात.

*फुलामध्ये फूल । फुल हुंगावे जाईचे ।*
*सुख भोगावे आईचे । बाळपणी ॥*
*फुलामध्ये फूल । फुल हुंगावे चाफ्याचे ।*
*सुख भोगावे बापाचे । बाळपणी*
*माऊलीची माया । काय करील चुलती ।*
*पाण्यावीण ती शेवंती । कोमेजली ॥*

उलट आईबापांना काय वाटते ते पहा—

*लाडके ग लेकी । माझ्या ताटी जेवू नको ।*
*जाशील परघरी । फार माया लावू नको ॥*

*मांडवाच्या दारी । चिखल कशाचा ।*
*वरमाईच्या न्हाण्याचा । वहिनीबाईच्या ॥*
*भाग्याची लक्ष्मी । हिरवी साडीचोळी ल्याली ।*
*मुंज घरी आली । तान्हीयाची*

अशा तऱ्हेच्या ओव्या म्हणून मुंजीचे साहित्य सुरू होते व कार्याला सुरुवात करण्यापूर्वी आईबाप व कार्य असेल तो मुलगा--मुली अशी तिघे बसून घाणा भरतात. तेव्हाही ओव्या म्हणण्याची चाल आहे. उदाहरणार्थ:—

*घाणा भरीयेला । वीडा ठेवियेला ।*
*आधी नामियेला । गणराज ॥*
*आधी मूळ धाडा । घुंगराची गाडी ।*
*गणराज वऱ्हाडी । घरा आणा ॥*
*आधी मूळ धाडा । परशूराम देवा ।*
*आमच्या घरी यावा । कार्यासाठी ॥*
*घाणा भरीयेला । सव्वाखंडी भाताचा ।*
*आमुच्या गोताचा । गणराज ॥*
*न्हाऊनी माखुनी । पूजेला बसली ।*
*हिरवा चुडा ल्याली । वहिनीबाई ॥*

लहान मुली झोपाळ्यावर बसल्या म्हणजे त्यांच्या आनंदाला पारावार नसतो, तसाच त्यांच्या ओव्यांनाही नसतो. त्यात नुकते लग्न झालेले असले म्हणजे सासरचे कौतुक सांगायचे असते. ते अशा ओव्यांच्या रूपाने त्या सांगतात. जसे की—

*साखळ्या तोरड्याचा । पाय पडला चिखलात ।*
*मला दिली ग कोकणात । बाप्पाजींनी ॥*
*साखळ्या तोरड्याचा । पाय ठेवीते गाडीत ।*
*मला दिली ग वाडीत । बाप्पाजींनी ॥*
*साखळ्या तोरड्याचा । पाय हळू टाका वहीनीबाई ।*
*बाहेर बसले माझे भाई । सदरेला ॥*

*मला हौस मोठी । सावळ्या तोरड्याची ।*
*सून आहे जहागीरदाराची । दादाजींची ॥*

तसेच आपण भाग्यवान आहो म्हणूनच चांगली माणसे मिळाली हेही ती सांगते—

*काय मी पुण्य केले । आईसारख्या त्या सासूबाई ।*
*कमळी अंबाई । पुजीयेली ॥*
*काय मी पुण्य केले । भावासारखे दीर*
*कमळी रघूवीर । पुजीयेला ॥*
*सासरी सासुरवास । मला नाही केला ।*
*कीर्ती मिळाली तुम्हांला । सासूबाई ॥*

पण क्वचित उलटे झाले तरी काय करावे ते देखील ती सांगते—

*सासरी सासूरवास । सोसेल तसा सोसावा ।*
*आब तो राखावा । माहेरच्यांचा ॥*

सासरी किती सुख असले तरी माहेर विसरू शकत नाही, म्हणून तिला मग आपल्या लग्नापासूनच्या आठवणी यायला लागतात.

*फुलामध्ये फूल । फुल हुंगावे जाईचे ।*
*सुख भोगावे आईचे । बाळपणी ॥*
*फुलामध्ये फूल । फुल हुंगावे चाफ्याचे ।*
*सुख भोगावे बापाचे । बाळपणी*
*माऊलीची माया । काय करील चुलती ।*
*पाण्याविणा ती शेवंती । कोमेजली ॥*

उलट आईबापांना काय वाटते ते पहा—

*लाडके ग लेकी । माझ्या ताटी जेवू नको ।*
*जाशील परघरी । फार माया लावू नको ॥*

बारा वर्षं घरी । लेकीचा लाड होता ।
डोळ्या आले पाणी । पराया घरी जाता ॥
मुलीच्या बापाची । धन्य ग ती छाती ।
कन्यादाना वेळी । पोर देतो लोका हाती ॥
सासरी जाताना । डोळा आले पाणी ।
माऊलीची वाणी । गोड बोले ॥
सासू सासरे तुझ्या । देव्हाऱ्याचे देव ।
त्यांच्या सेवेमध्ये । नको करू दुजा भाव ॥
उंबऱ्याबाहेर निघताना । मुरडुनी पाहीले ।
माहेरा वाहिले । प्रेम माझे ॥

मग ती घरी येते तेव्हा सासू म्हणते—

आवर सूनबाई । ताटवाट्यांचा पसारा ।
जेवून उठले सासरे । तुझे हंबीर ॥
उचला उचला सूनबाई । ताटवाट्यांच्या चळती ।
नणंदा दिरांच्या पंगती । जेवियेल्या ॥

मग ती मनात देवाचे चिंतन करते—

आयुष्य मी चिंती । सासूबाई तुमच्या नीरी ।
माझी कुंकवाची चिरी । अखंड राहो ॥
आयुष्य मी चिंती । परया पुरुषाला ।
सखे तुझ्या यजमानाला । मैनाबाई ॥
देवाच्या देऊळात । उभी मी केव्हाची ।
वाट पहाते ब्राह्मणाची । पूजेसाठी ॥

हे सगळे सुख जरी असले तरी माहेरची आठवण पुनः पुन्हा होते म्हणून ती म्हणते—

माझ्या दारावरनं गेला । माझ्या घरी नाही आला ।
काय अपमान झाला । भाईरायाचा ॥
माझ्या दारावरनं ग । रंगीत गाड्या गेल्या ।
त्यात मी ओळखीला । भाईराया ॥
दसऱ्यापासूनी । दिवाळी वीस दिशी ।
मला न्याया कधी येशी । भाईराया ॥

संसारातले बाळपण संपून तारुण्यात प्रवेश झाला, संसार रंगला, म्हणजे मातृत्वाची भूक स्त्रियांना लागते. मग ती प्रथम गोत्रजय वगैरे समवयस्कांकडे वळते आणि म्हणते—

देवाच्या देऊळात । नंदीला हिरवा शेला ।
पुत्रासाठी नवस केला । वहिनीबाईनी ॥

आणि तीच भूक ईश्वराने पुरी केली म्हणजे तृप्तीने बोलते—

पालखीची दोरी । हालत लोंबत ।
संसारी गंमत । तान्हीयाची ॥
पालख पाळणा । येता जाता जो जो ।
त्यात बाळ नीजो । नवसाचे ॥
आंथरूण केले । पांघरूण शेला ।
निजविते तुला । तान्ह्या बाळा ॥
पालख पाळणा । रंगवीला लाल ।
आत बाळ नीजवीलं । माझं तान्हं ॥
आंथरूण केले । पांघरूण शालजोडी ।
गाण्याची फार गोडी । तान्हीयाला ॥
पाळणा पाटाचा । त्याला मोतीयाचे सर ।
दिसे शोभिवंत हार । तान्ह्या बाळा ॥

पाळणा पाटाचा । वर झेंडा मोत्याचा ।
आत बाळ नवसाचा । तान्हा बाळ ॥
पाळण्यावरी । रावे मोर आले ।
मामा शिकारीला गेले । तान्हीयाचे ॥
पाळण्यावरी । खेळणे पितळेचे ।
बोलणे पुतळीचे । गौरीबाईचे ॥
पालख पाळणा । मोत्यांनी विणीला ।
तुझ्या मामांनी धाडीला । तान्हया बाळा ॥

अशा तऱ्हेने पुत्रानंदात रंगलेली माता मग मुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करू लागते. तेव्हा जुन्या कल्पनेप्रमाणे जिवतीच आधी तिच्या डोळ्यापुढे उभी राहते. तेव्हा ती प्रथम जिवतीला म्हणते—

जीवती ग माये । रानात तुझी माडी ।
तेथून रक्षा धाडी । तान्हीयाला ॥
जीवतीच्या हाती । अमृताचा द्रोण ।
शिंपीले चारी कोन । पाळण्याचे ॥

मग तिला बाळ मोठे झाले आहे तर ते काय काय पराक्रम करील हे लक्षात येते व त्याचे ती आपल्या ओव्यात वर्णन करते—

घागर घुळु घुळु । दणाणीला माझा वाडा ।
कोण आला सवंगडा । नारायण ॥
गाईचा गोवारी । म्हशींचा खिल्लारी ।
बाळाचा कैवारी । नारायण ॥
गाईचा गडोबा । गोठणीला उभा ।
माये तुझ्या लोभा । पार नाही ॥
गाई गोवर्धन । हिंडे रानोरान ।
शोभे नारायण । चरायाला ॥

ये ग तू ग गाई । चरूनी भरूनी ।
बाळाला म्हणूनी । दूध देई ॥
ये ग तू ग गाई । आपुल्या गोठ्यात
बाळाच्या वाटीत । दूध देई ॥
गाई गोवर्धन । चरती बारा रानं ।
पावा जनार्दन । वाजवितो ॥
गाई चरतील । कोवळी कणसं ।
बाळाला निरसं । दूध देई
आमच गोटू बाळ खेळून येईल ।
विसावा देईल । घडीभरी ॥

मग मुलगा मोठा झाला म्हणजे कारभारी होतो. घरात पायऱ्या उतरून अंगणात खेळू लागतो, हिंडायला लागतो, तेव्हा आईची काळजी वाढायला लागते.॰ आणि मग ती मुलाकरता निराळ्या तऱ्हेने विचार करू लागते—


अतुल बाळ खेळे । अंगण झाले थोडे ।
लाविली फुलझाडे । ताईबाईनी ॥
अतुल बाळ खेळे । अंगणी ओसरी ।
सदर दुसरी । बांधीयेली ॥
शेजारीण बाई । संभाळ आपल्या जाईजुई ।
अवखळ शांताबाई । खेळू येते ॥
शेजीच्या अंगणात । शेजीचे पाच लाल ।
त्यात माझी मखमल । शांताबाई ॥
तिन्ही सांजा झाल्या । नको खेळू अंगणात ।
गुरे येतील बंगल्यात । आजोबांची ॥
तिन्हीसांजा झाल्या । गुरावासराची वेळ ।
वाटेवेगळा तू खेळ । सुनिल बाळ ॥

माझं घर मोठं । केर लोटता लोटेना ।
पोरं बैसली उठेना । अनिल बाळांची ॥
माझ्या घरामध्ये । कशाचा केर झाला ।
मित्र–परिवार पाणी प्याला । राजसाचा ॥
माझ्या दारापुढे । कुणी ग केर केला ।
जाई मोडोनी तुरा केला । अनिल बाळानं ॥

मग एकदा मुली रंगल्या म्हणजे लुगडी, पुराणे वगैरे ज्या ज्या गोष्टी आठवतील त्याच्यावर ओव्या सुटतात. विषयाला धरबंद राहातच नाही.

काळी चंद्रकळा । पदर भरजरी ।
शोभते तुला खरी । मायबाई ॥
काळी चंद्रकळा । सुंदर पोताची ।
तुझ्या ग आवडीची । लताबाई ॥
काळी चंद्रकळा । खडीनं खुलली ।
नेसून डुलली । ताराबाई ॥
मला हौस मोठी । वहिनीबाईला पुत्र व्हावा
बाळंतविडा न्यावा । कडी तोडे ॥
मला हौस मोठी । सोन्याच्या जानव्याची ।
मुंज तुझ्या तान्हीयाची । वहिनीबाई ॥
सकाळी उठुनी । राम राम कुणी केला ।
आई तुझा मुलगा । भाग्यवंत झाला ॥
माझ्या शब्दासाठी । कोण उठलं उठाउठी ।
राहिला उपाशी । भाऊबाळ ॥
शाळेत जाण्याचे । बाळा तुला रडू येते ।
दौत लेखणी ओझे । दप्तराचे होते ॥
मोठे मोठे डोळे । भिवया लांबरुंद ।
केशरी लावी गंध । बाबू बाळ ॥

बाप्पाजी हो वापा । फार लेकी म्हणू नका ।
जसा चिमण्यांचा थापा । उडूनी गेला ॥
झोपाळ्यावरी बसू । हिरव्या साड्या नेसू ।
सारख्या वहिणी दिसू । माईबाई ॥
झाडांना फुले आली । बागेला शोभा आली ।
डोक्यात रोज घाली । तारूमाई ॥
हाड रे कुतऱ्या । शुक रे मांजरा ।
तान्ह्याच्या काजळा । दृष्ट झाली ॥
वाकडी तिकडी । तुझ्या शाळेची ती वाट ।
अवी रे बाळा । दौत धर नीट ॥
शाळेच्या पंतोजीला । देऊ केला धोतरजोडा ।
लिहू आला अनिलबाळ । त्याला सांभाळा तेवढा ॥
माझं घर मोठं । पन्नास येती जाती ।
रुपयाची वाटी हाती । बाबूबाळाच्या ॥
माझं घर मोठं । पन्नास महालाचं ।
हांडे घंगाळांचं । वावरनं ॥
माझं घरं मोठं । आल्या गेल्याचा पाऊस ।
राखणी तू बैस । नाना बाळ ॥
भाग्यवंताच्या मुला । भाग्य तुझे ते उदेले ।
वडीलांच्या आशीर्वादे । घर सुखान फुलले ॥
भाग्यवंताच्या मुला । भाग्य तुझे कोणा हाती ।
वडीलांची कीर्ती । सदा उभी तुझ्या पाठी ॥



# बाळलेणी

डॉ. सरोजिनी बाबर, पुणे

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

एखाद्या घरात लहानगं बाळ जन्माला आलं म्हणजे उभ्या घरचं जीवन आनंदानं फुलून जातं आणि त्यातल्या त्यात त्या मुलाच्या आजोबा-आजींची आणि मामा-मावशींची भारी तारांबळ उडून जाते. ह्या नव्या बाळाला बघूनच त्यांचे ओठ बोलू लागतात—

*आंबा मोहोरला मोहोरला पानोपानी*
*दारी माज्या उगवली शुक्राची चांदणी*
*लाडकी झाली लेक लाड करू मी कशाचा*
*खेळायाला आणीते चंद्रमा आगाशीचा*
*घागऱ्या घुंगुरांनी दणाणेल माजी गल्ली*
*अंगणात खेळे बाई राघू माजा चेंडूफळी*

*अंथरूण करीन मी    जाई मोगऱ्याचं*
*साजीरं गोजीरं    बाळ माजं नवसाचं*
*पालख पाळणा    हत्तीणी दातांचा*
*वर चेंडू मोत्यांचा    राजसाला*
*लाडका बाळराज    देवाघरीचे मंगल*
*अमृताचे हे फळ    माझ्या घरी*
*सागर सांडूनी    माणीक धुंडूनी*
*चंद्रसूर्य जडविले    इवल्याशा गगनी*

आणि मग त्या उभारीत बाळलेणी घडवून आणायची धांदल-गडबड उडून जाते. वाळ्या मनगट्यांच्या जोडीला अनेक दागिने केले जातात. सुंदर झबली, टोपडी न कुंच्या शिवल्या जातात. त्याचबरोबर वाढत्या वयाचं लेणं लेणाऱ्या बाळराजाला छान छान गीतांचीही बाळलेणी घडविली जातात. त्यासाठी जिवाचं रान केलं जातं. वयाचं भान हरपतं. आणि मन जसं स्फूर्ती घेऊन उठतं. कोडकौतुकाला उधाण येतं. जिवाभावाच्या हौसेला बाळसं चढतं!

त्यामुळं बोबड्या बोलांची नक्कल करीत वडीलधारी बायकामंडळी आपल्या बाळपणीच्या आठवणीतील न् कानांवर पडलेली ओळखीतील गाणी मनाचा उपसा करून बाहेर काढतात. अशा वेळी दंडावर तोळबंद घातलेली त्यांची मैना त्यांना मोठी झालेली दिसते. आणि म्हणून—

*श्रावण हंकारी हंकारी*
*करा ग पंचीम साजरी*
*श्रावण हंकारी हंकारी*
*या बाई पंचमीची साडी*
*आणील मामा जरतारी*
*श्रावण हंकारी हंकारी*

ह्या भावनेची तिच्यावर शिंपणी केली जाते. एवढंच नाही तर चिमुकली मैनाराणी पुढ्यात बसवून आपणच कोंबडा-घोडा-खेळताना—

*सईबाईचा कोंबडा, कोंबडा*
*पाटीखाली मी डालीला, डालीला*
*पाटी गेलीया उडून, उडून*
*कोंबडा आलाया चरून, चरून*
*कोंबड्याच्या गळयात साखळी, साखळी*
*मैना माझी धाकली, धाकली*
*बोबडं बोलाया शिकली, शिकली*

असलं काही ठेक्यात गाताना त्यांना मनस्वी समाधान होतं. त्या नादात तो कोंबड्याचा खेळ असा काही सुरेख रंगत जातो की, बघतच राहावा! तो बघून ते लहानगं बाळ देखील तोंडानं फू–फू– करायला लागतं, एवढंच नाही तर लाडक्या लेकीचा हा पक्वा–पिंगा बघून त्या घरच्या आईला अगर मावशीला एकदम अभिमान चढतो न् ती साफ बोलून टाकते—

*एक तोळा सोनं घ्या वो वैनी*
*बरम्या लेकी द्या वो वैनी*
*एक तोळा सोनं मी घियाची नाय*
*बरम्या लेकी दियाची नाय*
*रघुरायाच्या पतीरायाच्या*
*लेकी थोराच्या न्हाई दियाच्या*
*तुज्या पिंग्या मला बोलीवलं*
*दिस सोन्याचं दावीलं ग सई दावीलं*
*असा पिंगा ग सई पिंगा ग*
*पोरी पिंगा ग पोरी पिंगा ग*

त्याचप्रमाणं आपली ही मैना राजाच्या घरी पडावी असा देखील तिचा हट्ट असतो. त्याला भारी सुरेखशी वाचा फुटते—

*घे घे गडनी चल जाऊ न्हवणा*
*जिथं पाय पडल तिथं उगावला दवणा*

*दवणा न्हवं बाई दवण्याची काडी*
*राजानं बांधली उप्पर माडी*
*माडी बांधुनी शाबास केली*
*चाफेकळी सोनी माजी लुटूनी नेली*

आणखी सांगायचं म्हणजे यातलं काही एक कळलं नाही तरी ते बाळ पोटभर हसून हातपाय उडवीत नाचू लागतं. त्याच्या गालाला खळी पडते. दृष्ट लागण्याजोगं मग बाळाचं देखणेपण नजरेत येतं न् एकाएकीच जीव उडून जातो. मीठ-मोहऱ्यांनी बाळाची दृष्ट काढली जाते, आणि मनाची ही कांक्षा जावी म्हणून की काय बाळाला हातावर घेऊन त्या स्वतःशीच प्रश्नोत्तरं करीत बसतात—

*तुझी माझी सासू*
*दिसते कशी ? दिसते कशी ?*
*चुलीपुढं बसलेली*
*मांजरीच जशी ! जू जू जू*
*तुझा माझा सासरा*
*दिसतो कसा ? दिसतो कसा ?*
*हातभर दाढीचा*
*बोकडा जसा ! जू जू जू*
*तुझा माझा भाऊराया*
*दिसतो कसा ? दिसतो कसा ?*
*छडी घेतलेला*
*अंमलदार जसा ! जू जू जू*
*तुझी माझी भैन ग*
*दिसते कशी ? दिसते कशी ?*
*कृष्णदेवाच्या हातची*
*मुरलीच जशी ! जू जू जू*

त्यामुळं तिचं तिलाच हसू येतं आणि त्या नादात बाळाला उराशी कवटाळताना त्याचा जसा चोळामोळा होऊन जातो ! म्हणून मग बाळ रडू लागतं. आरडून ओरडून गोंधळ घालतं. घरातल्या कानाकोपऱ्यात आपली कागाळी नेऊ पाहातं. म्हणून मग ती आई अगर मावशी त्याचे मुके घेऊन त्याला गप्प करीत जोजवू लागते. अशा वेळी तिच्या आवाजाला फारच गोड अशी धार चढते आणि भावनेला उमाळा फुटतो.

*सावळा विठ्ठल आला बाई दारी*
*ढवळ्या पवळ्यांची दावण ग घरी*
*घुसळण घुसळी रखुमाई राणी*
*अर्धा डोंगर चढती गवळणी*
*नका खाऊ कोणी दही तूप लोणी*
*आणील साखर तुकाराम वाणी*
*गाईवासरांचा मेळा पंढरीच्या रानी*
*दुधातुपानं ग भरील्या मी गोणी*
*पंढरपुरात विठूचा परगाणा*
*देवाच्या दाराला मोत्याचा पाळणा*
*हालवा सयांनो हालवा बायांनो*
*परसरामाला, मी गुंतले कामाला*

अशा वेळी चुकलं माकलं खपून जातं. ऐकलं सवरलं ओठांवर खेळतं. काळजातलं न् मनातलं जुळवलं जातं. आणि रडतं बाळ चांगल्यापैकी खेळवलं जाऊन झोपेलाही येतं. त्या नादात मग —

*जोडवी झिनकार बाई विरुद्यावरी मोर*
*सावळी मैनाबाई लेकी खेळ तू तालीवार*
*पाऊस–पाण्याची झळ लागूनी वाऱ्याची*
*सावळी मैना माझी मला पासूडी निवाऱ्याची*

*सावळ्या सुरतीकडं नार बगती कवाची*
*तानी बाळ माजी रास बकशी गव्हाची*
*झाडाची सावली यावी झाडाच्या पुरती*
*लेकीची माज्या सर काय करील परती !*
*तरवड फुलू दे सोन्यापरीस सवाई*
*लेकीची सर बाई काय करील जावाई*
*भरल्या बाजारात मायलेकींची गंमत*
*शेजी बोलती वैराळा सांग चुड्याची किंमत*
*उनाळ्याचं ऊन बाई लेकी लागतं शेल्यातून*
*हावशा कांता, तुमी शिंगी काडावी पागेतून*

अशी कौतुकाची आळवणी होते. बाळी झोपून जाते. मातामाउली सुखावते. तिला पान्हा फुटतो. आणि मग उगीचच लेकीला पाजताना तिच्या नजरेत तिचा राघू भरत जातो. अंगण–ओसरी ओलांडून गल्लीला खेळायला गेलेला बाळराजा तिच्या ध्यानीमनी येतो. आणि मग हालती लोंबती अशी पालखाची सोनेरी दोरी संसारात किती गंमत करते याचे मोजमाप ती करीत राहते !

*एकुलता एक नका म्हणू राजसाला*
*कारल्याचा येल सारा मांडव झाकीला*
*तांबड्या लुगड्याला डाग पडला काजळाचा*
*सावळा बाळराजा गल्ली खेळतो जावळाचा*
*सरावना बाळा माज्या खांद्यावरी तुझ्या काई*
*आईबापांची कावड काशीला जातो बाई*
*काळी ग चंद्रकळा खडीनं भरीयीली*
*लेका बाळाची ग आई संसारी रंगयीली*
*जिवतीच्या त्या ग हाती दिसती अमृताची वाटी*
*शिंपीली तुझ्या पाठी लाडक्या बाळराजा*

*गण–गौरीच्या मायेचा बाळ माझा नवसाचा*
*आला झरारा अंगणी खेळ मांडी लगूरीचा*
*अल्याड दवण्याची पल्याड पवळ्याची माडी*
*राघु मैनांच्या खेळाची ग वाट चालती नागमोडी*

तिचा जीव मग भारी सुखावतो. चुटकीसरशी घरच्या शेतीवाडीत जाऊन ती आपल्या बाळाला धुंडाळू पाहते. अशा वेळी केळीनारळीच्या बनातून ती जाऊ पाहते. तिच्या हाती या वेळी तिच्या बहिणीचं बाळ लोंबकळत असतं! त्यामुळं एखाद्या विहिरीवरील मोटेच्या धावेवर चालणारी मोटकऱ्याची शानदार ललकारी तिच्या कानी घुमू लागते. आणि मग आपल्या बहिणीच्या बाळाच्या मुखी देखील तसलाच एखादा मोटेच्या गीताचा साद घुमत असल्याचा तिला भास होतो!—

*सारंगा गवळ्यामाज्या*
*मंजुळ्या पाखऱ्याला ऽहो ऽऽऽ*
*वजीऱ्या सुंदऱ्याला वडावं*
*वजीरा माज्याला सुंदरा सागराला ऽहो ऽऽऽ*
*हैबती चित्ताराला*
*फुल्या माझ्या चंदराला*
*गरूडाला मानकऱ्याला*
*बोलावं ऽहो ऽऽऽ*

एवढंच नाही तर मोटेच्या कुईकुईवर न् थारोळ्यात पडणाऱ्या पाणलोटाच्या साथीवर रंगणारी बाळाची बोबडी सुरावटदेखील आपोआप तिच्या ओठांवर खेळू लागते.

तितक्यात गल्लीच्या कोपऱ्यावर न् हिच्या घरच्या साऱ्याच्या खाली पोरं नाचतेली न् खेळतेली अशी तिला ऐकू येतात. तिचा स्वतःचा 'चंद्रहार' देखील त्या गलक्यात तिला ऐकू येतो. ती कान देते. एवढंच नाही तर अशा वेळी त्या ऐकू येणाऱ्या गीताच्या सुरातच आपला सूर मिसळून तीही मोकळी होते! कारण तिच्या भावानं तिच्या लेकाला शिकवलेलं गीतच या वेळी तिच्या कानांवर पडत असतं—

वाकडी तिकडी बाभळ
तिच्यावर होता व्हला
त्याला मारला टोला
त्याची केली कांजी
ढवळा बैल पूंजी
ढवळ्या बैलाची येसण
गणुबा निळ्या घोड्याव बसीन
निळ्या घोडीचा खरारा
तिनं शिलकला तगोरा
तगोऱ्याच्या किंकाळ्या
गणुबा, बोलीवल्या तुमी पुतळ्या
पुतळ्या गाईचा खोंड
त्याच्या गळी रेशीम–गोंडं
तिकून आल्या गवळ्याच्या मावल्या
तुमी मावल्या कुणाच्या
आमी मावल्या गवळ्याच्या
तुमचे गवळी काय करती
आमचे गवळी गाई पिळती
दह्या दुधानं भरले डेरे
गाईम्हशींनी भरले वाडे
आली वर्साची दिवाळी
सोन्यारुप्यानं ववाळी
आराटी का पराटी
सोन्याची दिवटी
आण ग म्हातारे खोबऱ्याची वाटी
न्हाईतर घालीन तुझ्या कंबरड्यात काठी

आणिक त्या वेळी मग तिच्या न् त्या गल्लीतल्या मुलाबाळांच्या हसण्याखेळण्याचा दंगा असा उडतो की विचारूच नये!

घरातील लेकुरवाळ्या मनाची न् हौसेमौजेची माणसं आपल्या मुलाबाळांना अशी नवलाईची अनेक बाळलेणी घडवीत असतात. त्यांच्या घरचा असा डामडौल पाहिला की, बघणाराला न् ऐकणाराला देखील आपल्या आठवणीची शिदोरी सोडायचा मोह होतो. बाळपणी हाडीमासी खिळलेलं असं काही बोलावसं वाटतं. त्या नादात समोर खेळायला बाळराजा असो की नसो, प्रौढ वयाला बाळासारखं चुटक्या वाजवीत नाचावंसं वाटतं! अशा वेळी जर एखाद्यानं अवचितच दिवाळीचं निमित्त काढून—

*दिन दिन दिवाळी*
*गाई म्हशी ववाळी*
*गाया हरनी चिक्कार फळं*
*गाई म्हशींनी भरलं वाडं*
*नऊ वाडं जुंपलं गाडं*
*गाडं जाई वरल्या टेकी*
*हाका मारी गवळ्याच्या लेकी*
*हाका बाई कुणाच्या ?*
*हाका माज्या हनुमंताच्या,*
*उडी अशी कोणाची ?*
*अशी उडी वाघाची*
*फडी अशी कोणाची ?*
*अशी फडी नागाची*
*असलं शिंग कोणाचं ?*
*शिंग असलं ढोराचं*
*ह्या परी पंख कोणाचं ?*
*पंख ह्या परी मोराचं*
*दूध पायजे कोणाचं ?*

*पायजेय दूध गाईचं*
*फुलात फूल कशाचं ?*
*ते बाई फूल जाईचं*
*मावलीत मावली कोणाची ?*
*मावली माझ्या बाळाची*
*बाळात बाळ कोणाचं ?*
*बाळ माझ्या लाडाचं !*

ह्या गाण्याचा पाठपुरावा केला म्हणजे हे गीत बोलणाराचं मन उल्हासतं. भराला आलेल्या हुरड्यासारखं चवदार होतं. चमचमत्या राशीसारखं हरखून जातं. फिरक्या पागोट्यासारखं तिथंच पिंगा घालीत राहातं!

त्यामुळं एखादा शेतकरी जर आपल्या बाळाला खांद्यावर घेऊन नाचत नाचत—

*चाड बांधीलचा पदुर तुळशीचा*
*आमच्या गावचा लक्ष्मन गुंड्या*
*त्येला पिकल्या सोळा खंड्या*
*सोळा खंड्याचं मणभर भूस*
*उचली आटकरी माणूस*
*आटकरी पाटकरी तेल्याचा*
*तेली म्हणतो घालीन घाणा*
*घाला तेल शिंप्यादादाला*
*शिंपी म्हणतो शिवीन चोळी*
*घालावी चोळी गंगेला*
*गंगा म्हणते लावीन दोर*
*सांगावा दोर मांगाला*
*मांग म्हणतो वळीन नाडा*
*घालावा नाडा नांगराला*

२०

*नांगर म्हणतो घालीन तास*
*करावा थाट जमिनीचा*
*जमीन म्हणते पिकवीन खंड्या*
*धराव्या कुणब्याच्या बंड्या*
*कुणबी म्हणतो लावावी चिठी*
*घालावी मिठी बाळाला*

असलं काही बडबडू लागला तर त्या घराला भारी आगळी शोभा येते. राहतं घर थोरामोठ्यांचं दिसू लागतं. तिथं घुसळणारे डेरे घुमू लागतात. सप्तपाताळात डंका पिटला जातो. केवड्या मोगऱ्याच्या वासाची दरवळ सुटू लागते. गोकुळच्या नंददेवाच्या दारी जसा कृष्णाचा अवतार येतो तसंच घरचं बाळ कृष्णदेवासारखं दिसू लागतं.

म्हणून मग घरच्या अपूर्वाईला अंगाई गावीशी वाटते. कृष्णदेवाचा जन्माष्टमीचा पाळणा घरात अवचितच हालू लागतो–

*मथुरेमध्ये अवतार झाला। देव किष्णजी जन्मासी आला।*
*तोडुनी बेड्या बंदी सोडीले। चरणाच्या प्रतापी मार्गी लागले।*
*जू बाळा जू जू रे जू॥*

*गोकुळी मध्यानी देवजी आले। नंदाच्या घरी आनंद ल्याले।*
*गुड्या तोरणे शीघ्र लावीले। गगनी देव पुष्प नाचले।*
*जू बाळा जू जू रे जू॥*

*राजमंदिरी झाला आनंद। नैवेद्या गर्जे कर्णाचा नाद।*
*ऊठ ऊठ छंद नाचे गोविंदा। जू बाळा जू जू रे जू॥*

*पुत्र जन्मला देखोनी नयनी। हिरा शोभला जैसा कोंदणी*
*पूर्वेचा चांद जातो अस्मानी। देखूनी त्याला लज्जीत मनी।*
*जू बाळा जू जू रे जू॥*

रत्नजडित पान शोभते भाळी । नयनाच्या कोरा काजळ घाली ।
दंडी बाजूबंद मुद्रिका करी । वाळ्याचा नाद उमटतो दारी ।
जू बाळा जू जू रे जू ॥

सोन्याचा दाब कमरेच्या वरी । येश्वदा बैसली मंचकावरी
नाव ठेविले परब्रह्म हरी । जू बाळा जू जू रे जू ॥

आणि त्या नादात बाळाची व वडीलधाऱ्यांची ब्रह्मानंदी टाळी लागते. फार काय, पाळण्याच्यावरची नक्षत्रमाळदेखील सुखावते. दाही दिशांना गावंसं वाटतं. रानपाखरांना झुला खेळायचा मोह होतो. रजनीमाईच मग स्वतः गात राहते, आणि म्हणूनच की काय पाळण्यातलं साजिरं गोजिरंदेखील आपला करताल धरू पाहतं. स्मितहास्य करून जीवीचा आनंद उल्हसित करून सोडतं. सरीबिंदल्याचा सरदार लाडका वेल्हाळ होतो. हिऱ्यामाणकांची चवड दाराशी पडते. रात्रूमैनांचा मेळा घरात येतो. मीठमोहऱ्यांनी माखलेला येसबंद दृष्टीचा उतारा टाकतो. आणिं घरात मग अंगाईचेच सूर घुमू लागतात.

त्या कारणानं ह्या नाना प्रकारच्या बाळलेण्यांनी गुंफलेला नवलाखी हार कुणाकुणाला घालू ह्याचा भ्रम घरच्या आईला होतो. आणि तो हार घालून कुणाच्या नजरेची पारणं फेडीत कुठं कुठं फिरू, या संभ्रमात शेवटी तिचं बाळ तिच्या कुशीतच समाधानानं खेळत रहातं !

# अंगडीचं होतं -धांगडीचं झालं



सौ. तारा परांजपे, नांदेड

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

डोळ्यांचा दिवा नि हातांचा पाळणा करून आपल्या मुलाला वाढविणारी आई त्या आपल्या मुलाला आंदुळताना जे गीत गाते त्याला जगाच्या साहित्यात अन् संगीतात दुसरीकडे कुठेही तोड सापडणार नाही. या गीतात काव्यमयता, लयबद्धता अन् हृदयंगमता यांचा सुमधुर संगम आढळतो; कारण ते वात्सल्यरसात डूबून निघालेले असते.

मराठवाड्याच्या पूर्व सरहद्दीवर ज्या ठिकाणी, मराठी, तेलगू, कानडी अन् उर्दू या भाषा व संस्कृतींचा संगम झाला आहे अशा ठिकाणच्या वात्सल्याच्या भावनेने जे मनोहारी रूप घेतलेले आहे त्याचे आपण आता ओझरते दर्शन घेऊ या.

मातृत्व हे स्त्रीजीवनातले सर्वात मोठे वरदान आहे. त्यामुळे जिला हे वरदान लाभलेले आहे ती स्वतःला धन्य धन्य समजते व समाजही तिचे सर्वतोपरी कौतुक करतो. म्हणूनच एखाद्या भरल्या घरच्या पुरंध्रीचे :

*उंच ग वसरीला । मोत्याचं आसन*
*पुत्रवंतीचं बसनं । माय माज्या हरनीचं*

अशा शब्दात कौतुक होते तर एखाद्या लेकुरवाळया स्त्रीच्या कार्यक्षमतेचे वर्णन पुढील शब्दांत केले जाते.

*लेकरवाळीचं काम । चालती दोन्ही हात*
*पाळण्याखाले जातं । बाळ ग नेनंत्याच्या*
*लेकरवाळीचं काम । तिच्या कामाला दिरंगा*
*आडवा आलाया श्रीरंगा । बाळ ग नेनंता*
*लेकरवाळीचं काम । काम तिचं घाई घाई*
*भांड्यामध्ये रवी लावी । मैनाबाई*
*लेकुरवाळ्या ग नारीचा । अमंगळ रांजन*
*उतरले भगवान । पानी[1] पिले[2] समाधान*

म्हणून प्रत्येक स्त्रीला वाटत असते की, आपण माता व्हावे तरच स्त्रीजन्माचे सार्थक होईल. त्यामुळे एखादीला जर लौकर मूल झाले नाही तर ती व्रतवैकल्ये करते आणि देवाजवळ वंशाचा दिवा मागते.

*देवाच्या देवळात । नंदीला घाले माळ*
*मागते तान्हं बाळ*

*किंवा*

*देवाच्या देवळात । कोन बसली येकली*
*आहे पुत्राची भुकेली*
*देवाला ग मागीतो । कुळीला ग दीपक*
*वई गायाला ग लेक । वसरीला मैना येक*
*देवाला ग मागीतो । संपत्तीला ग धनी*
*लेक मईना वाचूनी । हुर्द[3] उकलीना कोणी*

---

१ पाणी. इकडील प्रदेशात व मराठवाड्यात लोकभाषेत 'ण' ऐवजी 'न' वापरला जातो.
२ प्यायले. या विभागात असा प्रयोग सर्वत्र आढळतो. ३ हुर्द–हृदय.

ज्या बाळामुळे आईचे एवढे कौतुक होते त्या बाळाच्या वर्णनात तर काय उभ्या जगातले काव्यच साकार होत असते. एखादी आई आपल्या मुलीच्या सुकुमार पायांचे वर्णन करताना म्हणेल,

*माज्या ग अंगनात । काटेकुटे रिंगनीचे*
*गोरे पाय चांदनीचे । तान्ह्या माज्या मयनाचे*[१]

तर दुसरी एखादी आई आपल्या मुलाला त्याच्या कोणत्या रूपवैशिष्ट्यामुळे दृष्ट झाली ते सांगेल :

*दात डाळिंबाचे दाने । होटा पवळ्याची लाली*
*हासता ग दृष्ट झाली । बाळ माज्या*[२] *नेनंत्याला*

एखादी खेडवळ आई आपल्या मुलाच्या पाणीदार डोळ्यांचे वर्णन करताना आपल्या रोजच्या अनुभवातील एखादी उपमा देऊन आपल्या भावना प्रकट करील :

*हे ग मोठे मोठे डोळे । जशा कारल्याच्या फोडी*
*बाल*[३] *याचे नागमोडी । बाळ ग अंजनाचे*[४]

तर दुसरी एखादी आपल्या मुलाच्या कांतीचे वर्णन पुढीलप्रमाणे करील :

*पाळण्याच्या वरे । चांदवा भिंगाचा*
*गेंद गुलाबी रंगाचा । बाळ ग नेनंता*

एखाद्या आईला आपली मुलगी मुलाच्या पाठीवरची आहे असे साधे जरी विधान करावयाचे असले तरी ती अगदी काव्यमय भाषेत आपल्याला ऐकवील :

*उजेड पडला । चंदामागे चांदनीचा*
*रेतामागे रोहीनीचा । भावापाठी भयनीचा*

पाळण्यात झोपलेल्या गोजिरवाण्या पाखराला पाहून कोणी विचारले, मुलगा का मुलगी ? तर उत्तर मिळेल :

*उजेड पडला । पाळन्याच्या बाई कोनी*
*हिरा न्हवं हिरकनी । बाळ ग नेनंती*

---

१ मैना. २ माझ्या तेलगू भाषेच्या सान्निध्यात असलेल्या प्रदेशातून ‘ह’ कार युक्त शब्दातील ‘ह’ कार गाळला जातो. ३ केस. ४ अजाण

प्रत्येक आईची कल्पना अशी की, आपल्या गोऱ्यागोमट्या न् गोंडस गोजिरवाण्याला सारखी कुणाची ना कुणाची तरी दृष्ट होते; म्हणून ती येता जाता त्याच्यावरून मीठ, मोहऱ्या अन् मेथ्या[1] ओवाळून टाकीत असते.

*द्रिष्ट ग काढीते । मीठ मोहऱ्या मेत्या*
*न्याहाळीत कोन होत्या । माज्या ग चांदणीला*

कधी तिला वाटते, भाऊबंदाचीच दृष्ट झाली असावी. कारण,

*माळ्याच्या ग मळ्यामंदी । इसबंदाचा झुंबाडा[2]*
*झाला दृष्टीनं तांबडा । बाळ ग नेनंता*

पण पुन्हा तिला वाटते, कुणाचे नाव कसे घ्यावे पटकन्?

*बाळाला ग द्रिष्ट झाली । उतरीते पिवळे गहू*
*बाळाच्या ग द्रिष्टीसाठी । नाव कोनाचं ग घेऊ*

तरीही एक मात्र निश्चित की, बाळाला दृष्ट झाली अन् त्यामुळेच बाळ सुकला अशी तिची खात्री असते.

*कोनी ग द्रिष्ट केली । पाळन्याच्या पाड्या*
*दिल्या जाल्या मनगट्या । बाळ ग नेनंत्याच्या*

असे सुकून गेलेले मूल सारखे रडते अन् तिचा जीव अगदी उडून जातो. त्यात कुठेतरी कुत्र्यामांजराची भांडणे लागतात अन् तिला अशुभाच्या शंकेने घेरून टाकतात.

*कुतऱ्या मांजराची । लागली कळवंड[3]*
*तान्यानं देलाय भंड[4] । बाळ ग नेनंत्यानं*

असे म्हणून त्याला समजावता समजावता ती रडकुंडीला येते.

*लाडक्या ग लेकराला । समजता समजेना*
*कांहीं केल्या उमजेना । बाळ ग नेनंता*

---

१ या विभागात मेथ्या किंवा गहू मुलावरून उतरून टाकण्याची पद्धत आहे. २ गर्दी.
३ भांडण. ४ भंडावणे.
बोलेना वगैरे.

शेवटी ती अगतिक होऊन स्थानिक देवीला नवस करते.

*पोचम्मा[1] माजी माय। भरीते तुजा वाडा*
*हिंवसा[2] ठेवा माजा वाडा*

नवस करूनही उपयोग होत नाही आणि बाळाचे रडणे शेवटी देवीच्य तापाचे ठरते आणि ती घाबरून जाते. लगेच नवसावर नवस सुरू होतात.

*पोचम्मा माजी माय। फुलाचं पातळ*
*आई निगू दे शीतळ। बाळ ग अंजानाला*

एवढे हे नवससायास केल्यामुळे म्हणा किंवा औषधांमुळे म्हणा, पण बाळ पुन्हा पहिल्यासारखा झाला आणि हसू-खेळू लागला, तेव्हाचा आईचा आनंद काय वर्णावा?

या हसू-खेळू लागलेल्या बाळाच्या खेळण्याचे कौतुकही तितक्याच काव्यमय कल्पना करून केले जाते. एखाद्या आईला भास होतो, चांदव्यावर लावलेले रावे आपल्या बाळाबरोबरच झोपी गेले होते आणि—

*पाळन्या ग वरी। रावे ग झोपी गेले*
*यानं खेळून जागे केले। बाळ ग राजसानं*

तर दुसरीला वाटते, आपल्या बाळाबरोबर निर्जीव रावेही गुजगोष्टी करतात.

*पाळन्याची पाटी। येता जाता लोटी*
*रावा सांगे गोष्टी। बाळ ग नेनंत्याला*

आपले तान्हे बाळ खेळताना पाहिले तर कुणाच्याही दुष्ट प्रवृत्ती आपोआप नाहीशा होतील अशी एखाद्या आईची दृढ श्रद्धा असते. ती म्हणते:

*तान्हं ग बाळ खेळे। वाजतील वाळे*
*निवतील दुष्ट डोळे। तान्ह्याला देखील्यानं*

अशा या निष्पाप निरागस तान्ह्या बाळाचे कौतुक घरातले सारेच जण करतात. त्यातून बाळाच्या भाग्याने त्याने वैभवशाली कुळात जन्म घेतला तर मग काय! लहानपणापासूनच त्याच्यावर बाळलेण्यांचा वर्षाव होतो; आणि त्याची आई बाळा-

---

१ तेलंगणातील लोकप्रिय व जहाल ग्रामदेवता. २ थंड.

बरोबर आपल्या घरच्या वैभवाचेही वर्णन करते. एखादी जमीनदारीण म्हणते—

*माझ्या ग अंगनात । वाळवन ग साळीचं*[1]

आणि एवढ्या साळी घरी ठेवायला हव्यातच; कारण-

*घर लेकरवाळीचं.*

वाळत घातलेल्या डाळीसाळी इकडे तिकडे उधळून द्यायची, बालगोपाल मंडळींना हौस फार. असे उधळलेले दाणे वेचणार तरी कुठवर? आणि ज्या घरात खंड्यांनी धान्य येते तेथे एवढ्या बारकाईने वेचायचेच कशाला? कारण ती म्हणते—

*माझ्या ग अंगनात । सांडीला डाळदाना*
*जमेदारी*[2] *कारखाना । सावळ्या देसायाचा*[3]

अशा या जमेदारी कारखान्यातल्या बाळराजावर जितकी बाळलेणी चढवली जातील तितकी थोडीच. म्हणूनच सराफीचा धंदा करणाऱ्या धनाढ्य पेढीवाल्यांकडे

*हातात कडीतोडे । गळ्यात कडीगोफ*
*कोन्या सराफाचा ल्योक । बाळ ग नेनंता*

अशी ओवी ऐकू येते; तर सावकारी करणाऱ्या एखाद्या कोमट्याकडे,

*पाळन्याची दोरी । मोतियाचे सर*
*मामे तुझे सावकर । बाळा रे राजसा*

अशी ओवी ऐकू येते तर एखाद्या भाग्यवंताच्या घरी

*तान्ह्या बाळाचा ग खेळ । दाराच्या उंबऱ्याला*
*हिरे तुझ्या बिंदल्याला । बाळा रे राजसा*

अशी ओवी ऐकू येते; तर एखाद्या उंच वसरीवर थोराची जावळाची कन्या खेळताना आढळते.

*उंच ग वसरीला । समई आवळ्याची*
*कन्या खेळे जावळाची । बाळ ग नेनंती*

---

१ तलंगणाच्या सरहद्दीवर साळी भरपूर पिकतात. २ ज्या घरात भरपूर संपत्ती असून सढळ हाताने देण्याची वृत्तीही असेल अशा घराला जमेदारी कारखाना म्हणतात ३ देशमुखाला देसाई म्हणतात या विभागात.

बाळराजाला सारेच जण देणार. त्यामुळे त्याला अंगड्या टोपड्यांची रेलचेल होते.

*अंग्या[१] ग वरी अंग्या । वरे कुंच्या प्रकाराच्या*
*दंडी वाक्या घुंगुराच्या । बाळ ग नेनंत्याला*

अशी भरपूर बाळलेणी नि अंगडी टोपडी झाली तेव्हा खेळणी आणायला सुरुवात झाली. बाळाच्या चांदव्यावर चिमण्याराघू काही कमी नव्हते, तरीही त्याच्या मामाला ते कमी आहेत असे वाटले आणि तो मोठ्या शहरी ते आणायला गेला.

*पाळन्याचे वरे बाई । रावे ग थोडे झाले*
*मामा इंदूराला[२] गेले । बाळा ग साठी*

बाळ थोडा मोठा झाला आणि सायीसाठी हट्ट घ्यायला लागला तेव्हा–

*तान्ह्या बाळाचा ग छंद । दुधावरील ग साय*
*माम्यानं देली गाय । बाळ ग नेनंत्याच्या*

अशी गोष्ट घडली. त्यामुळे या भाग्यशाली बाळराजाच्या खाण्यापिण्याचा थाट तरी किती वर्णावा! त्याची आई वर्णन करते :

*लोकाच्या लेकरान्ला । मिळंना भाजीपाला*
*गर्जेलाची[३] न्याहरी तुला । बाळा रे नेनंत्यारे*

एखादे बाळ असे न्याहारीला साजूक करंज्या खाते तर दुसरे एखादे खडीसाखर तोंडी लावते.

*लाडका ल्योक बाई । बापासंगाट जेवी*
*खडीसाखर तोंडी लावी । बाळ ग नेनंता*

ज्यांच्या घरात ऐवढे वैभव नाही त्यांनी आपल्या बाळालाच वैभव समजून आपला विषाद गाळून टाकला आहे.

*शेजीची संपत । सांदी गोंदीला ग लोळे*
*बाळ वसरीला खेळे । नेनंता ग माजा*

---

१ झबले. २ इन्दूर-निझामाबादचे पूर्वीचे नाव अजूनही खेड्यांतले लोक इन्दूर याच नावाने निझामाबादचा उल्लेख करतात. ३ करंज्या–गर्जेलु–करंज्या तेलगू शब्द. मराठीत गर्जेल झाले.

किंवा एखादी आई शेजारणीच्या दागिन्याकडे आसुसलेल्या नजरेने पाहत असेल तर तिची सासू तिला समज देते—

*शेजी ग लेनं लेती । काय फातीस[1] लेन्याला*
*झाक कडेच्या तान्ह्याला । बाळ ग नेनंत्याला*

अशा घरातून बाळराजाच्या चांदव्याला रावे-मैना कोण आणून देणार? ती आई बिचारी आहे त्यातच बाळाची हौस करते.

*पाळन्याच्या ग वरी । चांदवा जंवसाचा*
*आत माजा नवसाचा । बाळ ग नेनंतां*

असे हे नवसासायासाचे मूल बोबडे बोल बोलायला लागले की, आईला परब्रह्म गवसल्याचा आनंद होतो. ती शेजारणींना कौतुकाने सांगते :—

*बोबड्या बोलन्याचं । मला ग येते हासू*
*किती प्रताळून[2] पुसू[3] । बाळ ग नेनंत्याला*

बोबडे बोल बोलणारे अन् लटपटती पावले टाकणारे लाडके लेकरू आता चांगले मोठे होऊन दांडगाई करायला लागले तेव्हा ती आपल्या शेजारणींना सावध करते—

*शेजारिनीबाई रंबा । तुजं संबाळ रांजन*
*माजं अनवाळ[4] महाजन । चेंडू येइल वागतून*

खेळायला म्हणून बाहेर गेलेल्या बाळाला काय तहानभुकेची शुद्ध राहते? पण बाळ भुकेला असेल म्हणून आईचा जीव मात्र सारखा खालीवर होत असतो ती शेजाऱ्यापाजाऱ्यांना विनवते :

*नेनंत बापु[5] गेलं । खेळता खेळ मोडा*
*माज्या भुकेल्या बापूला । जेवायला घरा धाडा*

घरात असे खेळते सवरते मूल असले की त्याच्याबरोबर खेळायला चार इतर मुलेही येणारच. त्या मुलांनी कितीही धुडगूस घातला तरी आई रागावत नाही. कारण तिचे म्हणणे असे की,

---

१ पाहतेस. २ पडताळून. ३ विचारू. ४ लडिवाळ. ५ लहान मुलांना कौतुकाने बापू म्हणतात.

*शेजीच्या लेकरान्‌ला । लावीता पाच चोटं*
*वाडा भरे तुझ्यासाटं । बाळा रे नेनंत्या*

मूल म्हटले की, त्याच्या पाठोपाठ खोड्या या आल्याच. अशाच एका खोडकर मुलाच्या आईकडे शेजारीण येते तेव्हा तिची खात्री पटते की, हिने आपल्या मुलाच्या कागाळ्याच आणल्या असाव्यात बहुधा. पण आपले पोर जर खोडकर आहे तर शेजारणीवर रागावण्यात काय अर्थ? उलट तिची मनधरणीच करायला हवी. म्हणून ती म्हणते :

*शेजी ग घरा आली । पाट टाकीते बसाया*
*तुजा अन्याय पुसाया । बाळा रे नेनंत्या*

शेजारीण तर चिडलेलीच होती. बसायला पाट टाकला तरी ती शिव्याच द्यायला लागली; पण आई मात्र समंजसपणा दाखविते—

*शेजी ग शिया[1] देती । देती ग संतापाच्या*
*वव्या[2] गाते आउक्षाच्या । बाळ ग नेनंत्याला*

शेजीने दिलेल्या शिव्या या शिव्या नसून आयुष्य वाढण्यासाठी गायिलेल्या ओव्या आहेत असे ती समजते.

बाळाचे आयुष्य असे दंगामस्ती करण्यात मोठे मजेत चाललेले असते; पण बदलत्या युगाला अनुसरून त्याला शाळेतले शिक्षण तर दिलेच पाहिजे. म्हणून बाळाला शाळेत घातले जाते. आईला वाटते, आपला बाळ असा दिवसभर उनाडक्या करण्यात दंग असतो, त्याला विद्या येणार तरी कशी? म्हणून ती देवीला नवस करते:—

*नवस करीते । बासरचे[3] सरस्वती*
*विद्या द्यावी पुरती । बाळ माज्या नेनंत्याला*

---

१ शिव्या. २ ओव्या. ३ बासर येथे श्री. व्यास महर्षींनी स्थापित केलेली सरस्वतीची मूर्ती आहे. हिची आराधना केल्याने व तप केल्याने विद्या येते असा समज आहे. महाराष्ट्राची सरहद्द सोडून आंध्रची सरहद्द येथूनच सुरू होते. आंध्रच्या सरहद्दीवरचे पहिले रेल्वे स्टेशन.

नुसते नवस करून थोडेच भागते? आपल्या बाळाला मार न खाता शिक्षण आले पाहिजे म्हणून शाळेतल्या पंतोजीलाही काहीतरी दिलेच पाहिजे अशी तिची समजूत असते. म्हणून ती म्हणते:—

*साळतल्या पंतोजीला। देऊ केली ताटवाटी*
*नको मारू लेहण्यासाटी। बाळ ग नेनंत्याला*

मुलगा अभ्यास करतो तर आईला त्याच्या अभ्यासाचे कौतुक फार! ज्याला त्याला ती सांगते:—

*लेहोनी लेहोनी ग। सुकलेत पाची बोटं*
*कवळे हात मनगट। बाळ ग नेनंत्याचं*

मुलाला शिक्षणासाठी दूर परगावी ठेवतात. आईचा सारा जीव त्याच्याकडेच असतो. तिला वाटते:—

*जीव माजा उदासला। इतुन भरारी मारावं*
*जाड कवटाळी धरावं। बापु माज्या चंदनाला*
*मला ग बाई वाटे। पाखरासहित जावं*
*हे ग राव्याला ग पाहावं। बाळ माज्या राजसाला*

असे तिला वाटत असते. तरीही मुलाच्या भवितव्याकडे पाहून त्याचा हा विरह ती सहन करते. अखेर बाळ मॅट्रिक पास होतो, तेव्हा तिचा आनंद काय वर्णावा? तिला वाटते, जिकडे तिकडे माझ्या मुलाच्या मॅट्रिक पास होण्याचीच चर्चा चाललेली आहे. म्हणून ती कौतुकाने ज्याला त्याला सांगते:—

*देलगूर[१] तालुक्यात। कशाचा ग गलवला*
*म्याट्रिक पास झाला। बाळ ग नेनंता*

एवढासा भुईतला अंकुर आपल्या डोळ्यांदेखत इतका मोठा झालेला जेव्हा पाहते तेव्हा खेड्यातली आई तिच्या भाषेत तिची ईश्वराविषयीची कृतज्ञता व्यक्त करते—

*अंगडीचं बाई होतं। घोंगडीचं बाई झालं*
*पांग देवानं फेडीलं.*

---

१ नांदेड जिल्ह्यांतील सर्वांत मोठा तालुका



# लोकसाहित्यातील लेकरू

डॉ. ग. वा. तगारे, एम्. ए., पीएच. डी.,
उस्मानाबाद

लहान मुलांसंबंधी (इकडे लेकरू शब्द जास्त प्रचलित आहे) आळवलेल्या ओव्यांमध्ये बाळाचा नाजुकपणा काव्यविषय व्हावा यात नवल नाही. बालकृष्ण हा लेकराचे प्रतीक मानून एक शेजारीण सांगते :—

*यसवदेला काना झालाय ।*
*झालाय कुना वानी ।*
*जवसाच्या फुलवानी ॥*

हे कौतुक बालकृष्णापुरतेच मर्यादित नसून सृष्टिमातेचे तान्हे लेकरू— बालसूर्य—उदय पावत असतानासुद्धा व्यक्त होते.

*उगवला नारायण । उगवता तान्हं बाळ ।*
*शिरी सोन्याचं जावळ ॥*

दशदिशांना फाकलेल्या सोनेरी किरणांनी सुशोभित झालेल्या सूर्यबिंबाला पाहून जुन्या वैदिक कवीला तो स्वरूपसुंदरी उषेचा अनुनयार्थ पाठलाग करणारा प्रियकर (सूर्यो देवीमुषसं रोचमानामर्यो न योषामभ्येति पश्चात्) वाटला, तर एका वत्सल मातेला तो सोन्याचं जावळ असलेला तान्हा बाळ भासला.

बालकृष्ण थोडा मोठा होतो. यशोदेच्या मैत्रिणी त्याला पाहण्यासाठी निघतात आणि कल्पनेने त्याचे वैभव रंगवितात :—

*चल ग सया पाहया जाऊ ।*
*किसन देवाचं बाळपन ।*
*त्याच्या ग टोपीला ।*
*नऊ लाख तारांगन ॥*

शेजारीण श्रीमंत आहे. पण तिची संपत्ती कड्याकुलपात अडकून पडलेली आहे. आपली लेकरे मात्र उघड चारचौघात, समाजात वावरत आहेत हे समाधान काय थोडे आहे?

*शेजीची संपत्ती । पडली सांदी कोंदी ।*
*हिरे माजे सभेमंदी ॥*

मुले मोठी झाल्यावरच हे समाधान मातेला लाभते असे नसून लेकरू अगदी लहान असल्यापासून शेजारणीच्या झाकून पाकून घातलेल्या दागदागिन्यांपेक्षा तिला ते समाधान देते. एक गरीब माता म्हणते :—

*शेजी ग लेनं लेती । झाकून पाकून ।*
*मन माजं समाधान । बाळाला पाहून ॥*

आजीला तर आपले नातवंड सोन्यापेक्षा मोलाचे वाटले तर नवल नाही. कडेवरच्या मुलाच्या डोक्यावरून पदर घालून त्याला झाकण्यापेक्षा स्वतःच्या जिनसांना जपणाऱ्या मुलीला ती समजावून सांगते :—

*शेरभर सोनं । काय करावं सोन्याला ।*
*झाक कडेच्या तान्याला ॥*

बाळ मोठे होते. आईला कामाला जायचे असते. पण बाळाला आईला सोडावेसे वाटत नाही (आणि आईला सुद्धा); आणि या अडचणुकी–हा कामात होणारा घोटाळा–व तो करणारे बाळ मोठा कौतुकाचा विषय असतो :—

*काम हे करताना । कामाचा घोटाळा ।*
*नाग घालतो वेटाळा । तान्हं ग बाळ माझं ।*

ही ओवी तुळजापूर भागात


*लेकुरवाळीच्या । कामाचा घोटाळा ।*
*नेनंत्या मैनाला । नाग घालितो वेटाळा*

अशी दुसऱ्या संदर्भात ऐकू येते.

बाललीलांचे कौतुक किती करू आणि किती न करू असे मातेला होत असते त्याची उदाहरणे कितीतरी देता येतील. पण अशा लेकरांना जन्म देणारे आपले मोठे लेकरू (मुलगी) पाहून प्रौढ माता लिंबलोण करीत म्हणते :—

*कोनी दृष्ट केली । आंब्याच्या डहाळीला ।*
*माझ्या लेकुरवाळीला ॥*

मातृवात्सल्याने ओथंबलेल्या ओव्या मातेने पाजलेल्या हृद्यामृतासारख्या अवीट गोड आहेत. महाराष्ट्राच्या या उपेक्षित विभागामधील लोकसाहित्यातील वात्सल्याची वानगी वर दिली आहे.





# खानदेशी लोकगीते

प्रा. गजमल माळी, एम्. ए. औरंगाबाद

सायंकाळचा सूर्यप्रकाश ओसरला. झाडांच्या झुबक्यांच्या हालचाली अस्पष्ट होऊ लागल्या. क्षितिजात मिसळलेल्या डोंगररेषा काजळू लागल्या. गुरा-वासरांचा, पक्ष्यांचा ध्वनी आता विरू लागला. मिणमिणते दिवे घराघरातून पेटले. पेटलेल्या चुलीजवळ घरातील माणसे एकत्र झाली. श्रमलेल्या, थकलेल्या पोटात अन्नाचे कण जाऊ लागले. जेवणे संपली. घराघरातून मुले बाहेर पडली आणि सारी पाराजवळ एकत्र झाली.

चंद्राचे बिंबही हळूहळू वर सरकू लागले. वृक्षांच्या पानातून साचलेला काळोख हलला. वृक्षांच्या पानातून गळालेले चांदणे जमिनीवर पसरू लागले. वाऱ्याच्या झोताने पाने हलू लागली. हलताना चकाकू लागली. घरांच्या आणि वृक्षांच्या लांब लांब सावल्या जमिनीवर लोळत पसरल्या. हवेतील गोड गारव्याने नसानसातून लाख झिणझिण्या उठल्या. अंगात उत्साह भरला. आता पाराभोवती बराच घोळका जमू लागला. मुलांच्या आणि मुलींच्या पलीकडे कट्ट्यावर काही मोठी माणसे बसली होती. त्यांच्यात काही चर्चा चालू होती. जवळच बैलांच्या जोड्या रवंथ करीत होत्या. हालचालींनाही एक ताल होता. साऱ्या वातावरणात एक गती होती. साऱ्या हालचाली कशा सुसंगत, सुसंवादी घडत होत्या. माणसे

आणि निसर्ग कसे एकात्म झाले होते. एकीकडे काही मुले हुग हुग सावल्यांचा खेळ खेळत होती. काहीत भुताखेतांच्या चमत्कारिक, अद्भुत गप्पांना रंग भरला होता. काही 'शिव माशी'चा खेळ खेळत होती. काही मुली जवळच फुगडी खेळत गाणी म्हणत होत्या. फुगडी खेळता खेळता पायाखालची जमीन लाल लाल होत होती. सारीकडे चैतन्य ओथंबून होते. निसर्गात आणि मानवी मनातही.

काहीच्या गळयातून गाण्याचे सूर निघाले. शब्द बाहेर पडू लागले. ध्वनी उमटू लागले. पावलांनी ठेका धरला आणि ओठांतून फू फू चा नाद निघू लागला. केश–झिंज्या मोकळया सोडून मुली घुमू लागल्या. चैतन्याला भरते आले. मी ओट्यावर बसून डोळ्यांत हे चैतन्य साठवू लागलो.

माझ्या बालपणापासून मी ही लोकगीते ऐकतो आहे, म्हणतो आहे. थकलेल्या मनाला नवा उत्साह देण्याची चैतन्यशक्ती या गीतात आहे. युगायुगापासून ही गीते म्हटली नि ऐकली जातात; पण त्यातील गोडी अजूनही कमी होत नाही. काळाचे दुःख आणि सुख या गीतांनी आपल्यात साठवून ठेवले आहे. बहिणीचे निर्व्याज प्रेम, पत्नीचा लाडका रुसवा, आईचे वात्सल्य अशा कितीतरी मानवी भावनांची साठवणी या गीतातून झाली आहे. विविध प्रकारच्या तरल, सूक्ष्म भावनांना या गीतात शब्दरूप दिलेले दिसते. या गीतातून सावित्रीचे पातिव्रत्य, द्रौपदीचा स्वाभिमान, सीतेचे पावित्र्य आणि भक्ती व दमयंतीची ऋजुता आहे. यात भावनांची कोमलता आहे, तशी प्रखरताही आहे. सत्याला आवाहन आहे, तसा असत्याचा तिरस्कार आहे. शुचित्वाची पूजा आहे, मांगल्याचा ध्यास आहे आणि दिव्यत्वाचा साक्षात्कार आहे. ह्या साऱ्या भाव-भावना आमच्या आहेत. मानवी विचारात प्रगती झाली. ती होणे अपरिहार्य आहे. परंतु चिरंजीव असलेल्या त्याच त्या भावनाचे वेड मानवी मनाला आहे. ह्या विविध प्रकारच्या चिरभावनांचा आविष्कारच आमच्या लोकगीतातून झाला आहे. शाश्वत मूल्यांची जोपासना या लोकसाहित्याने केली आहे. आमच्या समाजाचे प्रतिबिंब खऱ्या अर्थाने या लोकसाहित्यात उमटले आहे. समाजाच्या संस्कृतीचा शोध या लोकसाहित्यातूनच लागेल. आमचे हे साहित्य म्हणजे लोकभारत नि लोकरामायण आहे. त्यात शाश्वत अशा मानवी भावनांचा ताजेपणा आहे. टवटवी आहे. आणि म्हणून ते सतत वाचावेसे वाटणार! ही गीते ऐकावीशी वाटणार!

तीच गीते मी आज पुन्हा कित्येक दिवसांनी ऐकत होतो. पलीकडे काही मुली खेळत होत्या त्यांनी हातात हात गुंफले होते. एक साखळी तयार केली होती. एक एक मुलगी हातांच्या साखळीतून निघत होती आणि सर्व मुली गाणे म्हणत होत्या :

*आमची म्हैस*
*तुमची म्हैस*
*अजनाचा पाला खाते*
*धम्म धम्म दूध देते*
*लगीन कोणाचं ?*
*×××चं.*

शेवटच्या ओळीत एका एका मुलीचे नाव घातले जात होते. काहीही खर्च न लागता लग्नाचा सोहळा पार पडत होता.

पलीकडे काही मुली 'टिकली मारुनी जा' हे गीत गात होत्या. एका मुलीने एकीचे डोळे झाकले होते. समोर दहाबारा मुली बसल्या होत्या. जिने डोळे झाकले होते. ती गात होती :

*राजा राणींनो या*
*टिकली मारून जा*
*हालू नको डोलू नको*
*किल्ली कुलूप*

समोर बसलेल्या मुलींपैकी कोणतीही एक मुलगी जिचे डोळे झाकले होते त्या मुलीच्या कपाळावर बोटांनी टिचकी मारीत होती आणि परत आपल्या मैत्रिणीं-मध्ये अगदी न हालता, न डोलता येऊन बसत होती. आणि मग टिचकी कोणी मारली, असा प्रश्न डोळे झाकलेल्या मुलीला विचारला जात होता. केवळ बोटांच्या स्पर्शावरून त्या मुलीला ओळखावे लागत होते. तिने जर बरोबर ओळखले तर त्या दुसऱ्या मुलीचे डोळे झाकले जात होते आणि पुन्हा पूर्वी-प्रमाणे हे गाणे म्हटले जात होते.

लहानपणी लग्न म्हणजे खरोखर काय आहे याची कल्पनाही नसते. परंतु लग्नाचा संदर्भ अशा अनेक गीतातून आलेला दिसतो. या गाण्यात हा संदर्भ असाच नाही का आला?

*एक म्हणे*
*लगीन कर.*
*दुसरी म्हणे*
*कुठून करू ?*
*तिसरी म्हणे*
*कर्ज काढ.*
*चौथी म्हणे*
*कोण फेडील ?*
*पाचवी म्हणे*
*मीच फेडीन.*

हे गाणे एक एका बोटाला धरून म्हटले जाते. गाणे संपले म्हणजे जिचा हात हातात घेतला असेल तिला गुदगुल्या केल्या जातात. मुलांमध्ये असेच गाणे 'वाटीभर दूध पिशील का' या ओळीने सुरू होते.

लहान मुलांचे कितीतरी कुतुहलाचे विषय असतात. घरी आलेला पाहुणा हाही लहान मुलाचा एक चेष्टेचा विषय. फार दिवसांपासून आलेला पाहुणा. हा आपल्या घरी परत जात नाही. पाहुणचार केला, जिभेला फोड येईपर्यंत त्याला गरम, ताजे पदार्थ खायला दिले, तरी तो आपल्या घरी परत जात नाही, अशी कल्पना खालील गीतात सुंदर रीतीने वर्णिली आहे. एखादा पाहुणा घरी परत गेल्यावर हे गीत मुलांनी म्हटले म्हणजे मोठी माणसे खूप हसतात—

*आटुकल्या मटुकल्या*
*चवल्या चटुकल्या*
*चटुकल्या झाल्या गोड गोड*
*जिभले आलाय् फोड फोड*

*तो फोड फुटेना*
*दारचा पाव्हना उठना*
*तो फोड फुटला*
*दारचा पाव्हना उठला.*

आपल्या वहिनींविषयींच्या आपुलकीच्या भावना मुलींनी लोकगीतातून विविध प्रकारे व्यक्त केल्या आहेत. काही गीतात वहिनींची चेष्टा केलेली दिसते, तर काहींमध्ये वहिनींच्या तुसड्या, खाष्ट नि रागीट स्वभावाचे वर्णन आलेले असते. काही गीतात वहिनी आपल्या धाकट्या नणंदेला प्रेमाने वागविताना दिसतात, तर काही गीतात वहिनी आपल्या मैत्रिणींशी गप्पा मारीत बसतात आणि धाकट्या नणंदेला स्वयंपाकाचे काम करायला सांगतात. लहान मुली म्हणत असलेल्या या गीतात अशीच एक खाष्ट वहिनी वर्णिलेली आहे. ती सर्व स्वयंपाक झाला तरी रंगलेल्या गप्पा सोडून येताना दिसत नाही; परंतु भाजीला फोडणी देताना झालेल्या सन्‌न्‌ अशा आवाजाने वहिनींच्या गप्पांत व्यत्यय येतो नि आपल्या वन्सला बोलण्याकरिता मात्र त्या स्वयंपाकघरात दणकन्‌ येतात !

*कडू कारलं तोडलं ग सई*
*अजून भावजयी आल्या नई*
*कडू कारलं कापलं ग सई*
*अजून भावजयी आल्या नई*
*कडू कारलं भाजलं ग सई*
*अजून भावजयी आल्या नई*
*कडू कारलं शिजलं ग सई*
*अजून भावजयी आल्या नई*
*भाजी टाकली सन्‌कन्‌*
*भावजया आल्या दण्‌कन्‌*

या गीतात एक मुलगी ही आपल्या कथा दुसऱ्या मैत्रिणीला सांगत आहे. प्रत्येक ओळ दोनदोनदा म्हटली जाते. भाजीला फोडणी देताना होणारा

आवाज आणि भावजयांचे दणकन् येणे यातील ध्वनींबरोबर वहिनींच्या स्वभावाचेही सहजतया रेखाटन झालेले दिसते.

माहेराविषयीचे उत्कट प्रेम शब्दाशब्दातून पाझरताना दिसते, माहेराच्या कोणत्याहि वस्तूचा उल्लेख आला की, प्रेमाचे झिरपे वाहू लागते. खालील गीतात माहेरच्या आठवणींचा गोफ कसा काव्यात्मक रीतीने उकलतो आहे बघा :

*काळा कोळसा झिक झिक बाणा*
*पालखीत बसला बुलोजी राणा*
*घाल घाल बुलोजी इंजीन वाणा*
*घालता घालता लागला वेळ*
*घरात रडतं तान्हं बाळ*
*तान्ह्या बाळाचं काय काय लेणं*
*सरी पिंपळ एक पान*
*एक पान दरबारी*
*दरबाराचा डामा डौल*
*वाजतो तसा वाजू द्या*
*आम्हाले खेळ मांडू द्या*
*खेळात सापडली अधेली*
*अधेली देऊ वाण्याला*
*वाण्या वाण्या शोप दे*
*शोपा माझ्या गाईला*
*गाई गाई दूध दे*
*दूध माझ्या बगळ्याला*
*बगळया बगळ्या पंख दे*
*पंख माझ्या राजाला*
*राजा राजा घोडे दे*

*घोडे माझ्या बापाला*
*बापा बापा साड्या दे*
*साड्या माझ्या आईला*
*आई आई चोळ्या शिव*
*चोळ्या माझ्या बहिणीला*
*बहिणी बहिणी भातकुलं दे*
*भातकुल माझ्या भावाला*
*भावा भावा गोंडे दे*
*तेच गोंडे लेवू*
*सासरी जाऊ*
*सासरच्या वाटे*
*कुचू कुचू काटे*
*माहेरच्या वाटे*
*खारिक खोबरे दाटे*

या गाण्यात ती मुलगी एक एक वस्तू मागताना दिसते; परंतु ती स्वतःकरिता नव्हे, तर आपल्या आई, बाबा, भाऊ, बहीण यांच्याकरिता! स्त्रीच्या त्यागाची भूमिका येथे सहजरीत्या प्रकट झाली आहे. शेवटच्या ओळीत भावाने दिलेले गोंडे घेते आणि तेच गोंडे वेण्यांना लावून ती सासरी येते. पुढील जीवनात भाऊच स्त्रियांचा हक्काचा आधारस्तंभ असतो हे मोठ्या कलात्मक रीतीने या गाण्यातून सुचविले आहे. आणि शेवटच्या चार ओळीत सासर आणि माहेर यांविषयीच्या भावना काव्यात्मक शब्दात व्यक्त झाल्या आहेत.

खेड्यामधून सायंकाळच्या वेळी सांजी मांडली जाते. एका वाड्यातील मुली एकत्र येतात. गुलबक्षीची फुले सायंकाळीच फुलतात. तेवढेच या फुलांचे आयुष्य. ही गुलबक्षीची झाडे खेड्यांमधून पाण्याच्या माठाजवळ, परसात लाविलेली असतात. ही फुले मुली सायंकाळी तोडून आणतात. फुलांची जी कांडी असते, तिच्या शेवटच्या टोकाला ज्वारीच्या दाण्याएवढे बी असते. फुले ताजी असताना तेही हिरवे असते. त्याला फुलांच्या पाकळ्यात एक बारीक

तंतू असतो. कांडीजवळचे हे हिरवे बी बाहेर ओढले म्हणजे तो तंतूही बाहेर ओढला जातो. नंतर ते बी लोंबकळत सोडले जाते. मुली भिंतीला शेणाचा किंवा ओल्या मातीचा (खानदेशमध्ये फक्त शेणाचाच) थर देतात. गोलाकार शेणाच्या पंजाएवढ्या थरावर ही फुले चिपकवितात. अशी फुले भिंतीला चिपकली असताना तंतूसह असलेला तो हिरवा दाणा लोंबकळत असतो. तिलाच सांजी असे म्हणतात. ही सांजी मांडून झाली म्हणजे मुली टिपऱ्यावर सांजीचे गाणे म्हणतात. हे गाणे पाचदा म्हणून झाले म्हणजे ज्या मुलीकडील सांजी असेल, ती इतर मुलींना सांजीचा प्रसाद म्हणून खाऊ देत असते. हा मुलींचा घोळका नंतर जिचे निमंत्रण असेल त्या मुलीच्या घरी जातो. काळोख पसरू लागला म्हणजे हे फिरण्याचे सत्र बंद होते. ते गाणे असे :

*सांजी सांजी दिवा लगाव*
*दिवा लगाव*
*दिवा नेला चोरानं*
*चोरानं*
*बत्ती लाविली मोरानं*
*मोरानं*
*मोरानं देल्या पाच कवड्या*
*पाच कवड्या*
*त्याच्या आणू रेवड्या*
*रेवड्या*
*रेवड्या देऊ भाचीला*
*भाचीला*
*आपण जाऊं काशीला*
*काशीला*
*काशीहून आणू वायकं*
*वायकं*

*फोडा सांजीचं टायकं*
*टायकं*

या ठिकाणी सांजीचे नंतर टाळके का फोडायचे ते मात्र कळत नाही! कदाचित् गुलबक्षीच्या फुलांना लाभणारे किंचित् आयुष्य यातून सूचित होत असावे. कारण गाणे म्हणेपर्यंत गुलबक्षीची फुले फुललेली असतात आणि थोड्याच वेळात ती कोमेजूनही जातात.

नवरात्रातील भुलाबाईचा उत्सव खानदेशात मोठ्या थाटाने साजरा केला जातो. भुलाबाई बसविल्यानंतर तिच्यासमोर गाणी म्हणण्याची पद्धती आहे. पटपऱ्या खेळून ही गाणी म्हटली जातात. गाणी संपल्यावर खाऊ वाटला जातो. खाऊ देताना तो कशाचा आहे हे लपवून ठेविलेले असते. आलेल्या मुली खाऊ कशाचा असावा ते गाणे म्हणत ओळखतात.

अशी भुलाबाईची गाणी डॉ. सरोजिनी बाबर यांनी प्रकाशित केलेली आहेत. काही नवीन गाणी मला खानदेशात मिळाली, ती अशी :

भुलाबाईच्या काही गाण्यात कूटेही असतात. एक मुंगी, ती व्याली, तिला णारे दूध किती असावे? असा प्रश्न करून या गीताला प्रारंभ होतो.

*काळी मुंगी व्याली बाई*
*हिचं दूध किती?*
*पहिला पेला भरला बाई*
*दुसरा प्याला हाती*
*काळी मुंगी व्याली बाई*
*हिचं दूध किती?*
*दुसरा प्याला भरला बाई*
*तिसरा प्याला हाती!*
*काळी मुंगी व्याली बाई*
*हिचं दूध किती?*
*तिसरा प्याला भरला बाई*
*चवथा प्याला हाती!*

काळी मुंगी व्याली बाई
हिचं दूध किती ?
चवथा प्याला भरला बाई
पाचवा प्याला हाती !
पाचाचा आकडा
माळ घातली हनुमंता
हनुमंताची निळी घोडी
जाता जाता कमळ तोडी
कमळाच्या पाठीमागे लागली राणी
अग अग राणी कोठे चालली ?
जिथे होते चिलया बाळ
चिलया बाळाला भूक लागली
चांदीच्या चमच्याने दूध पाजियले
पाटाच्या घडीने तोंड पुशियले

हनुमंताचा येथे आलेला उल्लेख लक्षणीय आहे. त्याची घोडी भरधाव सुटली असताना कमळाच्या फुलाला तोडते. येथे चिलयाचा उल्लेख का आला असावा ?

मुलाबाई म्हणजे महाराष्ट्रीय मुलींची देवता. त्यांच्या गाण्यातून या भुलाबाईने विविध प्रकारच्या भूमिका पार पाडलेल्या दिसतात. भाऊ-बहिणी-विषयी वाटणाऱ्या प्रेमाला अशा गाण्यातून भरते येते.

काळा कोळसा करू बाई
शेर तूप मावेना
आमची भुलाबाई
चौपट खेळेना
चौपट खेळता लंपट झाली
वाटेवरला चांदोबा

*वाटोळा दिसे*
*आमुची भूलाबाई*
*पातळ नेसे*
*पातळ नेसू द्या*
*गंगेवर जाऊ द्या*
*गंगेला आला लोंढा*
*भिजला माझा गोंडा*
*गोंड्याच्या पदरी रुपाया*
*भाऊ माझा शिपाया*
*शिपायानं केली बायको*
*आडे घेऊ का कडे घेऊ*
*समुद्राच्या आड नेऊ*
*समुद्राला आला पूर*
*चाल ग सये भूर*

या गाण्यात भावाविषयीची आपुलकी तर व्यक्त झालेली दिसतेच; परंतु आपल्या भावाने लग्न करून आणलेली वहिनीदेखील घरातील धाकट्या बहिणींना भावाइतकीच आवडते. आपल्या वहिनीला कुठे ठेवू नि कुठे नाही असे धाकट्या बहिणीला होते. तिचा अमाप उत्साह ओसंडत असतो. या गाण्यातील शेवटच्या ओळी हा उत्साह किती यथार्थ शब्दांनी तोलून धरतात.

*पहिल्या मासी नणंद पुसे*
*वहिनी ग वहिनी डोहाळे कसे ?*
*माझे हे डोहाळे पूर्वीचे वन्स*
*वहिनीला खायला दिली मी कणसं*
*दुसऱ्या मासी दीरही पुसे*
*वहिनी ग वहिनी डोहाळे कसे ?*

माझे हे डोहाळे पूर्वीचे दीरा
वहिनीला खायला दिला मी खीरा
तिसऱ्या मासी सासूही पुसे
सूने ग सूने डोहाळे कसे ?
माझे हे डोहाळे पूर्वीचे सासू
सूनेला खायला दिले मी काजू
चवथ्या मासी सासरा पुसे
सुने ग सुने डोहाळे कसे ?
माझे हे डोहाळे पूर्वीचे मामंजी
सुनेला खायला दिली मी करंजी
पांचव्या मासी भाऊही पुसे
बहिणी वहिणी डोहाळे कसे ?
माझे हे डोहाळे पूर्वीचे भाऊ
बहिणीला खायला दिला मी खाऊ
सहाव्या मासी बहिण पुसे
बहिणी ग बहिणी डोहाळे कसे ?
माझे हे डोहाळे पूर्वीचे वहिणी
बागेत जाऊन आणिल्या खिर्णी
सातव्या मासीं बापही पुसे
लेकी ग लेकी डोहाळे कसे ?
माझे हे डोहाळे पूर्वीचे बापा
बागेत जाऊन आणावा चाफा
आठव्या मासी आईही पुसे
मुली ग मुली डोहाळे कसे ?
माझे हे डोहाळे पूर्वीचे आई
खोली सारवोनी सावध राही

*नवव्या मासी नवरा पुसे*
*राणी ग राणी डोहाळे कसे ?*
*माझे हे डोहाळे पूर्वीचे पति*
*कृष्णाचा जन्म मध्यम राती*

या गाण्यातील काव्यात्मक रम्य कल्पना, प्रत्येक महिन्यात विकसित होत जाणाऱ्या तिच्या भावना, त्या भावनांच्या बरोबर उमलत जाणाऱ्या गर्भचंद्राच्या पाकळ्या सारेच नावीन्यपूर्ण !

नऊ महिने पूर्ण झाले. मध्यरात्री मुलाचा जन्म झाला. मग त्याचे नाव काय ठेवायचे ?

*आड बाई आड ग*
*इतका काय खोल ग ?*
*सोनियाच्या पायऱ्या*
*रुपयाचं मोल ग !*
*विटी बाई विटी*
*अशी कशी विटी,*
*भुलाबाईला लेक झाला*
*गावोगाव चिठ्ठी !*
*दांडू बाई दांडू*
*असा कसा दांडू ?*
*भुलाबाईला लेक झाला*
*नाव ठेवा पांडू*

याच गाण्यात हव्या तेवढ्या पदार्थांची किंवा वस्तूंची नावे घालून ते लांबविता येते.

अशी ही खानदेशातील मुलींची गाणी मी आज पुन्हा त्याच बालपणच्या उत्साहाने ऐकत होतो. यातील काही शब्द निरर्थक असतील; परंतु त्यांतही नाद असेल. त्या नादाने माणूस वेडा होऊन जावा इतके सामर्थ्य

त्या नादात आहे. त्यात युगायुगापासून याच वाटेने चालत आलेले दुःख आहे, पोळलेल्या अंतःकरणाचे आर्त सुस्कारे आहेत. डोळ्यातून गळालेल्या ऊन पाण्याने ही गाणी ओली झाली आहेत. सुखाचे क्षणही टिपून घेतले आहेत. श्रमपरिहाराकरिता म्हटली जाणारी ही गाणी आणि खेळले जाणारे हे खेळ; परंतु त्यातही माहेर आणि सासरचा विसर त्यांना पडत नाही. स्त्रियांचे जीवनच या दोन टेकडयातून वाहणाऱ्या नदीसारखे ! एका काठावर माहेराचे मंदिर आणि दुसऱ्या काठावर राजाचा राजवाडा. नदीच्या पाण्याला दोन्ही काठांचा विसर कधी पडत नाही. मग खळखळून हसण्याचा प्रसंग असो, अगर दुःखाच्या डोंगरावरून कोसळण्याची घटना असो. आमच्या महाराष्ट्रीय स्त्रियांचे हेच जीवन आणि हीच त्यांच्या जीवनाच्या कहाणीची गाणी !

# माणिक मोत्यांची रास

प्रा. आनंद यादव, एम्. ए., पंढरपूर

पहाटे ज्या वेळी सूर्यनारायण पृथ्वीला मंगल मंगल म्हणून बोलावितो आणि तिला सगळे मांगल्य त्या कोवळ्या ताज्या सोनप्रकाशातून सहस्र सुंदर किरणांनी देऊ करतो, त्या वेळी महाराष्ट्राच्या कणाकणातून पसरलेले मराठी माउलीचे प्राण जागृत राहून गात असतात; तिच्या मुलांफुलांत उमलत असतात. जात्याच्या तालावर मग ती गात असते. त्या वेळी अंथरुणात जागे होऊ पाहणाऱ्या तिच्या फुलावर–टपोऱ्या मोगऱ्यावर–गोंडस जाईवर–तिचे डोळे आणि भावना खिळलेल्या असतात—

*चाललं दळण, सुपात खंडी दाणा,*
*गोकुळात ग कृष्ण तान्हा, जागा होई ॥*

दळणाच्या वेळी सुपात खरे दाणे मूठ-पसाच असतात. अठरा विश्वे दारिद्र्यात कुठले आले आहे अधिक धान्य? पण तिच्या झोपलेल्या गोकुळात तिला तिचा तान्हा कृष्ण दिसला की, सोन्याच्या द्वारकेत असल्यागत तिला वाटते.

*हातात कडी-तोडे, कमरी करगोटा नागमोडी*
*टाळु झुलपाचा मारवाडी बाळ माझा ॥*
*बिंदल्या-मनगटाचा हात, ठेवितो ताटापुढे*
*बाळ जेवितो बापापुढे, सुधाकर*

कडी-तोड्यांचे, बिंदल्या-करगोट्याचे भाग्य तिच्या फार थोड्या बाळांना मिळते. तेवढ्या भाग्यासाठीही तिला घामाचे पाणी करावे लागते. असे असले तरी तिच्या बाळाचा तो खरा दागिना नव्हे!

*मोठे मोठे डोळे, भिवया चंद्रज्योति,*
*तुला चांगला म्हणू किती, सोन्या माझ्या ॥*
*मोठे मोठे डोळे, जशा अंबियाच्या फोडी*
*नटवा डोळे मोडी, बाळ माझा ॥*
*मोठे मोठे डोळे, झुलपाचे आकडे*
*किती पाहू मी रूपाकडे, राजसाच्या ॥*
*असा रस्त्यानं चालता, कसा बाळ ग डोलतो*
*माझं काळीज फुलवितो, माऊलीचं ॥*

बाळाचे डोळे, त्याची टाळू–झुलपे, त्याचा अंगलोट, त्याचे चालणे–बोलणे हेच त्याचे खरे दागिने! त्याच्या या सौंदर्याला तीट–काळजाने नटविले की पुरे. पण बाळ नटलेला–सजलेला नसतानाही कधी कधी या बाळास दृष्ट होते. मग मात्र माउलीचा जीव घाबराघुबरा होतो. नाही त्या गोष्टीचा तिला संशय येतो.

*हाड ग शीड गाई, शीड म्हणता जाईना*
*बाळ रडता राहीना, काय करू ?*
*हाड ग शीड बाई, शीड म्हणीते मांजराला*
*दीष्ट बाळाच्या काळजाला, शेजीबाई ॥*

तिन्हीसांजेला घराकडे परत येणाऱ्या गाईचा देखील असा संशय येतो. फार काय घरातल्या मांजराचा संशय येतो! तिचे भोळे मन गुरा–ढोरांच्या

दृष्टीचाही संशय घ्यायला कमी करत नाही. शेजीचाही तिला संशय येतो. पण तिचे नाव घ्यायला तिला धीर मात्र होत नाही. अशा वेळी बाळ रडत असताना "हाड रे कुतऱ्या, हाड रे मांजरा, हाड गऽऽ गाई" असे म्हणत त्यांच्या नावाने पण शेजीवर राग धरून एखादी-दुसरी शिवीसुद्धा तिच्या तोंडून बाहेर पडते. पण काही केल्या बाळ गप्प होत नाही. तेव्हा शेजीच तिला उपदेश करते—

*भरल्या तिन्ही सांजा, गाई आल्या गजरानं*
*सोनं झाकावं पदरानं, उरासंगं ॥*

पण शेजीबाईच्या उपदेशाचा काय उपयोग? म्हणून शेजीच उपाय सांगण्यासाठी अनुमान काढते की, त्या चौकाच्या दुकानापाशी आहे ते लागले असेल! त्यामुळे चटाचट मग ती तिकडे लिंब-लोण-उतारा घेऊन जातेः—

*लिंबलोण मी करीते, दुकानाच्या ग चिऱ्याला*
*कोंदणातल्या हिऱ्याला ॥*

आणि मग परत येऊन ती बाळाची दृष्ट काढतेः—

*जळो जळो दिष्ट मिठाचं झालं पाणी*
*बाळ कोमेलं फुलावाणी ॥*
*जळो जळो दिष्ट, मीठ मोहऱ्या आणि बिब्बा ।*
*रासबिंदीला चंद्र उभा ॥*
*जळो जळो दिष्ट, गेली पाळण्यावरूनी ।*
*उभा कळयाला धरूनी ॥*

भुनाची-खेताची, माणसाची-काणसाची, गुराची-ढोरांची, थोरांची-पोरांची सगळ्यांची नावे घेऊन मग ती दृष्ट काढते. रात्री न्हाऊ घालून बाळाला शांत झोपवते. मग सकाळी बाळ पुनः खेळायला-हासायला लागतो आणि तिचा जीव शांत होतो.

तरी पण ती एखादे वेळी अशीच कधीतरी तिन्हीसांजेची उंबऱ्यात उभी असते. खेड्याचे वैभव राना-वनातून चरून परत येत असते. त्यांची

वासरे भुकेलेली असतात. खिल्लार पुढे असते. गुराखी लांब मागे असतात, म्हणून काळजी वाटते. कारण—

*झाल्या तिन्ही सांजा, गाई आल्या मारकणी*
*माझी खेळे हिरकणी, वाटेमंदी ॥*

मग ती तिला चटकन् काखेला लावते. घेऊन ओसरीला बसते. पण—

*उंचशा ओसरीला बसल्या मायलेकी*
*दिष्ट झाली ग एकाएकी ॥*

असे व्हायचे ते होतेच, म्हणून पुनः लिंब-लोण न् मीठ-मोहरीची उपसाभर होते. कारण—

*लेकीचा जलम, जसा अंतराळी दोडका*
*जागा चांगली हुडका, आण्णाराया ॥*
*दिवस उगवला, केळीच्या कोक्यावरी*
*पोर नक्षत्र सोप्यावरी, माझी खेळे ॥*
*पाळण्याची दोरी, येता जाता हालवावी,*
*सोनुलीला बोलवावी लाडकीला ॥*
*सकाळच्यापारी, नाग घालितो येटाळा*
*बाळाच्या नादामंदी, हुतो कामाचा घोटाळा ॥*
*शेजारीणबाई, बस म्हणाया चुकले*
*हिच्या छंदाला गुंतले, सखीच्या ॥*
*शेजारीणबाई गरज तुपाची, मूद निवली भाताची*
*अग माझ्या राजसाची ॥*
*दुधानं भरली वाटी, वर साखरेचा ग पसा*
*तुझा छंद ग असा कसा?*
*दुधानं भरली वाटी, वर साखर माईना*
*मैना रडता राहीना ॥*

*दऊत लेखणी, दौतीला पिवळा दोरा*
*लिणाऱ्याचा हात गोरा, राजसाचा ॥*
*पेठच्या रस्त्यानं, खाली बघून चालणीचा*
*हिरा कोणत्या मालणीचा ॥*
*म्हातारं ग तुझं पण, नगं भिऊ नाचाराला*
*नेणंती ग बाई बाळं, सोपं येतील आकाराला ॥*

असल्या विचारांनी ती भारावून जाते. आणि यातून जेव्हा आपली बाळे लहानाची मोठी होतील तेव्हा आपले घर भरेल असे तिला वाटते. सोप्यांना, माजघरांना खंडी खंडीच्या पोऱ्यांनी आणि लेकी-सुनांनी आकार येईल ही आशा तिच्यात निर्माण होते. शंकर-पार्वतीवर तिची भक्ती दांडगी. तेव्हा त्यांच्याच आशीर्वादाने आपल्या बाळांना उदंड आयुष्य लाभेल, ही तिची श्रद्धा असते. '

*शिखरीच्या शंभूराया, देवा येवढं बरं केलं*
*खेळवाया मांडीवर, दिली मला चार बाळं ॥*

म्हणून त्या रक्षणकर्त्या हरीला ती एक विनंती करते—

*तानं लेकरू बाई माजं तानं माझ्या घरी*
*पाळण्यात हरी, राखन द्यावी बरी ॥*

ह्या बाळाचे कौतुक केल्याशिवाय तिला राहवत नाही.

*रांगत रांगत हुंबरा केला पार*
*मामा म्हणाया झाला थोर ॥*
*रांगत रांगत बाळ हुंबऱ्यावरी बसं*
*मला सोन्याचा ढीग दिसं ॥*

बाळाला बघून तिचे हुरदे भरून आलेले असते—

*सकाळच्यापारी सडा टाकिते हासत*
*बाळ माझ्या राजसाची दिंडी आली ग नाचत ॥*

*मागं बघत बघत, बाळ खेळाया गेलं लांब*
*हाती साखरीचा जांब (पेरू) ॥*

शेजारणीलाही एखाद-दुसरी मैना असते. गरिबीचा संसार. एकाच घरी कुडाच्या अलीकडे ही नि पलीकडे ही राहत असते. तीही आपल्या मैनेला उद्देशून म्हणते—

*समोरच्या वोसरीला, समई जळती अत्तराची*
*मैना सावळी बाळ माझी, कन्या खेळती चातुराची ॥*

तिची मैना मग आपल्या आईला बिलगते. आईही तिला उचलून तिचे मटामट मुके घेते.

*तोंडात घाली तोंड, गोऱ्या ओठांची लाल चोच*
*मेघ सावळी बाळ माझी, आवडीची मैना तूच ॥*
*शेजारीणबाई, तुझ्या बाळाची वरदळ*
*परसातली ग माझ्या, त्येनं तुडीवली करदळ ॥*
*येसवदाबाई, क्रिस्नाला सांग बूध*
*गवळ्याच्या राधीकीचं, लवंडलं दूध ॥*
*येसवदाबाई, क्रिस्नाला सांगा काई*
*गवळ्याच्या राधिकीचं, लवंडलं धई ॥*
*शेजारीणबाई, नग असं उगी भांडू*
*एका दारानं दोघी वागू, तुझी मैना माझा राघू ॥*

शेजारणी मग खूप होतात. त्यांची बाळे अशी भांडत-खेळत मोठी होतात. ह्या बाळांना शिक्षण फक्त आई-वडिलांचे. निसर्गाने जपलेली ही बाळे निसर्गासंगेच खेळत असतात.

*बिद्दीला खेळत्याती, सावळी काळी बेरी*
*पिवळा-तापशा ल्हेरं मारी ॥*

काळी-बेरी जरी असली तरी त्यांचे कौतुक काही कमी नसते. मामा-काका सगळ्यांचीच ती लाडकी असतात.

*हातात येतो दांडू, डाव-लगूरी ढासळली*
*वोसरीला बसलेली मामा मंडळी हासईली*
*पानं खाईत बसलेली, काका मंडळी हासईली ॥*
*भरली चंद्रभागा, नावा बांधल्या झाडाला*
*बाळ कोळ्याचा वुडाला, सईचा ॥*
*भरली चंद्रभागा, पाणी लागलं डगरीला*
*सोमेसूर बाळ माझा, चेंडू हाणितो घागरीला ॥*
*आंबेमोहोर तांदुईळ, भात करतो ल्हवा ल्हवा*
*सोनुल्या बाळायाची, तुझी गडबड जवा तवा ॥*

दगडा-धोंड्यातून, टक्क्या टोणप्यातून, पडत-झडत ही बाळे थोडी मोठी होतात. लहानपणीचे खेळ खेळत सुटतात. मग मातीत झुंजायला शिकतात. भल्या पहाटे उठून तालमीकडे जातात. हूमदांडगाव्याने जे ते काम करीत असतात, बोलत असतात, चालत असतात, तेव्हा—

*एका मागं एक, नका जाऊ धडाधडा*
*भिमा-अर्जुनाचा जोडा ॥*
*पाटंच्या पाऱ्यामंदी, उठा सयांनो दळायाला*
*पोरं गेल्याती, खेळायाला ॥*
*सकाळच्या पारी तांब्या कशानं वल्ला झाला ?*
*पैलवान दूध प्याला ॥*
*वयल्या शिवारात, शाळू आलाया राखणीला*
*शिवू सावळं बाळ माझं, लावी घुंगुर गोफणीला ॥*
*ओढ्याची ईहीर भरली खच्चून*
*राजबिंड बाळ माझं, मोट मारतं बसून ॥*

अशी बाळे अशा रीतीने जगतात. यातूनच माणिकमोत्यांची रास मिळते. इतिहास घडतो. धर्म घडतो. संस्कृती घडते. आणि त्यातूनच—त्यांच्या

बोलण्या–चालण्यातून–बाळाची आई घडते. त्यांच्याविषयी किती सांगावे तेवढे थोडे आहे. त्यांच्या ओव्या ऐकल्या म्हणजे आभाळात आलेले चंद्र-सूर्य मावळा-यचे विसरून जातात. दगडांना प्राण फुटतात, आभाळाला पहाट फुटते आणि त्याचे सुख प्रकाशातून उमलते. वेलींना फुले येतात, वृक्षांना फळे येतात, हे पाहून आभाळाला मग दुःख होते. त्याचे अश्रू गवतावर गळतात. त्याचे चांद-ण्याचे सुगंधी सोनेरी क्षण नाहीसे होतात. ते फिकट पडते. कारण त्याला आई नसते. आईच्या ओवीतूनच खरा प्रकाश फाकतो, आणि सूर्यनारायण त्याला साक्षी राहतो. सगळे जग त्या प्रकाशात उजळून निघते. पशु-पक्ष्यांना सुख-संवेदना होऊन त्यांचे प्राण शब्दांनी मोहरतात.

# कोकणी लोकगीते



सौ. कमला वाघ, पुणे

आपल्या पहिल्यावहिल्या चिमुकल्या अपत्याला मांडीवर घेऊन तरुण माता बसलेली आहे. चारपाच महिन्यांच्या त्या गोऱ्यागोमट्या, बाळसेदार बाळाच्या अंगातला उत्साह वाढता आहे. त्या उत्साहाच्या भरात तो हालचाल करू लागतो. आईच्या मांडीवर बसल्या ठिकाणी मागेपुढे होत जमिनीला पाय लावून तो झुलू लागतो आणि त्या लाडक्या जिवाची ती धडपड पाहून मातेच्या मुखातून आपोआप काव्य उत्स्फूर्त होते. ज्याप्रमाणे पुरातन ऋषींच्या मुखातून वेद उत्स्फूर्त झाले, अगदी त्याचप्रमाणे मांडीवरच्या चिमुकलीला डोलवीत कौतुकाने अधिकच गोड झालेल्या आपल्या गळ्याने ती गाऊ लागते :

*घॉल गे घॉल, घॉलांची*
*बाय म्हजी पिरथिमीच्या मोलाची*

*घॉलता बाय म्हजी भागली*
*फुलां वेचूक लागली*

*एक फूल व्हेले कावळ्यानं*
*बायक म्हज्या व्हेले मावळ्यानं*

*मावळ्याचे घर खंय खंय*
*वड पिंपळ भंय भंय*

आपल्या चिमुकल्या मुलीला ती म्हणते, "बाळे, तू सारखी अशी आनंदाने डुलत राहा. साऱ्या पृथ्वीपेक्षाही तुझे मोल जास्त आहे." पण लहान मूलच ते! एकच गोष्ट किती वेळ करीत राहणार? हळूहळू बाळीला डुलण्याचा कंटाळा येतो. ती थकते. आणि थकून करते काय? गप्प पडून राहते म्हणता? छे! दुर्दम्य उत्साहाची मूर्तीच ती! डुलून डुलून थकली म्हणजे ही पृथ्वीमोलाची बाळी फुले वेचायला जाते! गोवा-कारवार यासारख्या कोकणी प्रदेशातील स्त्रियांना फुलांचे वेडच असते. दागिन्यांपेक्षाही फुले त्यांना जास्त आवडतात. मग ती स्त्री गाद्यागिरद्यात लोळणारी जमीनदाराच्या घरची कुलवधू असो की, डोक्यावर मासळीची टोपली घेऊन मासे विकण्यासाठी बाजाराला जाणारी खारवीण असो. केसात फुले ही हवीतच. ही नैसर्गिक आवड ह्या पृथ्वीमोलाच्या बाळीच्या अंगीही उपजतच असते. म्हणूनच ती एवढ्या लहान वयात देखील फुले वेचायला जाते. झाडावर कावळा बसलेला असतो. तो हळूच उतरून खाली येतो आणि कदाचित बाळीचे अनुकरण करायचे म्हणून एक फूल घेऊनच निघून जातो. आणि मग स्त्री-गीतातून नेहमीच डोकावणारा भाऊ आणि माहेर हे सगळे डोकावू लागते. कावळ्याने फूल नेले, तसे बाळीच्या मावळ्याने-मामाने-बाळीला आपल्याकडे नेली. आणि ह्या मामाचे घर कुठे आहे? तर ज्या ज्या ठिकाणी वडाचे आणि पिंपळाचे झाड आहे त्या त्या ठिकाणी मामाचे घर आहे

लाडक्या बाळीचे कौतुक कुणाला दाखवू आणि कुणाला नको असे त्या आईला वाटते. साहजिकच माहेराला आसुसलेले तिचे मन भावाची आठवण काढते आणि कावळा जसा भुरकन् येऊन क्षणात फूल घेऊन गेला, तसाच बाळीचा मामा आपल्या फुलासारख्या नाजुक भाचीला घेऊन जाण्यासाठी अचानक येतो आणि तिला घेऊन आपल्या घरी जातो अशी ती कल्पना करते. कल्पनासृष्टीत मग ती स्वतः आपल्या भावाच्या घरी जाते. श्रीमंत भावाची वडापिंपळाच्या छायेच्या गारव्यात असलेली अनेक घरे ती पाहते. माहेरच्या गावातील सगळ्याच

घरातले तरुण तिला आपल्या भावासारखेच असतात. मग ज्या ज्या ठिकाणी वड आणि पिंपळ आहे त्या त्या ठिकाणचे माहेरच्या गावातले घर तिच्या बाळीच्या मामाचेच नव्हे काय?

मुलीला झुलवताना गायिलेले हेच गीत मुलाला डोलावताना निराळेच रूप घेते :

*घॉल रे घॉल बाळा*
*घॉल रे बाळा घॉल*

*घॉलता बाळ व्हडलो जालॉ*
*केळीं खावच्याक लागलॉ*

*एक केळे व्हेले कवळ्यानं*
*बाळाक व्हेले मावळ्यानं*

*कित्या रे मामा व्हरता*
*आंगी तोपी शिवता*

आता बाळीच्या ऐवजी आईच्या मांडीवर डुलणारा बाळ असतो. डुलता डुलता तो थकत नाही तर उलट मोठा झालेला असतो. आता बाळ नुसत्या आईच्या दुधावरच समाधान मानीत नाही. त्याला केळी (केळी) खायला हवी असतात. म्हणून आईच्या मांडीवर बसून डुलता डुलता तो एकीकडे केळी खात असतो. इथे देखील कावळा हजर! बाळ केळे खातो, मग कावळ्याला नको का? तो तर केळे घायचीसुद्धा वाट पाहत नाही; सरळ येतो आणि बाळाच्या पुढ्यातले एक केळे घेऊन निघून जातो. तेवढ्यात बाळाचा मामा येतो आणि बाळाला घेऊन जातो. आई घाबरून जाऊन भावाला विचारते, 'अरे बाळाच्या मामा, कशाला आणि कुठे घेऊन जातोस माझ्या बाळाला?' (कित्या रे मामा व्हरता?) मामा हसून उत्तर देतो, 'अग ताई, बाळ आता मोठा झाला ना? त्याचे जुने कपडे आता त्याच्या अंगाला येत नाहीत. मी आता बाळाला नवीन अंगडी टोपडी शिवून आणतो. माप नको का घ्यायला त्याचे? म्हणून नेतो आहे त्याला!'

मघाची डोलणारी बाळी हळूहळू मोठी होते. आता ती आईच्या मांडीवर बसल्या ठिकाणी आपला सुंदर उजवा हात वर उचलते आणि हाताची

पाचही बोटे कमळाच्या कळीसारखी मिटून तळवा इकडून तिकडे फिरवीत कळी फुलवते. पुन्हा फुलाची कळी होते, पुन्हा कळीचे फूल होते. तळवा सारखा उघडत, मिटत, हलत व फिरत राहतो. ती कळी–फुलाची जादू पाहून आईच्या तोंडून प्रसन्न आवाजात गीत बाहेर पडते :

*था गे था, थातांची*
*गोऱ्या गोऱ्या भांवाच्या हातांची*

*था कर गे कशी थिमुला*
*बायच्या हातानं घाली बिमुलां*

*था कर गे कशी थातूळी*
*हाती बायच्या म्हज्या बिंदूळी*

*था कर गे कशी थिंगुणा*
*हातात बायच्या काकणा*

*था कर गे कश्यो भातुल्यो*
*भांगरान भल्यो हातूल्यो*

*था करता करता भागली*
*निनी येवंक लागली*

था था करून, हातांच्या मुद्रा करून दाखविणाऱ्या बाळीचे हात कसे आहेत तर अगदी गोरे गोरे आणि भांवाचे (भांगराचे)–म्हणजे सोन्याचे ! सुवर्णकान्ति आहे त्यांची आणि असे हे हात सुवर्णाच्या वेगवेगळ्या अलंकारांनी नटलेले आहेत. ह्या सुवर्णकान्तिमय हातात 'बिमला' च्या (एक प्रकारचे फळ) आकाराचे अलंकार आहेत, बिंदल्या आहेत, सुवर्णकंकणे आहेत. पण अशा एका एका दागिन्याने कुठे आईची तृप्ती होते ? तिला तर आपल्या लाडक्या बाळीच्या चिमुकल्या हातुल्या भांगाराने म्हणजे सोन्याने मढवून टाकायच्या आहेत आणि कल्पनासृष्टीत त्या हातुल्या सोन्याने भरलेल्या ती पाहतेही.

बाळी सारखी था था अशा तबल्याच्या बोलांवर हात नाचवीत असते. पण आता हात सोन्याने भरलेले आहेत ना ! ते जड जड हात हालविता हालविता

सुकुमार कोवळी कळी थकून जाते आणि तिचे डोळे झोपेने जड होतात. तिला झोप (निनी) येऊ लागते.

आणि मग मातृहृदयाला जाणीव होते की, आपली नाजुक कळी या था-च्या तालावर सारखा नाच करून थकलेली आहे, तिला झोप आलेली आहे आणि तिला भूकही लागलेली असणार ! तेव्हा आई उठते. गाईचे गोड गोड दूध आणते. त्यात साखर घालून ते आणखी मिष्ट करते आणि बाळीला ते पाजवून तिला अंगाई करते.

*आऽऽल्लयीऽऽऽ*
*जोई जोई जोयचे*
*दूदू गोड गायचे*
*साखर घालून दिवचे*
*बायेक म्हज्या आऽऽल्लयीऽऽऽ*

खेळून खेळून थकलेली चिमुकली बाळी गाईचे गोड गोड दूध पिऊन स्वस्थ झोपी जाते. तिला पाळण्यात निजवून आई आपल्या कामाला निघून जाते. इकडे काही वेळाने बाळीचा थकवा जातो. तिची शांत झोप पुरी होऊन ती जागी होते. काही वेळ पाळण्यातच हातपाय हालवीत राहून ती आईची प्रतीक्षा करते. तरी आई येत नाही. मग आ....अु, मा....अु असे आवाज काढून बाळी आपल्या जागृतीची आईला दखल देते. पण आई दूर स्वयंपाक-घरात कामात असते. शेवटी आपल्याकडे झालेले दुर्लक्ष सहन न होऊन बाळी मोठ्याने रडायला सुरुवात करते. शेजारच्या देवघरात बसलेली बाळीची आजी म्हाताऱ्या पावलांनी धावत येते. लगबगीने बाळीला पाळण्यातून काढून ती मांडीवर घेते आणि तिला रडण्याचे कारण विचारते. कुणी माझ्या सोनीला मारले का ? बडवून का काढले ? का म्हणून माझी बाळी अशी रडायला लागली ? कोणी रडवले तिला ? आणि मग वडिलकीच्या अधिकाराने ती बाळीला हेही सांगते की, जर तुला कोणी मारले असेल तर मी त्या निर्दय माणसाची मुळीच गय करणार नाही. मी त्याला चांगला चोप देईन. एवढेच नव्हे तर त्याच्या डोळ्यात मिर्ची (मिमी-मिरसा) घालीन.

*माल्ली ? बडैली ?*
*तिका कोणे रडैली ?*
*हांक ताका मारतले, गे*
*दोळ्यांत मिमी घालतले ।*

आणि आजीकडून एवढे आश्वासन मिळाल्यावर चिमुकली बाळी रडणे थांबवते. कारण तिच्यावर मुळी अन्यायच झालेला नसतो. कुणीच तिला मारलेले नसते. झोप पुरी झाल्यावर तिला कुणीतरी उचलून घ्यायला हवे असते. आई आली नाही तरी आईपेक्षाही अधिक लाड करणारी आजी आलेली असते ना तिला घ्यायला! म्हणून ती खूष होऊन जाते. अशा वेळी आजीच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. ती आपल्या म्हाताऱ्या प्रेमळ आवाजात गाऊ लागते :

*लाडू वळ गे*
*लाडू वळ गे*
*अंबाबाई !*
*एक लाडू*
*तुपात खाई !*
*खेळगड्या वांगडा*
*खेळूक जाई !*

आपली चिमुकली नात तिला साक्षात अंबाभवानीच वाटते. त्या बालरूपात तिला देवीचाच साक्षात्कार होतो. भवानीमाता ह्या छोट्या रूपात आपल्या घरी खेळाबागडायला आली आहे अशी तिची भावना होते. आणि मग ती नातीला सांगते, 'वळ बाई, अंबाबाई, लाडू वळ. मग एक लाडू तुपाबरोबर खा आणि मग तुझ्या सवंगड्यांबरोबर खेळायला जा.'

पण हे बोलाचेच लाडू खाऊन चिमुरड्यांचे पोट थोडेच भरते!

आजीच्या मांडीवर आता बाळीऐवजी बाळ बसला आहे आणि त्याला दूध हवे आहे. बाळाचे घर मोठे संपन्न आहे. त्याच्या घरी गाई–म्हशींना तोटा नाही. दिवसभर रानात चरून म्हशी अंगणात आलेल्या आहेत. पण गाई

अजून रानातच आहेत. आणि बाळाला तर गाईचेच दूध हवे आहे. म्हणून तो सारखा गाईचे दूध मागतो.

*गायो रानात*
*म्हशी आंगणात*
*बाबा म्हजो घरात*
*दूदू मागी !*

आणि मग आजी रानात गेलेल्या बाळाच्या खास गाईला साद घालून सांगते,

*यो गे, यो गे गायी*
*गाईच्या गोठ्यात*
*बाबाच्या वाटयेत*
*दूदू दी गे*

बाळाच्या लाडक्या गाईमाते, ये ग बाई लवकर ! लवकर, लवकर तुझ्या गोठ्यात ये. माझा बाळ भुकेला आहे. त्याच्या वाटीत तुझं दूदू दे बघू लवकर.

बाळाची गोमाता मग रानातून धावत धावत गोठ्यात येते आणि बाळाला दूध देते. वाटीतून दूध पिता पिता बाळ मोठ्या खुषीत येतो आणि तोरड्या घातलेला आपला पाय नाचवू लागतो. बाळाच्या जागी आजीला आता तो गोपींना वेड लावणारा कृष्णकन्हय्या दिसू लागतो. ती त्याला आळवते :

*एक पाय नाचय रे मुरारी*
*वाजूं दी घागरी ।*
*एक पाय नाचय रे हरी हरी*
*खेळ तुजो नाना परी ।*
*एक पाय नाचय रे वामना*
*अपुर्बायेच्या मोहना ।*
*एक पाय नाचय रे मुकुंदा*
*झुंझरांच्या छंडा ।*

आजीच्या गाण्यात तल्लीन होऊन तिचा लाडका श्रीकृष्ण पाय नाचवून झंझरांच्या म्हणजे तोरड्यांच्या घुंगुरांच्या आवाजावर नाच करतो. वार्धक्य आणि शैशव काही काळ एकरूप होऊन जातात. तेवढ्यात बाळाला अंगणातला पाळीव मोर पिसारा फुलवून नाचत असलेला दिसतो. बाळ लगेच पाय थांबवतो. तोरड्यांना असलेल्या घुंगुरांचा आवाज थांबतो. बाळ आपल्या डाव्या हाताचा तळवा उघडून धरतो आणि उजव्या हाताची तर्जनी त्या तळव्यावर पुन्हा पुन्हा नाचवतो. आजीला बाळाची भाषा कळते. ती नवीन गीत गाऊ लागते :

*येथें येथें येथें येथें*
*नाच रे मॉरा !*
*मामा ना घरा*
*तुका कोण घाली चारा ?*
*उडून वेशीत मॉरा ?*
*बांदीन तुका दॉरा !*
*चारो खा पाणी पी*
*भूSSSर मॉरा*
*बाळाच्या तक्क्यार बस*

'मोरा रे, इथं इथं येऊन सारखा नाचत राहा. पण तू कितीही नाचलास तरी इतक्यात तुला चारा कोण बरं घालील? कारण बाळाचा मामा बाहेर गेला आहे ना! घरी नाही तो. (अर्थात् ह्या गीतातला बाळ हा आजीच्या माहेरपणाला आलेल्या मुलीचा मुलगा आहे; मुलाचा नव्हे.) हे काय रे मोरा, मामा घरी नाही म्हणून कळल्यावर उडून जायला बघतोस का तू? पण याद राख उडून गेलास तर! तुला दोरीने बांधून ठेवीन हं! तेव्हा उडून जाऊ नकोस. मामा घरी आल्यावर मग चारा खा, पाणी पी आणि भूSSSर करून उडून माझ्या बाळाच्या डोक्यावर (तकली–डोके, तक्क्यार–डोक्यावर) बस बरं का पिसारा फुलवून.' आजी भुSS मॉरा म्हणायला लागली की, बाळही मग आपले दोन्ही हात उचलून आपल्या भुरभुरत्या जावळावर ठेवून मोराला खुणेने सांगतो, 'खरंच रे मोरा, ह्या इथे माझ्या डोक्यावर येऊन बस हं तू!'

आणि तेवढ्यात बाळाची नजर अंगणातल्या झाडाआडून डोकावणाऱ्या चांदोबावर जाते. बाळ आनंदाने टाळ्या पिटतो आणि चांदोबाकडे झेप घ्यायला बघतो. मग आजी आपला डावा तळवा पसरून उजव्या हाताची तर्जनी त्या डाव्या तळव्यावर मधोमध टेकवून वाटोळी फिरवीत गाऊ लागते.

*आना, बांदा*
*गिरी गिरी चांदा*
*वाटीभर गंधा*
*शिपीभर अक्षता*
*तान्या बाळाच्या*
*कपळाक ती ती*

आकाशात सारखा गिरगिर फिरणाऱ्या त्या चांदोबाला धरून आणा. बांधून आणा. वाटीभर गंध आणा. शिंपलाभर अक्षता आणा आणि माझ्या ह्या तान्ह्या बाळाच्या कपाळावर चांदोबासारखी गोल गोल तीट लावा.

आजीचे बघून बाळही आपला डावा तळवा पसरतो. उजव्या हाताच्या तर्जनीने डाव्या तळव्यावर गोल गोल फेर धरतो आणि आजीने कपाळाक ती ती म्हणून आपल्या हाताची तर्जनी बाळाच्या कपाळावर टेकवली की, बाळही आपल्या उजव्या हाताची चिमुकली तर्जनी आजीच्या वृद्ध कपाळावर टेकवून तिला चांदोबा एवढी 'तीती' लावतो.

बाळाच्या ह्या कृतीने आजीचे काळीज सुपाएवढे होते. कसा गुणी बाळ आहे आजीचा! दृष्टच लागायची कुणा पाप्याची अशा गोजिरवाण्या गुणी बाळाला, हा विचार मनात येतो आणि मग तिन्हीसांजेच्या त्या वेळी आजी बाळाची दृष्ट काढते. नाजुक फुलासारखा बाळ. त्याची दृष्ट काढायची ती टणक मिठाच्या खड्यांनी आणि मोहऱ्यांनी नव्हें, तर बाळासारख्याच नाजुक आणि सुवासिक फुलांनी गोमन्तकात तान्ह्या मुलांची दृष्ट काढतात. निसर्गात नटलेल्या त्या नंदनवनातील स्त्रियांचे मनसुद्धा किती काव्यमय झालेले असते पाहा! अंगणातल्या पारिजाताच्या कळ्या नुकत्याच उमलू लागलेल्या असतात. आजी बाळाला कडेवर घेऊन पारिजाताजवळ जाते. हाताजवळ असलेल्या फांदीवरच्या सुगंधाने दरवळणाऱ्या एकदोन उमलत्या कळ्या हलक्या हाताने

खुडून घेते आणि बाळाच्या डोक्याभोवती त्या ओवाळून टाकता टाकता तिच्या मुखातून काव्य बाहेर पडते :

*काळ्या काजळाची*
*वाटी गे रुप्याची*
*ती ती गे बाळाची*
*सोबता बरी ।*

*पोवळ्या मोतियांची*
*फुपा पार्दीकाची*
*म्हज्या गे सोन्याची*
*दिष्ट काढा*

*आइल्ल्या गेल्ल्याची*
*सग्या सोयऱ्याची*
*पिशाची पाप्याची*
*दिष्ट वचू ।*

बाळाच्या डोळ्यात घालण्यासाठी मुद्दाम तयार केलेले काळेभोर काजळ चांदीच्या शुभ्र वाटीत ठेवलेले आहे. आईने बाळाच्या डोळ्यात काजळ घालताना तेच बोट त्याच्या कपाळावर टेकलेले आहे. ती तीट किती सुंदर शोभते आहे (सोबता बरी) बाळाच्या गोजिरवाण्या कपाळावर! आणि तिच्यामुळे तर तो आणखी सुंदर दिसतो आहे! अशा सुंदर बाळाची दृष्ट काढण्यासाठी पोवळी आणि मोती ह्यांनी बनविल्यासारखी दिसणारी पारिजाताची फुले (फुपां पार्दिकाची) आणली आहेत आजीने. आणि त्यांनी ती सोन्यासारख्या बाळाची दृष्ट काढते आहे.

अशा सुंदर बाळाला कुणाचीही दृष्ट लागू शकेल म्हणून दृष्ट काढताना ती साऱ्यांची नावे घेते. आलेल्या गेलेल्या कुणाही माणसाची, सग्या-सोयऱ्याची, वेड्या-खुळ्यांची किंवा पापी माणसाची, कोणाचीही नजर बाळाला लागली असेल तर ती आजीच्या ह्या तोडग्याने नाहीशी होईल ह्याची तिला खात्री आहे.

दिवसभर खेळत राहिलेला बाळ रात्रीही लवकर झोपत नाही. सारखा खेळत राहतो. बाळाला जागरण सहन होणार नाही म्हणून मग आजी निद्रेला आवाहन करते—

*यो ग यो गे न्हिदे*
*न्हिदेच्या वेळ*
*बाळाच्या खेळा*
*रात जाली*

आजीचे आवाहन निद्रा तत्काळ मान्य करते. बाळाच्या पापण्या जड होऊ लागतात. बाळाला शांत झोप यावी म्हणून आजी तेलाची वाटी घेऊन बाळाची टाळू तेलाने भरते. मग बाळाच्या कानात तेल घालते आणि त्या कानाची चिमुकली पाळी हळुवारपणे हलवीत म्हणते,

*कुर कुर कुर कुर काना*
*म्हशी गेल्यो राना*
*आंबडून हाड रे मामा*
*गाई म्हशी ।*

*गायो गे गोठ्यात*
*म्हशी गे वाड्यात*
*बाळ पाळण्यात*
*निनी करी ।*

संध्याकाळ होऊन रात्र पडायला लागलेली असते. पण अजून गाई-म्हशी रानातच असतात; गुराख्याने त्या परत आणलेल्या नसतात; म्हणून आजी मामाला सांगते, 'तू स्वतः जाऊन त्यांना हाकून घेऊन ये (आंबडून हाड).' तेवढ्यात गाई येतात, म्हशीही येतात. आणि मग रात्री गाई आपल्या गोठ्यात म्हशी आपल्या कोंडवाड्यात आणि बाळ आपल्या पाळण्यात स्वस्थ झोपतात!

बाळाची आई आपल्या गोव्यातल्या माहेराहून कारवारातल्या सासरी आल्याला आता बरेच दिवस झालेले असतात. अशा वेळी बाळाला घेऊन

अशीच एका संध्याकाळी ती अंगणात तुळशीवृन्दावनाजवळ वसलेली असते. संध्याकाळची वेळ. पुरुषमंडळी बाहेर गेलेली असल्यामुळे तिला पुढील दारी अंगणात वसायला संकोच वाटत नाही. अंगणातल्या पिंपळाच्या झाडावर वसलेला कावळा मोठ्याने ओरडतो, 'काव काव!' बाळाची आई ती काव काव ऐकते आणि कावळ्याला विचारते,

*कावया, तू गोया गेलोलो रे?*
*बाबाच्या मामाक देखिलाँ?*

कावळ्या तू गोव्याला गेला होतास का रे? माझ्या लाडक्या बाळाच्या मामाला पाहिलंस का तू तिथं? तिचा हा प्रश्न कावळ्याला कळतो. तो आपल्या भाषेत उत्तर देतो, 'काव काव!' बाळाच्या आईला पण कावळ्याची भाषा कळते. कावळा तिच्या प्रश्नाचे उत्तर देतो, 'हो हो, बाळाचा मामा मी पाहिला गोव्यात. तो शेताच्या बांधावरून जात होता. आणि त्याने खांद्यावर उघडलेली छत्री रेलून धरली होती.'

*मामाक देखिलाँ बांदर*
*मामाच्या सत्रि खांद्यार*

मामाची कितीतरी शेते आहेत. त्यांची पाहणी करायला, शेतात काम करणाऱ्यांवर लक्ष ठेवायला मामा शेतांच्या बांधावरून फिरत होता. आणि उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून त्याने छत्री उघडून खांद्यावर रेलून धरली होती. कावळ्याचे उत्तर ऐकून बाळाच्या आईला भावाची खुशाली कळते व आनंद होतो. तिला बरोबर खूणगाठ पटते. कावळा अगदी खरे सांगतो आहे. तिला माहीतच असते मुळी मामा अशीच बांधावरून शेतांची पाहणी करतो म्हणून आणि मग उत्सुक मनाने ती कावळ्याला आणखी प्रश्न करते. तिची आणि कावळ्याची प्रश्नोत्तरे चालू राहतात. बाळ आईच्या मांडीवर बसून ऐकत असतो. आई पुन्हा कावळ्याला विचारते :

*कावया, तू गोया गेलोलो रे?*
*बाबाच्या मामाक देखिलाँ?*

कावळा उत्तर देतो :

*मामाक देखिलॉ मार्गारि*
*मामाच्या शेलॉ आंगार*

'हो तर, मामाला मी रस्त्यातून जाताना पाहिलं होतं. आणि किनई मामाच्या खांद्यावर ह्या वेळेला छत्री नव्हती, तर मामानं अंगावर शेला पांघरला होता.'

बरोबर आहे. शेताच्या बांधावरून जाताना ऊन लागू नये म्हणून मामाने छत्री खांद्यावर घेतली होती; पण आता तो संध्याकाळच्या वेळी गावातील रस्त्यातून जात होता ना! त्याला आपला प्रतिष्ठितपणा सांभाळायला नको का? जमीनदार आहे ना तो? म्हणून चांगला भरजरी शेला पांघरून जात होता तो. भावाची प्रतिष्ठा आणि माहेरघराची खानदानी आठवून बाळाच्या आईचा ऊर अभिमानाने भरून येतो. मामाची आणखी काही खबरबात मिळाली तर पाहावी म्हणून ती पुन्हा खबरबात विचारते :

*कावया, तू गोया गेलोलो रे ?*
*बाबाच्या मामाक देखिल्लॉं ?*

कावळा उत्तर देतो, 'हो ग बाई, पुन्हा मी तुझ्या बाळाच्या मामाला पाहिला होता. पण त्या वेळी मामा घरात होता आणि त्याच्या दारात माचिल म्हणजे मेणा तयार होता.'

*मामाक देखिल्लॉं घरात*
*मामाच्या माचिल दारात*

बहुतेक कुठेतरी दूर बाहेरगावी जाणार असावा तो. कुठे बरे जायची तयारी चाललेली होती आपल्या बाळाच्या मामाची? कावळ्यालाच विचारून पाहावे, असा विचार करून बाळाची आई पुन्हा कावळ्याला विचारते :

*कावया तू गोया गेलोलो रे ?*
*बाबाच्या मामाक देखिल्लॉं ?*

आणि ह्या वेळेला कावळ्याला उत्तर द्यावेच लागत नाही. किंबहुना, त्याला उत्तर द्यायला अवसरच मिळत नाही. अंगणातून बाहेर पाहात बाळाची आई आनंदाश्चर्याने उद्गारते :—

*आगे बाए, मामा दारात*
*बावाक व्हरुक गोयात*

'अग बाई, बाळाचा मामा आला की दारात!' भोई थांबले. त्यांनी माचिल खाली ठेवले आणि माचिलातून खाली उतरून मामा बाळाच्या जवळ आला. मामा आज का आला हे मामाने न सांगता बाळाच्या आईने ओळखले आहे. बाळाला आणि बाळाच्या आईला गोव्याला घेऊन जायला आला आहे तो. बाळाची आई पिंपळावरच्या कावळ्याला पार विसरली आणि खूप दिवसांनी आलेल्या भावाच्या स्वागतात गढून गेली.

अशी बोलकी आहेत ही गोवा-कारवारची कोकणी बालविषयक लोकगीते.



# तान्हं बाळ

सौ. मालती दांडेकर, सांगली

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

संसाराच्या वेलीवर कोवळी फुले फुलून घरात चिमण्या पायांनी सौख्य नाचू लागावे हे पतिपत्नीचे केवढे भाग्य! या बाळरूपाचा देवादिकांनाही मोह पडतो व कालिदासासारखे महाकवीसुद्धा त्याचा 'धन्यस्तदंगरजसा मलिनी भवन्ति' अशा शब्दांनी गौरव करतात. संसारातील या गोड श्रेयावर मोठ्या नामवंत कवींप्रमाणेच ग्रामीण स्त्रीनेही असंख्य काव्ये रचली आहेत.

विवाहित दांपत्याच्या कटीखांद्यावर गोजिरवाणे बाळ खेळू लागले की, संसाराला जणू रंग चढतो. आम्रतरूला कोवळा मोहर आलासा भासतो. खरोखरच तान्हुले ही संसारातील केवढी थोर संपत्ती आहे! तिच्यापुढे सोनेनाणे, हिरेमोती, सगळे तुच्छच भासले तर आश्चर्य नाही. या संदर्भात एक माता म्हणते :

*सूपभर सोनं । शेजी झाकुन घेती गळा ।*
*कडीवर तान्हं । माझा उघडा पानमळा ॥*

पानमळा वहरला की, तेथले सजीवतेचे सौंदर्य काही अपूर्वच असणार. त्याची सर सोन्यासारख्या जड वस्तूला कशी येणार ? स्त्रियांनी आपल्या तान्हुल्याला सुंदर मूल्यवान दागिन्यांच्या दिलेल्या उपमा मोठ्या हृद्य वाटतात. मातेचे खरे वैभव तिच्या कुशीचे बाळ! या वैभवाचे लोकगीतातील हे शब्दरूप पाहण्याजोगे ठरेल :

*समुद्राच्या काठी उभी होते मी सहज*
*बाळराज माझं आलं मोत्याचं जहाज*
*अंगणात खेळे कोणाची बछडी*
*लाडकी मैना माझी सोन्यामोत्याची खिचडी*

पण जगात सगळीकडेच कोठे समाधानाची फुलबाग बहरलेली दिसते ? नवससायास केले तरी बाळाची गोजिरवाणी पाउले एखाद्या घरात उमटतच नाहीत. अमाप पैसा खर्च करूनही तेथे वंशदीप दृष्टीस पडत नाही. अशा घरी कशाचा आनंद ? सारे जणू कृष्णावाचूनचे सुने गोकुळ. अपत्यहीन अशी स्त्री काकुळतीने देवाला सारखी एकच एक प्रार्थना करीत असते :

*दे रे देवा मला संपत्तिला साजं*
*अंगणी गाडीघोडं, वसरीला बाळराज*
*दे रे देवराया तानं बाळ खेळवाया*
*त्येच्या सायासाला दिस जाईल मावळाया*
*पोटी नाही पुत्र नार झुरती मनामंदी*
*तुळशीची पूजा करिते उन्हामंदी*
*पोटी नाही पुत्र नार किती देखणी*
*लागे जीवाला घोकणी*

कधी काळी ईश्वर पावला, त्याची कृपा झाली तर या रित्या घरात प्रकाश भरेल, देवाचे बाळरूप येथे दिसू लागेल, ही श्रद्धा ठेवून एखादे दांपत्य पुष्कळदा मोठ्या आशेने देवाची भक्ती करते :

*देवाचं देवघर सारवते तिन्ही सांज*
*दयाळु अंबाबाई कधी पावशील सांग?*

आणि मग एक दिवस भाग्याचा येतो. सुभान संतूबाई ही एक मोठी पुत्रदादेवी मानली जाते. आजवर केलेली तिची ही सेवा जणू फळाला येते आणि बाळाच्या सोनुल्या पावलांची चाहूल त्या घरी लागते.

*सुभान संतूबाई, पानी न्हानीचं थंडगार*
*मला घावला लाख्याहार*

आणि मग लाख मोलाची संपदा सजीव होऊन अंगणात नाचू लागते.

असे हे तोलामोलाचे तान्हुले, साखळ्या-वाळ्यांची रुणझुण करीत नाजुक पावलांनी घरी आले की, संसारसुखालाही शीग लागते. बाळाला कुठे ठेवू न् कुठे नको असे सगळ्यांना होते. मातृहृदयाला तर हा अमोल ठेवा कसा जपावा ह्याचीच सदा काळजी. बाळरूप आधीच कोवळे अन् मनोहर! त्यातही एखादे बाळ तर किती नीटस अन् देखणे दिसते! अशा वेळी आईने केलेली ही बालरूपवर्णने पाहण्यासारखी आहेत. मुलगी असेल तर रूपसंपदेचे वर्णन विशेषच अगत्याचे असते :

*माझ्या अंगनात सयांची पाच बाळं*
*त्यात माझी चंद्रावळ*
*आकाशीचा चंद्र थांबला दारापाशी*
*माझी चांदनी बघायासी*
*दात मोतियाचे दाणे, ओठ पवळ्यांच्या येली*
*राजसा बाळायाला हासताना दृष्ट झाली*

अशा फुलावाणी तान्हुल्याचे रूप आरशात मावत नाही व नजरेत सामावत नाही. त्यामुळे दृष्ट लागेल ही भीती!

*दिष्ट झाली म्हणू दिष्ट निघंना कुठंकुठं*
*तान्हुल्याचं माझ्या गोरं रूप ते लाल ओठ*
*पापीणीच्या डोळां पिळावा लिंबरस*
*माझा राजहंस न्याहाळीला सावकाश*

या दृष्टीला कसलाही उतारा नाही असं मात्र नाही. येसबंदाच्या वेलींनी ही नजरबाधा सहज उतरते. शिवाय मीठ, मोहरी, मेथी, कांदा, काळा विब्बा हे सारे उताराचेच जलाल जिन्नस असतात. त्यासंबंधीचेही उल्लेख बालगीतातून येतात :

*दिष्ट मी काढिते मीठ मोहऱ्या कांदा*
*दिष्ट झालीया माझ्या चांदा*

असे हे बाळ थोडे मोठे झाले की, घरभर त्याचा दंगा सुरू होतो.

*धाकुटं माझं घर जागा दाटणीचा*
*बाळ मोराच्या नाचणीचा*
*माळ्याच्या मळ्यामंदी अनवाळ राघु गेला*
*जाईचा वेल मोडूनी दांडू केला*

या खोड्यांचा शेजारणीला थोडाबहुत उपसर्ग पोचणारच, म्हणून तिलाही मातेची:ही विनंती नित्याचीच :

*संभाळ शेजीबाई दारीच्या जाईजुई*
*बाळ अवखळ हाई ते लई*
*संभाळ शेजीबाई दारीचं वाळवण*
*अवखळ बाळ करील मिसळण*

गोकुळातल्या कृष्णाच्या बाललीलांचेच जणू अशा प्रकारे घरोघर नित्य नवे प्रकरण रंगत असते व त्यात वेगवेगळया भावनांचे मोहक रंग लोकगीतात भरत असतात.

*शीवण शीव शिंप्या -- अंगडं टोपडं रुपायाचं*
*बाळ लेणार राजसाचं*
*भरल्या बाजारात दिंड आल्याती ऐना ऐना*
*झगया पोलक्याजोगी माझी मैना*

*माळीणीच्या पोरी फुलं तोड कूपाकाठी*
*बाळीच्या साजासाठी*
*सांगून मी धाडी, बंधु सावळ्या सखयाला*
*घस बाळाच्या वाक्यायाला*

सारं घर बाळाच्या खेळाने धुंद झालेले असते. आईला तेथे मीपण स्मरत नाही.

*घागऱ्या घुळघुळ दणाणला माझा मेपा*
*खेळतो तान्हा प्राणसखा*
*साखळ्यावाळ्याचा नाद येतूया माझ्या कानी*
*आली खेळून माझी रानी*

अशा बाळाचे कोडकौतुक स्त्रियांनी कितीतरी प्रकारांनी वर्णन केले आहे :

*एकामागं एक ल्येक निघालं देसमुक*
*त्यांना पाहून निवाली तहानभूक*
*वाईट माझा राग दूधावाणी उतू गेला*
*सावळ्या मैनाईनं हासून शांत केला*
*तान्हं बाळ खेळे वाजत्यात वाळे*
*निवत्यात डोळे, सखया राजसाचे*

असा हा प्राणविसावा जरा नजरेच्या टप्प्याबाहेर जाऊ लागला की, आईचे मन व्याकुळ होते. ती काकुळतीने म्हणते :

*पराया ल्येकरांनी न्हाई माझं मन*
*तान्हुल्या, तुज्यापाशी पंचप्राण*

अशी ही तान्हुली हळूहळू पुष्पांकुरांप्रमाणे दिसामासा वाढू लागतात. बाळ घरभर रांगता रांगता पाऊले टाकू लागते. घराबाहेरचे त्याचे जग सुरू होते!

*शिवच्या शेतांमदीं शाळू आलाया राखनीला*
*बाळराय लावी घुंगूर गोफनीला*

*लाडक्या लेकीचा लाडाचा ग हेका*
*मागे चोळीवरी टिक्का*
*ऐन दुपार झाली माझ्या येकलीच्या कामा*
*मैनाई लावी हात, भुक्याला तिचा मामा*

असे हे बालांचे बाल्य मागे पडत असते व तिकडे पाहून घरातल्या वडीलधाऱ्यांच्या मनात भविष्याच्या अनंत आशा पालवत असतात.

संसारात बाळजीवाचे स्थान हे असे जिव्हाळ्याने शोभणारे अन् भावपूर्ण-तेने रंगणारे असते. ज्या घरी देवाने हे राजस देणे दिले, तेथे दुःखाचा प्रकाश राहत नाही, हे जाणून एका आईने बालकांना पुढील समर्पक शब्दात गौर-विले आहे :

*लेकीची हे ग जात, तुपाची फुलवात*
*बाळ राजस माझा, कुळीचा नंदादीप*



# वेडी माया

ले. सौ. कुमुदिनी पवार; बी. ए. (ऑ.)

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

आपल्या आयुष्यातील आपल्या कर्तृत्वाची इतिकर्तव्यता संपली किंवा आपल्या इच्छा, आपली ईर्षा आपल्या आकांक्षा यांची समाप्ती झाली; म्हणजे माणसाला खरे सुखसमाधान मिळते. आपल्या गत आयुष्यातील सुखदु:खाचे प्रसंग मनात घोळीत, मग उतारवयात ही कर्तृत्ववान माणसे आपले आयुष्य समाधानाने घालवीत असतात. आपल्या मुलाबाळांना त्यांच्या जीवनाचा पाया उभारून देऊन, त्यांच्या कर्तबगारीचे कौतुक करीत व त्यांना उत्साह देत वडीलधारी मंडळी म्हातारपणी दिवस घालवितात. काही मनाविरुद्ध घडले तर त्याला मुरड घालण्याइतकी त्यांच्या मनाची तयारी आता झालेली असते.

पुष्कळ वेळा परक्या घरातील मुलगी घरात सून म्हणून आल्यानंतर तिचे विचार, तिच्या इच्छा, तिच्या आकांक्षा वडीलधाऱ्यांशी जुळत नाहीत, तेव्हा मोठा पेच निर्माण होतो. अशावेळी जीवनभर सोबत केलेल्या आपल्या संसाराचा रथ मोठ्या धीराने सर्व प्रसंगात पेलून धरणाऱ्या पत्नीबरोबर उतारवयात पुरुषाला हाकावा लागतो. मुलेबाळे रांकेला लागली की त्यांनाही पंखे फुटतात.

वडिलधाऱ्यांना देता येईल तेवढे सुख देऊन आपल्या संसाराकडे त्यांनाही वळावे लागते. मुलीबाळी सासरी जातात. मुलगे काही वेळा ठिकाणी जवळ असतात. तर पुष्कळ ठिकाणी नोकरीनिमित्त, उद्योगधंद्यानिमित्त परगावी जातात. अशावेळी या जुन्या नव्या पिढीत आनंदाची, समाधानाची न् सुखाची झलक, निर्माण होते ती आजीआजोबांच्या नातवंडांच्यामुळे.

आजोबांना आपल्या जीवनात कधीही न मिळालेल्या अलौकिक सुखाचा आनंद या बाळराजांकडून मिळतो.

त्यांना आपल्या उतारवयाची जाणीव रहात नाही. अगदी पार थकलेले आजोबासुद्धा नातवंडांबरोबर उड्या मारायचा प्रयत्न करतात. अशावेळी जुन्या संसारातील पतीपत्नींच्या संसाराला काही आगळाच साज चढतो. आपल्याला नातवंड होणार या बातमीनेच ती हरखून जातात. आणि बाळ जन्माला आल्यावर तर मग काय विचारू नका. आनंदाने ते डोलू लागतात. बाळ जसे मोठे होईल तसे अगदी देहभान विसरून हे आजी आजोबा नातवंडांशी हितगूज करण्यात गुंग होऊन जातात. काय करू नि काय नको असे त्यांना होऊन जाते. अशावेळी त्यांच्या हृदयातली माया बोलू लागते. मनातले सारे कौतुक उफाळून बाहेर येते. बाळराजाच्या एकेका गुणाकडे बघत ही आजी काय म्हणते—

*बाळी माजीचा खेळ चुली देव्हारा बानवशी*
*बाळ माझा चन्द्रकान्त गाडा रेटीतो येशीपाशी*

घरभर खेळाचा असा पसारा बघून आजीला राग येत नाही तर उलट कौतुक वाटते. बाळाची आई मात्र चिडते. तेव्हा आजी म्हणते, नको रागावू बाई मुलांचे खेळाचे वय. एका जागी का खेळणे रहाणार? मी भरून ठेवते खेळ सारा. याच नादात आजी आणखी गाणे गुणगुणते—मोठ्या कौतुकाने तो खेळ बघत म्हणते—

*लेकी वालुयींचा खेळ सुपलीमंदी बुटी*
*बाळ माझा चंद्रकान्त वाळा रंगीत गाडीयिटी*

अशा वेळी खेळत असताना बाळ रांगत रांगत जर पाण्यात किंवा ऊन्हात गेले, तर आजीला काळजी वाटते. ती म्हणते—

*लेकी वालुयीचा खेळ चूल भानुशीच्या मागं*
*वाळा माजा चन्द्रकान्त माझ्या चंद्राला उन लागं*

आजीचे हे गीत ऐकून बाळ परत धावत येते आजीकडे. तिला मिठी मारते, तेंव्हा आजी एक गोड पापा घेते आणि त्याच्या किलबिलाटाकडे बघत आपल्या कानशिलावर प्रेमाने बोटे मोडते. या बोटांचा काडकाड आवाज निघतो तेंव्हा शेजारी बसलेले आजोबा हसून म्हणतात, 'लई मया करतीयास ग?'

तशी लाजून त्या म्हणतात, 'तुम्हाला कोण नको म्हणतंय का अशी मया करायला? अं?'

त्यांचा हा ठसका बघून आजोबा नीट सावरून बसत व सुपारी कातरत त्यातली थोडी तोंडात टाकून बोबडे बोलत म्हणतात,

'बोटं मोडली म्हणजे दिसती व्हय मया तेवढी? मला बी कशी भोकरावानी चिकाटल्यात पोरं माहिती हाय का?'

यावर आजीबाई म्हणतात कशा बघा हं, 'कायितरीच बोलणं आपलं!'

त्यावेळी 'अग, थांब तुज्यागत गीतबी तुला दाखवतोच म्हणून' असे सांगत आजोबा म्हणतात कसे—

*'हातात कडी तोडं बाळ कुन्याया राजाचं*
*वाबा माझा नाव सांगितो आजायाचं*
*अंगड्या टोपड्याचा केला बाळानं साजवाजा*
*बाळ माजा चंद्रकान्त कडं घेयाचा तुला आजा*

हे ऐकून आजीबाई तोंडभर हसून म्हणतात, 'सारं आज्याचंच कौतुक ठावं हाय सगळ्यांना.' तेंव्हा आजोबा आणखी म्हणतात कसे,

'राग येऊ देऊ नगस. माजं न्हाई मी करीत. मी पोराचं करतो कौतुक; ऐक आणिक—

*बोबड्या बोलाचं बाळा मजला येत हासं*
*बाळा माज्या राजा मला बोलुन दाव तसं*
*रांगत रांगत बाळ उंबऱ्यावरी बसं*
*मला सोन्याचा ढीग दिसं*

*आगाशी वावडी संगं लावुनी सोडिलं*
*तान्हया माज्या बाळाजीनं घर आज्याचं येढीलं*
*अंगणी खेळं बाळ गगनी सूर्यदीप*
*तान्हया माज्या बाळाजीचं हिरं माणीक बिंद्ल्यात*

या साऱ्या कौतुकात तिन्हीसांज होते. सूनबाई बाळाला जेवायला घेऊन जाते. तेव्हा आजी आजोबा एकमेकांकडे समाधानाने बघत हसतात. घरात जेवायला जातात. दुसऱ्या दिवसाची आतुरतेने वाट बघत झोपी जातात.

आसपासच्या इतर मुलांच्या मेळाव्यात त्यांना आपले बाळ निराळेच उठून दिसते. साऱ्या बालकांच्या मेळाव्यात खेळत असणारे बाळ बघून आजीला वाटते

*माज्या या अंगणी आयाबायांची पाची कुंडं*
*बाळराज माझं त्यात दिसतं बलदंड*
*हातात इटी दांडू लगोरी ढासळली*
*तान्ह्या माज्या बाळायाला सारी मंडळी हासयिली*

या बाळाला कौतुकाबरोबर हौसेचे लेणेही अमाप मिळते. आपापल्या परीने प्रत्येकजण हौस करतो. या हौसेने केलेल्या लेण्यांनी मूल नटले की, त्याला बघून त्यांचा जीव कसा हरखून जातो—

*पालख पाळणा घेती भिंगाचा*
*तान्ह्या माजा बाळराज राघू हिरव्या रंगाचा*
*अंगडं टोपडं शिव शिपनी नक्षीचं*
*बाळ माझं लेयाचं लाडायाचं*
*घडीव घडीव सोनारा पाच फेराचा कडदोरा*
*बाळ माजा चन्द्रकान्त कांतीचा हाये गोरा*
*हातात कडी तोडं बाळ चालतं तोऱ्यानं*
*बाळा माझ्या राजसाची झुलपं उडती वाऱ्यानं*
*लाडक्या लेकाचं त्वांड पोळतं भाजीनं*
*भातावर तूप सवं लावली आजीनं*

या:लाडक्या बाळाला शिंक आली किंवा जरा त्याचे काही दुखले खुपले तर आजीची वेडी माया तिला स्वस्थ बसू देत नाही. सूनबाईच्या व मुलाच्या नव्या विचारसरणीला दूर सारून आजी येसबंद, चारी वाटांची माती, मिरच्या इत्यादी साहित्यांनी चुलीत ठिसकारणारी दृष्ट काढते आणि म्हणते—

*माळ्याच्या मळ्यामंदी येसबंदाचा कवळा*
*तान्ह्या या बाळाजीच्या दृष्ट झालीया जावळा*
*दृष्ट झालीया म्हनं पाळण्याच्या फळी*
*बाळ माजं आत झोपली चाफेकळी*

या गुणी पाखरांच्या लाडात रंगलेली आजी आजोबा आनंदाच्या शिखरावर बसलेली असतात.

आणि.......आणि पुष्कळ वेळा वडलांच्या बरोबर थोडे दिवसासाठी आजोळी आलेला हा बाळराज जेव्हा वडलांच्या बरोबर परत त्यांच्या नोकरीच्या गावी जायला निघतो तेव्हा आजी आजोबांचा जीव गलबलून जातो. मग ही वेडी माया त्याच्या परत येण्याची वाट मोठ्या आतुरतेने बघत राहते. पहिले काही दिवस अगदीच काही सुचत नाही तेव्हा आजी म्हणते—

*यिला गेला कामधंदा चैन पडेना रातियींची*
*तान्ह्या माज्या बाळायिची वार्ता लागली भेटीयिची*
*तुझ्या भेटीसाठी जीव झाला कष्टी*
*बाळा माझ्या पाखरा कधी पडशील दृष्टी*

अशावेळी मन बेचैन होते. कशात ना कशात मन गुंतवून हा वेडाजीव थोडा फार विसावतो. मन लागले तेव्हा आजी आजोबाही आपल्या मुलाचा संसार पारखायला आणि चिमण्या पाखरांचा सहवास मिळवायला आतुरतेने त्यांच्याकडे धाव घेतात.

# जात्यावरील आई

श्री. पां. र. शिन्दे, संगमनेर

सगळीकडे सामसूम असते, नि भल्या पहाटेच शुक्राची चांदणी आपल्या निळ्या तेजाने क्षितिजावर चमकू लागते. आपण एकट्याच जाग्या आहोत म्हणून तिला हुरहूर वाटते की काय कुणास ठाऊक! आपली एक शलाका दाराच्या फटीतून ती घरात पाठविते. आईला तिचा निरोप मिळतो नि आई जागी होते ती मोठ्या उत्साहाने, आनंदाने! थोड्याच वेळात जात्याची पाळी स्वच्छ केली जातात. त्या आवाजाने साखरझोपेत असलेला तिचा तान्हा जागा होतो. आईच्या मांडीची उशी व पदराचे पांघरूण त्याला मिळते, अन् पहिली वैरण (घास) घेऊन जात्याची गोड घरघरत सुरू होते. त्या गोड घरघरीच्या साथीला आईच्या गोड कंठातून कर्णमधुर सुरावट बाहेर पडते. तिच्या गोड ओव्या सुरू होतात.

*पहाटेचे दळण माझ्या जीवाला आनंद*
*कडे तोड्याचे बाळ मांडी निजला गोविंद*

*जात्यावर बसले उल्हासले माझे मन*
*पोटीचे बाळराज ओव्याजोगे भीमसेन*
*माझिया मनाची केली देवाने समाधानी*
*आंगड्याचा रावा परकराची मैना तान्ही*
*राघू मैनाची कीजवीज चालली झाडावरी*
*देवाने दिली तशी जोडी नांदते माझ्या घरी*

आपली सोनुली बाळे तिला प्राणप्रिय असतात; मग सावळा हरी असो की सावळी मैना असो. तिला दोन्हीही सारखी असतात. जी माया मुलावर, तीच मुलीवर. पर्जन्य नदी आणि समुद्र असा भेद करतो का कधी ?

*माझ्या आयुष्याचा उदयबाळ तुला शेला*
*पपाबाई माझे उरलेल्याची चोळी तुला*

आणि मग आपल्या मुलाचे तोंड भरून कौतुक केले जाते. वंशाचा दिवा तर त्यात मानाचा असतो. त्याच्या प्रत्येक गोष्टीविषयी आईला कौतुक वाटते. त्याला पाहून तिचे काळीज खुलते. त्याला खेळताना पाहून तिचा शीण हलका होतो. आणि खेळून आल्यावर त्याला मांडीवर घेण्यात तिला आनंद वाटतो.

*शुक्राची चांदणी करते लुढळा*
*मोहनराजा माझ्या तसं रूप तुझं बाळा*
*मोठमोठे डोळे याच्या भुवया कातीव*
*सावळ्याचे माझ्या रूप राघूचे ओतीव*
*रस्त्याने चालतो जसा गणपति डुलत*
*बाळाला देखुनी माझे काळिज खुलत*
*सारविले घर हे ग केव्हा वाळेल बाई*
*बाळाचे ग माझ्या रांगत्याचे भरतील पायी*
*सारविलं घर माझं कधीशी वाळन*
*तान्हा माझा राघू रांगतं खेळनं*

*खेळ खेळा बाळा तुला कोणी केली मना*
*पोटीच्या राजा माझ्या तुला आज्याचा परगणा*
*हातात विटीदांडू बगलेला मारी गाडा*
*बाळाची माझ्या खेळणाराची वाट सोडा*

तिचा बाळ अजून बोबडेच बोल बोलतो आहे. त्या बोबड्या बोलाची तिला मोठी गंमत वाटते आणि हा बोबडे बोलणारा तिचा लाल शाळेतही जाऊ लागतो. पंतोजी त्याला कधी बोलतील म्हणून आई पंतोजीला खारीक देऊ करते. त्याला शाळेत दृष्ट होऊ नये म्हणून त्याच्यावर लिंबलोण शाळेत जाऊन उतरते व त्या लिहिणाऱ्या गोऱ्या हातात काळा दोराही बांधते.

*बोबडे ग बोल मला लागतात गोड*
*बाळा माझ्या मोहना, फिरुनी आणखी तू बोल*
*नगर शहरात धूळ कशाची उठली*
*विठ्ठल बाळाची शाळा राघूची सुटली*
*शाळेतला पंतोजी एवढा कामून तापला*
*मोहन बाळ माझा एक अक्षर चुकला*
*लिंबलोण करीते तुझ्या शाळेत येऊनी*
*सावळ्या बाळा तुझं अक्षर पाहुनी*
*दृष्ट होईल म्हणूनी बांधते मी काळा दोरा*
*प्रकाश बाळाचा लेखणीचा हात गोरा*
*दौत लेखणी शाई सांडू लवंडू देई*
*गप्प बस तान्ह्या मैना काकुलती येई*

आपल्या मुलापुढे तिला कशाचीही किंमत वाटत नाही. लेणी नकोत; लुगडी नकोत; संपत्ती नको! रस्त्यावर खेळणारा, वाड्याच्या जोत्यावर वाळे वाजवीत बसलेला तिचा सोन्या हाच तिचा शिणगार. एखाद्या हिणविणाऱ्या शेजारणीला अथवा श्रीमंतीचा तोरा दाखविणाऱ्या शेजारणीलाही ती तो शिणगार पाहून घे असे सांगते :—

*लेणी ती लुगडी काय करायचं वस्त्याला*
*तान्हा माझा राघू पंड्या खेळतो रस्त्याला*
*संपत्तीची नार, नार हिणविते मला*
*चल माझ्या वाड्यामंदी सोनं दाखविते तुला*
*नार लेती लेणी झाकुनि चंद्रहार*
*रस्त्याला खेळतो ग माझा उघडा शिणगार*

आईच्या काळजाचा तुकडा अगदीच तान्हा आहे. तो झोपेला आला आहे. त्याच्याकरिता मामाने रंगीत पाळणा पाठविला आहे आणि आई त्याला झोका देत आहे. कोणी पाऊल वाजवीत–धडधडा येऊ नका; माझे राघू झोपले आहेत, असे ती सांगते. आईच्या हृदयातील वात्सल्य तिच्या गोड गळ्यातून आपल्या कानांवर पडते—

*रंगीत पाळणा वर हिंगूळ सारीला*
*सावळ्या हरी तुला तुझ्या मामाने धाडीला*
*पाळण्याची दोरी येता जाता हालविते*
*बाळाला माझ्या राघूला ग झोका देते*

त्याला सुखी ठेव अशीच ती देवाजवळ नवस-सायास करीत असते. सटवाई, लक्ष्मीआई, सूर्यनारायण, मढीचा कानीफनाथ, पैठणाचा नाथ यांनाही ती नवस बोलते. त्यांना ती जिवाभावाने आळविते :—

*सटवाई तुला वाहीन बत्तासा*
*तान्हा माझा राघू पाऊल टाकितो आत्तासा*
*सटवाईबाई तुला वाहीन कमळ*
*माझ्या राघूला सांभाळ*
*सटवाईबाई तुझ्या देऊळाला विटा*
*बाळाच्या ग माझ्या झाल्या जावळाच्या जटा*
*लक्ष्मी आईचं देऊळ ओल्या केसांनी झाडीते*
*बाळाचे ग माझ्या केले नवस फेडीते*

*नवस वाळले लक्ष्मीबाई सोयरीला*
*सावळा बाळ माझा ठेवीन तुझ्या पायरीला*
*नारायण बाप्पा जोडीते मी दोन्ही हात*
*सावळे बाळ माझे सांभाळी रे दौलत*

त्याच्याचकरिता केलेले नवस ती त्याच्याकडूनही फेडून घेते. त्याला देवाधर्माविषयी श्रद्धा वाटावी म्हणून त्याची आई त्याला आसपासच्या देवदेवतांच्या यात्रेला पाठवीत असते. कावड हाती घेऊन तिचा हा कावड्या दिंडीतील वारकरी यात्रेला निघतो, तेव्हा तिची कोण धांदल उडते!

*धुणं धू ग धोबिणी साबू लावून बंडीला*
*सावळा राघू माझा जातो नाथाच्या दिंडीला*
*धुणं धू ग धोबिणी साबू लावून शेल्याला*
*बाळ राजा माझा जातो नाथाच्या काल्याला*
*पैठणच्या वाटे दिंडी लहानग्या बाळाची*
*बाळाची ग माझ्या वाटी फुटली टाळाची*

मढीच्या कान्होबाला तिचा लहानगा कावड घेऊन जातो तेव्हा—

*कान्होबा मायंबा[1] दोन्ही मढीच्या रानात*
*आंघोळीला पाणी यांना जांभळ्या वनात*
*मळीच्या वाटेन ग हा फुपाटा मातला*
*सांगते बाई तुला माझा कावड्या नाचला*
*मळीच्या वाटेने हुतुतूला आला भर*
*बाळाला ग माझ्या कावड्याला सोमवार*

आपला बाळ सावळा आहे यात तिला अभिमान वाटतो. पांडुरंगाचा तो वानवळा आहे असे तिला वाटत असते. तरी पण कोणी त्याला काळा म्हणू नये म्हणून ती म्हणते—

---

१ मायंबा = मच्छिंद्रनाथ

*नको म्हणू गोरे माझ्या बाळाला ग काळा*
*पांडुरंगानं दिला मला माजा वानवळा*
*पंढरीचा पांडुरंग सिंहासनाखाली आला*
*सावळा बाळ माझा पायरीचा चिरा झाला*

या पांडुरंगाच्या रूपाला नजर लागते ती अशी :—

*आंब्याची आंबराई सर्व खांदली राघूनं*
*बागवानाच्या बाळाला गेली नजर लागून*

अन् मग तिची दृष्ट काढण्याची घाई होते. ती मीठ, मोहऱ्या, पदर, पिवळ्या मेथ्या, मोराचा पंखा, मेंदीचे बोंड, या सर्वांचा उपाय करते. शोधाशोध सुरू होते. कारणमीमांसा होते. तिचा राघू फुलासारखा कोमेजला आहे तो कशाने ?

*दृष्ट मी काढीते मीठाचे ग होते पाणी*
*सावळा ग माझा बाळ कोमेजला फुलावाणी*
*दृष्ट मी काढीते मीठ मोहऱ्या पिवळ्या मेथ्या*
*बाळराज माझा कोण न्याहाळीत होत्या*
*दृष्ट मी काढीते डोईच्या पदरानं*
*जोर केला बाई नारीच्या नजरेनं*
*आगद[१] लागली मला मोराच्या पंखाची*
*बाळाला झाली दृष्ट या ग साहेब लोकांची*
*माळ्याच्या मळ्यात वीसबंध[२] कोपऱ्याला*
*बाळाला ग माझ्या दृष्ट झाली व्यापाऱ्याला*
*दृष्ट मी काढीते मीठ मोहऱ्या काळा बिब्बा*
*बाळराज माझा होता रस्त्यावर उभा*
*दृष्ट मी काढीते मीठ मोहऱ्या तळुनी*
*बाळराज माझे आले लेझीम खेळुनी*

---

१ २ आगत्य, जरूरी. २ मेंदीचे बोंड. येसबंद.

तिचा हा बाळ तिला मोठा भाग्यशाली वाटतो. दैव दुणीने झाल्यासारखे तिला वाटते. त्याचा हातगुण चांगला आहे :—

*गाई हंबरती वासरं साद देती*
*बाळराजा माझा तुझा वाडा लखोपती*
*गहू हरभऱ्यानं माझा भरला कोपरा*
*कुमार बाळ माझ्या तुझी कमाई लेकरा*
*दसऱ्याचे दिवशी आपट्याचं सोनं*
*राघुबाळाचा माज्या सख्याचा ग हातगुण*
*दिवाळीचे दिवशी ताट माझं आहे जड*
*असं ओवाळीते राजुबाळ शहागड*

म्हणून ती म्हणते :

*माझं दुबळेपण उद्या निघून जाईल*
*सावळ्या बाळाला मोल राघूला येईल*
*धन ग संपदा कोण पुसतं मालाला*
*आता पुसतील माझ्या कडेच्या लालाला*

कधी तिचा तान्हुला बाहेर गेला म्हणजे तिचा जीव वरखाली होतो. त्याची सारखी ती वाट पाहात असते. मध्येच ती दारात येते. तो लवकर येत नाही म्हणून तिला राग येतो. कधी रागाच्या भरात ती त्याला केवळ शिवी देण्याचेच धाडस करीत नाही, तर ती कधी मारतेही. पण लगेच तिला त्याचे वाईट वाटते :—

*काम करीते घरात, दाराकडे माझा डोळा*
*आता येईल बाई राघू माझा जीवनकळा*
*किती हाक मारू उभी राहून दारात*
*सावळा ग माझा चंद्र कोणाच्या वाड्यात*
*राग आला मोठा पोटी संताप मावेना*
*राघूला माझ्या शिवी लालाला देईना*

*राग आला मोठा बाई म्या मारिली चापट*
*विखारी माझी बोटं उमटली कुठं*

आई त्याला उरी-पोटी लावते, कुरवाळते; पण तिचा लाल घुश्शातच असतो :–

*आंबट आंबा, तुरट सालीचा*
*बाळ माझा भीमसेन आहे रागीट बोलीचा*
*आंबट आंबा तुरट ग याची साल*
*बाळाचे ग माझ्या डोळे रागीटाचे लाल*

आईला मुलगा नि मुलगी दोन्हीही सारखीच. आपल्या काळजाच्या दोन घडांप्रमाणे ती दोघांवर माया करते. मुलाची ओढ असलेली आई मुलगी झाल्यावरही तितकीच आनंदाने गहिवरून जाते :–

*ल्योक मागितला लेकीबाई केलं येणं*
*साळुबाई माझे तुला कंटाळलं सांग कोण ?*

यात सर्व सामावले आहे !

कधी कधी तर तिला मुलापेक्षाही मुलगीच हवीशी वाटते. आपल्याला कामात मदत करण्यासाठी, तान्ह्याला सांभाळण्यासाठी, मुलाइतकेच तिला मुलीचेही कौतुक !

*मुलापरीस लेकी मैना मला आवडती*
*राघू जातो शाळेला ग मैना जीवाला जाणती*
*कुरुंदाचं जातं याला खुंटा आवळीचा*
*हाई कमळाबाईचा वर हात सावळीचा*

तिला तिच्या केसांचे कौतुक वाटते. खेळाचे वाटते. बुरुडदादास ती सुपली, कुरकुली करून देण्याची घाई करते. मोठी झाल्यावर ही मऊमऊ हाताची, साखरेसारखी गोड असलेली, विजेसारखी गोरी असलेली राधा कोणास द्यावी याचीही तिला चिंता पडते. त्यामुळे तिचे कौतुक करण्याच्या भरात—

*लाडक्या लेकीचं नांव ठेविते सुंदर*
*पायामधी तोडे बाजूबंदाला घुंगूर*

लाडक्या लेकीचं हिचं खेळणं उड्याचं
विबडाबाईचं भिंग झळकतं चुड्याचं
कुरळ्या केसाचा भांग पडतो धामुका
सावळी बाई माझी बापासारखी रेणुका
सुपली कुरकुली बुरूडदादा जल्दी कर
लेक मैना माझी झाली आता खेळकर
सुपली कुरकुली भिंतीशी उभी केली
लाडकी मैना माझी सयांना भाया[१] गेली
लोकाच्या लेकी खेळतात शेणसडा
लाडकीच्या माझ्या हाती गुलालाचा पुडा
लाडकी ग लेक खडीसाखर खड्याची
बाळाची ग माझ्या मला लज्जत पेढ्याची
लाडक्या लेकीचे इचे तळहात मऊ
पडली बाई चिंता कोणा राजीयाला देऊ

लाडकी लेक म्हणजे खडीसाखरेचा खडा; तोंडात पटकन् विरघळणारा पेढा! कधी कधी मोठ्या भाग्याची पाठ घेऊन ही जन्माला येते. आई तिचे कौतुक करते. काही उपदेशही भावाच्या बहिणीला केला जातो :–

माझ्या मैने तुझी पाठ दिसते भाग्याची
तुझ्या पाठीवर जोडी पंचाळू वाघाची
भावाची बहिण दिसते रंगलाल
सबादून गेली बाई झेंडूमधीं मखमल
कपाळीचा घाम नको टाकू भिंतीवरी
सावळे मैना माझे रत्न तुझ्या पाठीवरी

---

१ बोलाविण्यास

*दिव्याच्या पडसावली नको वसू सावळे बाई*
*सावळा हरी माझा तुझ्या पाठीचा देसाई*

माहेराहून भावाचे लग्न असते म्हणून मुऱ्हाळी येतो अन् करवली होण्याचा मान आईपेक्षा मुलीलाच मिळतो. ही करवली मोठी चलाख आहे. चतुर आहे. नेणती पण मानाची आहे. हट्टी पण कामसू आहे. रागीट पण सेवावृत्तीची आहे.

*लांब लांब केस सडका सोडिल्या न्हायाला*
*आता माझी बाई जाते करवली व्हायाला ॥*
*भाऊ नवरदेव करवल्या वीस तीस*
*सावळबाई मानानं खाली बस ॥*
*भाऊ नवरदेव याची करवली कोण*
*सावळी बाई माझी नेसली सूर्यपान ॥*
*नवऱ्याला नवरकळा एका रात्रीतून आली*
*बाईनं ग माझ्या सेवा करवलीनं केली ॥*
*बंधू नवरदेव याची करवली रागीट*
*पडतो तिच्या पायां शिरी बाशिंगासकट ॥*

मुलामुलीच्या संसारात आई फार सुखी असते. घरात राघू–मैनेची जोडी तरी असावी अशी तिची आंतरिक इच्छा असते.

*हौस मला मोठी थाळ्याशेजारी वाटीची*
*आता माझी मैना भावाच्या पाठीची*
*चंदा-बाईची खेळ-खेळ चूल भानवशी*
*उदय बाळाचा चेंडू गेला वेशीपाशी*

या जोडीत मैना भोळी आहे. राघू बालंट आहे. मैना-राघूत लुष्टी होते. पण राघू? तिला चाळविणे–फसविणे हाच त्याचा छंद. आईला याची कल्पना आहे. पोराच्या जातीपासून मुलीने सावध राहावे, असाही इषारा ती देते.

*राघू मैना माझी लिंबाच्या शेंड्याला*
*राघू तोडीं फुलं मैना गुंफीते गोंड्याला*
*राघूची संगत नको धरू साळूबाई*
*राघू वईमान तुला उचलना पायी*
*राघूची संगत या ग मैनानं धरिली*
*राघू कटारी मारिली मैना विचारी पडली*
*राघू नी मैना दोन्ही खेळती ऊसात*
*राघू भरारी मारिली मैना पडली फासात*

अशी आहेत तिची ही अवखळ बाळे! मोठी आभंड आहेत. धिंगाणा, पळापळ हे तर कधी बंदच नाही. त्यामुळे शेजारीण सखू हिला त्रास होणार हे ओघानेच आले. आपली शेजारीण चांगली आहे अशी आईची श्रद्धा आहे. तिने चांगले असावे अशीही तिची अपेक्षा. आपल्या पोराबाळांचे घर वर्दळीचे. शेजारणीने ते सारे सोसवून घ्यावे असे तिला वाटते.

*लेकुरवाळीचा माझा परवर गदळ*
*माझ्या ओसरीला राघूमैनांची वर्दळ*
*शेजारणी सखू सांभाळ तुझ्या साळी डाळी*
*राघू माझे नवसाचे नको करू शिवी गाळी*
*लेकुरवाळीची थाळीवाटी खरकटी*
*शेजीबाई नको कपाळाला घालू आठी*

चांगली शेजारीण आईची विनंती मानते, अगत्य करून घरी येते, तेव्हा आईला मोठा उल्हास वाटतो.

*शेजी आली घरा बस बस शेजीबाई*
*तान्हया पारठ्याचे अन्याय झाले काही*
*शेजारीण बाई बस माझ्या परवरी*
*जावळाचा हरी देते तुझ्या मांडीवरी*

*शेजारीणबाई शेजारपणाला चांगली*

*राघू मैनाची माझ्या तुला वर्दळ लागली*

आईचे काळीज ते! शेजारणीचा उपकारही ते ठेवीत नाही. शेजारणीच्या बाळाचाही ती तितक्याच सहजतेने सांभाळ करते. त्याला जपते. आपल्याजवळ कोणी आपला ठेवा ठेवला आहे याच भावनेने ती त्याला जपते.

*शेजी सुवासीन बाळ टाकिली रतन*

*तिचं बाळराज केलं जीवाचं जतन*

*माझ्या मनामंदी एवढं नाही दुजं आज*

*सावळ्या शेजारी शेजीच्या रं ताट तुजं*

पण शेजीचा मुलगा किती केला तरी परकाच असतो. त्याला आईचीच ओढ जास्त असणार. वासरू आपल्याच गाईकडे धाव घेते. प्राणपदराची सावली केली तरी त्याचा काय उपयोग?

*शेजीच्या बाळाला केली प्राणाची सावली*

*टाकिली झेप यानं माउली ओळखिली*

म्हणून :–

*शेजी तुझं बाळ जसं आलं तसं गेलं*

*माझ्या राघूनं ग माझं मन रंजवीलं*

*शेजी तुझं बाळ दुरूनी सांगी गोष्टी*

*माझी सावळी येईल घालील गळ्यां मिठी*

अशी आहे आई! तिचे उपकार कोणी कधी आणि कसे फेडायचे? आईची महती आईच्याच शब्दात सांगायची तर—

*आईचा उपकार कधी फेडशील जीवा*

*तळहाताचा पाळणा केला नेतराचा दिवा*



# शिशुगीते

श्रीमति आनंदीबाई शिर्के, पुणे

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

मातेला सर्वात अधिक जर काही प्रिय असेल तर ते तिचं तान्हं बाळ. त्या सुखाच्या ठेव्याला कुठं ठेवू न कुठं न ठेवू, किती जपू न आपलं हे सुखनिधान कुणाला दावू, किती त्याचं कौतुक करू, असं तिला होऊन जातं. बाळाच्या स्वास्थ्यासाठी त्याच्या भुकेची अन् झोपेची काळजी घेतली पाहिजे हे तिला कळतं; आणि त्यासाठी ती किती धडपड करते! तसेच त्याच्या रूपाची तरी तिला किती मोहिनी पडते! त्या रूपाला दृष्ट लागू नये म्हणूनही ती जपते. आपल्या बाळानं कुठं जावं, कुठं जाऊ नये, कुठं खेळावं याबद्दलही ती दक्षता बाळगते. या दृष्टीनं खालील ओव्या पाहाव्यात :—

*ये ग गाई*

*ये ग ये ग गाई । गाई ये ग तू गोठ्यात ।*
*भुकेजलं बाळ । दुदु दे ग तू वाटीत ॥*

सर्वीसांज झाली । बाळ भुकेजला फार ।
याच्या ग वाटीमधी । बत्ताशावर घाल धार ॥

काळी कपिला गाय । गाय दुधाला आधिक ।
बाई मला गवसलं । पृथ्वीमोलाचं माणिक ॥

दात डाळिंबाचे दाणे । ओठ पोवळ्याची जाळी ।
माझ्या तान्हियाला । कुणाची ग दृष्ट झाली ॥

माळ्याच्या मळ्यामधी । इसवंद ग कवळा ।
माझ्या चिमण्याच्या । दिष्ट झाली ग जावळा ॥

उतरिते दिष्ट । मीठ मोहऱ्या अगिनीला ।
कोणाची झाली दिष्ट । लाला माझ्या गहिन्याला ॥

खाईना पिईना । बाळ झालं ग मलूल ।
माझं ग तान्हं बाळ । एका दिसात कोमेलं

माझं ग तान्हं बाळ । रोज हाळदीनं न्हातं ।
त्याच्या आंघुळीचं पाणी । दारी शेवंतीला जातं ॥

हिडीस फिडीस । कुणी केलं लेकराला ।
काजळ गेलं वाया । पाणी आलं नेतराला ॥

शेजीबाईच्या घरी । जाऊ नये घडी घडी ।
तिच्या कवाडाला कडी । तिच्या कपाळाला आढी ॥

आंगण झालं थोडं । मामाला पडलं कोडं ।
मामाला पडलं कोडं । त्यानं लाविली फुलझाडं ॥

बहिणीच्या बाळाला खेळता आंगण थोडं झालं व आता काय करावं असं मामाला कोडं पडलं हे ठीक आहे. परंतु त्यासाठी भाच्याला खेळायला आंगण पैस–रुंद–करण्याऐवजी त्यानं फुलझाडं लावून ते आणखीच लहान का केलं हे कळत नाही.

मातेला बाळ कितीही अपूर्व वाटत असला तरी तिला इतर कामाकडेही लक्ष द्यावं लागतं. अशावेळी छोट्या बाळाला निजविण्याची, रिझविण्याची व खेळविण्याची पाळी त्याच्या मोठ्या बहीणभावंवर येते. ती ते कशी बजावतात पाहा :—

*निज रे बाळा*

*निज रे निज रे तान्ह्या बाळा । तुझी आई गेली सोनारवाड्या ॥*
*सोनारवाड्याचा दिवा जळे । तान्ह्या बाळाचे बाळे घडे ॥*
*घड रे घड रे सोनारा । माणिक मोत्यांचा डोल्हारा*

घड रे घड रे सोनारा म्हणताना ते वडील भावंड बाळाला चांगलंच थोपटून काढतं. त्यात त्याचा रागलोभही दिसून येतो. कधी त्याला स्वतःला खेळायला जायचं असतं किंवा अभ्यास करायचा असतो. अशावेळी छोट्याला निजवणं, खेळवणं त्याला आवडत नाही. त्यात ते अवखळ बाळ लवकर झोपत नाही. मग त्याच्यावरचा राग अशावेळी जरा जोरानं थोपटून काढल्याशिवाय त्यास गत्यंतर उरत नाही. त्यात झोपवणारी बहीण असली तर ती खालीलप्रमाणे मायेच्या शब्दात कशी झोपवते ते पाहा :—

*माझा बाळ शाणा । मोत्याचा दाणा ॥*
*माझा बाळ वेडा । रडून मागतो पेढा ॥*
*माझा बाळ लहान । किंकीचं पान*
*दादाला सांग । मला खुळखुळा आण ॥*
*माझी बाई छोटी । रंगीत काठी ॥*
*दादाला सांग । मला शिमग्याची गाठी ॥*

बाळ जरा बसता उठता झाला की, त्याला बाहेर जावंसं वाटतं. पशु-पक्षी, झाडं-माडं पाहावीत, त्यांचे आवाज, हालचाली पाहाव्यात, ऐकाव्यात, हे त्याला फार आवडतं. पण बाळाचं हे धावणं, पळणं मोठ्या भावंडाला परवडत नाही. ती त्याला जागेवरच बसवू खेळवू पाहतात. बाळाला मोठे आवाज आवडतात म्हणून जमिनीवर अथवा आई जवळपास नसली तर पत्र्यावरही छडी आपटून मोठे आवाज करीत खालील गाणं म्हणतात :—

*सरस्वती सरस्वती चकळंबे ( सकलंबे ) चकळंबे*
*चकळंबे के बेकंबे बेकंबे*
*बेकंबे के फाकडे फाकडे*
*सो सो घोडे लाकडे*
*रडत राऊ घोड्यावर जाऊ, घोड्यावर जाऊ*
*शेरगावाची हवा पाहू अन् चुकली मुकली तोंडात खाऊ*

आणि शेवटची ओळ म्हणताना एक हलकीशी चापट बाळाच्या गालावर वाजवायलाही ती कमी करीत नाहीत. तसं हे दुसरं एक गीत पाहा :—

*काशीबाई काशीबाई कटकटली, कटकटली*
*एक वाटी फोडली, फोडली*
*साऱ्या पोरांना वाटली वाटली*
*एक पोर चुकला, चुकला*
*परसादाला मुकला, मुकला*
*नांगर घंटा वाजती, वाजती*
*शिष्या डोल डोलतो, डोलतो*
*शिष्यानं केली आरती, आरती*
*रुप्याचा दिवा, सोन्याची वात, जळे सारी रात*
*निज बाळा निज*

हे गीत म्हणताना अवखळ बाळाची पाठ चांगली थोपटून काढण्याची संधी मोठी भावंडं सहसा सोडीत नाहीत.

बाळ दूध पिताना कितीतरी टिवल्याबावल्या करीत असतं! त्याला दूध पाजणारी, मम्मं घालणारी त्याची आई पुष्कळ वेळ जवळ असावी असं वाटत असावं. म्हणून ते खाऊन पिऊन लवकर मोकळं होत नसावं. त्या वेळेस त्याचा लाड पुरवीत आई त्याला खालील शब्दात रिझविते आणि एक एक घोट किंवा घास भरवीत असते :

### हाड कुत्र्या

*हाड कुत्र्या शिर माऊ । नको बाळाचं दुदु पेऊ ॥*
*हाड ग हाड ग हारकुली । बाळाच्या काखेत कुरकुली ॥*
*बाळ जातं बोराला । संगं नेतं पोराला ॥*
*बाळाची बोरं सांडली । पोरं वेचूं लागली ॥*
*बाळ लागलं रडायला । पोरं लागली हसायला ॥*

### नाच रे मोरा

*इथं इथं इथं नाच रे ऽ मोरा ऽ ऽ नाच रे ऽ मोरा*
*तुला घालू चारा ऽ चारा खा ऽ पाणी पी ऽ*
*चिमणीच्या डोक्यावर भुर्रकन उडून जा ऽ*

चांदोबा हा बाळाचा फार मोठा आवडता सोबती आहे. त्याला पाहून बाळाच्या आनंदाला उधाण येतं. त्या नादात तो दोन घोट किंवा दोन घास घेतो, म्हणून आई चांदोबावरील गाणी नेहमी म्हणते. हे एक अनादिकालापासून चालत आलेलं चांदोबाचं लोकप्रिय गीत कसं आहे पाहा :–

*चांदोबा चांदोबा भागलास का ? भागलास का ?*
*निंबोणीच्या झाडाआडी लपलास का ? लपलास का ?*
*निंबोणीचं झाड करवंदी, करवंदी*
*मामाचा वाडा चिरेबंदी*
*मामाच्या वाड्यात येऊन जा, येऊन जा*
*तूपरोटी खाऊन जा*
*तुपाची धार गेली वाऱ्यानं, वाऱ्यानं*
*कमळी नेली चोरानं, चोरानं*
*चोराच्या हातची सुटली, सुटली*
*बाजखाली लपली, छडीखाली ठोकली*

कोणाला छडीखाली ठोकलं हे ऐकून जराशी समज आलेल्या बाळाला खूप गंमत वाटते. ते आनंदानं टाळ्या पिटीत हसतं. आई ती संधी साधून बाळाच्या

उघड्या तोंडात चपळाईनं घास भरवते आणि तीही त्याच्या हसण्याला साथ देते. गुजरातमध्ये घोडीपाळणा असतो. तो इकडे तिकडे नेता येतो. महाराष्ट्रीय स्त्रियासुद्धा तोच वापरतात. त्याची लांब दोरी स्वयंपाकघरात नेऊन काम करता करता आई गात असते :—


*परसराम परगणा । विठ्ठलाच्या दरवाजाला*
*मोत्यांचा पाळणा ॥*
*हालवा ग सयांनो । हालवा ग बायांनो ।*
*परसरामाला । मी गुंतले कामाला ॥*

हे गीत बाळ झोपेपर्यंत घोळून घोळून म्हणायला पुरते.

बाळ जरा धरून उभा राहू लागला की, त्याचे हात धरून त्याला हलक्या हाताने जरा जरा घुसळल्यासारखं करतात आणि खालील गीत म्हणतात. या वेळी ताक केल्याप्रमाणं बाळाला हलवलं, डोलवलं तर ते त्याला फार आवडतं :–

*सावळ्या रामाच्या ढवळ्या गाई हो, ढवळ्या गाई*
*घुसळण घुसळी रखमाबाई हो, रखमाबाई*
*अझून लोणी आलंच नाही हो, आलंच नाही*
*आता बा येईल तुकोबा वाणी हो तुकोबा वाणी*
*मग खा बाप्पा साखर लोणी रे, साखर लोणी*

# बाळराजविषयक मराठी व अन्यप्रांतीय लोकगीते



डॉ. सौ. सविता जाजोदिया
एम्. ए., पीएच्. डी.

दैवाने घात केलेली कोणशीशी ती बाई विचारी औदासिन्य घालविण्यासाठी त्यादिवशी म्हणे बागेत गेली. पण तिचे पाय बागेला लागताच बागेतील तलाव आटून गेला, फुले कोमेजून गेली, झाडेझुडपे सुकून गेली! म्हणून निराश मनाने ती बाजारात गेली; पण तिला पाहताच दुकानदारांनी दुकाने बंद करून टाकली, तिचे दर्शन नको म्हणून लोक तोंड फिरवून चालू लागले. त्यामुळे रडवेली होऊन विचारी घरी परतली. दिंडी दरवाजातून ती वाड्यात शिरू लागताच सासऱ्याच्या हुकूमावरून पहारेदाराने हाकलून दिले. तेव्हा मागील दाराने ती स्वयंपाकघरात शिरली. तेथे लहानथोर दीर जेवत होते. तिला पाहताच नणंदेने तिचा हात धरून तिला स्वयंपाकघराबाहेर घालवून दिले! अखेरची आशा म्हणून ती आपल्या शयनगृहात गेली. तेथे तिचे पतिदेव पलंगावर पहुडलेले होते. तिला पाहून त्यांनी देखील तिच्याकडे पाठ फिरविली. हाय रे दुर्दैवा! आता जीव देण्याशिवाय गत्यंतरच उरले नाही. झपझप पावले टाकीत ती गावाबाहेर गेली. तेथे वारुळाबाहेर नागीण उन्हं खात बसली होती.

हात जोडून तिने नागिणीला विनविले, 'नागदेवते तू तरी माझा उद्धार कर.' पण नागिणीने नकारार्थी मान हलविली, 'छे, तुला जर मी डसले तर मीदेखील वांझ होईन. जा बाई पुढे जा.' तेथून निघून ती माहेरी भावाघरी आली. घरातून आईच बाहेर आली. तिने लेकीच्या सुखदुःखाची चौकशी केली आणि येण्याचे कारण विचारले. लेकीने सर्व कर्मकथा सांगितली आणि म्हटले, 'मइया हमका जो तुम राखि ले तिउ विपतिसे हम छूटित हो' (आई, तू मला थारा दे आणि या आपत्तीतून सोडव.) पण प्रत्यक्ष मायदेखील म्हणते, 'बिटिया, तुमका जो हम राखि लेबइ बहू बांझिनि होइहँई हो' (मुली, मी जर तुला ठेवून घेतले तर माझी सून वांझ होईल. वंश खुंटेल) आतां काय करावे? प्रत्यक्ष जन्मदात्या आईनेही पदराखाली घेतले नाही! सीतामाईला पोटात घेणारी धरणीमाता कदाचित आपल्यालाही पोटात घेईल म्हणून तिने धरणीला विनविले, 'आई, तू तरी मला तुझ्यात सामावून घे,' पण पृथ्वीमातेलाही दया आली नाही. तिने उत्तर दिले, 'वांझिनि तुहूंका जो हम राखि लेइब हमहु होब ऊसर हो.' (मी जर तुला ठेवून घेतले तर मीदेखील ओसाड होईन.) अखेर जीव देण्यासाठी म्हणून ती विहिरीवर गेली. तिला विहिरीपाशी घोटाळताना पाहून एका पांथस्थाने चौकशी केली—

*"की तुम्हे सास ससुर दुख की मइकै दूरि बसै,*
*बहिनी की तुम्हरे पिय परदेस कवन दुख रोवहु हो*

(बाई, तुला कसले दुःख आहे? का अशी रडतेस? तुला सासू-सासरे छळतात का तुझे माहेर खूप लांब आहे म्हणून? तुझे पती परदेशी गेलेले आहेत काय?)

*"ना मोरे सास ससुर दुख न मइके दूरि बसै।*
*ना मोर पिय परदेस, कोखि दुख रोवहुँ हो।"*

(मला सासुरवास नाही की माझे माहेरही दूर नाही. माझे पतिदेखील आज परदेशी गेलेले नाहीत. पण माझी कूसच आज मला रडवीत आहे.) पोटी पुत्र नसल्याने घरी दारी कोणी विचारीत नाही. माझे दर्शनही सर्वजण अशुभ समजतात. माझ्या पतिदेवाने देखील आज माझ्याकडे पाठ फिरविली आहे! मी काय करू? कोठे जाऊ? माझे जिणे व्यर्थ आहे. देवा, मला सोने नाणे नको,

फक्त मांडीवर 'विसाव्याला' तान्हे दे, कुलाला दीपक दे. वांझ स्त्री पुत्राचे फळ पदरी लाभावे म्हणून अशी सारखी देवाला विनविते, प्रार्थना करते, नवससायास करते, तुळशीची पूजा करते—

*"पोटी नाही पुत्र नार झुरे मनात,*
*तुळशीची पूजा करिते उन्हात"*

वांझ स्त्रीची तगमग, घरीदारी होणारी तिची उपेक्षा, तिच्या जीवनाची व्यर्थता हे सर्व पाहिले म्हणजे जिला पुत्र झाला आहे त्या मातेला किती धन्यता वाटत असेल ते शब्दात वर्णन करून सांगणे अशक्य आहे. लोकगीतातून आलेले वांझ स्त्रीचे वर्णन अतिशय हृदयस्पर्शी आहे. यातील कारुण्याला जशी तोड नाही तशीच पुत्रवतीच्या आनंदालाही तोड नाही. याला समाजरचना हे जसे एक कारण आहे तसेच स्त्रीची स्वतःची अपत्यलालसा हे देखील एक कारण आहे. भारतीय संस्कृतीने पुत्राशिवाय पितरांचा उद्धार नाही ही शिकवण मनावर ठसविली. त्यामुळे पितृऋणातून मुक्त होण्यासाठी, श्राद्धादी कर्मे करण्यासाठी, पुत्र असणे आवश्यक ठरले. पुत्र म्हातारपणी सेवाचाकरी करतो, आधार देतो म्हणूनही तो हवासा वाटू लागला. पण तेवढेच कारण असते तर ही हृदयस्पर्शी लोकगीते जन्मली नसती. या लोकगीतांचा उगम समाजरचनेपेक्षा मातृहृदयात अधिक आहे. सर्व सुखे देणारा पती आणि पाठीराखा भाऊ असला तरी स्त्रीला पुत्राचे भक्तिमय प्रेमही हवे असते. ती क्षणाची पत्नी असली तरी अनंतकालाची माता असते. मानव पुनःपुन्हा बालरूप घेऊन जननीच्या मांडीवर विसावत असतो. हे बालरूप म्हणजे 'नित्य कालाची सर्वांत प्राचीन अशी गोष्ट आहे.' ते देवतांनी मानवाला दिलेले धन आहे. पण ती निर्जीव संपत्ती नव्हे, तर रसमय सृष्टी आहे. 'मातेला मिळालेले ते देवाच्या बागेतील रसाळ द्राक्ष आहे. तो आकाशीचा तारा असून देवाने मातेच्या मांडीवर दिलेला आहे. ते गुलाबाचे फूल आहे.' मातृहृदयाला ते गंधमय करून टाकते, वात्सल्यरसाने आप्लावित करून टाकते. तिच्या दया, क्षमा, करुणा, प्रेम, सहानुभूती इत्यादि सर्व गुणांना कसोटीला लावून तिला ईश्वराच्या बरोबरीचे पद देऊन टाकते. इतकेच नव्हे तर त्या मातृहृदयातील वात्सल्यरसाचा अनुभव घेण्यासाठी स्वतः ईश्वरानेदेखील बालरूप घेतले होते.

साहजिकच स्त्रीजन्म सार्थकी लावणारा स्वर्गाचा राजहंस बालरूपाने जेव्हा मातेच्या कुशीत जन्म घेतो तेव्हा तिला वाटू लागते की, लहानसा दिवा ज्याप्रमाणे सर्व राजमहाल उजळून टाकतो, छोटासा चंद्र ज्याप्रमाणे व्योम प्रकाशून टाकतो, त्याप्रमाणे लहानगा बाळराज अवघे जीवन प्रकाशमय, आनंदमय, चैतन्यमय करून टाकतो. तिचे मन आनंदाने, समाधानाने तृप्त होऊन गाऊ लागते. तिच्या वाणीला मायेचा अलौकिक गोडवा येतो आणि सोन्याच्या साखळ्या, चारी कोपऱ्यांना चार चंद्र आणि मध्ये सूर्य असलेल्या चंदनाच्या पाळण्याची रेशमी दोरी हलवता हलवता तिच्या मुखातन भावोद्गार बाहेर पडतातः—


*" तमे माराँ देवना दिधेल छो*
*तमे माराँ भागी लीधेल छो*
*आव्याँ त्यारे अम्मर थई ने रो ' !*
*मा ' देव जाऊं उतावळी ने जाई चडावुं फूल,*
*मा ' देवजी परसत थीया त्यारे आव्यां तमे अणमूल !*
*तमे मारूं नगद नाणुं छो,*
*तमे मारूं फूल वसाणु छो*
*आव्याँ त्यारे अमर थई ने रो !"*

"—तू म्हणजे देवांनी दिलेले धन आहेस. तू म्हणजे मी मागून घेतलेले (वरदान) आहेस. तू जन्माला आला आहेस तर अमर होऊन रहा. मी धावत जाऊन महादेवाला फूल वाहिले. महादेव प्रसन्न झाले तेव्हा तुझ्यासारखी बहुमोल वस्तू मला मिळाली. तू माझे रोख नाणे आहेस. तू माझे सुवासिक फूल आहेस. जन्माला आला आहेस तर चिरायु होऊन रहा." याच वृत्तीत 'सर्वे वै सुखिनः सन्तु' प्रमाणे माता शुभेच्छा व्यक्त करते—'देव करो आणि मातेला कधीही दुःख न होवो, देव करो आणि पित्यावर कधी आपत्ती न येवो.

मातेच्या अंतःकरणातून बाहेर पडलेले असे असंख्य भावपूर्ण उद्गार आपल्याला पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र आढळतात. शब्दात फेरफार आढळतो. उपमांमध्ये वैचित्र्य आढळते. पण भावना त्याच आढळतात. बाळाच्या मांगल्याची इच्छा, त्याला दीर्घायुष्य लाभावे म्हणून ईश्वरास केलेली विनंती, बाळाचे कोडकौतुक हे काळ्या, गोऱ्या, पिवळ्या सर्वच वर्णांच्या लोकगीतातून आढळते. बाळाला खेळविण्यासाठी, झोपविण्यासाठी गायिलेली गीते थंड, उष्ण, समशीतोष्ण सर्व प्रदेशातून आढळतात. कारण मातृहृदय हे सर्वत्र सारखेच वात्सल्यमय आहे. त्याला वर्णभेदाचे वा भौगोलिक सीमांचे बंधन नाही.

फार काय त्यावर कालाचाही अंकुश नाही. अगदी प्राचीन काळी मानव जेव्हा रानटी अवस्थेत होता तेव्हाची माता आपल्या अपत्याला कमी प्रेम करीत होती आणि आजची माता अधिक प्रेम करते असे सिद्ध करून दाखविणे कठीणच आहे. प्रेम, कौतुक व्यक्त करण्याच्या पद्धतीत फार तर फरक असेल. पण मुळात प्रेमाचे, वात्सल्याचे प्रमाण कमीजास्त होते असे म्हणणे धाडसाचे होईल. आणि म्हणूनच बाळराजाविषयक लोकगीतांच्या झऱ्याचे मूळ शोधता येत नाही. लक्ष लक्ष तारकांप्रमाणे सर्वत्र विखुरलेल्या या गीतांची जन्मरात्र ठरविता येत नाही. एका लेखकाने म्हटले आहे, 'या लोकगीतांची परंपरा आई इतकीच प्राचीन आहे.' विश्वावर अधिपत्य गाजविणारी 'आई' किती प्राचीन आहे ते कोण, कसे ठरविणार? म्हणूनच या लोकगीतांचे प्राचीनत्व ठरविता येत नाही. अन्य लोकगीतांप्रमाणेच ही गीतपुष्पे देखील उमलत गेली आणि बाळाबरोबरच ऐकणाऱ्याचेही मन प्रफुल्लित करीत राहिली.

बाळराजविषयक या सर्व लोकगीतांचे वेगवेगळ्या तऱ्हेने वर्गीकरण करतात. पण आपल्या ग्रंथाचा आणि प्रस्तुत लेखाचाही विषय 'बाळराज'– लहानगा बाळ–असल्यामुळे इतकी मोठी वयोमर्यादा विस्तारभयास्तव घेता येत नाही. म्हणून ७.८ वर्षांपर्यंतची वयोमर्यादा–कौमार्यावस्थेपूर्वीचा बालपणीचा कालखंड घेऊन विवेचन करू या. त्या दृष्टीने आणि आंतरप्रांतीय बालगीते दृष्टीसमोर ठेवून थोड्या वेगळ्या पद्धतीने अधिक सोपे असे वर्गीकरण करू या.




यांपैकी बाळाला खेळविण्यासाठी गायिलेल्या आणि बाळ खेळताना स्वतः गात असलेल्या गीतांमध्ये अर्थपूर्ण गीतांच्या विभागांतर्गत ऋतुसंबंधीची गाणी, पशुपक्ष्याची गाणी आणि चांदोबाविषयक गाणी असे आणखी काही उपविभाग करता येतील. निरर्थक शब्दरचनात्मक गीतांमध्ये कित्येकदा या सर्वांची खिचडी झालेली आढळते. अर्थपूर्ण शब्दरचना असलेल्या गीतांमध्येही या सर्वांचे कांटेकोरपणे वर्गीकरण करणे कित्येकदा कठीण होते. तरी पण मुख्यार्थ लक्षात घेऊन असे विभाग करता येतात. त्या सर्वांचे आता थोडक्यात विवेचन करू या.

बाळाच्या जन्मोत्सवाप्रसंगी त्याचे व त्याला जन्म देणाऱ्या पुत्रवती मातेचे कौतुक करणारी असंख्य लोकगीते उत्तर भारतात सर्वत्र गायिली जातात. अशा लोकगीतांना हिंदीमध्ये 'सोहोर' म्हणतात. या गाण्यांमधून वांझ स्त्री, गर्भवती स्त्री, तिचे डोहाळे, प्रसूती, बाळंतिणीचे कोडकौतुक इत्यादि विषयांबरोबरच बाळाच्या आगमनामुळे साजऱ्या होणाऱ्या उत्सवाचे, त्याप्रसंगी आनंदाने सर्वांना देण्यात येणाऱ्या भेटीचे आणि मातेला होणाऱ्या अपार आनंदाचेही वर्णन आढळते. उदाहरणार्थ, एका निमाडी लोकगीतात म्हटलेले आहे—'आज माझ्या घरी साक्षात् मदनाचा अवतार अशा मुलाने जन्म घेतला आहे. मी उपाध्या-यांच्या घरी ही मंगल बातमी कळविते. ते लगेच पोथी व पुराणे घेऊन आमच्या

घरी येतील. माझा बाळ पोथी वाचील आणि पुराणे त्याचे वडील वाचून दाखवतील. मी सोनाराकडे मिठाई पाठविते. तो माझ्या घरी सोन्याचे कडे आणि तोडे घेऊन येईल. तोडे बाळाच्या पायात घालू आणि कडे त्याच्या वडिलांच्या हातात घातले जाईल. मी चाट्याला निरोप पाठविते. तो साडी आणि उपरणे घेऊन येईल. साडी बाळाची आई नेसेल आणि उपरणे बाळाच्या वडिलांना शोभून दिसेल. मी शिंप्याकडे मिठाई पाठविते. तो आंगडेटोपडे घेऊन येईल. आंगडे बाळाला घालू आणि टोपी बाळाच्या भावाला शोभून दिसेल. मी माझ्या भावाकडे मिठाई पाठविते. तो पिवळी चुंदडी आणि मिठाई घेऊन येईल. पिवळी चुंदडी बाळाची आई परिधान करील आणि पगडी बाळाचे वडील घालतील.' गीताच्या अखेरीस माता म्हणते. 'आज मी सर्वांनाच मिठाई वाटीन. कारण आज माझ्या घरी मदनासारख्या सुंदर बाळाने जन्म घेतला आहे.'

एका गुजराती लोकगीतात जन्मोत्सवाचे वर्णन आहे—'अं अं करीत बाळ मुठी चोखत आहे. नगरीचे सर्व लोक त्याला पाहण्यासाठी येत आहेत. कोणी कपडेलत्ते आणले आहेत, कोणी दागदागिने आणले आहेत, कोणी मेवा-मिठाई आणली आहे, तर कोणी खेळणी आणली आहेत.'

नंदाच्या घरच्या पुत्रजन्मोत्सवाचे वर्णनही कित्येक लोकगीतातून आढळते. कांगडा प्रदेशातील एक लोकगीत आहे—

*"घर बसुदेव दे जम्मेया पुत्तर, जसोदा पलंगे चढ़ी ।*
*नंद करदा है गऊँ आँ दे दान, सुन्ने दे सिंग मढ़ी*
*भट्ट ब्राह्मण दिन्दे ने सीसां, जीए साड्डा कृष्ण हरी*
*ओ ताँ आन बृज दिआँ नाराँ, सोलह शिंगार करी*
*ओ ताँ गाँदिआँ मंगलाचार, जीए साड्डा श्याम हरी*
*घर बसुदेव दे जम्मेया पुत्तर...........*
*नंद करदा है मोतियाँ दे दान, थाल कटोर भरी ।*
*भट्ट ब्राह्मण दिन्दे ने सीसां, जीए साड्डा कृष्ण हरी*
*ओ ताँ आन बृज दिआँ नाराँ, सोलह शिंगार करी*
*ओ ताँ गाँदिआँ मंगलाचार, जीए साड्डा श्याम हरी*
*घर बसुदेव दे जम्मेया पुत्तर...........*

—वसुदेवाघरी पुत्रजन्म झाला आहे. यशोदा पलंगावर बसली आहे. सोन्याने शिंगे मढविलेली गाय नंदाने दान दिली. विद्वान ब्राह्मणांनी कृष्णास शतायुषी होण्याचा आशीर्वाद दिला. सोळा शृंगार करून व्रज भूमीतील स्त्रिया आल्या. त्यांनी मंगलगीते गायिली, 'कृष्णा चिरायु हो.' नंदाने ताट वाट्या भरून मोत्यांचे दान दिले. ब्राह्मणांनी आशीर्वाद दिले, 'कृष्ण बाळा शतायुषी हो.' व्रज भूमीतील स्त्रिया सोळा शृंगार करून आल्या. त्यानी मंगलगाणी म्हटली. श्रीहरी बाळ चिरायु हो. वसुदेवाघरी पुत्रजन्म झाला आहे.

एका माळवी लोकगीतातही कृष्णजन्ममहोत्सवाचे वर्णन आढळते ते असे—"गायीच्या शेणाने आंगण सारवून काढा. मोत्यांनी रांगोळी काढा. त्यावर कुंभकलश ठेवा. आज मंगल दिवस आहे. आमच्या घरी महोत्सव आहे. गोकुळातील उपाध्यायाला बोलवा. बाळाचे नाव काय ठेवायचे ते विचारा. बाळाचे नाव कन्हैया, कृष्ण कन्हैया ठेवा. धरणीचा उद्धार करणारा, प्रजेचे पालन करणारा कृष्ण आज आमच्या घरी जन्मला आहे. आज आमच्या घरी महोत्सव आहे."

नंदाच्या घरच्या पुत्रजन्मोत्सवाचे वर्णन करणारी अशी लोकगीते बहुतेक सर्व प्रांतामधून आढळतात. मराठीतही अशी गाणी बरीच आहेत. प्रत्येक मातेला आपला बाळ कृष्णासारखा वाटतो. कृष्णाने देवकीला बंदिवासातून सोडविले, आईवडिलांचे आणि इतर सर्वांचे दुःख हरण केले, तद्वत् बाळामुळे आपले वांझपणाचे दुःख संपले, जीवन सफल झाले या भावनेतून ही कृष्णजन्माची गीते निर्माण झाली. स्त्रीने आपल्यासारखेच देवादिकांना कल्पिले. त्यामुळे स्वतःला देवकी, यशोदा कल्पून आपल्या बाळाला कन्हैया मानून तिने यशोदेच्या तन्मयतेने आनंदाने ही गाणी म्हटली.

पुत्रजन्मोत्सवाच्या गाण्यांमध्ये दशरथाला पुत्र झाल्याच्या महोत्सवाचे वर्णनही आढळते. पण त्याचबरोबर लवांकुशाच्या जन्माचे करुण वर्णनही आढळते—

*'सीताबाई बाळंतीन तिला बाळंत्याची वान*
*अंकुश ग बाळावरी झाकी पळसाचं पान*
*सीता वनवासी केली दगडाची सेज*
*म्हणे ग राजसाला अंकुश बाळा नीज'*

अरण्यात प्रसूत झालेली सीता म्हणते—

*'तुम पूत भयेहु बिपतिमें, वहुतै सांसतिमें,*
*पूत, कुसै ओढ़न कुस डासन वन फल भोजन ॥*
*जो पूत होते अयोध्याभें, वही पुर पाटन,*
*राजा दशरथ पटना लुटौतें, कौसल्या रानी अभरन ॥*

—'बाळांनो, कशा आपत्तिकालात तुमचा जन्म झाला आहे. अरेरे, दर्भाचे आंथरुण तुम्हाला मिळाले आहे. दर्भाचेच पांघरुण मिळाले आहे. आणि खायला अरण्यातील फळे मिळाली आहेत. अयोध्येत जर तुमचा जन्म झाला असता तर दशरथराजाने आनंदाने नगरी लुटविली असती. कौसल्याराणीने आपले सर्व दागदागिने लुटविले असते.'

पण सीताबाईच्या बाळंतपणाचे करुण वर्णन करणाऱ्या गीतांपेक्षा पुत्र-जन्माच्या आनंदाचे वर्णन करणारी गीते सर्वत्र मोठ्या प्रमाणावर गायिली जातात. नात्यातील व परिचयातील स्त्रिया एकत्र जमून ही गाणी गातात. एकप्रकारे तो सामूहिक उत्सवच असतो. या बाबतीत रवीन्द्रनाथ टागोरांनी म्हटले आहे—"जन्मोत्सवापासून श्राद्धानुष्ठानापर्यंत कोणत्याही घटनेस आम्ही वैयक्तिक, खाजगी घटनेच्या मर्यादित सीमारेषांमध्ये बांधून ठेवले नाही. या सर्व उत्सवांमध्ये आम्ही क्षुद्रपणाला अजिबात थारा देत नाही. त्या दिवशी आमच्या घरची दारे सर्वांना खुली होतात. फक्त आत्मीय स्वजनांसाठीच नव्हे, फक्त नातेवाईकांसाठीच नव्हे तर अनोळखी आगांतुकासाठीही आमची दारे खुली होतात. आमच्या घरी जन्मास येणारा बाळ फक्त आमच्याच घरी जन्म घेत नसून समस्त मानवाच्या घरी जन्म घेत असतो. अवघ्या मानवजातीच्या थोरपणाचा वारसा घेऊन तो जन्म घेत असतो. असे असताना, त्याच्या जन्म-मांगल्याच्या आनंदात भाग घेण्यासाठी आम्ही सर्वांना बोलावणार नाही हे कसे शक्य आहे? बाळाने कोणा एका व्यक्तीच्या घरी फक्त जन्म घेतला तर त्याच्यासारखा दुर्दैवी कोणीही नसणार. सर्व मानवजातीने त्याच्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, भाषा, ज्ञान आणि धर्म तयार करून ठेवलेले आहे. मानवात असलेल्या नित्यचेतन, मंगलशक्तीच्या कुशीत जन्म घेऊन धन्य होणाऱ्याच्या जन्मदिनी जर घरची सर्व दारे खुली करून आम्ही मानवजातीचे स्मरण केले

नाही तर मग पुन्हा केव्हा करणार? अन्य समाजाने ज्यास घरातील खाजगी घटना मानले त्यास भारतीय समाजाने विश्व-घटना मानले." आणि याच कारणास्तव लोकगीतातून विनंती केलेली आढळते—'मामंजी, उठा. पुरून ठेवलेले धन बाहेर काढा आणि सर्वांना वाटा. भावोजी, सर्वांना वस्त्रे द्या. अवघ्या नगरीत वाद्ये वाजवा.' उत्सव फक्त एका घरातच नव्हे तर सर्व गावात साजरा होऊ देत. सर्वांना आनंद होऊ देत. बाळाचा जन्म ही इतकी मोठी महत्त्वाची घटना आहे. तो महद्‌भाग्याचा प्रसंग आहे! त्यासाठी "अंगणात गणपती आले आहेत. जन्म देण्यास ब्रह्मदेव व त्यांच्या पाठोपाठ सावित्री आली आहे. पालन करण्यास श्रीविष्णु आणि लक्ष्मीआई आलेली आहे. राम, सीता आणि त्यांच्या पाठोपाठ लक्ष्मण आले आहेत. पार्वतीसवे महादेव नंदीवर स्वार होऊन आले आहेत. वीणावादन करीत नारद देखील आले आहेत." मानवानेच नव्हे तर प्रत्यक्ष देवांनी भाग घ्यावा इतका हा मंगल पावन प्रसंग आहे.

पण हे सर्व बाळराजाच्या आगमनाने होते, बाळीच्या नव्हे! आणि भारतीय संस्कृतीतील हे कटु सत्य, लेकापेक्षा लेकीला उणे लेखण्याची प्रथा, लोकगीतातूनही व्यक्त झालेली आढळते. महाराष्ट्रात मुलाप्रमाणेच मुलीचेही बारसे करतात आणि त्या निमित्ताने कन्यारत्नाचेही कौतुक होते. मैनाराणीस शंभर नंबरी सोने, खडीसाखरेचा खडा, तुपाची फुलवात, इ० म्हटलेले आढळते. आईला थाळ्याशेजारी वाटीची वाटणारी हौस व्यक्त झालेली आढळते. लेकीचे सुंदरसे नाव ठेवण्याचा तिचा उत्साह शब्दरूपाने व्यक्त झालेला आहे. त्याचबरोबर मुलगी झाली म्हणून एखादी माता जर मनातून खिन्न झाली तर जमलेल्या मायबहिणींनी 'खाली मान घालू नकोस, कन्यादानाचे पुण्य लाभेल' 'हिरा नसला तरी हिरकणी तर आहे?' असे म्हणून तिची समजूत घातल्याचेही आढळते. रुक्मिणीचा पाळणाही आढळतो. त्यातून भीमक राजाला झालेल्या आनंदाचेही वर्णन आलेले आहे.

पण हा समजूतदारपणा अन्यप्रांतीय लोकगीतातून फारसा आढळत नाही. लेकीच्या जन्माच्या प्रसंगी महोत्सव नाही. त्यामुळे त्याची गाणीही नाहीत. उलट कन्येबद्दल वाटणारी उपेक्षावृत्ती मात्र व्यक्त झालेली आढळते. कन्या झाली म्हणून, मातेला वाटणारी पिवळ्या चुंदडीची हौस तिचा पती पुरवीत नाही; तर एका रमणीला कन्या झाली म्हणून तिचा पती तिला माहेरी घालवून

देतो अशी वर्णने लोकगीतातून आढळतात. एका भोजपुरी लोकगीतात वर्णन आहे :—

*“जइसन कासीमें सिव हवे नरलोक पूजेला रे ।*
*ओइसन पूजेले हमरो हरि जी, त बबुआ का जनल नु रे ।*
*साल ओढन साल डासन, मेवा फल भोजन रे ।*
*ए ललना चननके जरेला पँसगिया, निनरि भल आवेला रे ।*

—काशीचे लोक ज्याप्रमाणे शिवाची पूजा करतात त्याप्रमाणे मला पुत्र झाला म्हणजे माझे पती माझी पूजा करतात. शाल पांघरायला मिळते आणि आंथरायला-सुद्धा शाल मिळते. मेवामिठाई, फळफळावळ जेवायला मिळते. धुपाऱ्यासाठी चंदन जाळला जातो आणि त्यामुळे छानशी झोप येते. विश्रांती मिळते.

पण तीच जर कन्या झाली तर मात्र :—

*“जइसन दहेमें के पुरइनि दहे बिचे काँपेले रे ।*
*ए ललना ओइसन काँपेले हमरो हरि जी,*
*धिया कारे जनम नु रे ॥*
*कुस ओढ़न कुस डासन, बन फल भोजन ।*
*ए ललना खुखुड़ी के जरेल पँसगिया,*
*निनरियो ना आवेला रे ॥”*

—“कन्येच्या जन्माच्या भीतीने माझे पती तलावातील पान ज्याप्रमाणे हलते त्याप्रमाणे थरथर कापतात ! आणि कन्या झाली तर आंथरापांघरायला गवत देतात ! ! जंगलातील फळे खायला देतात, रद्दी लाकूड धुपाऱ्यासाठी देतात. त्यामुळे नीट झोप येत नाही.”

बाळ आणि बाळी यातील हा फरक उत्तरभारतातील बहुतेक सर्व लोक-गीतातून विशेष आढळतो. आणि त्यास या बाजूला बहुप्रचलित असलेली दहेज प्रथा——हुंड्याची पद्धत——मुख्यत्त्वे कारणीभूत असावी असे मानावयास हरकत नाही. मुलीबद्दल ही उपेक्षावृत्ति असल्यामुळे मुलीच्या बाललीलांचे कौतुक जसे मराठीतून आढळते तसे हिंदी व हिंदीच्या सर्व उपबोली, राजस्थानी, पंजाबी,

कांगडी, गुजराती इत्यादि भाषांतील लोकगीतांमधून फारसे आढळत नाही. थोडेबहुत आढळलेच तर त्याचे स्वरूप असे असते :—

*"मत दो म्हाँ री बाअी नै गाळ*
*म्हाँ री बाई चिड़ोकली जी चिड़ोकली*
*आ आज उड़ै परभात*
*तड़कलै उड़ ज्यासी जी उड़ ज्यासी*
*सावणिये रां दिनड़ा च्यार*
*अँवायीड़ो ले ज्यासी जी ले ज्यासी."*

—"माझ्या बाईला कोणी शिवी देऊ नका. ती काय चिमणी आहे. आज नाहीतर उद्या उडून जाणार आहे. चार दिवसांचा श्रावण आहे. खेळते आहे तोवर खेळू द्या. मग काय जावई तिला घेऊन जाईल."

दुसऱ्या एका लोकगीतात मुलीला चंद्राची उपमा देऊन म्हटलेले आहे—

*बाई ए तू चांदसी*
*कोई सुभाग्यो मांगसी*
*बाई एं तू चन्दणकी*
*मण सोनै मण रूपैकी*
*खीर भरी कचोळीसी*
*ओर घण मोल्यै मोत्यांसी*
*कोई सुभाग्यो मांगसी*

—"बाळे, तूं चंद्रासारखी आहेस. कोणी नशीबवान व्यक्ति तुला घेऊन जाईल. तूं चंदनाची आहेस, मणभर सोन्याची आहेस, मणभर रुप्याची आहेस, खिरीने भरलेल्या पेल्यासारखी आहेस, बहुमूल्य मोत्यांसारखी आहेस. कोणी नशीबवान व्यक्ती येऊन तुला घेऊन जाईल.

येथे लेकीचे कौतुक आहे पण कन्या ही परक्याचे धन असल्याची जाणीवही व्यक्त केल्याचे आढळते.

बाळराजविषयक लोकगीतांचा दुसरा विभाग बाळाला झोपविण्यासाठी गायिल्या जाणाऱ्या अंगाई गीतांचा आहे. याला हिंदीमध्ये 'लोरी' असे म्हटलेले

आढळते. मराठीतील काही पाळणे, काही राजस्थानी हालरे, काही गुजराती 'हालरडां' हे देखील या विभागात घालता येतात. लहानग्या बाळाचे नादमाधुर्या-कडे लक्ष वेधून तदनुषंगाने एक प्रकारची तल्लीनता आणून बाळाला झोपविण्या-साठी ही गाणी गातात. यांची चाल साधीसुधी असते आणि शब्दरचना कित्येकदा निरर्थक असते. यमक व अनुप्रास साधण्यासाठी केलेली असते. त्यामुळे गीताला फारसा अर्थ नसतो. उदाहरणार्थ एका गीतामध्ये वर्णन आहे– "बाळा नीज. बाळाची आई पाण्याला गेली. जाताना घरात कुत्रे कोंडून गेली. कुत्री होळीवर भुंकतील आणि बाळ झोळीत निजेल. चिऊताई धावतपळत ये. बाळ पांघरुण घेऊन निजणार आहे. चिऊताई परातीत ये. बाळ लग्नाच्या वऱ्हाडात जाणार आहे. चिऊताई ये. मी तुझे लगीन लावून देते. कथीलाची आंगठी आणि हार तुला देते. बाजरीची खिचडी आणि मसुराची आमटी देखील देईन. ये चिऊताई. तुझे लग्न लावून देते. झोप बाळा झोप."

या गीतातील शब्दांना अर्थ असला तरी गाण्यात सुसंबद्धता नाही. कुत्र्याला कोंडून जाण्याचा, होळीवर त्याच्या भुंकण्याचा, चिऊताईच्या लग्नाचा बाळाच्या झोपेसाठी अर्थाअर्थी काही संबंध नाही. मध्येच आपले झोप बाळा झोप म्हणून, बाकी सुचतील तशा ओळी त्याला जोडून टाकलेल्या आहेत.

या उलट काही अंगाईगीते मात्र खरोखरीच अर्थदृष्ट्याही उल्लेखनीय आढळतात. एक बंगाली अंगाईगीत आहे—

*घुमेर माशी घुमेर पिशी*
*मोदेर बाडी एशो*
*खाट नाई पालंग नाई*
*चोक पेते बोशो.*
*बाटा भर पान दिबो*
*गाल भोरे खाओ*
*खोकार चोके घूम नाई*
*घूम दिये जाओ.*

—झोपेची मावशी, झोपेची आत्या, माझ्या घरी या पण तुमच्यासाठी माझ्याकडे खाट नाही, पलंग नाही. तेव्हा तुम्ही डोळ्यांमध्ये बसा. तबक भरून मी तुम्हाला

विडे देईन. तोंड भरून तुम्ही खा. आणि बाळाच्या डोळ्यांमध्ये झोप नाही, ती झोप तुम्ही देऊन जा.

गाणे ऐकताच मी चमकले. किती सुंदर कल्पना आहे यात!

आणखी एका बंगाली गीतात म्हटलेले आहे—'बाळा झोप. वृक्षांची पाने झोपी गेली. बाजार रस्ते सर्व निद्राधीन झाले आहेत. सर्वत्र झोपेचे अधिराज्य पसरलेले आहे. तूही झोप बाळा.'

सात्ररा जातीच्या एका लोकगीतातही असाच आशय आलेला आहे. त्यात म्हटलेले आहे—'हवा आणि पाणी दोरी हालवीत राहते—हालवीत राहते आणि तरीही दिवसभराच्या कामाने दमलेले तिचे हात दुखत नाहीत. डेरागाझिखान, शिकारपुरच्या बाजूची एक मुलतानी माता गात असताना मी ऐकले आहे—

*अड्डा तेरा पंगुडा*
*वट पावाँ लईं*
*देवा झूटाँ*
*तो थक ना मेरा वईं*

(तुझ्या पाळण्याची दोरी कितीही हालविली तरी माझे हात दुखत नाहीत.)

*लो लोरी अला लोली*
*वइयां घोली*

असे म्हणून बाळावरून सर्व काही ओवाळून टाकण्याची मनीषा ती व्यक्त करते.

अशा अंगाईगीतांखेरीज बाळाला पाळण्यात घालून गायिली जाणारी पाळण्याची गीते—राजस्थानी 'हालरा,' गुजराती 'हालरडां,' हिंदी 'लोरीं'—देखील असंख्य आहेत. या गीतांमधून बाळाचे कौतुक अधिक आढळते. त्याच्यासाठी आणलेल्या अलौकिक, वस्तूंचे, त्याला कोणकोण खेळवील याचे वर्णन बहुधा आढळते. उदाहरणार्थ, एक राजस्थानी गीत आहे—

*"ऊँचो घालूँ पालणो कै जळ जमनाकै तीर*
*आवतड़ा सा जावतड़ा गीगै नै दादो झोटा दे*
*दादी गोद खिलासी जी*
*हुलर गीगा हुलर*

*तू दूध पतासा पी*
*तेरै सोनैको झूंझणियो*
*रूपैको मादळियो*
*रेसमकी डोर*
*तेरै आगे नाचै मोर."*

—यमुनेचे पाणी वहात आहे. बाळाचा पाळणा मी उंचावर बांधीन. बाळाचे आजोबा येताजाता त्याला झोके देतील. सारे झोपी गेले आहेत. बाळा तू झोप. मधमाशा आणि भ्रमर झोपले आहेत. कृमीकीटक सर्व झोपी गेले आहेत. पतंग-देखील झोपले आहेत. बाळा तूही नीज."

कित्येकदा या अंगाई गीतांमधून निद्रादेवीला हाक मारलेली असते—

*आ जा री निंद निंदीकी रानी*
*सोनेको रोवे मुन्ना राजा ।*

आणि निद्रादेवी उत्तरते—

*आती हूँ बीबी आती हूँ बीबी*
*दो चार बच्चोंको सुलाके आती.*

निद्रादेवी चार दोन मुलांना झोपवून येत आहे. पण तिला सांगितले जाते की—

*"नींदरडी तुं आवे जो*
*मारा बचु ते भाई सारू लावे जो–नींदरडी०*
*तुं पेंडा पतासा लावे जो*
*मारा बचु ते भाई सारु लावे जो–नींदरडी०*
*तुं खारेक टोपरुं लावे जो*
*मारा बचु ते भाई सारु लावे जो–नींदरडी०*
*तुं बदाम मिसरी लावे जो*
*मारा बचु ते भाई सारु लावे जो–नींदरडी०*

—निद्रादेवी, येताना बाळाला आवडणारे पेढे, बत्ताशे, खारीक, खोबरे, बदाम, खडीसाखर सारे काही घेऊन ये.

कित्येकदा या अंगाईगीतांमधून बाळाच्या पाळण्याचेही वर्णन आढळते.

एका काश्मिरी लोकगीतात आपला बाळ दीर्घायुषी असल्याची कल्पना मातेने मोठ्या सूचकतेने मांडलेली आढळते. श्रीनगरच्या बाजूला मला हा पाळणा मिळाला तो असा—

*छ़नथ रोन्य मंजलिस*
*करयि गूर गूर*
*शान्द दिमय शान्द गोंड*
*मख़मलच् वूर*
*छ़नथ रोन्य मंजलिस*
*करयि गूर गूर*
*मोल चोन यन्दराज*
*मअज़् यम्बरज्वल*
*लेफ छय वुरन्यतय*
*अतलासच् वूर*
*छ़नथ रोन्य मंजलिस*
*करयि गूर गूर*
*निकलाल ज्यायव अड—रातस्*
*ज़ातुक ल्यूख़नस भगवानन्*
*जातकस वुछमय छय उंबर पूर*
*छ़नथ रोन्य मंजलिस*
*करयि गूर गूर*

—लाडक्या राजस बाळा, मी तुला झणकार करीत असलेल्या पाळण्यात झुलवीन. तुझ्या उशाशी मी मखमली अभ्रा असलेली उशी ठेवीन. तुझे वडील इंद्रराज आहेत आणि आई 'यम्बरज्वल' (विशिष्ट जातीचे पवित्र फूल) आहे. तू पांघरलेल्या रजईच्या अभ्यावर सोनेरी तारांचा कशीदा केलेला आहे.

लाडक्या बाळा, तू मध्यरात्री जन्मला होतास. तुझी जन्मपत्रिका स्वतः देवाने (विधात्याने) लिहिली आहे. मी ती जन्मकुंडली पाहिली आहे. तू खूप दीर्घायुषी होणार आहेस.

देवाने स्वतः जन्मपत्रिका लिहिली आहे आणि मातेने ती वाचली आहे. किती भोळीभाबडी असली तरीही ही कल्पना किती रम्य आहे!

बाळराजाच्या या गाण्यांमधून मखमली गाद्यागिरद्यांची, हिऱ्यामोत्यांची, सोन्यारुप्याची रेलचेल आढळते. बाळाला राजाचे लेक खेळवितात, बाळ म्हणजे भोज राजा आहे आणि त्याच्या दाराशी हत्तीघोड्यांची फौजच फौज उभी आहे अशा वैभवपूर्ण कल्पना आढळतात. बाळाच्या नातेवाईकांची थट्टाही केलेली आढळते. 'बाळाच्या टोपीला फुलांची जाळी, नि बाळाची मामी आहे काळी' अशा सयमक ओळी मध्ये मध्ये घालून बाळाची आई, बाळाच्या मावशीची, कधी आत्येची, कधी चुलतीची, कधी वहिनीची तर कधी बाळाच्या प्रत्यक्षात नसलेल्या सासूचीही थट्टा करते.

बाळ फार किरकिर करू लागला किंवा फार वेळ झोपून राहिला तर मातेच्या मनाची घालमेल होते आणि तिच्या मनात पहिली शंका येते ती म्हणजे—

*कोण्या पापिणीची दृष्ट गेली पाळण्यावरूनी*
*बाळ राजस कोमेजला खेळ खेळता अंगणी*

आणि मग ती दृष्ट उतरण्यासाठी मीठमोहऱ्या बाळावरून ओवाळून टाकते. दृष्ट लागण्याची व मीठमिरच्यांनी ती उतरण्याची कल्पना महाराष्ट्राप्रमाणेच अन्य प्रांतातूनही आढळते. उत्तरेकडील एक हिंदी गीत आहे—

*झुला दो मैया स्याम परे पलना।*
*काहू गुजरियाकी नजर लगी है*
*उलक बुलक दूध डारें*
*राई नोन उतारौ जसुदा खुसी भए ललना॥*

बाळ दूध ओकून टाकत आहे. कोणा गवळणीची दृष्ट लागली कोणास ठाऊक? यशोदेने मीठमोहऱ्या ओवाळून टाकल्या आणि बाळ हसूखेळू लागला.

एका गुजराती मातेला आपला बाळ बराच वेळ झोपलेला पाहून हीच शंका आली—

*"बाई रे पाडोशण बेनड़ी*
*ने हजी नो जागे बाळ, बाळा जागो ने*
*बाई तारुं बाळक बीनुं छे*
*ने लावो उतारीए लूण, बाळा जागो ने"*

—'शेजी बहीणाई, बघ तर खूप वेळ झाला तरी बाळ झोपून राहिला आहे. जागा होत नाही.' 'बाई ग तुझे बाळ भ्यालेले आहे. त्याच्यावरून मीठ ओवाळून टाकू या.'

एका राजस्थानी लोकगीतातही वर्णन आहे—

*"लाला ने लेर बारण सूती*
*कणीक नजर लगाई कपूती।*
*हीं कुण अशी रांड अणूती*
*जणी मार्यो नजर रो बाण॥"*

(बाळाला घेऊन बाहेर निजले होते. कोण्या मेल्या वांझोटीने दृष्ट लावली कुणास ठाऊक!) गीतात पुढे सात मिरच्या व मिठाचे सात खडे घेऊन ते बाळावरून ओवाळून टाकल्याचे वर्णन आहे.

पाळण्याच्या गीतांमधून बाळाचे कौतुक आणि वात्सल्यभावनाच फक्त आढळते असे नाही, तर क्वचित वीररसात्मक भावनाही आढळते. पठाण जातीची एक आई आपल्या रडणाऱ्या बाळाला समजावते—"बाळा रडू नको. उगी. तू असा रडलास तर तुझे मित्र तुला भित्रा समजतील. उगी बाळा. तू आता झोप. आज तुला झोप घेता येईल. पण पुढे मग झोपायला मिळणार नाही. तुला रणांगणावर जावे लागेल. मग झोप कुठली? तेव्हा आज झोप. रडू नको." ही माता बाळाला झोपवीत आहे. पुढील काळात जागृत राहण्यासाठी झोपवीत आहे. तर इराणची एक माता झोपलेल्या बाळाला जागे करताना गात आहे.—"बाळा खूप झोप झाली, आता ऊठ. तुझे वडील लढाईत मारले गेले आहेत. त्यांची जागा त्यांनी तुला दिली आहे. तू म्हणजे तुझ्या

वडिलांची स्मृति आहेस. त्यांची तलवार मी तुझ्या कमरेला बांधीन. ऊठ. आईचे दूध लाजवू नकोस...." असे वीररसात्मक पाळणे राजस्थानातही असले पाहिजेत. कारण राजस्थानच्या पाळण्यांबद्दल म्हटलेले आहे—

*इळा न देणी आपरी, हालरियै हुलराय*
*पूत सिखावै पालणै मरण बड़ाई माय*

—पाळण्याला झोके देता देता, आपली मातृभूमि दुसऱ्याला देऊ नये अशी मृत्यूच्या महत्तेची शिकवण माता बाळाला पाळण्यातच देते!

असे पाळणे अजून संकलित मात्र झालेले नाहीत. महाभारतात दिलेल्या मदालसेच्या पाळण्यात वैराग्यभावना असल्याचे सर्वश्रुत आहेच. लोकगीतांमध्ये असा वैराग्यपर पाळणा माझ्या पाहण्यात आला नाही. पण एवढे मात्र आपण म्हणू शकतो की, पाळण्याच्या गीतांमधून फक्त वात्सल्यभावनाच असते असे नाही. मातेच्या मनात ज्या भावनेचे प्राबल्य असते ती देखील या गीतांमधून आढळते. आणि म्हणूनच इंग्रजीत म्हटलेले आहे—'The mother that rocks the cradle rules the world' पण असे वीररसात्मक वा वैराग्यपर पाळणे अगदीच बोटावर मोजण्याइतके आढळतील. बाळाला झुलविताना मातेच्या मनात कौतुकमिश्रित वात्सल्यभावनाच अधिक असते. शौर्य, वैराग्य इत्यादींवर वात्सल्याने विजय मिळविलेला असतो. त्यामुळे त्याचेच प्रतिबिंब पाळण्याच्या गीतांमधून उमटलेले अधिक आढळते.

पाळण्याच्या गीतांमधून नुसते कौतुक नव्हे तर कित्येकदा वास्तविक वर्णनही आढळते. या गीतातील माता बाळाला म्हणते—

*'येक घडी तु सूई जा रे भाई*
*मारे घरमां झाझां रे काम'*

--बाळा थोडा वेळ तरी झोप रे. घरात मला अजून कितीतरी काम आहे.

ही आई मग--

*'जेम तेम करीने बाळ सुवारीआं*
*'ने करवां घरना काम, बाळा पोढो ने'*

—कसेबसे असले काही गुणगुणून व करून बाळाला झोपविते आणि घरचे काम करते.

प्रत्यक्षात मातेची हीच इच्छा असते. बाळ थोडा वेळ झोपला तर घरची कामे उरकता येतात. म्हणून ती आंजारूनगोंजारून बाळाला झोपविण्याचा प्रयत्न करीत असते. कुमाऊंच्या बाजूला प्रचलित असलेल्या एका पाळण्यामध्ये असेच वास्तववादी वर्णन आढळले. बाळाची आई जंगलातून गवताचा भारा आणावयास गेलेली आहे. अशा वेळी बाळाला खेळविणारी घरातील अन्य महिला त्याला समजावते—"बाळा, तू पाळण्यात झुलत रहा, पूर्व दिशेला सूर्याचा मंद मंद पिवळा प्रकाश पसरलेला आहे. पश्चिमेकडील वारा वहात आहे. तू झुलत रहा. तुझी आई जंगलात गवताचा भारा आणावयास गेलेली आहे. बाळा, तुझ्यासाठी ती आपल्या स्तनांमध्ये दूध भरून आणील. चिमणी धरून आणील. तू स्तन तोंडात धरून दुग्धपान करशील आणि चिमणीशी खेळशील तू पाळण्याचा दांडा तोडशील आणि कापडाची झोळी फाडशील." (कल्पना अशी आहे की, झोके देत असताना स्वतः बाळही हालचाल करून पाळण्याची गती वाढवितो आणि पाळणा इतक्या जोरात हलू लागतो की त्यामुळे पाळणाच मोडण्याची भीती निर्माण होते.) साधेसुधेच पण सुरेख असे हे वर्णन आहे. कामावर गेलेली आई स्तनांमध्ये दूध भरून आणणार आहे. आणि खेळण्यासाठी चिमणी पण धरून आणणार आहे. गीतातील ही सहजता, अनुभवाची प्रामाणिक अभिव्यक्ती—यांच्यामुळेच तर ही लोकगीते कायम स्मरणात राहतात!

रामाला व कृष्णाला गायियेले पाळणेही महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रप्रमाणेच अन्य प्रांतातूनही विपुल आढळतात. या सर्व पाळण्यांचा विषय समान आहे. कृष्णाच्या पाळण्यातून चिमुकल्या कृष्णाच्या सावळ्या रूपाचे वर्णन, यशोदेच्या घरचे वैभव, कृष्णाचा रत्नजडित पाळणा, नंदाच्या घरचा उत्सव, गौळणींची धांदल इत्यादींचे वर्णन आहे. आणि रामाच्या पाळण्यामधून दशरथाने कोणाकोणाला काय काय भेटी दिल्या, किती दानधर्म केला, आपला खजिना कसा रिकामा केला, अयोध्येत उत्सव कसा साजरा झाला, रामाच्या पाळण्याची व आंथरुणाची कशी वैभवशाली व्यवस्था असते याचे वर्णन आढळते. रामकृष्णांच्या पाळण्या-खेरीज गुजरातीमध्ये अनसूयाचा एक पाळणा आहे. कै. झवेरचंद मेघाणी यांनी तो दिलेला आहे. नेहमीच्या पाळण्यापेक्षा वेगळा असा हा पाळणा असून

अनसूयेची पौराणिक कथा त्यात सांगितलेली आहे. ती अशी—'अनसूया माता मुलांना पाळण्यात झुलवीत आहे. तिघे देव सत्त्वहरणासाठी आले. त्यांनी भिक्षा मागितली. अनसूयेने त्यांना बालरूप देऊन भिक्षा घातली, दूध पाजले आणि मग पालख पाळणा घडवून तो आंब्याच्या फांदीला बांधला. यात तिघा अतिथींना निजविले. सतीने पाळण्याची दोरी हाती घेतली आणि ती पाळणा गाऊ लागली.—माझ्या काळ्या गोऱ्या कन्हैया बाळांनो, तुमच्या नावांवरून मी प्राणांची कुरवंडी करते. ब्रह्मा, विष्णु, महेश बाळांनो झोपा. देवाने मला ही बालके दिली. किती आनंद आहे. काका, मामा, मावशी माझ्या बाळाच्यासंगे बोला बघू. जो कोणी बाळाशी बोलेल त्याला फुलांचा हार देईन. तिघी सती मातेपाशी आल्या. आमचे पती द्या म्हणू लागल्या. अनसूया माता बोलली—सतींनो, तुम्ही तुमचे पती ओळखून घ्या बघू.

पाळण्याची गीते असंख्य आहेत. त्याचप्रमाणे बाळाला खेळविण्यासाठी गायिलेली गाणीदेखील अगणित आहेत. बाळ जसजसा मोठा होत जातो तसतसे त्यास वेगवेगळ्या तऱ्हेने घरची मंडळी खेळवितात.. बाळ जरा हसू लागला, त्याला गुदगुल्या होऊ लागल्या की 'इथे इथे नाच रे मोरा' खेळवताना करतात त्याप्रमाणे त्यांचा तळहात धरून त्यावर आपले बोट फिरवीत गातात :—

*आटे बाटे*
*गोल पराखे*
*मुन्नाकी सासूको*
*ले गये चोट्टे*
*दाना खाया*
*पानी पिया*
*ढूँढो भई, ढूंढो भई*

आणि त्यानंतर दोन बोटांना बाळाच्या हातावरून चालवीत त्याच्या काखेपर्यंत नेऊन 'पा गई, पा गई, पा गईं' (सापडली रे सांपडली) असे म्हणून बाळाला गुदगुल्या करतात. लहान मुलांना खेळविण्याची ही प्रथा उत्तरेकडे सर्वत्र आढळते. त्यामुळे हेच बालगीत वेगवेगळ्या स्वरूपात आढळते. राजस्थानात गातात ते गीत असे—

*आलिया गोलिया*
*दही कचोळिया*
*दुधा मीठा पीई जा*

यानंतर बाळाच्या उघड्या तळहाताचे एकेक बोट मिटत म्हणतात—ही बाळाची, ही बाळाच्या आईची, ही बाळाच्या बाबांची, ही बाळाच्या ताईची, ही बाळाच्या आत्येची—अशा तऱ्हेने पाचही बोटे मिटून मूठ बंद झाली की वर सांगितल्याप्रमाणे दोन बोटे हातावरून काखेपर्यंत चालवीत म्हणतात—

*धोळी गाय पीळो बाछो*
*खूंटो तोडकै भाग म्यो*
*ढूँढो भई, ढूँढो भई*
*यो रह्यो, यो रह्यो, यो रह्यो*

बाळ जरा पाय टेकवून उभा राहू लागला की त्याचे दोन्ही हात धरून त्याला हलकेच घुसळल्यासारखे करतात. त्यावेळी म्हणतात—

*सावळ्या रामाच्या ढवळ्या गायी हो*
*घुसळण घुसळी रखमाई हो*
*अजून ताक झालंच नाही हो*
*अजून लोणी आलंच नाही हो*
*आता वा येईल तुकोबा वाणी हो*
*मग खा बाळा साखर लोणी हो*

बाळाला अशा तऱ्हेने खेळविण्याची पद्धत महाराष्ट्राप्रमाणेच गुजराथ, राजस्थान आणि उत्तर भारतातही सर्वत्र आढळते. गुजराथमध्ये खेळवताना असे म्हणतात—

*आज मारो नानका नाच्यो नथी*
*कूद्यो नथी*
*कडयनी घूघरी वागी नथी*
*बटकुंक रोटलो टीपुं घी*
*नाच रे नानका रात ने दी*

—आज माझा बाळ नाचला नाही. त्याने उड्या मारल्या नाहीत. त्याच्या कमरेच्या साखळीचे घुंगरू वाजले नाहीत. घासभर पोळी, त्यावर थेंबभर तूप. नाच रे बाळा रात्रंदिन.

राजस्थानात गातात—

*झगर बिलोवणो*
*गादडीसी ब्याई*
*भैंसकी धिराणी*
*म्हार छा माँगण आई*
*आज तो कोनी तड्कै ले ज़्याई*
*परस्यूं कोनी पल्हारै दिन ले ज़्याई*

घुसळण घुसळत आहे. कोल्हीण व्याली. म्हशींची मालकीण माझ्याकडे ताक मागायला आली. आज नाही, उद्या घेऊन जा. परवाही नाही, त्याच्या पुढच्या दिवशी घेऊन जा.

हिंदीमध्ये म्हणतात—

घुम्मर घुम्मर दूध बिलोय
जाटनीचा छोरा रोवै
रोने दे भाई रोने दे
मुझे दूध बिलौने दे
घुरर घुर, घुरर घुर

असाच लहान मुलांना खेळविण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे 'डोल ग बाई डोलाची' खेळविताना करतात त्याप्रमाणे बाळाला दोन्ही पायांवर घेऊन पाय हलवीत त्याला डोलवायचे. त्यावेळी आई म्हणते—

*आंगशो मांगशो*
*किताक पोळ्या ?*
*एवढ्या पोळ्या*
*कोणाला दिल्या ?*

*आईला दिल्या*
*कोणाला दिल्या ?*
*ताईला दिल्या*
*किती राहिल्या ?*
*एवढ्या*
*तू खा बाळा तू खा*

किंवा

*इरिंग विरिंग लौंगा तिरिंग*
*डुग डुग बाजा*
*गाई गोपी उतरल्या राजा*

अशा गाण्यातील शब्दरचना अनुप्रासयुक्त, नादमधुर, आणि लयबद्ध असते. यापेक्षा अधिक अर्थ या गाण्यांना नसतो.

ही सर्व मुलांना खेळविताना इतरांनी गायिलेली गाणी झाली. याशिवाय स्वतः जी गाणी खेळताना गातात ती देखील सर्वत्र आहेत आणि असंख्य आहेत. महाराष्ट्रातील—

*आपडी थापडी गुळाची पापडी*
*धम्मक लाडू तेल पाडू*
*तेलंगीचं एकच पान*
*धर गे बिब्बे हाच कान*
*च्याऊं म्याऊं च्याऊं म्याऊं*
*पखालीचं पाणी पिऊं*

या खेळासारखे खेळ महाराष्ट्राबाहेरही आहेत. मथुरेच्या आसपास हा खेळ खेळताना गातात—

*घघरीके घपरा*
*फोरी खाए खपरा*

*मियाँ बुलाए*
*चमकत आये*
*पकरि बिलैयाको कान*
*चेऊं मेऊं चेऊं मेऊं*
*हुर्र बिलैया*

राजस्थानात गातात—

*अतनी पतनी पीपलिये रा पान*
*अपड़ साथण इणरो कान*

याशिवाय हुतूतू खेळताना गाण्याची प्रथा बहुतेक सर्व उत्तर भारतात आढळली. त्याची अनेक गाणी आहेत. कोठे मुले म्हणतात—

*आम छू आम छू कउडी बदाम छू*
*आम छू आम छू कउडी झनक छू*

तर कोठे मुले म्हणतात--

*आवीला आवीला खेल कबड्डी आवीला*
*तबला बजावीला*
*तबलामें पड़सा, लाल बगड़चा*
*लाल बगड़चा.*

कधी मुले खेळताना एकमेकांची थट्टाही करतात—

*खेल कबड्डी तारा*
*सुल्तान मैंने मारा*
*सुल्तान गया कासी*
*मडुम तेरी मासी.*

हुतूतू खेळताना गाण्याची ही गाणी इतकी आहेत की ती सर्व येथे देणे विस्तारभयास्तव शक्य नाही. यात अर्थापेक्षा शब्दरचना, नाद आणि ठेका यालाच अधिक महत्त्व असल्याचे दिसते.

लहान मुलांचा आणखी एक खेळ म्हणजे सर्व मुलांनी आपआपले दोन्ही तळहात बोटांवर उभे ठेवायचे. मग प्रत्येकाच्या हाताला बोटाने स्पर्श करीत एकजण गाणे गातो. ज्या मुलाच्या हाताशी गाणे संपते त्याने आपला तळहात मागे लपवायचा असतो. शेवटी ज्याचा हात राहतो त्याच्यावर राज्य येते. हा खेळही उत्तर भारतात बहुतेक सर्व ठिकाणी आढळतो. आणि याची गाणीही तऱ्हेतऱ्हेची आहेत. एक गाणे आहे—

*अटकन बटकन*
*दही चटोकन*
*राजा गये दिल्ली*
*सात कटोरी लाये*
*एक कटोरी टूट गयी*
*राजाकी टांग टूट गयी.*

असेच एक दुसरे गाणे आहे—

*अक्कड़ बक्कड़ बंबे बो*
*अस्सी नव्वे पूरे सौ*
*सौ सलिका कित्तर बाजा*
*अपना अपना भाग जागा.*

राजस्थनाता गातात—

*अटकण बटकण दही चिटोकण*
*आला गीला बाँस कटीला*
*चील बैठी अलणै पलणै*
*गीगो चाल्यो टलणै मलणै*

हा खेळ मला काश्मीरमध्येही आढळला. आणि त्यावेळचे गाणे मिळाले ते असे—

*हुकुस बकुस*
*तोलि वन् चकुस*

*ओनुम् वतुक लोटुम देग्यि*
*शाल किच किच वांगनो*
*ब्रिमिज हारस पूँयं छोकुम्*
*ब्रिमिज बेन्ये टेकिस ख्यखा.*

—तो कोण आहे? मी कोण आहे? आणि सांग बघू तू कोण आहेस? मी माझ्यासाठी पातेल्यात वदक शिजायला घातले आहे. तू मात्र फक्त वांगीच खा. मी आषाढ महिन्यात 'ब्रिमिज' वृक्षावर पाणी शिंपडले आहे. ब्रिमिज माझी वहीण आहे. तिच्या मस्तकावर मी कुंकुमतिलक लावतो.

खेळाचे गाणे असूनही या काश्मीरी गीताचा अर्थ उल्लेखनीय आहे. विशेषत: ब्रिमिज नावाच्या विशिष्ट वृक्षाला बहीण मानून तिला कुंकू लावण्याची कल्पना मोठी सुंदर आहे.

महाराष्ट्रातील फुगडीही मला काश्मीरात आढळली. आणि महाराष्ट्रातील मुली ज्याप्रमाणे फुगडी खेळताना गाणे गातात त्याप्रमाणे काश्मिरातील छोट्या छोट्या मुली देखील गाणे गातात. त्यांच्या गाण्याच्या ओळी आहेत—

*दोह पँश ल्वकचार*
*हक चयू चयू.*

अर्थ मोठा सुरेख आहे—बालपण क्षणभंगुर आहे. परमात्मा अमर आहे.

अशा तऱ्हेने आणखीही अनेक खेळ सर्वत्र समान स्वरूपात आढळतात म्हणजेच त्या खेळांची पद्धत सारखीच आढळते. अर्थातच त्यांची गाणी देखील आढळतात. विस्तारभयास्तव ती सर्व येथे देणे शक्य पाही. या खेळाच्या गाण्यां-पैकी काहींना अर्थ आहे. पण बऱ्याच ठिकाणी निरर्थक शब्दरचनाही आढळते. ती शब्दरचना बहुधा खेळाच्या हावभावानुसार असते. त्यामुळे खेळाला एक प्रकारची लयबद्धता येते. नाहीतरी मुलांना गुपचूप बसून खेळणे काही आवडत नाही. आणि गुपचूप बसून खेळण्यात काही मजाही नसते. आपण नेहमी बघतो की खेळताना आरडाओरडा करण्यात मुलांना गंमत वाटत असते. खेळताना मुले जर गाऊ लागली तर आरडाओरडा न होता खेळ शिस्तीने चालतो आणि खेळाकडे मुलांचे लक्षही लागते.

मुलांच्या बैठ्या खेळांच्या गाण्यात कित्येकदा मालाकथाही आढळते. एका दमात सर्व कथागीत ऐकविण्याची चढाओढ कित्येकदा मुले लावतात. शिवाय गोष्ट सांगताना त्यात चूक होता कामा नये चूक झाली की बाकीची मुले हुर्यो करायला टपलेलीच असतात. लहान मुलांच्या स्मरणशक्तीची ज्ञानाची, पाठांतराची एकप्रकारे ही कसोटीच असते. या मालाकथाही सर्व प्रांतातून आढळतात. एक हिंदी कथागीत आहे—

*अलमें गई, दलमें गई*
*दलमेंसे लकडी लायी*
*लकड़ीने दिया हुक्का*
*हुक्केने दी रोटी*
*रोटी दी कुम्हारको*
*कुम्हारने दी मटकी*
*मटकी दी अहीरको*
*अहीरने दी भैंस*
*भैंस दी राजाको*
*राजाने दी रानी*
*रानीने दी कटोरी*
*कटोरीने दी ढोलक*
*बज री मेरी ढोलकिया*
*बज री मेरी ढोलकिया*
*रानीके बदले आयी तू*
*रानीके बदले आयी तू.*

या गाण्यात थोडीफार सुसंबद्धता तरी आहे. तर्कशुद्ध काही नसले तरी लहान मुलांना सहज पटण्यासारखा व्यवहार आहे. राणीच्या बदल्यात ढोलकी आली यात त्यांना काहीच वावगे वाटत नाही. सारे काही क्रमाने घडल्यासारखे वाटते. आणि लहान मुलांच्या मनोरंजनासाठी, खेळासाठी हे पुरेसे आहे.

पण काही मालाकथांमध्ये मात्र अशी सुसंबद्धता आढळत नाही. एका

नेपाळी गाण्यात वर्णन आहे—'वाघिणी, सिंहिणी आल्या आहेत. बाळ उंदीर मारून जवळच बसला आहे. आणि मेलेला उंदीर त्याने आपल्याजवळ ठेवलेला आहे. बाळाला तेथे सुई मिळाली. ती सुई शिंप्याला दिली. शिंप्याने टोपी दिली. टोपी गवळ्याला दिली. गवळ्याने गवत दिले. गवत गाईला दिले. गायीने दूध दिले. दूध गंगेत टाकले. गंगेने गाव दिला. गाव राजाला दिला. राजाने घोडा दिला. घोडा पळून गेला आणि मी माघारी आलो.' या गीतातील सुरुवातीच्या वाघिणी, सिंहिणी आणि मेलेला उंदीर यांचा फारसा संबंध दिसत नाही.

याहूनही अधिक निरर्थक शब्दरचना कित्येकदा आढळते. मालगाडीप्रमाणे शब्दाला शब्द जोडून गाणे तयार झालेले असते. उदा० एक राजस्थानी गाणे आहे :—


*कहाणी कूँ रै कागला*
*हूँकारो भरै वैया*
*बैया चोर चुगावता*
*लोगां नै भुळावता*
*लोग म्हानै मारता*
*इटियो बिटियो वाईको*
*कांगसियो भोजाइ को*
*काळै घोड़ै मैं चढूँ*
*फेर मारूँ कामड़ी*
*रामगढ ल्यूँ*
*रामगढ़में हेलो फिरग्यो*
*बारा मास खण्डेलो फिरगो*
*खण्डलैमें लागी लाय*
*छान झूँपड़ा भाग्या जाय*
*चीड़ी दळै दाळ*
*माकड़ बोल्यो हूँ*
*भड़भूँजै नै खाऊँ!*

—कावळी गोष्ट सांगते. बयापक्षी हुंकार देतो. बया पक्ष्याला चोर दाणे घालतात. लोकांना फसवितात. लोक मला मारतात. ताईची खळेणी. वहिनीचा कंगवा. काळ्या घोड्यावर मी चढणार. मग भावळ्यांना मारणार. रामगड जिंकणार. रामगडात दवंडी फिरविली. बारा महिने राजदंड फिरला. राजदंडाला लागली आग. गोठे झोपड्या सर्व पळून जात आहेत. चिमणी दाळ दळते. माकड म्हणाले—हूं, मी चुरमुरेवाल्याला खाणार.

यात 'रामगड'च्या जागी इतर गावांची नावे घालून मुले हे गीत खूप लांबलचक करतात आणि आपल्या ज्ञनाची प्रौढी समवयस्क मित्रांसमोर मिरवतात. गीतातील ओळींचा परस्परांशी फारसा संबंध नसल्याचे उघड आहे.

या सर्व गीतांखेरीज बाळराजाच्या पहिल्यांदा अन्नप्राशन करण्याच्या, जावळ काढण्याच्या आणि मुंज करण्याच्या प्रसंगावरील लोकगीतेही आपल्याला भारतातील सर्व प्रांतांमधून कमीअधिक प्रमाणावर आढळतात. महाराष्ट्रात बारसे करून नामकरणसंस्कार करण्याची प्रथा आहे, तशी अन्य प्रांतातून पाहण्यात आली नाही. नामकरण संस्काराचा समारंभ असा आढळला नाही. त्यामुळे त्याची गाणीही ऐकण्यात आली नाहीत. 'सोहर' च्या गाण्यांचा विचार आपण वर केला आहेच! पण नामकरणाची गाणी जरी आढळत नसली तरी बाळराजाचे जावळ काढण्याची आणि मुंज करण्याची गाणी विपुल प्रमाणावर आढळतात. यांपैकी जावळ काढण्याच्या प्रसंगावरील गीतांमधून जावळ काढण्याच्या तयारीचे व त्याप्रसंगी बाळाच्या आत्येला देण्यात येणाऱ्या भेटीचे वर्णन प्रामुख्याने आढळते. मुंजीच्या गीतांमधून कोणी कापूस लावला, कोणी सूत कातले, कोणी त्याचे जानवे तयार केले, याचे आणि बाळाच्या भिक्षावळीचे, त्यावेळच्या उत्सवाचे वर्णन अधिक आढळते. काही गीतांमधून 'बाळा तू अध्ययनासाठी काशीला जाऊ नकोस. येथेच अभ्यास कर, तुझ्या पंतोजीला अमुक अमुक वस्तू देऊ असे वर्णन केलेले आढळते. अन्नप्राशनाच्या गाण्यांमधून बाळासाठी खीर कशी तयार करण्यात आली याचे वर्णन आढळते. ही सर्व गाणी बाळराजाविषयींची असल्यामुळे कित्येकदा शिशुगीतांमध्ये त्यांचा समावेश करण्यात येतो. पण या गाण्यांमधून बाळाच्या कौतुकाचा भाग थोडा आणि अवांतर उत्सवाचा, त्यावेळी काय काय करतात याचाच भाग अधिक असल्यामुळे संस्कार गीतांमध्ये त्यांचा समावेश करावा असे आम्हांला वाटते.

आतापर्यंत केलेल्या सर्व विवेचनावरून लोकगीतांचा हा विभाग किती समृद्ध आहे याची कल्पना येण्यासारखी आहे. नादमाधुर्य, साधीसुधी शब्दरचना, एक प्रकारची सहजता ही या गीतांच्या शैलीची वैशिष्ट्ये आहेत. आणि बाळाप्रति मातृहृदयातील वत्सलभाव, तज्जनित कौतुकभावना हा या गाण्यांचा प्रमुख विषय आहे. हे कौतुक निरनिराळ्या कल्पनांचे आवरण घेऊन व्यक्त झालेले आहे. त्यात कल्पनाजन्य वैभवाचाच भाग बराच आहे. प्रत्यक्षात साधा रंगीत पाळणा बाळासाठी मिळण्याची मारामार असली तरी गाण्यातील पाळणा मात्र रत्नजडित असतो. त्याला रेशमी दोर असतो. त्यात मखमली गाद्याउश्या असतात, त्यावर जरीच्या तारांचे भरतकाम केलेले असते. पण असे असले तरी ही गाणी म्हणजे फक्त कल्पनेची कसरत वाटत नाहीत तर मातृहृदयातील नैसर्गिक भावनेच्या प्रामाणिक आविष्कारामुळे सजीव वाटतात. आणि हृदयाचा ठाव घेतात, मुखात घोळत राहतात. हाच सजीवपणा मुलांच्या खेळांच्या गाण्यांमधूनही आढळतो. प्रत्यक्षात खेळताना मुलांमध्ये जो उत्साह ओसंडून वहात असतो तोच जणु शब्दरूप घेत असतो. त्या शब्दांना कित्येकदा अर्थ नसतो, त्यांची रचनाही सुसंबद्ध नसते पण त्यांचे वैचित्र्य जसे वैशिष्ट्यपूर्ण आहे तसाच त्यांचा ठसठशीतपणाही उल्लेखनीय आहे.



# हिन्दी के बालगीत

डॉ. कृष्णदेव उपाध्याय
एम. ए.; पीएच्. डी.

हिन्दी :के लोग साहित्य को अनेक प्रकार से विभाजित किया जा सकता है। उनका प्रत्यय वर्गीकरण संस्कार की दृष्टि से हो सकता है। पुत्रजन्म, मुण्डन, यज्ञोपवीत, विवाह तथा द्विरागमन (गवना) आदि संस्कारों के अवसरपर स्त्रियाँ अनेक प्रकार के गीतों को गाती है। ऋतुओं की दृष्टि से भी इन गीतोंका विभाजन हो सकता है। विभिन्न मासों तथा विभिन्न ऋतुओं में भिन्न भिन्न प्रकार के गीत गाये जाते है। उदाहरण के लिए यदि सावन के मन भावन मास में कजली गाई जाती है तो फागुन में होली का हुरदंग सुनाई पड़ता है। यदि चैत्र के महीने में ग्रामीण गायक "हमरी अटरिया हो रामा सुगना बोले हो" के मधुर संगीतसे जन-मन का अनुरंजन करता है तो बारह मासा को गाकर वह जनता के हृदय को करुण रस के प्रवाह लेभर देता है। कुछ गीत विशेष जाति के लोगों द्वारा गाये जाते हैं। यदि अहीर (ग्वाला) लोगों का राष्टीय गान बिरहा है तो दु:लाघ नामक जाति के लोग पचए (देवी की स्तुति संबंधी गीत) गाने में सिद्ध हस्त माने जाते है। इसी प्रकार

से अन्य जातियाँ भी किसी न किसी गीतको गाने में विशेष प्रवीण समझी जाती है।

हिन्दी के लोकगीतों का वर्गीकरण निम्नांकित पद्धति से भी किया जा सकता है।

(१) पुरुषों के गीत
(२) स्त्रियों के गीत
(३) बालकोंके गीत

ऋतुसंबंधी गीतों की चर्चा अभी की जा चुकी है। इन गीतों को प्रायः पुरुष ही गाते हैं। इसके अतिरिक्त लोकगाथायें—जैसे आल्हा, लोरकी, विजयमल सोरठी, गोपीचन्द–भरथरी आदि—पुरुषों के द्वारा ही गान का विषय बनाई जाती हैं। संस्कार संबंधी गीत स्त्रियों के कल कण्ठ द्वारा ही गाये जाने पर कानों को मधुर लगते हैं। तीसरे प्रकार के वे गीत हैं जिन्हें 'बालकों के गीत' या बाल-गीत कहा जाता है। इन गीतों को तीन श्रेणियों में विभक्त किया जा सकता है।

(१) पालने के गीत (Cradle songs)
(२) धाय के गीत (Nursery Rhymes)
(३) खेल के गीत (Play–sogns)

इनमें से प्रथम दो प्रकार के गीतों को माता या धाय गाती हैं और अन्तिम प्रकार के गीतों को बालक विभिन्न प्रकार के खेलों को खेलते समय स्वयं गाते हैं।

जो लोग श्रीमान् हैं तथा धन धान्य से परिपूर्ण हैं उनके यहाँ छोटे बच्चों को खेलाने के लिए धाय (दाई) रखी जाती है। परन्तु जो लोग लक्ष्मी के कृपा कटाक्ष से वंचित है, जो मध्यम तथा निम्न श्रेणी के लोग हैं उनके घरों में यह कार्य माता के ही द्वारा किया जाता है।

मातायें छोटे बच्चों को पालने पर सुला देती हैं। वे शीघ्र ही निद्रा देवी के कृपा पात्र बन जाँय इस लिए वे उन्हे थपकियाँ देती हैं अर्थात उनकी पीठ को हाथ से थपथपाती है। जब बच्चे रात को देर तक नहीं सोते अथवा वे किसी कारण से रोने लगते हैं तब मातायें उन्हें सुलाने के लिए लोरियाँ

सुनाती है। इन पालने के गीतो तथा लोरियों को गाने का समय प्रायः रात हुआ करती है जब माता भोजन के उपरान्त बच्चें को सुलाने जाती हैं।

## प्राचीन परम्परा

पालने के गीत उतने ही प्राचीन हैं जितना मानव का इस पृथ्वी पर आविर्भाव। जब मानव का जीवन अपनी बाल्यावस्था में था तब भी ये गीत गाये जाते थे और आज आधुनिक सभ्यता की यौवनावस्था में भी उन गीतों का प्रचार उसी रूप में पाया जाता है। आज भी ग्रामीण स्त्रियाँ अपने बच्चोंको लोरी गा गाकर सुनाती हैं जिस प्रकार से प्राचीन कालमें वे गाती थीं।

प्राचीन भारतीय (संस्कृत) साहित्य में पालने के गीत पाये जाते हैं। महाभारत में मदालसा का उपाख्यान उपलब्ध होता है जो अपने बालशिशु को सुलाते समय गीतों को गाती है। मदालसा के इन गीतों में दर्शन शास्त्र–अद्वैत वेदान्त–के गूढ़तत्त्वों का समावेश हुआ है। पुत्र–वत्सल मदालसा अपने छोटे बच्चे–जिसका नाम अलर्क था–को सम्बोधित करती हुई कहती है कि ए पुत्र, तुम शुद्ध, बुद्ध और निरंजन हो। तुम संसार की माया से रहित हो। तुम मोह-निद्रा को छोड़कर सुखपूर्वक सोवो।

*"त्वमसि तात ! शुद्ध ! बुद्ध ! निरंजन !*
*भव मायावर्जित ज्ञाता।*
*भव स्वपनं च, मोहनिद्रां त्यज,*
*मदालसाह सुतं माता"*

रोते हुए अपने बच्चे को सम्बोधित करती हुई मदालसा पुनः कहती है कि ए मेरे प्रिय पुत्र! तुम नाम से रहित हो, तुम शुद्ध हो। न तो यह शरीर ही तुम्हारा है और न तुम हलके हो। अतः तुम क्यों रो रहे हो?

*"नामविमुक्तः शुद्धअसि रे सूत !*
*मया कल्पितं तव नाम।*
*न ते शरीरं न चास्य त्वमसि,*
*किं रोदिषि त्वं सुखधाम"*

विदुषी तथा शास्त्रो की ज्ञाता मदालसा पुनः कहती है कि हे पुत्र!

ब्रह्म सत्य है, वह मल से रहित अर्थात विमल है। वह ज्ञानस्वरूप और संसार का स्वामी है।

*"विमलविज्ञान विश्वेश्वर व्यापक*
*सत्यं ब्रम्ह त्वमसि ज्ञाता।*
*प्राह मदालसाअलर्कसुतं प्रति*
*शास्त्र प्रसिद्धा परमात्मा॥"*

इससे पता चलता है कि प्राचीन भारत में भी लोरियो के गाने की प्रथा थी और उनमें तत्त्वज्ञान का गहरा पुट होता था।

## बाल गीतों का वर्ण्य विषय

आधुनिक काल में जो पालने के गीत या लोरियाँ उपलब्ध होती हैं उनमें वर्ण्य विषय का प्रायः अभाव पाया जाता है। न तो उनमें संस्कृत के पालने के गीतों के समान दर्शन शास्त्र का पुट ही उपलब्ध होता है और न अंग्रेजी की लोरियों में वर्णित विश्वासघाती पिता के प्रति निन्दा ही प्रकट की गई है। यह कहना कुछ अनुचित न होगा कि हिन्दी में उपलब्ध पालने के गीतों में वर्ण्य विषय का नितान्त अभाव है। चूँकि इन गीतों का प्रधान उद्देश्य बालको को सुलाना है। अतः इन गीतों में ऐसे श्रुतिमधुर शब्दों तथा वर्णो का विन्यास किया गया है जिनका प्रभाव बालक के मन तथा इन्द्रियों पर सुखद एवं सुन्दर पड़े और वह इन गीतों के नाद-माधुर्य से ही निद्रादेवी के वश में हो जाय। ग्रेस रीज़ ने इस संबंध में बड़ी ही सटीक बात कही है। उनका कथन है कि वही 'लोरी' सबसे अच्छी है जिन्हें किसान की स्त्रियाँ गाती हैं। इन गीतों में अधिक से अधिक दो या तीन शब्द होते हैं। इन गीतों का मधुर स्वर झूलते हुए पालने की ध्वनि से समानता रखता है और छोटे बच्चों के स्नायुजाल के ऊपर मधुर प्रभाव डालता है।[1]

---

१. "The best lullaby would seem to be that sung naturally by peasant mothers with but two or three words and sung on two notes—a sort of soothing drone, corresponding exactly to the sound of a rocking cradle and having apparently the same effect on the nerves of the child."—Grace Rhys–Cradle songs and Nursery Rhymes.

छोटे छोटे बच्चों में लय पूर्ण गीतों को सुनने की भावना जन्मजात होती है। वे उन मधुर गीतों को सुनकर सुखका अनुभव करते हैं तथा शीघ्र ही निद्रा देवी की गोदमें चले जाते हैं। इसीलिए पालने के गीतों में वर्ण्य विषय पर तनिक भी ध्यान न देकर, ऐसे वर्णों की योजनापर ही विशेष बल दिया जाता है जो एक निश्चित क्रमसे स्वर-साम्य को उत्पन्न कर सके। इन गीतों में समान स्वर या ध्वनि को उत्पन्न करने के लिए एक ही वर्ण की अनेक बार आवृत्ति की जाती है। उदाहरण के लिए यह निम्नांकित बाल-गीत लीजिए।

*"हाल हाल बबुआ।*
*कुरुई में ढेबुआ।*
*माई अक सरूआ।*
*बाप दर बरूआ।*
*हाल हाल बबुआ।*

यहाँ प्रत्येक पंक्ति के अन्तिम शब्द बबुआ, ढेबुआ, अकलऊआ दरबरुआ और बबुआ में समान रूप से ध्वनि-साम्य को उत्पन्न करने के लिए एक समान वर्णों की योजना की गई है।

एक दूसरा उदाहरण लीजिये जिसमें समान स्वर वाले वर्णों तथा शब्दों की पुनरावृत्ती ध्वनि साम्य को उत्पन्न करने के लिए उपलब्ध होती है।

*"अरर बरर पूजा पाकेला।*
*चीलर खोहँदा नाचेला।*
*चीलर महले चोर।*
*मोर बाबू के मुँहळा गोर।"*

इस गीत में अरर-बर, पाकेला, नाचेला थोर और गोर इन शब्दों में एक ही प्रकार के व्यजन तथा स्वरों का समावेश किया गया है। इस लिए इन गीतों की विशेषता इनके शब्दों-स्वर तथा व्यञ्जोनों की योजना में ही निहित है।

---

१. They do not bear translating. Their charm lies in the words themselves, often half meaningless and the monotonous cadence of mother's chant.
Grace Rhys—Cradle songs and Nursery Rhymes.

लय तथा स्वर-प्रधान होने के कारण इनका अनुवाद किसी दूसरी भाषा में करना नितान्त कठिण है।

ग्रीष्मऋतु की भीषण गर्मी से व्याकुल होकर, जब हिन्दी प्रदेश की मातायें अपने घर के आँगन में आकाश के चँदवा के नीचे सोती है, तो वे आसमान तथा पृथ्वी को समान रूप से अपनी चाँदनीसे प्रकाशित करनेवाले चन्द्रमा अथवा चाना मामा-की ओर अंगुली से निर्देश करके उसे अपने बच्चों को दिखलाती है। जब बच्चा दूध पीने में आनाकानी करता है तब पुत्रवत्सला माता अपने बच्चे को दूध पिलानेके लिए 'चाना मामा' का आवाहन करती है और सोने के कटोरे में दूध और भात ले आने की उनसे प्रार्थना करती है। वह धीरे धीरे नीचे लिखे गाने को गाती है?—[1]

*"चाना मामा आरे आवऽ पारे आवऽ।*
*नदिया किनारे आवऽ।*
*सोना के कटोरवा में दूध-भात लेले आव*
*बबुआ के मुहवाँ में,।*
*घुटुऽक; घुटुऽक।"*

इस गीत के नाद-माधुर्य को सुनकर बच्चा प्रसन्न हो जाता है और वह प्रेम से दूध पीने लगता है। बच्चों को सुलाने के लिए भी इस गीत का उपयोग बहुधा किया जाता है।

कहीं कहीं पालने के इन गीतों में पुत्र के प्रति माता का स्वाभाविक प्रेम दिखाया पड़ता है। माता प्राणों से प्यारे अपने पुत्र को बड़े प्रेम से पुचकारती हुई उसे पालनेपर सुलाती है और अपने हृदय के भावों को अनेक प्रकार से प्रकट करती है। भोजपुरी के एक बालगीत में माता अपने पुत्र से कहती है कि हे पुत्र! तुम किस वस्तु से बने हुए हो? तुम मुझे कभी सोने (सुवर्ण) के रूप में दिखाई पड़ते है और कभी चाँदी के रूप में। अर्थात तुम्हीं मेरे

१ सुप्रसिद्ध फिल्म गायिका लता मंगेशकर ने अपने कोकिल-कण्ठ से इस गीत को गाकर इस में वह अपूर्व नाद माधुर्य भर दिया है जिसका वर्णन लेखनी से परे है!

जीवन के सर्वस्व हो। तुम्हारे सामने अन्य लोग तो मुझे मिट्टी के समान (अर्थात् तुच्छ) दिखाई पड़ते हैं।[1]

> *"ए बबुआ ! तू कथी के ?*
> *खने रूपा, खने सोना के ?*
> *माई लवँग के, बाप चडवा चन्नन के।*
> *पितिया पीतम्बर के, लोग बिराना माटी के।*
> *ए बबुआ तू कथी के,*
> *खने सोना खने रूपा के"।*

हिन्दी के लोकगीतों में मामा (माता का भाई) का एक विशेष स्थान है। जब किसी स्त्री को पुत्र उत्पन्न होता है तब उसका भाई–अर्थात् नव जात शिशु का मामा–उपहार स्वरूप में बालक के लिए वस्त्र तथा आभूषण लेकर आता है। इसी प्रकार से पुत्र तथा पुत्री के विवाह में भी मामा की बड़ी आवश्यकता पड़ती है। पालने के गीतों में भी बालक के मामा का बार बार उल्लेख पाया जाता है।

> *"घुघुआ माना, उमजे घाना।*
> *एहि मुँहे अहले बबुआ के **मामा**।*
> *नाक दुनो घइके इदा दिहले काना।*
> *ओही में पहिरा दिहले सोने के बाना।*
> *नयी भीति उठेले पुरान भीति गिहेले,*
> *सँमरिई बुढ़िया दाई।*
> *तोरा हाथ मे मिठाई।*
> *लड़िका तूरि तूरि खाई।"*

छोटे बच्चों को दूध पिलाना एक टेढ़ी खीर है, अपनी माता के स्तन्य का पान वे भले ही कर लें परंतु गाय या बकरी का दूध उन्हें पिलाना कुछ सरल काम नहीं है। माता यशोदा को भी बालक कृष्ण को दूध पिलाने में

१ डा० कृष्णदेव उपाध्याय—भोजपुरी लोक साहित्य का अध्ययन।

अनेक कठिनाईयों का सामना करना पड़ा था तथा अनेक प्रकार के झूठे-सच्चे प्रलोभन देने पड़े थे।

*"मइया कबहिं बढैगी चोटी।*
*किती बार मोंहि दूध पियत भयो*
*यह अजहूं है छोटी॥"*

इन पंक्तियों में महाकवि सूरदास ने इसी तथ्य का उद्घाटन किया है।

हिन्दी प्रदेश की माता भी अपने बालक को दूध पिलाने का बड़ा प्रयास करती है। वह अपने बच्चे से कहती हैं कि गाय ने अभी पहिली बार बच्चा दिया है। इसका दूध मीठा और गाढ़ा है। इसलिए तुम इसके दूध को खूब पियो। दो पालने के गीत लीजिए:--

*"बबुआ के गइया आँटी।*
*दूधवा ले आहवि भरि काँटी।*
*मोर बबुआ पियसु भरि काँटी।"*

मिट्टी के छोटे से जिस पात्र में दूध दूहा जाता है उसे काँटी कहते है।

*"आउ रे गइया अगरी;*
*दूधवा ले आऊ भरि गगरी।*
*मोर बबुआ पियसु भरि गगरी"*

इन दोनों गीतों को बालक को दूध पिलाने के लिए गाया जाता है।

लोकसाहित्य के सुप्रसिद्ध विद्वान् श्री झवेरचन्द्र मेघाणी ने गुजरात प्रदेश के बाल-गीतों को दस भागों में विभक्त किया है। जैसे (१) चलने कूदने के गीत (२) ऋतुसंबंधी गीत (३) पशुपक्षी संबंधी गीत (४) चाँदनी रात के गीत (५) खेल संबंधी गीत और (६) गरबा एवं रास के गीत। हिन्दी प्रदेश में भी इस प्रकार के गीत उपलब्ध होते हैं। व्रज, अवध, बुन्देल खण्ड तथा कुरुप्रदेश में बालकों के विचित्र खेलों से संबंध रखने वाले अनेक गीत हैं जिन्हें बच्चे उन खेलों को खेलते समय गाते हैं।

## खेल संबंधी गीत

उत्तर प्रदेश के पूर्वी और बिहार राज्य के पश्चिमी जिलो में कबड्डी और गुल्ली डंडा का बड़ा प्रचार है। इन खेलों को प्रायः बालक ही खेलते हैं। यद्यपि कभी कभी युवा पुरुष भी इन खेलों में भाग लेते हुए पाये जाते हैं। बालकों के खेल में कबड्डी सबसे अधिक लोकप्रिय और प्रसिद्ध है। पहिले बालक बराबर संख्या में दो दलों में विभक्त हो जाते हैं। उनके बीच में एक रेखा खींच दी जाती है। एक दल का बालक उस रेखा को पार कर दूसरे दल की सीमा में चला जाता है। वह दूसरे दल के किसी बालक को छूकर अपने दल में वापस आ जाता है। इस सारी क्रिया को 'कबड्डी पढ़ाना' कहते है। कबड्डी पढ़ाते समय बालक अनेक प्रकार के गीतों को गाते रहते हैं जिनका कुछ अर्थ नहीं होता परन्तु उनमें नाद साम्य अवश्य उपलब्ध होता है।

यह गीत लीजिए :—

*"कबड़ी में लबड़ी पाताल हाहाराई।*
*चील्ह कउआ हाँक पारे बाघ लरि आई।"*

कबड़ी और लबड़ी में नाद–साम्य बड़ा सुन्दर है।

*"ए कबड़िया रेता; भगत मोर बेटा।*
*भगताइन मोरी जोरी, खेलबि हम होरी।"*

कबड्डी के गीत को गाते समय उच्चारण में विराम नहीं करना चाहिए। परन्तु कुछ बालक श्वास लेने का अवकाश प्राप्त करने के लिए नीचे लिखे गीत को गाते है।

*"आम छू, आम छू; कबड़ी झनक छू।*
*आम छू; आम छू, कउडी बादाम छू।"*

हार जाने पर भी खेलने के लिए सदा उद्यत रहने को "दाव खेलाना" कहा जाता है। खेल में पराजित हो जाने के कारण जो बालक 'दाव खेलाने' के लिए तैयार नहीं होता उसकी निन्दा करते हुए अन्य बालक निम्नांकित गीत गाते हैं।

*"हामार दडवा ना खेलावे ओकर माई गुजरी*
*खाले गिरगिटवा, बिआले मुसरी।"*

इस गीत में गूजरी शब्द ग्वालिन का पर्यायवाची है। किसी उच्च कुल के बालक की माता को गूजरी कहना निश्चयही उसके लिए अपमान जनक है।

छोटे छोटे बालक अपने एक हाथ पर दूसरा हाथ रख कर एक खेल खेलते हैं और खेल के मध्य में यह गीत गाते हैं।

*"ताई ताई पुरिया, घीवमें चमोरिया।*
*हम खाई कि मडजी खाई*
*मडजी पतरोंगिया॥"*

कभी कभी बालक 'चुप्पी नामक खेल खेलते हैं जिसमें सभी बालकों को कुछ समय के लिए मौन धारण करना पड़ता है। उन बालकों में से एक बालक निम्नांकित गीत को गाता है.--

*"ओका, बोका, तीन तड़ोका;*
*लडआ लाठी, चन्दन काठी।*
*बाग में बगडवा ड़ोले,*
*सावन में करहला फूले,*
*ओ करहला के नाँव का,*
*इजइल, विजइल, पानवा, फुलवा*
*पूअवा पचक।"*

छोटी छोटी लडकियाँ एक प्रकार का नृत्य करती हैं जिसमें दो बालिकायें एक दूसरे के दोनो हाथों को पकड़ कर वृत्ताकार में घूमती हैं। इस खेल को 'झाका झूमरि' कहते हैं। इस प्रकार के खेल में जितनी ही अधिक लडकियाँ भाग लेती हैं वह इतना सुन्दर लगता है। वे नृत्य करते समय इस गीत को गाती हैं।

*"एक हाड़ी झिंकड़ा, बड़ेरी लागे घुँआ;*
*सासु पकवली गल गल पूआ।*
*अपने खइली घिअहवा पूआ,।*
*हमरा के दिहली तेलहवा पूआ।*
*ना खाइबि पूआ, खेलबि जूआ।*
*ना खाइबि पूआ, खेलबि जूआ॥"*

इस गीत की अन्तिम दो पंक्तियों को गाते समय लड़कियाँ वृत्ताकार में बड़ी द्रुतगति से नाचने लगती हैं।

अनेक बाल गीत जानवरों से संबंधित हैं। बालक जब किसी जानवर को देखते हैं तब उससे संबंधित गीत को वे गाने लगते हैं। गीदड़ बड़ा ही डरपोक जानवर है। वह जनसमुदाय को देखकर भागने लगता है। इस गीदड़ के संबंध में यह गीत है।

*"एक देखि लपकी, दुई देखि झपकी।*
*तीनि देखि चलेला पराई॥"*

बन्दर बालकों के मनोरंजन का अनन्य साधन है। उसे देखते ही गाँवों के बच्चे जोरो से गाने लगते हैं।

*"चोकर के लिट्टी, कहलली के दाल।*
*ए बनरा तोर मुँहवा लाला।"*

साँड की पीट पर गर्दन के पास का भाग कुछ ऊँचा होता हैं जिसे हिन्दी (भोजपुरी) में 'बदुरि' कहते हैं। संस्कृत में इसे 'ककुद्' कहा जाता हैं। साँड को देखते ही छोटे छोटे बच्चे जोरो से आवाज करते हुए गाते हैं:—

*"साँड़वा के पीठि पीठि;*
*बदुरी बिआहल जाला।*
हे हाहा; हे हाहा;
हे हाहा हे॥"

इस प्रकार हिन्दी प्रदेश के बालकों के गीत कुछ कम मनोरंजक नहीं हैं। पालने के गीत प्राय: अर्थ से रहित हैं क्योंकि उनमें लय की ही प्रधानता है। फिर भी यदि इन गीतों का सम्यक संग्रह तथा सम्पादन किया जाय तो भारतीय संस्कृति के अनेक तत्व उनमें उपलब्ध हो सकते हैं।

विदेशों में लोकसाहित्य के संकलन, सम्पादन तथा प्रकाशन के संबंध में बड़ा ही प्रशंसनीय कार्य हो रहा है। अनेक अधिकारी विद्वानों ने वहाँ के

बालगीतों का संकलन कर वैज्ञानिक रूपसे उनका सम्पादन किया है। इंग्लैण्ड तथा स्कॉटलैण्ड के बच्चों के खेल के संबंध में अनेक पुस्तकें प्रकाश में आ चुकी हैं। पाश्चात्य विद्वान् अपने लोक साहित्य की सभी विधाओं का बड़े मनोयोग से मनन कर रहे है।

भारतवर्ष संसार के सभी देशों में लोकसाहित्य के क्षेत्र में सर्वाधिक समृद्ध है। इस महान् देश के प्रत्येक राज्य में सैकड़ो प्रकार के ऐसे खेल पाये जाते हैं जिन्हें लड़के और लड़कियां खेलती हैं। इन खेलों के अवसर पर अनेक गीत भी गाये जाते है जिनका अध्ययन सांस्कृतिक दृष्टि से बडा ही महत्त्वपूर्ण है। यदि इन बाल गीतों का तुलनात्मक अध्ययन किया जाय तो भारत की भावात्मक एकता का पता लगाया जा सकता है। अतः मुझे आशा ही नही बल्कि दृढ विश्वास है कि लोकसाहित्य का कोइ विद्वान इन बाल-गीतों को निकट भविष्य में अपने शोध का विषय बनायेगा।

REFBK 0016298
REFBK-0016298